म. ग्रं. मं. ठाणें
विषय
सं. नं.
सन १८५३

REFBK-0008054
REFBK-0008054

संवत १९५३

दा. नं.
८०४८

ता. ३-८-११

१७०२८
31/3/82



देवांचे वैद्य अश्विनीकुमार च्यवन ऋषींना

## तारुण्यप्राप्तीसाठीं "च्यवनप्राश" देत आहेत.

"**च्यवनप्राश**" हा पौष्टिक कल्प ताज्या आंवळ्यांपासून तयार करतात. च्यवन ऋषींनीं हा कल्प तारुण्यप्राप्तीसाठीं तयार करविला आणि पुढें तो एक पौष्टिक आणि बलवर्धक कल्प म्हणून हजारों वर्षांपासून वापरण्यांत येत आहे. या कल्पामध्यें आम्हीं संशोधिलेल्या **अष्टवर्ग** (बलवर्धक आठ वनस्पति) वापरल्या आहेत. आंवळ्यांमध्यें आतां **सी (C) व्हिटॅमिन** असल्याचाहि शोध लागला आहे. आम्हीं हा कल्प विशिष्ट पद्धतीनें तयार केला आहे. अग्निमांद्य, मलावरोध, स्वप्नावस्था, खर पडणें व क्षीणता यांमध्यें उपयुक्त असून याचे सेवनानें विशेषत: पचनेंद्रियें, मेंदू व मज्जातंतु कार्यक्षम बनतात.

(**धूतपापेश्वर इंडस्ट्रीज लि., पनवेल** मार्फत प्रकाशित)

# अभिनव योजना

आपल्या आवडत्या मुलांमुलींसाठीं—उच्च शिक्षण, घर, लग्न वगैरेंची उत्तम तरतूद करतां येईल अशी अभिनव योजना अत्यंत अल्प हप्त्यांत बसविली आहे.

सह्यादि विमा कंपनीची एजन्सी म्हणजे उदरनिर्वाहाचें मुख्य किंवा जोड धंदा म्हणून एक उत्कृष्ट साधन होऊन बसलें आहे. प्रतिनिधींना कामाचें शिक्षणही दिलें जातें. भरपूर कमिशन मिळतें व लायकी सिद्ध होतांच पगारी नोकरीही दिली जाते.

‘ सह्यादि ’ अल्प काळांत लोकप्रिय झाली आहे. तेव्हां आयुष्याचा विमा या कंपनींत उतरा व एजन्सी घेऊन भरपूर पैसाही मिळवा.

मुंबई, पुणें, कोल्हापूर, हुबळी, बेळगांव, कारवार, मडगांव, म्हापसा, नगर, धुळें, नागपूर, इंदोर, औरंगाबाद, दिल्ली वगैरे ठिकाणीं शाखा आहेत. अधिक माहितीसाठीं लिहा अगर भेटा.

**गो. ग. सौंदणकर**
मॅनेजिंग डायरेक्टर

**दि सह्यादि इन्शुरन्स कंपनी लिमिटेड, नासिक**

# क्रान्तिमार्गावरील ब्रह्मदेश

सं. क्रं. ३६११
स्थळ प्रत

लेखक

वि. त्र्यं. देशपांडे

किंमत दोन रुपये

रामकृष्ण बुक डेपो, मुंबई ४

प्रथमावृत्ति : १९५३

मुद्रक:—मा. ह. पटवर्धन, संगम प्रेस लि., ४०।४१ वेलस्ली रोड, पुणें १. प्रकाशक:—वि. र. बाम, रामकृष्ण बुक-डेपो, प्रार्थनासमाज नाका, गिरगांव : मुंबई ४

REFBK-0008054

REFBK-0008054

8058

# निवेदन

चार वर्षांपूर्वी ब्रह्मदेश स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावर असतां त्या देशामधील परिस्थितीचें निरीक्षण करण्याच्या उद्देशानें 'केसरी' चा प्रतिनिधी म्हणून मी ब्रह्मदेशास गेलों होतों. तिकडे गेल्यानंतर त्या देशामधील परिस्थिति व त्यापुढील प्रश्न यांसंबंधीं मीं पाठविलेलीं वार्तापत्रें 'केसरी' मध्यें प्रसिद्ध झालीं होतीं. साप्ताहिक 'नवयुग' दैनिक 'लोकशक्ति' 'भारत ज्योति' व 'ब्लिट्झ' यांमध्येंहि माझे त्या विषयींचे लेख प्रसिद्ध झाले.

हिंदुस्थानांत परत आल्यावर मी तिकडे असतां केलेल्या निरीक्षणाच्या व अभ्यासाच्या आधारावर पुस्तकही लिहिलें.

परंतु ब्रह्मदेश स्वतंत्र होतो न होतो तोंच त्या देशांत यादवीचा भडका उडाला. आपल्या पुस्तकांत अद्ययावत् परिस्थितीचें समालोचन केलेलें असावें, अशी माझी स्वाभाविक इच्छा असल्यामुळें, ब्रह्मदेशामधील परिस्थिति निवळेपर्यंत मला पुस्तकाचें प्रकाशन स्थगित ठेवावें लागलें. त्यामुळें माझें संकल्पित पुस्तक ब्रह्मदेशास जाऊन आल्यानंतर चार वर्षांनीं प्रसिद्ध होत आहे !

ब्रह्मदेशामध्यें युद्धोत्तरकाळीं निर्माण झालेली परिस्थिति, घडलेल्या घडामोडी, त्या देशांतल्या राजकारणामधील अंतःप्रवाह व त्यापुढें असलेले विविध प्रश्न यांचें विश्लेषण मीं या पुस्तकांत केलेलें आहे. तें करतांना कोणत्याही पूर्वग्रहाच्या अथवा मताच्या आहारीं न जातां, त्या देशांत घडणाऱ्या घडामोडींची पार्श्वभूमि वाचकांच्या दृष्टीसमोर उभी राहण्यास व त्यांचा अन्वयार्थ लावण्यास माझ्या पुस्तकाचें शक्य तेवढें साह्य व्हावें, असा उद्देश मी माझ्या दृष्टीपुढें ठेविलेला आहे. तो कितपत सिद्धीस गेलेला आहे, यासंबंधीं निर्णय देण्याचें काम माझें नाहीं.

कार्यव्याप्त असतांही, त्यांतल्या त्यांत वेळ काढून श्री. काकासाहेब गाडगीळ यांनीं पुस्तकास प्रस्तावना लिहून मला जें उत्तेजन दिलें, त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे.

धूतपापेश्वर इंडस्ट्रीज्चे संचालक व महाराष्ट्रांतील एक अग्रगण्य उद्योगपति श्री. नानासाहेब पुराणिक, न्यू सिटीझन बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. डी. डी.

९२८०२८
३७/३१४३

देशपांडे, सह्याद्रि इन्शुअरन्स कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. गो. ग. सौंदणकर, वेस्टर्न इंडिया इन्शुअरन्स कंपनीच्या मुंबई शाखेचे व्यवस्थापक श्री. नारळकर, व मुंबईचे सोन्या-चांदीचे प्रमुख व्यापारी श्री. हरचेकर यांनीं आपल्या जाहिराती देऊन पुस्तक-प्रकाशनाच्या कामीं मला केलेल्या साह्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

माझे स्नेही श्री. शं. वि. साल्ये, श्री. श्री. म. सहस्रबुद्धे व श्री. अं. शं. अग्निहोत्री यांनीं मला या बाबतींत साह्य केलें, तें केवळ स्नेहभावनेनें. त्यामुळें मी त्यांचे आभार मानल्यास तें त्यांना आवडणार नाहीं, याची मला जाणीव आहे; तरीही त्यांचे आभार मानल्यावांचून मला राहवत नाहीं.

मी ब्रह्मदेशास गेलों तो स्वतंत्र पत्रकार म्हणून, आपल्या स्वतःच्या जबाबदारीवर. 'केसरी'चे त्यावेळचे संपादक श्री. दा. वि. तथा बाबूराव गोखले, 'नवयुग'चे संपादक आचार्य प्र. के. अत्रे व ''लोकशक्ति''चे तेव्हांचे संपादक श्री. ह. मो. जोशी यांनीं केलेल्या साह्यामुळेंच मला माझी ती योजना सिद्धीस नेणें शक्य झालें, हें येथें कृतज्ञतापूर्वक नमूद करणें माझें कर्तव्य आहे. श्री. लालचंद हिराचंद यांनींही मला त्या बाबतींत साह्य केलें. या पुस्तकाच्या प्रकाशनाच्या प्रसंगीं मी त्यांचेही पुन्हा एकवार आभार मानतों.

भिडे बंगला, मालाड
३१-१२-१९५२

वि. त्र्यं. देशपांडे

# प्रस्तावना

*इ. स. १८८६ मध्यें ब्रिटिशांनीं ब्रह्मदेशावर पूर्णपणें आपला कबजा बसविला. तेव्हांपासून ते ४ जानेवारी १९४८ रोजीं म्हणजे ज्या दिवशीं ब्रह्मदेशानें आपलें स्वातंत्र्य औपचारिकरीत्या जाहीर केलें तोंपर्यंतच्या कालाचा राजकीय आढावा प्रस्तुत पुस्तकांत फार चांगल्या रीतीनें श्री. देशपांडे यांनीं घेतला आहे. ब्रिटननें ज्या ज्या देशावर आपला अंमल बसविला त्या त्या सर्व देशांतील इतिहास एका विशिष्ट नमुन्याबरहुकूम घडत गेलेला आढळून येतो. ब्रह्मदेश इंग्रजांचे ताब्यांत आल्यापासून इंग्लंडची दृष्टि तेथील राज्य-व्यवस्थेसंबंधीं जी हिंदुस्थातबाबत होती तीच होती. ब्रह्मदेशाच्या राज्यकारभारांत सुरुवातीपासून भारतीयांचा मोठा हिस्सा होता. ब्रह्मदेशामध्यें जपानी मोहिमेपूर्वी सुमारें १३ लाख हिंदी लोक होते; व त्यांपैकीं सुमारें २० हजारांवर सरकारी नोकरींत असून फार मोठ्या प्रमाणावर नागरी जीवनांत हिंदी लोकांचें वर्चस्व होतें. जमिनीपैकीं*

एक-चतुर्थांश जमीनीवर हिंदी लोकांची, विशेषतः चेट्टियर लोकांची मालकी होती. त्याचप्रमाणें हुन्नर क्षेत्रांत हिंदी कारागीर यांचाहि विशेष भरणा होता. किंबहुना असें म्हणतां येईल कीं राजकारण व अर्थकारण या क्षेत्रांत इंग्रज हे पहिल्या वर्गांत होते, हिंदी दुसऱ्या वर्गांत होते व १९२० पर्यंत तरी ब्रह्मी लोक हे कोठेंहि नव्हते असें म्हटल तरी चालेल. पहिल्या महायुद्धानंतर जी एक जागतिक जागृति झाली तिचा परिणाम ब्रह्मदेशावर झाला व १९१९ च्या कायद्याप्रमाणें ज्या सुधारणा अमलांत आल्या त्यांचा परिणाम ब्रह्मदेशांत ब्रह्मी लोकांत अधिक जागृति होण्यांत झाला. १९२० पासून हिंदुस्थानामध्यें जी राजकीय चळवळीची लाट उसळली तिचा परिणाम हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळण्यांत होणार हें इंग्रजांनीं ओळखून तेव्हांपासून ब्रह्मदेशांत त्यांनीं भेदनीतीचा अवलंब केला. १९२० ते १९३५ या पंधरा वर्षांत हिंदी व ब्रह्मी यांच्यांतील हितसंबंध दुरावले; आणि या महत्त्वाच्या काळांत ब्रह्मदेशांतील हिंदी लोकांनीं जें धोरण स्वीकारावयास पाहिजे होतें तें स्वीकारलें नाहीं. दक्षिण आफ्रिकेंत गांधीजींनीं तद्देशीयांबरोबर जी नीति स्वीकारली ती स्वीकारावयास पाहिजे होती. खुद्द ब्रह्मदेशांत हिंदुस्थानला मिळून राहावें असें म्हणणारा एक पक्ष होता. पण त्याचे हात हिंदी लोकांनीं बळकट केले नाहींत. परिणाम असा झाला कीं, ब्रिटिश हे वास्तविक शोषक असतांना इंग्रजांच्या कुटिल नीतीमुळें हिंदी हे शोषक आहेत असा ब्रह्मी लोकांचा समज कायम झाला. १९३६ सालीं ब्रह्मदेश हिंदुस्थानापासून वेगळा झाला. 'वाजपेय करार' म्हणतात तो झाला व त्याप्रमाणें हिंदी लोकांचा दर्जा यांत फरक पडला. अमेरी निवाड्याप्रमाणें ब्रह्मदेशाकडून सुमारे ९ कोटि रुपये हिंदुस्थानला मिळावयाचे असे त्यावेळीं ठरलें. त्यापैकीं व्याज अगर मुद्दल हें तर

मिळालें नाहींच पण तें देण्याची मान्यताहि नव्या सरकारनें दिलेली नाहीं ! तात्पर्य, ब्रह्मदेशाला वेगळें करून स्वायत्तता देण्याचा बहाणा करून इंग्रजांनीं साधलें. हिंदी व्यापाऱ्यांचें व सामान्य जनांचेंहि नुकसान झालें.

ब्रह्मदेश स्वायत्त झाल्यानंतर ब्रह्मदेशामध्यें ज्या राजकीय उलाढाली झाल्या त्यांतील प्रमुख घटनांचा व विचारप्रणालींचा प्रपंच सुबोधरीत्या प्रस्तुत ग्रंथांत केला आहे. प्रथम स्वातंत्र्य, नंतर समता व सुबत्ता या विचारसरणीनें ब्रह्मदेशामध्यें एकजूट झाली व 'फासापाला' या नांवानें ती प्रसिद्ध आहे. दहा वर्षांत हे एकजुटीचे प्रयत्न कसे झाले व कसे फसले व प्रत्येकवेळीं साम्यवादी ( कम्युनिस्ट ) पक्षानें कसा विश्वासघात केला याचें यथासांग चित्र या पुस्तकांत पाहावयास मिळेल. कम्युनिस्टांशीं सहकार अगर एकजूट याचा अर्थ पक्षाचे पदरांत निखारे घेणें आहे हा सार्वत्रिक अनुभव येथेंहि आला. देशी राजकारणांत परदेशी नेतृत्व स्वीकारल्यानें कसा घात होतो हेंहि ब्रह्मदेशाच्या गेल्या दहा वर्षांच्या घडामोडींवरून कळून येण्यासारखें आहे. युद्धकाळांत प्रथम जपानी आक्रमण व कबजा व त्यानंतर पुन्हा दोस्त राष्ट्रांचें व ब्रिटिशांचें आगमन, सार्वत्रिक संप, ब्रह्मदेशास स्वातंत्र्यप्राप्ति, आँग सान व त्याचे सहकारी मंत्री यांचे खून इत्यादि घटना सत्य व अद्भुत यांचा समन्वय दाखविणाऱ्या आहेत.

भारतानें वसाहतवाद नष्ट करण्याचे कामीं केवढी कामगिरी केली याचें एक उदाहरण ब्रह्मदेशाचें स्वातंत्र्य हें आहे. हिंदी स्वातंत्र्य-चळवळ व तिचें नेतृत्व याचा मोठा परिणाम ब्रह्मदेशाच्या संघर्ष व संघटन या दोन्ही क्षेत्रांतील इतिहासावर झाला आहे. ब्रह्मी स्वातंत्र्याचें प्राण आँग सान हे रामगड काँग्रेसला हजर होते. त्याचप्रमाणें ब्रह्मदेशाच्या घटनेवराहि हिंदी घटनेंत ग्रथित केलेल्या तत्त्वांचा परिणाम

झाला आहे. ब्रह्मी घटना ही संयुक्त घटना आहे. फक्त घटकांना दहा वर्षांनंतर स्वतंत्र होण्याचा हक्क ठेवला आहे. जमीनीबाबत ब्रह्मी घटना अधिक प्रागतिक आहे. जमीन राष्ट्राच्या मालकीची, वहिवाटणारीं कुळें व राज्यानें मान्य केलेली कृषि-योजना सर्वांवर बंधनकारक असें तिचें सामान्य स्वरूप आहे. खाजगी मालकी मर्यादित केली असून परकी भांडवलवाल्यांना सशर्त वाव दिला आहे. ब्रह्मी संघराज्य हें सहिष्णु राज्य असून इतर धर्मांना वाव ठेवून बुद्ध धर्माला विशेष मानलें आहे. पाली व संस्कृत भाषांना उत्तेजन देण्याचीहि व्यवस्था घटनेंत केली आहे. तात्पर्य, ब्रह्मदेश व हिंदुस्थान हीं जरी राजकीय दृष्ट्या स्वतंत्र व प्रभुत्वपूर्ण अशीं पृथक् राज्यें असलीं तरी इतिहास व भूगोल, संस्कृति व व्यापार, अतीत व भविष्य यामुळें जागतिक राजकारणांत अगदीं जवळजवळ आहेत. जगाच्या राजकारणाच्या दृष्टीनें हिंदुस्थानाइतकेंच महत्त्व ब्रह्मदेशाला आहे. आणि म्हणूनच सामान्यपणें ब्रह्मदेश व हिंदुस्थान यांचें परराष्ट्रीय धोरण तोंडवळ्यानें सारखें आहे. भौगोलिक दृष्ट्या साम्यवादी चीन ब्रह्मदेशाचे द्वाराशीं उभा आहे व मधून मधून डोकावून पहात आहे. ब्रह्मदेशांत अंतर्गत सुव्यवस्था व शांतता या दृष्टीनें अधिक महत्त्वाची बाब आहे. संभाव्य अशा तिसऱ्या महायुद्धांत ब्रह्मदेश ही महत्त्वाची बाब आहे व हें महायुद्ध टाळावयाचें असल्यास भारत व ब्रह्मदेश यांचें सहकार्य व सहयोग जगाच्या शांततेच्या दृष्टीनें इष्टच नव्हे तर आवश्यक आहे. या सर्व घटनांची पार्श्वभूमि समजून घेण्याच्या दृष्टीनें श्री. देशपांडे यांचा हा ग्रंथ अत्यंत उपयुक्त आहे. श्री. देशपांडे हे स्वतः ब्रह्मदेशांत वास्तव्य करून, माहिती घेऊन आले असल्यामुळें ग्रंथाचे उपयुक्ततेंत अधिक भर पडली आहे.

नवी दिल्ली<br>३-१-१९५३

**न. वि. गाडगीळ**

स्थळ प्रत

# अनुक्रमणिका


१. नवा ब्रह्मदेश — १

२. उध्वस्त जीवन — ६

३. ब्रह्मदेशाची काँग्रेस—' फासापाला ' — १४

४. फासापालाचे आधारस्तंभ
—समाजवादी पक्ष व पी. व्ही. ओ. — २८

५. फासापालाचा प्रतिस्पर्धी
—साम्यवादी पक्ष — ३६

६. ब्रह्मदेशांतील अल्पसंख्यांक — ४५

७. गंडांतर टळलें — ५४

८. नव्या ब्रह्मदेशाचा शिल्पकार
—सेनापति आँग सान — ६७

९. ब्रह्मी प्रजासत्ताकाची राज्यघटना — ७७

१०. ब्रह्मदेशांतील हिंदी लोक — ८७

११. ब्रह्मदेश आणि हिंदुस्थान — १०१

१२. आणखी एक दिव्य — १०८

८०५४...

# नवा ब्रह्मदेश

## : १ :

दुसरें महायुद्ध सुरू झालें त्यावेळीं "हें युद्ध जगाचें सारें स्वरूप बदलून टाकणार आहे. जगाची जुनी व्यवस्था आतां मेली. तिचें पुनरुज्जीवन करणें यापुढें कोणासहि शक्य होणार नाहीं," असें पं. जवाहरलाल नेहरूंनीं एका वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतींत म्हटलें, तेव्हां अनेकांना ती पंडितजींच्या कविमनाची नेहमींची एक भरारी वाटली. परंतु दुसऱ्या जागतिक युद्धानंतर सुरू झालेल्या आशिया खंडाच्या पुनरुत्थानानें पं. नेहरूंच्या भविष्यवाणीची सत्यता पटवून दिली.

युद्धपूर्वकाळीं मूठभर गोऱ्या साम्राज्यवाद्यांनीं एके ठिकाणीं बसून किंवा आपापसांत लढून जगाच्या नकाशाचे रंग आपल्या सोयीप्रमाणें बदलले; जगांतील लोकसंख्येच्या निम्म्याहून अधिक लोकवस्ति असलेल्या आशिया खंडावर वर्चस्व गाजविलें; आशियाई राष्ट्रांच्या आर्थिक लुटीवर आपल्या राष्ट्रामधील धनिक वर्गाच्या वैभवाची उभारणी केली, आणि त्या अंकित राष्ट्रांतील जनतेचा राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक व नैतिक अशा सर्व बाजूंनीं विनाश घडवून आणला.

आपल्या आक्रमक साम्राज्यवादाला सोज्ज्वल स्वरूप देण्यासाठीं युरोपीय साम्राज्यवाद्यांनीं त्याच्याभोंवतीं उदात्त तत्त्वप्रणालीची मखमलदेखील गुंडाळली होती. जगामधील मागासलेल्या जनतेंत संस्कृतीचा प्रसार करून तिचा उद्धार करण्याचें महत्कार्य परमेश्वरानें आपल्या शिरावर दिलेलें आहे, असें परमेश्वराच्या प्रेषिताचा आव आणून ते जगाला सांगत असत. स्वातंत्र्य, स्वयंनिर्णय, लोकशाही यांचा नवा प्रकाश या मागासलेल्या जनतेला देण्याचें परमेश्वरानेंच सोंपविलेलें अवतारकार्य अल्पावधींतच परिपूर्ण करणें त्यांना अशक्य होतें ! कारण आशियांतील जनतेची परंपरा व परिस्थिति लक्षांत घेतां, या नव्या कल्पना एकदम पचविणें कठीण होतें. म्हणून तिला

पचेल अशा हप्त्या-हप्त्यांनीं त्यांचे "डोस" पाजणें अपरिहार्य असून, त्याची परिपूर्ति होईतों, जगांतल्या या मागासलेल्या जनतेच्या अंतिम-हितासाठीं त्यांना हें ओझें—हें "व्हाइटमॅन्स बर्डन"—वाहणें भाग असल्याचें ते मोठा गांभीर्याचा आव आणून सांगत.

आशियांतल्या अंकित जनतेला आपल्या अंगच्या सामर्थ्याची जाणीव झालेली नव्हती व तिच्यावर वर्चस्व गाजविणाऱ्या साम्राज्यसत्तांच्या सामर्थ्याविषयींच्या व त्यांच्या अजिंक्यतेबद्दलच्या अनेक अद्भुतरम्य कल्पनांनीं तिच्या मनाची पकड घेतलेली होती, तोंपर्यंत गोऱ्या साम्राज्यवाद्यांना आपलें वर्चस्व निर्वेध गाजवितां आलें, आणि आपल्या तथाकथित वर्णश्रेष्ठतेच्या, सामर्थ्याच्या व अजिंक्यतेच्या अहंकारानें छाती फुगवून जगभर ऐटीनें मिरवितां आलें. गोऱ्या साम्राज्यसत्तांच्या अजिंक्यतेविषयीं जगांतील 'रंगीन' जनतेच्या अंतःकरणांत वसत असलेला दरारा हाच या सत्तांच्या त्यांच्यावरील वर्चस्वाचा एकमेव आधार होता. या अजिंक्यतेविषयींच्या आधारभूत दंतकथेलाच दुसऱ्या महायुद्धानें सुरुंग लावल्यामुळें त्यावर आधारलेल्या साम्राज्यसत्ता पायापासून हादरूं लागल्या. बेचाळीस सालीं हिंदुस्थानांत म. गांधींच्या मुखामधून उमटलेल्या 'चले जाव' या राष्ट्रीय मागणीचे पडसाद सर्व अंकित राष्ट्रांत घुमूं लागले. ईजिप्तपासून इंडोनेशिया-इंडोचायनापर्यंतच्या प्रत्येक अंकित राष्ट्रांत झालेल्या उद्रेकांनीं जगामधील दलित राष्ट्रांमध्यें जन्मास आलेल्या या नवजागृतीचा, नवशक्तीचा व नवचैतन्याचा साक्षात्कार घडवून दिला.

ब्रह्मदेश तर आशियाच्या या नवजागृतीचें प्रतीकच बनलासें वाटूं लागलें. सेनापति ऑंगसान या नव्या ताऱ्याचा जगाच्या राजकीय क्षितिजावर उदय झाला, आणि त्याच्या नेतृत्वाखालीं जन्मास आलेल्या अँटी-फॅसिस्ट पीपल्स फ्रीडम लीग (AFPFL) या ब्रह्मी राष्ट्रीय संस्थेनें चालविलेल्या स्वातंत्र्य आंदोलनाचें वृत्त जगांतील वृत्तपत्रांच्या पहिल्या पृष्ठावर झळकूं लागलें. ब्रह्मदेशाचे ब्रिटिश गव्हर्नर सर रेजिनॉल्ड डॉर्मन्-स्मिथ यांनीं ब्रह्मी राष्ट्रवाद्यांत फूट पाडण्यासाठीं केलेल्या प्रयत्नांमुळें ब्रह्मदेशांतील वातावरण अधिकाधिक तंग बनत गेलें, आणि त्यानंतर त्यामधून निर्माण

झालेला देशव्यापी संप, डॉर्मन् स्मिथची बडतर्फी व त्यांच्या जागीं सेनापति सर ह्यूबर्ट रॅन्स यांची करण्यांत आलेली नेमणूक, ऑंग सानच्या नेतृत्वाखालीं स्थापन झालेले सर्वपक्षीय प्रतिनिधि असलेलें गव्हर्नरांचें कार्यकारी मंडळ, ब्रह्मी राष्ट्रीय पक्षांनीं ब्रह्मदेशासाठीं हिंदुस्थानप्रमाणें मध्यंतर सरकार व घटना-परिषद यांची केलेली मागणी, ब्रिटिश सरकारबरोबर बोलणीं करण्यासाठीं ऑंग सानच्या नेतृत्त्वाखालीं गेलेलें ब्रह्मी सर्वपक्षीय शिष्टमंडळ, आणि अखेर त्यातून जन्मास आलेला " ॲटली-ऑंग सान करार " या ब्रह्मी राजकारणांत लागोपाठ झालेल्या घटनानीं साऱ्या जगाचें लक्ष ब्रह्मदेशाकडे वेधून घेतलें.

पण ब्रह्मी शिष्टमडळाचीं ब्रिटिश सरकाराबरोबर बोलणीं चालू असतां शिष्टमडळाच्या सदस्यांत निर्माण झालेल्या मतभेदांमुळें ब्रह्मी घडामोडींचें नियमित व लक्षपूर्वक निरीक्षण करणाऱ्या ब्रह्मदेशाबाहेरील निरीक्षकांच्याही मनात ब्रह्मी राजकीय परिस्थितीविषयीं गोंधळ निर्माण झाला.

ब्रह्मी शिष्टमंडळांतील म्योचित पक्षाचे पुढारी उ सॉ व डॉ. बा मॉ पक्षाचे थकीन बा सीन यांनीं ॲटली-ऑंग सान करारावर सह्या करण्याचें नाकारलें. शिष्टमंडळाचे सदस्य ब्रह्मदेशास परत गेल्यावर त्यांनीं ब्रह्मी कार्यकारी मंडळाचेही राजीनामे दिले. या कराराला विरोध असलेल्या सर्व पक्षांची एकजूट करून करारान्वयें स्थापन व्हावयाच्या घटनापरिषदेच्या निवडणुकींत ऑंग सानच्या फ्रीडम् लीगला एकजुटीनें विरोध करून ॲटली-ऑंग सान-करारांतील योजना उधळून लावावयाची, असा महत्त्वाकांक्षी मनसुबादेखील त्यांनीं रचला. जपानी राजवटींतल्या 'स्वतंत्र' ब्रह्मी सरकारचे प्रधान-मंत्रि डॉ. बा मॉ हे ब्रह्मदेशाच्या 'विमोचना' नंतर राजकारणांतून निवृत्त झाले होते. पण तेंदेखील या ऑंग सानविरोधी आघाडीचें नेतृत्व करण्यासाठीं राजकीय आखाड्यांत पुनः उतरले! "राजकीय क्षेत्रांत पुन्हा पदार्पण करण्याची माझी इच्छा नव्हती. पण या दुसऱ्या श्वेत-पत्रिकेच्या संकटापासून ब्रह्मदेशाला वांचविण्यासाठीं या आणीबाणीच्या वेळीं मी पुढें आलों नाहीं, तर मी माझ्या मातृभूमीचा द्रोह केला असें होईल, असें मला वाटतें, म्हणून मी पुन्हा राजकारणात दाखल झालों आहे," अशी

घोषणाही ऑंग सान विरोधी मोहीम सुरू करतांना डॉ. बा मॉंनीं केली.

ब्रह्मी शिष्टमंडळ वाटाघाटींसाठीं इंग्लंडला जाण्यापूर्वीच ब्रह्मी कम्युनिस्ट पक्ष फ्रीडम लीगमधून व गव्हर्नरांच्या सर्वपक्षीय कार्यकारी-मंडळांतून फुटून बाहेर पडला होता; खरें म्हणजे, कम्युनिस्टांच्या जगपरिचित कार्यपद्धतीप्रमाणें फ्रीडम लीग व कार्यकारी मंडळ यांचे जबाबदार घटक म्हणून नांदत असताही, ऑंग सानच्या 'तडजोडवादी' राजकारणाविरुद्ध ब्रह्मी कम्युनिस्ट पक्षानें प्रचार-मोहीम चालविल्यामुळें फ्रीडम लीगनें या शिस्तभंगाबद्दल शासन म्हणून कम्युनिस्टांना फ्रीडम लीगमधून हाकलून दिलें होतें. फ्रीडम लीग-मागचा लोकमताचा पाठिंबा नष्ट करण्याची जाहीर प्रतिज्ञा करूनच कम्युनिस्ट पक्ष नंतर 'रणांगणां'त उतरला होता!

ॲटली-ऑंग सान करारानंतर-ब्रह्मदेशास परत निघण्यापूर्वी लंडनला पत्रकार-परिषदेंत आपल्या भावी धोरणाचें दिग्दर्शन करतांना ऑंग साननें सांगितलें कीं, "हा समझौता स्वीकारार्ह असल्यामुळें तुम्हीं त्याला संमति द्यावी, अशी आमची तुम्हांला शिफारस आहे, असें ब्रह्मी जनतेला सांगेन; मीं पण या योजनेनुसार ब्रह्मदेशाचें स्वातंत्र्य ताबडतोब प्रस्थापित व्हावयाचें नाहीं, हेंही मी त्याच बरोबर स्पष्ट व प्रांजलपणें त्यांना सांगेन. तें प्राप्त करून घ्यावें लागेल; पण या योजनेच्या साह्यानें शांततामय मार्गानें ब्रह्मदेशाचें स्वातंत्र्य प्रस्थापित करतां येईल, असें आमचें मत आहे. आतां आम्हांला घटना-समिति मिळणार असून, ब्रह्मदेशाचें स्वातंत्र्य केव्हां जाहीर करावयाचें याचा निर्णय आमचा आम्हांलाच करावयाचा आहे. अशा रीतीनें ब्रह्मदेशाचें विमोचन आतां अन्य कोणावर अवलंबून नसून तें आम्हीच साध्य करूं शकणार आहोंत."

या उलट, "ब्रह्मी स्वातंत्र्य ताबडतोब!" अशी आरोळी ठोकून ऑंग सान-विरोधी पक्ष सामन्यासाठीं सज्ज झाले होते. जपानी राजवटींत बेगडीच कां होईना पण 'पूर्ण स्वातंत्र्य' चाखलेल्या ब्रह्मी जनतेची स्वातंत्र्य-भावना प्रखर झालेली असून, युद्धोत्तरकालीन घडामोडींमुळें ती अधिकच तीव्र बनलेली होती. निर्भेळ स्वातंत्र्य ताबडतोब प्रस्थापित करण्याचा आग्रह धरणाऱ्या पक्षांना ब्रह्मी जनतेच्या या भावनेचा भरपूर

उपयोग करून घेणें सहज शक्य होतें. त्यामुळें ॲटली-ऑंग सान-कराराला ब्रह्मदेशाचें स्वातंत्र्य शांततामय मार्गानें सिद्ध करण्यासाठीं प्राप्त झालेलें उपयुक्त साधन म्हणून मान्यता देऊन त्याच्या साह्यानें तें प्रस्थापित करण्याचें वरवर मवाळ भासणारें ऑंग सानचें धोरण ब्रह्मी जनतेस कितपत मान्य होईल, याविषयीं शंकाच वाटत होती. त्यामुळें गर्जूं लागलेल्या या विरोधाच्या वादळांतून ऑंगसान आपली नाव पैलतीरास कशी काय हाकारूं शकतात, या विषयीं जगांत कुतूहल निर्माण झालें होतें.

डॉर्मन-स्मिथनें परोपरीनें प्रयत्न केले असतांही अभंग राहिलेल्या ब्रह्मी राष्ट्रीय ऐक्याला सुरुंग लावण्याच्या कामीं ॲटलीला यश मिळालें असें यामुळें वाटूं लागलें. ब्रह्मी राष्ट्रीय पक्षांत या करारामुळें झालेल्या फाटाफुटीचें पर्यवसान म्हणून युद्धाच्या आगींतून नुकत्याच होरपळून निघालेल्या ब्रह्मी जनतेला यादवीच्या आणखी एका अग्निदिव्यांतून जावें लागणार, आणि बहुधा-घटना परिषदेच्या निवडणुकीच्या वेळींच हा भडका उडणार, असें ब्रह्मी राजकीय घडामोडींच्या येणाऱ्या वार्तांवरून वाटावयास लागलें.

परंतु त्यानंतरच्या घडामोडींनीं हे अंदाज चुकीचे ठरविले. घटना-परिषदेच्या निवडणुकी शांतपणें पार पडल्या आणि त्यांत ऑंग सानच्या फ्रीडम लीगला प्रचंड यश मिळालें. घटना-परिषदेच्या निवडणुकींत फ्रीडम लीगला मिळालेलें यश हें ऑंग सानच्या ब्रह्मी जनतेवरील असमान्य वजनाचें व त्याचप्रमाणें फ्रीडम लीगच्या प्रबळ संघटनासामर्थ्याचें द्योतक होतें. पण निवडणुकी शांतपणें पार पडल्या, याचा अर्थ साऱ्या भानगडी मिटल्या आणि ऑंग सानचा मार्ग पूर्ण निष्कंटक झाला, असा नव्हता. फ्रीडम लीगच्या विरोधकांनीं आपला विरोध चालूच ठेवला होता, आणि ब्रह्मदेशांतील युद्धोत्तर अशन्त व स्फोटक परिस्थिति लक्षांत घेतां, एखाद्या घटनेच्या निमित्तानें यादवीचा भडका उडण्याचा संभव अजिबात नष्ट झालेला नव्हता. पण ब्रह्मदेशांतून येणाऱ्या वार्ता इतक्या त्रोटक व संदिग्ध असत, कीं त्यांवरून त्या देशांतील परिस्थिति व घडामोडी यांचें यथार्थ ज्ञान होणें दुरापास्तच वाटे.

शिवाय फ्रीडम लीगनें सर्व विरोधी पक्षांवर घटना-परिषदेंत मिळविलेल्या यशामुळें इतर अनेकांप्रमाणें माझ्या मनांत अशीही शंका डोकावे, कीं ब्रह्मी जनतेचा इतका जोरदार पाठिंबा असतांना, व जपानच्या पराजयानंतर उभारलेले ब्रिटिश राज्ययंत्र कोलमडून पाडणें सहज शक्य आहे, हें डॉमॅन-स्मिथच्या राजवटींतल्या राष्ट्रीय संपाच्या वेळीं प्रत्यक्ष अनुभवास आलेलें असतांही, शक्य तों लढा टाळून शांततेच्याच मार्गानें ब्रह्मी स्वातंत्र्य प्रस्थापित करण्यासाठींच ऑंग सान विशेष उत्सुक कां असावेत ?

माझ्या मनांत उद्भवलेल्या या शंकेचें समाधान ब्रह्मदेशांत समक्ष जाऊन त्या देशांतील परिस्थितीचें प्रत्यक्ष निरीक्षण केल्यानेंच होणें शक्य होतें. म्हणून ब्रह्मदेशास जाण्याबद्दल प्रबळ इच्छा माझ्या मनांत निर्माण झाली, आणि त्या उद्देशानें १९४७ च्या मे-अखेर मी तिकडे जाण्यास निघालों.

● ● ●

## उध्वस्त जीवन : २ :

१९४७ च्या जून महिन्याच्या पांच तारखेस सायंकाळीं मी रंगूनच्या बंदरांत उतरलों. युद्धामुळें निरनिराळ्या देशांत झालेल्या संहाराचीं अनेक वर्णनें मी त्या पूर्वी वाचलीं होतीं. पण युद्धाच्या "रम्य" कथा ऐकणें, आणि प्रत्यक्ष आघाडीवर जाऊन त्याचा अनुभव घेणें यांत जितका फरक आहे, तितकाच आधुनिक युद्धानें समाजजीवन कसें उध्वस्त होतें, याचीं वर्णनें वाचणें किंवा ऐकणें, आणि तें आपल्या डोळ्यानें समक्ष पाहणें यांतही आहे, याची प्रचीति मला रंगूनला उतरतांच आली.

सर्व प्रकारच्या आधुनिक सुधारणा व सुखसोयी असलेल्या जगांतल्या प्रमुख आधुनिक शहरांत रंगूनची गणना होत असे. पण युद्धानंतर त्याच रंगूनला एकाद्या जुनाट, पडक्या, इतिहासकालीन राजधानीची अवकळा आली होती. इतिहासकालीं भरभराटलेल्या परंतु नंतर महत्त्व न उरलेल्या शहरांत सर्वत्र पडकीं घरें दृष्टीस पडतात, त्याप्रमाणें विमान हल्ल्यांत

उध्वस्त झालेल्या घरांच्या बखळी रंगूनमध्यें चोहोंकडे आढळून आल्या. रस्त्यांत विजेचे दिवेही नव्हते. शहरांतील वीजपुरवठा बंद पडलेला असून फक्त सरकारी कचेऱ्या व अधिकाऱ्यांचीं निवासस्थानें यांनाच वीज पुरविण्यांत येते, असें समजलें. तीच गत पाणी पुरवठ्याबद्दलही ! रंगूनला पूर्वी ट्रामची सर्व्हिस होती; पण तीही बंद पडली. बसेस व रिक्शा हींच वाहतुकीचीं साधनें उरलीं. युद्धाच्या खाईत होरपळून निघालेल्या राष्ट्राच्या राजधानींत मी उतरलों आहे, याची जाणीव मला या परिस्थितीनें करून दिली.

पण ब्रह्मदेशांतील इतर शहरांत व खेड्यांत झालेल्या संहाराच्या मानानें रंगूनला झालेला विध्वंस कांहींच नव्हे, हें मला नंतर दिसून आलें. युद्धाच्या प्रत्यक्ष खाईंत पडलेल्या जगांतल्या सर्वच राष्ट्रांत मोठ्या प्रमाणावर संहार झाला व आज त्यांना आपल्या राष्ट्राची पुनर्रचना करण्याच्या कामीं आपलें शक्तिसर्वस्व वेंचावें लागत आहे. परंतु युद्धाच्या आगींत जगांतलें दुसरें कोणतेंही राष्ट्र ब्रह्मदेशाइतकें होरपळून निघालें नसेल ! प्रथम जपान्यांनीं चाल केली, तेव्हां जपानी विमानदलानें व सैन्यानें संहार केला, त्याच-बरोबर त्यांच्यापुढें माघार घेतांना ब्रिटिशांनींहि आपल्या ' दग्धभू ' नीतीला अनुसरून जातां जातां जाळपोळ व विध्वंस करून घेतला. त्यानंतर पुन्हां जपानच्या ताब्यांतून ब्रह्मदेश परत जिंकण्यासाठीं ' दोस्तां 'नीं ब्रह्मदेशावर आक्रमण केलें, तेव्हां त्यांच्याही विमानदलाच्या व लष्कराच्या संहार-साहित्याचा वर्षाव ब्रह्मदेशास सहन करावा लागला ! ब्रह्मदेशांतील रंगूनखेरीजचीं बहुतेक सर्व लहान मोठीं शहरें संपूर्ण उध्वस्त झालीं, व तेथील बहुसंख्य नागरिकांवर आपल्या उध्वस्त नगराच्या आसमंतांत तंबू आणि झोपड्या उभारून राहण्याचा प्रसंग ओढवला ! युद्धानें ब्रह्मदेशाचें समाज-जीवन सर्व बाजूंनीं व सर्वस्वीं उध्वस्त करून टाकलें.

युद्धोत्तर ब्रह्मदेशाच्या या हीनावस्थेची त्या देशाच्या मूळच्या समृद्धींशीं तुलना करतांना ' न्यू टाइम्स ऑफ बर्मा ' या रंगूनच्या प्रमुख इंग्रजी दैनिकानें लिहिलें होतें : " ब्रह्मदेशांत इतिहासकाळापासून आजपर्यंत एकही मनुष्य उपासमारीनें मेलेला नाहीं, या गोष्टीबद्दल आम्हां ब्रह्मी लोकांना मोठा

अभिमान वाटत आलेला आहे. अशी समृद्धि ब्रह्मदेशांत शतकानुशतकें नांदत आलेली आहे. अलीकडच्या काळांतही फक्त एकुलत्या एका वेळींच —ब्रिटिशांनीं वरचा ब्रह्मदेश जिंकल्यानंतरच्या काळांत—मिंजान जिल्ह्यांत दुष्काळ पडला. त्यानंतर ब्रह्मदेशांत कधींही दुष्काळ पडला नाहीं. ब्रह्मदेश जिंकल्यावर ब्रिटिशांनीं हिंदुस्थानांत जारी असलेला दुष्काळविषयक कायदा (इंडियन फॅमिन कोड) ब्रह्मदेशासाठीं लागू केला. पण त्याचा उपयोग करण्याचा प्रसंगच ब्रह्मदेशांत उद्‌भवला नाहीं !"

ब्रह्मी जनतेची सुखासीन वृत्ति, कलाप्रेम, व उंची आणि रंगी-बेरंगी वस्त्राभरणांची आवड, काबाड-कष्टांचीं कामें करण्याचा सर्वसाधारण जनतेसही वाटणारा कंटाळा, हीं परक्या निरीक्षकाच्या नजरेंत भरणारीं ब्रह्मी जनतेच्या स्वभावाचीं प्रमुख वैशिष्ट्येंही ब्रह्मदेशाच्या या समृद्धीच्या पोटींच जन्मास आलेलीं आहेत.

ब्रह्मदेश हें नैसर्गिक संपत्तीनें अत्यंत समृद्ध असलेलें राष्ट्र आहे. शेती हाच ब्रह्मी जनतेचा प्रधान व्यवसाय आहे. ब्रह्मदेशांतील शेंकडा नव्वद टक्के जनता शेतीवर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणें अवलंबून आहे. तांदूळ हें ब्रह्मदेशाचें मुख्य पीक. युद्धपूर्वकाळात ब्रह्मदेशाच्या एकंदर लागवडीखालीं असलेल्या जमिनीपैकीं शेंकडा सत्तर टक्के जमीन, म्हणजे १२,०३६,००० एकर जमीन भाताच्या पिकासाठीं वापरली जाई. त्या काळांत ब्रह्मदेशामध्यें साडेसात दशलक्ष टन तांदूळ पिकत असे व त्यांतला साडेतीन दशलक्ष टन परदेशीं रवाना होई. ब्रह्मदेश हें जगांतलें सर्वांत मोठी तांदुळाची निर्यात असणारें राष्ट्र; एकटा हिंदुस्थानच ब्रह्मदेशापासून प्रतिवर्षी १,५००,००० टन तांदूळ खरेदी करीत असे. ब्रह्मदेशाच्या या वैशिष्ट्यामुळेंच त्या देशास 'आशियाचें तांदुळाचें कोठार' म्हणत असत.

ब्रह्मदेशाच्या निम्म्याहूनही अधिक— ५७ टक्के —भूभाग जंगलांनीं व्यापलेला आहे. त्यामुळें जंगल-संपत्तीचें उत्पादन हा ब्रह्मी जनतेचा शेतीच्या खालोखाल महत्त्व असलेला व्यवसाय आहे. ब्रह्मी जंगलांपासून मिळणाऱ्या चीजांत सागवानी लाकूड ही सर्वांत अधिक मूल्यवान. युद्धापूर्वी ब्रह्मदेशांतील जंगलांतून दरसाल ४४६ हजार टन सागवानी लाकूड

ग्रंथ संग्रहालय क्र. २७/३१५३

काढण्यांत येई, व त्यांतलें २१४ हजार टन निर्यात होई. हिंदुस्थान ब्रह्मी सागवानी लाकडाचाही सर्वांत मोठा ग्राहक होता; कारण ब्रह्मदेशांतून निर्यात होणाऱ्या सागवानी लाकडांतील जवळजवळ ऐंशीं टक्के लाकूड हिंदुस्थानच खरेदी करीत असे.

देशभर पसरलेल्या पर्वतराजींनीं ब्रह्मदेशाचे निरनिराळे विभाग केलेले असून, त्याच्या जोडीला घनदाट जंगलांनीं व्यापलेलीं खोरीं असल्यामुळें, त्या देशाच्या निरनिराळ्या भागांत दळणवळण व वाहतुक चालू ठेवणें नेहमींच कठीण भासत आलेलें आहे. नद्या हेंच ब्रह्मदेशांतील सर्वांत महत्त्वाचें वाहतुकीचें साधन. सबंध ब्रह्मदेशांत अवघी २,८५२ मैल रेल्वे आहे. वाहनांच्या वाहतुकीला सोईचे रस्ते १७,००० मैलच असून त्यांतसुद्धां फक्त १२,५०० मैलच मोटर-वाहतुकीला उपयोगी पडण्यासारखे आहेत !

ब्रिटिशांनीं "दग्धभू" नीतीस अनुसरून ब्रह्मदेशांतील वाहतुकीच्या साधनांचा नाश केला, व उरलीं सुरलीं प्रत्यक्ष युद्धांत नष्ट झालीं. त्यामुळें युद्धकाळांतच ब्रह्मदेशांतील अंतर्गत दळण-वळण दुरापास्त झालें. त्याच्या भरीला जपान्यांनीं बैलगाड्या वगैरेंसारख्या वाहतुकीच्या साधनांचा जळण म्हणून उपयोग केला! जपान्यांनीं बैलगाड्या वगैरेबरोबरच शेतीच्या लाकडी अवजारांचाही जळणासाठीं उपयोग करून घेतला, आपल्या सैनिकांची भूक शमवण्यासाठीं शेतीस उपयुक्त असलेल्या जनावरांची बेसुमार कत्तल केली, आणि शेतमजुरांची युद्धकार्यासाठीं सक्तीनें भरती केली. या परिस्थितीमुळें साहाजिकच युद्धकाळामध्येंच ब्रह्मदेशांतील लागवडीखालच्या शेतजमिनीपैकीं हजारों एकर जमीन पडून राहिली. जपानच्या घशांत ब्रह्मदेश गेल्यावर त्या देशाचा पूर्वीचा आयात-निर्यात व्यापारही बंद झाला. युद्धाच्या संहार-साधनांनीं केलेल्या विध्वंसाबरोबरच या अन्य कारणांमुळें ब्रह्मी समाजाची आर्थिक घडीहि विस्कटून गेली.

जपान्यांच्या तावडींतून ब्रह्मदेश सोडविल्यावर देशांत कायदा व शांतता पुन्हा प्रस्थापित करणें हेंच ब्रह्मी सरकारपुढें सर्वांत महत्त्वाचें कार्य होऊन बसलें. जपान्यांपुढें माघार घेतांना ब्रिटिशांनीं मोठ्या प्रमाणावर शस्त्रास्त्रें

टाकून दिलीं, व नंतर दोस्त सैन्यानें ब्रह्मदेशावर चढाई केली, तेव्हां त्या देशांतून पाय काढतांना जपान्यांनींही त्यांचें अनुकरण केलें. यामुळें युद्धोत्तर काळीं ब्रह्मदेशांत बेकायदा शस्त्रांचा प्रसार फार मोठ्या प्रमाणावर झालेला होता.

याप्रमाणें युद्धोत्तरकाळीं ब्रह्मदेशांतली समाजव्यवस्था व अर्थव्यवस्था कोलमडून पडली; जीवनास अवश्य असलेल्या वस्तु दुर्मिळ झाल्या; देशांतील वाहतुक व दळणवळण कठीण बनलें; बेकायदा शस्त्रांचा फैलाव सर्वत्र झाला, आणि प्रथम ब्रिटिशांच्या जागीं जपानी आणि नंतर जपान्यांच्या जागीं परत ब्रिटिश असा राज्यकर्त्यांतही लागोपाठ बदल झाल्यामुळें मुलकी राज्ययंत्रही दुर्बल झालें. यामुळें देशांत अगदीं अराजकच माजलें नसलें, तरी अशान्ततेची परिस्थिति निर्माण झाली. लुटारूंच्या सशस्त्र टोळ्या निर्माण होऊन त्यांचा सर्वत्र सुळसुळाट झाला व जीवित आणि वित्त यांची शाश्वति उरली नाहीं. रात्रींच्या वेळीं माल व प्रवासी यांची वाहतुक करणाऱ्या बोटी व रेल्वेगाड्याही लुटारूंच्या टोळ्यांनीं लुटल्याचीं उदाहरणें घडल्यामुळें कांहीं काळ रेल्वेची व बोटींची रात्रींची वाहतुकदेखील बंद करावी लागली होती!

याच वेळीं ब्रह्मदेशांत राजकीय सत्तांतरही व्हावयाचें घाटत असल्यामुळें ब्रिटिशांकडून ब्रह्मी हातांत येऊं घातलेली सत्ता हस्तगत करण्याच्या कामीं देशांतल्या या अशांत परिस्थितीचा उपयोग करून घेण्याचा प्रयत्न कम्युनिस्टांसारख्या ब्रह्मदेशांतील कांहीं राजकीय गटांनीं केल्यामुळें परिस्थितीमधील गुंतागुंत अधिकच वाढली.

असल्या अशान्ततेच्या व असुरक्षिततेच्या परिस्थितींत ब्रह्मी शेतकरी आपल्या शेतांत धान्य पिकविण्यास तयार कसा व्हावा? कारण त्यानें मेहनत–मशागत करून आपल्या शेतांत धान्य पिकविलें, तरी शेवटीं तें लुटारूंच्या हातीं न पडतां आपल्याच पदरीं पडेल, अशी त्याला शाश्वति नव्हती! याच्या भरीला ब्रह्मी शेतकऱ्याला भांडवलाची चणचण भासूं लागली होती. जपान्यांनीं ब्रह्मदेश जिंकल्याबरोबर लोकांजवळच्या ब्रिटिश करन्सी नोटा बळजबरीनें काढून घेतल्या व त्याबदली आपल्या नोटा

दिल्या. ब्रह्मदेश ब्रिटिशांच्या ताब्यांत पुन्हा गेला तेव्हां नव्याण्णव टक्के लोकांजवळ त्या जपानी नोटाच होत्या. पण ब्रिटिशांनीं त्या जपानी नोटा स्वीकारण्याचें चक्क नाकारलें! त्यामुळें ब्रह्मी जनता व त्यांतल्या त्यांत ब्रह्मी शेतकरी नागवला गेला. ब्रिटिशांच्या या निर्णयामुळें ज्यांना कागदाच्या कपट्याइतकीही किंमत उरली नाहीं, अशा दोनशें कोटी रुपयांच्या जपानी नोटा ब्रिटिशांच्या ताब्यांत ब्रह्मदेश गेला तेव्हां ब्रह्मी लोकांपाशीं होत्या, असा तज्ज्ञांचा अंदाज आहे!

या सर्व गोष्टींचा परिणाम विशेषतः ब्रह्मदेशाच्या शेतीवर विशेष प्रतिकूल झाला. लागवड व उत्पादन हीं प्रचंड प्रमाणांत घटलीं. पृष्ठ १२ वरील कोष्टकावरून त्या विषयींची कल्पना येऊं शकेल.

ब्रह्मदेश हें कृषिप्रधान राष्ट्र असल्यामुळें त्याला आयात कराव्या लागणाऱ्या मालावरील खर्च आपल्या शेतींत उत्पन्न झालेल्या मालापैकीं निर्यात केलेल्या मालावरील उत्पन्नामधूनच भागवावा लागतो. १९३०-३५ ते १९३५-४० या कालखंडांत निर्यात व्यापारावर ब्रह्मदेशास दरवर्षी ५०५ दशलक्ष रुपयांचें उत्पन्न मिळालें. त्यांत तांदूळाचें रु. २२७ दशलक्ष, पेट्रोलियमजन्य द्रव्यांचें रु. १३० दशलक्ष व इमारती लाकडांचें रु. ३७ दशलक्षांचें झालें होतें. ब्रह्मदेशास या कालखंडांत आयात कराव्या लागणाऱ्या मालावर दरसाल सरासरी रु. २२५ दशलक्ष खर्च करावे लागले. आयात कराव्या लागणाऱ्या मालांत कापड, लोखंडी सामान, यंत्रसामुग्री यासारखा पक्का माल व तेलें आणि चरबी यांचा प्रामुख्यानें समावेश होई. या काळांत आयात निर्यात व्यापारांत याप्रमाणें ब्रह्मदेशास आयात मालावर कराव्या लागणाऱ्या खर्चापेक्षां निर्यात व्यापारावर रु. २८० दशलक्ष अधिक मिळत असत.

युद्धांत इतका संहार होऊनदेखील ब्रह्मदेश तांदूळ व इमारती लाकूड निर्यात करण्याच्या स्थितींत होता. युद्धपूर्वकाळीं ३,०००,००० टन तांदूळ निर्यात करणाऱ्या ब्रह्मदेशाला १९४७ मध्यें ७५०,००० टन तांदूळ निर्यात करूं शकण्याची उमेद होती, तर युद्धपूर्वकाळांतल्या निर्यातीच्या चाळीस टक्क्यांइतकेंच इमारती लाकूड ब्रह्मदेश निर्यात करूं शकत होता.

| पीक | १९४०–४१ मधील लागवड-एकरीं | १९४५–४६ मधील लागवड-एकरीं | १९४५–४६ चें १९४०–४१ शीं एकरीं प्रमाण (शें.) | १९४५–४६ च्या उत्पन्नाचें १९४०-४१ च्या उत्पन्नाशीं प्रमाण (शें.) |
|---|---|---|---|---|
| भात | १२,५११,००० | ६,६५१,००० | ५३ | ३३·५ |
| तीळ | १,३५३,००० | १,२११,००० | ९१ | ६३ |
| भुईमूग | ७८१,००० | ६२२,००० | ८० | ५८ |
| कापूस | ४१८,००० | २६३,००० | ६३ | ३५ |
| डाळी | १,४४८,००० | ७५८,००० | ५२ | ... |
| इतर | २,२९६,००० | २,२२३,००० | ९६ | ... |
| एकूण | १८,८१५,००० | ११,७३६,००० | ६२ | ... |

| पीक | १९४६–४७ मधील लागवड-एकरीं | १९४६–४७ च्या लागवडीचें १९४०–४१ च्या लागवडीशीं प्रमाण (शें.) |
|---|---|---|
| भात | ८,१०८,००० | ६५ |
| तीळ | १,१८९,००० | ८७ |
| भुइमूग | ५४६,००० | ७० |
| कापूस | १७,००० | ४२ |

उलट, युद्धामुळें उध्वस्त झालेल्या राष्ट्राची पुनर्रचना करण्याचें कार्य अत्यंत प्रचंड असून, त्याकामीं या तुटपुंज्या निर्यात व्यापाराची अल्पही मदत होण्यासारखी नव्हती.

युद्धानें ब्रह्मदेशांत केलेला संहार केवढा भयानक आहे, हें समक्ष पाहिल्या-वर, शक्यतों लढा टाळून शांततामय मार्गानेंच ब्रह्मदेशाचें स्वातंत्र्य प्राप्त करून घेण्यासाठीं ऑंग सान उत्सुक कां होते, व त्यासाठीं साधन म्हणून त्यांनीं ॲटली-ऑंग सान करारांत अनुस्यूत असलेली योजना कां स्वीकारली, या माझ्या मनांत त्यापूर्वीं येणाऱ्या शंकेचें निरसन झालें. कोणाही सहृदय व जबाबदार राष्ट्रीय नेत्यानें युद्धकाळांत ब्रह्मी जनतेस करावें लागलेलें अग्निदिव्य व युद्धजन्य संहारामुळें युद्धोत्तरकाळीं सोसावे लागणारे अपरिमित हाल लक्षांत घेतां, तिला लगेच आणखी एका दिव्यांतून नेण्याचें टाळतां आल्यास बघावें, असाच आटोकाट प्रयत्न केला असता.

दुसऱ्या महायुद्धाच्या आगीमुळें झालेल्या ब्रह्मी समाज-जीवनाच्या झालेल्या या रक्षेमधून प्रबळ, प्रगमनशील, स्वतंत्र व सार्वभौम प्रजासत्ताक ब्रह्मदेश निर्माण करण्याचें महान् कार्य ब्रह्मी राष्ट्रवाद्यांना करावयाचें होतें. स्वतंत्र ब्रह्मदेशाची राज्यघटना तयार करण्याचें व त्या देशाच्या उध्वस्त जीवनाची पुनर्रचना करण्याचें हें द्विविध कार्य शांततामय मार्गानें सिद्धीस नेण्यासाठीं ऑंग साननें ॲटलीयोजनेचा स्वीकार केला व हीं दोन्ही कार्यें त्यांच्या स्फूर्तिप्रद नेतृत्वाखालीं ब्रह्मी राष्ट्रवाद्यांनीं एकदमच हातीं घेतलीं. ब्रह्मी घटनापरिषदेच्या पहिल्या अधिवेशनाच्या थोडेच दिवस आधीं ब्रह्म-देशाच्या पुनर्रचनेचा कार्यक्रम आंखण्यासंबंधीं विचार करण्यासाठीं ऑंग साननें रंगूनला परिषद बोलावली होती. परिषदेंत या कार्यक्रमाचीं मूलतत्त्वें ठरविण्यांत येऊन तपशीलवार कार्यक्रम निश्चित करण्यासाठीं उपसमित्या नेमण्यांत आल्या. ही रचना-परिषद व ब्रह्मी घटनापरिषद या दोहोंचेंही कार्य ऑंग सानच्या नेतृत्वाखालीं बरोबरच चालू राहिलें.

• • •

# ब्रह्मदेशाची काँग्रेस—‘ फासापाला ’ : ३ :

रंगूनला गेल्यावर अँटी-फॅसिस्ट पीपल्स फ्रीडम लीगची मुख्य कचेरी कोठें आहे, याची चौकशी केली असतां ती चर्चिल रोडवर आहे असें समजलें, तेव्हां मला फार गंमत वाटली. ब्रह्मदेशाच्या साम्राज्यविरोधी राष्ट्रीय संस्थेचें मुख्य कार्यालय चर्चिलसारख्या इरसाल साम्राज्यवाद्याचे नांव असलेल्या रस्त्यावर असावें, हा एक अभावित विनोदाचाच प्रकार ! ब्रिटिश मजूर मंत्रिमंडळाच्या ब्रह्मदेशविषयक धोरणावर पार्लमेंटमध्यें चर्चिलनें केलेल्या विलापाचें मला तेव्हां स्मरण झालें. “इंग्लंडच्या इतिहासांत एक काळ असा होता, कीं रोज सकाळीं उठल्यावर ब्रिटिश साम्राज्यांत एकाद्या नव्या प्रदेशाची भर पडल्याचें शुभ वर्तमान समजत असे. पण आतां रोज एक नवा प्रदेश साम्राज्यांतून बाहेर पडल्याचें वृत्त ऐकण्याचें आमच्या नशिबीं आलें आहे ! ’ असें त्यांनीं अगदीं डोळ्यांत आसवें आणून म्हटलें, आणि ॲटली-ऑंग सान कराराचा ‘ लाजिरवाणा करारनामा ’ (‘ Dismal Transaction ’) म्हणून धिक्कार केला होता. मला वाटलें, ज्या फ्रीडम लीगच्या प्रभावामुळें ब्रिटिश साम्राज्यसत्तेला ब्रह्मदेशांत माघार घ्यावी लागली, तिचें मुख्य कार्यालय आपलें नांव असलेल्या रस्त्यावर आहे हें चर्चिलला समजलें, तर काय वाटेल ?

फ्रीडम लीगच्या कचेरीकडे जाण्याच्या उद्देशानें बसनें निघालों, आणि बसवाल्यानें नेमकें उलट दिशेस नेऊन सोडलें ! कंडक्टरला इंग्लिश किंवा हिंदुस्थानी येत नव्हतें, मला ब्रह्मी येत नव्हतें. मी ‘ अँटी-फॅसिस्ट पीपल्स फ्रीडम लीग ’ असें सांगून तिकडे जावयाचें आहे, असें त्याला सुचविलें; त्यानें कांहीं निराळेंच ऐकलें. बऱ्याच लांबवर विरूद्ध दिशेनें गेल्यानंतर झालेला घोटाळा लक्षांत आला. दरम्यान माझ्या शेजारीं एक सुशिक्षित ब्रह्मी गृहस्थ येऊन बसले होते. त्यांनीं सांगितलें, कीं ‘ अँटी-फॅसिस्ट पीपल्स फ्रीडम लीग ’ ब्रह्मी बहुजनसमाजांत “ फासापाला ” या नांवानें ओळखली जाते. हें “ AFPFL ” या फ्रीडम लीगच्या सुटसुटीत नांवाचें ब्रह्मी रूपांतर आहे !

दुसऱ्या महायुद्धापर्यंत ब्रह्मदेशाच्या स्वातंत्र्यासाठीं जनतेची संघटना करून त्यासाठीं अविरत झगडणारी हिंदी राष्ट्रसभेसारखी राष्ट्रीय संस्थाही ब्रह्मदेशांत अस्तित्वांत आलेली नव्हती. ऐतिहासिक योगायोग असा, कीं हा देश जिंकण्याचें कार्य ब्रिटिशांनीं १८८५ मध्यें पूर्ण केलें व राज्य-कारभाराच्या सोयीसाठीं एक प्रांत म्हणून हिंदुस्थानला तो जोडून दिला, त्याच वर्षीं हिंदुस्थानचें राष्ट्रीय आंदोलन संघटित व परिणामकारक रीतीनें चालवितां यावें, म्हणून हिंदी राष्ट्रवाद्यांनीं राष्ट्रसभेची स्थापना केली. ब्रह्मदेशाचें जोखड हिंदुस्थानवर लादल्याबद्दल ब्रिटिश सरकारचा निषेध करणारा ठरावही हिंदी राष्ट्रसभेच्या पहिल्या अधिवेशनांत मंजूर करण्यांत आला होता !

स्वाभाविकपणेंच ब्रह्मदेशाच्या हिंदुस्थानबरोबरच्या या साहचर्यामुळें हिंदी राष्ट्रीय चळवळीचे पडसादही त्या देशांत उमटूं लागले. हिंदी राष्ट्रीय चळवळीपासून स्फूर्ति घेतलेल्या कांहीं ब्रह्मी देशभक्तांनीं ब्रह्मदेशांतही राष्ट्रीय आंदोलन संघटित करण्याचें ठरविलें, व त्यासाठीं 'यंग मेन्स बुद्धिस्ट असोसिएशन' या मूळच्या पुनरुज्जीवनवादी संस्थेचें त्यांनीं राजकीय संस्थेंत रूपांतर केलें. हिंदी राष्ट्रीय आंदोलनाच्या दडपणामुळें हिंदुस्थानांत ब्रिटिशांनीं अमलांत आणलेल्या राजकीय सुधारणा ब्रह्मदेशासही लागू करण्यांत याव्या, अशी सनदशीर चळवळही त्यांनीं या संस्थेमार्फत सुरू केली. पण तिचा प्रभाव मूठभर सुशिक्षितांपुरताच मर्यादित राहिला व तिच्या चळवळीस देशव्यापी राष्ट्रीय आंदोलनाचें स्वरूप प्राप्त होऊं शकलें नाहीं, किंवा तिचा ब्रह्मदेशाच्या प्रबळ राष्ट्रीय संस्थेंतही विकास झाला नाहीं. मॉंटफर्ड सुधारणांमधून ब्रह्मदेशास वगळण्यांत आलें, तेव्हां भिक्षु उत्तमांच्या नेतृत्वाखालीं 'असोसिएशन'नें म. गांधींच्या असहकारितेच्या कार्यक्रमाचा पुरस्कार केला, त्यामुळें तिला कांहींसें लढाऊ स्वरूप प्राप्त झालें व ती लोकप्रियही झाली. भिक्षु उत्तमांना शिक्षा झाल्यावर तिला कोणी प्रभावी नेता न उरल्यामुळें या चळवळीची वाताहत झाली. नंतर हिंदुस्थानसारखी द्विदल राज्यपद्धति ब्रह्मदेशांतही सुरू झाल्यावर तिचा उरला सुरला प्रभावदेखील नष्ट झाला ! हिंदी 'स्वदेशी' चळवळीच्या

धर्तीवर ब्रह्मी राष्ट्रवाद्यांनीं 'वंथनु' चळवळ सुरू केली तेव्हां, व नंतर १९२० च्या युनिव्हर्सिटी-बहिष्काराच्या चळवळीनेंही ब्रह्मी राजकारणांत तेज निर्माण केलें. परंतु या चळवळीमुळें देशांत निर्माण झालेली जागृति व शक्ति यांचा स्वातंत्र्य-लढ्यासाठीं उपयोग करूं शकेल, अशी राष्ट्रीय संस्थाच नसल्यामुळें ती वाया दवडली गेली.

ब्रह्मी जनतेची आर्थिक स्थिति अत्यंत हलाखीची झालेली असल्यामुळें ब्रह्मी बहुजनसमाजांत पसरलेल्या असंतोषाचाही उपयोग स्वातंत्र्यलढ्याची शक्ति वाढविण्याच्या कामीं करून घेतां आला असता. ब्रह्मदेशांत राजकीय पक्ष किंवा संस्था यांचें दुर्भिक्ष होतें, असा याचा अर्थ नव्हे; त्यांची मुळींच कमतरता नव्हती. परंतु ते सारे कायदेमंडळांच्या निवडणुका लढविणारे 'पार्लमेंटरी' जातीचे पक्ष होते. बहुजनसमाजाच्या हिताचा कार्यक्रम घेऊन त्यावर त्याची संघटना करण्याचें, त्याच्या आर्थिक गाऱ्हाण्यांची दाद लावून देण्यासाठीं संघटित प्रयत्न करण्याचें रचनात्मक कार्य अविरत चालविणारा पक्ष मात्र एकही नव्हता! यामुळें ब्रह्मी शेतकऱ्यांत आर्थिक दुःस्थितीमुळें धुमसणाऱ्या असंतोषाचा स्फोट मधून मधून दंग्याच्या स्वरूपांत होई. 'थारावदी बंड' हें अशाच उद्रेकांचें एक उदाहरण होतें.

१९३७ मध्यें हिंदुस्थानापासून विभक्त करण्यांत येईपर्यंत ब्रह्मदेशाला हिंदुस्थानच्या एका मागासलेल्या प्रांताचाच दर्जा होता. विभक्तीकरणा-नंतर त्याचें हें दुय्यम स्थान जाऊन, ब्रह्मदेश हें निराळें राष्ट्र बनलें, व १९३५ च्या कायद्याप्रमाणें स्वतःचें स्वतंत्र कायदेमंडळ व मंत्रिमंडळही त्याला मिळालें. पण तरीही राष्ट्रवादी दृष्टीनें ब्रह्मदेशाचें पाऊल पुढें पडूं शकलें नाहीं. या नव्या परिस्थितींतसुद्धां ब्रह्मी स्वातंत्र्यासाठीं संघटित प्रयत्न करणारी राष्ट्रीय संस्था जन्मास आली नाहीं व त्यामुळें साहजिकपणेंच प्रबल राष्ट्रीय आंदोलनही निर्माण होऊं शकलें नाहीं.

प्रभावी राष्ट्रवादी संस्था किंवा आंदोलन नसल्यामुळें महत्त्वाकांक्षी संधिसाधूंना मोकळें रान मिळालें. १९३७ पासून १९४१ पर्यंतच्या कालखंडाचा समावेश करणाऱ्या ब्रह्मी राजकीय इतिहासाच्या प्रकरणास

संधिसाधूंचा अंमल ' हें शीर्षक शोभून दिसेल ! या काळांत अनेक पक्ष जन्मास आले. परंतु त्यांची कोठल्याही तत्त्वप्रणालीवर अथवा कार्यक्रमावर उभारणी करण्यांत आलेली नसे. केवळ कांहीं महत्त्वाकांक्षी व्यक्तींच्या आकांक्षांची परिपूर्ति करण्याच्या एकमेव उद्देशानें ते जन्मास येत. त्या आर्थिक मंदीच्या काळांत देखील ध्येयवाद व सार्वजनिक चारित्र्य या चिजा ब्रह्मी राजकीय क्षेत्रांत भयंकर महागल्या होत्या—नव्हे, दुर्मिळ झाल्या होत्या. मंत्रिमंडळावरील अविश्वासाचा ठरावही ब्रह्मी विधिमंडळाच्या कामकाजांतील जवळ जवळ रोजची बाब होती. कोणत्याही लहान मोठ्या प्रलोभनामुळें विधिमंडळाचे सभासद एका पक्षांतून फुटून दुसऱ्यास सामील होत, व तसें करतांना त्यांना त्यांच्या सदसद्विवेकबुद्धीची टोंचणी लागत नसे. एक पक्ष मोडून नवा पक्ष जन्मास येणें व एक मंत्रिमंडळ कोसळून त्याच्या जागीं दुसरें अधिकारारूढ होणें, ही ब्रह्मदेशांत दररोज घडून येणारी घटना बनली होती. ऊ पू यांचा ' लोकपक्ष ' ( पीपल्स पार्टी ), ऊ सॉ यांचा म्योचित ( ' देशभक्त ' ! ) पक्ष, डॉ. बा मॉ यांचा ' सिन्येथा ' पक्ष असे निरनिराळे पक्ष ब्रह्मी राजकीय क्षितिजावर या काळांत उदयास आले व अस्तंगत झाले. त्यांपैकीं डॉ. बा मॉ व ऊ सॉ यांचे पक्ष विशेष चमकले, व त्यांनीं ब्रह्मी राजकारणावर आळीपाळीनें प्रभुत्व गाजविलें. डॉ. बा मॉ हे १९३५ च्या कायद्याखालच्या पहिल्या मंत्रिमंडळाचे पंतप्रधान होते, तर दुसरें महायुद्ध सुरू झालें, तेव्हां पंतप्रधानकीचीं वस्त्रें ऊ सॉ यांनीं परिधान केलेलीं होतीं. निवडणुकींत मतें मिळविण्यासाठीं हे पक्ष हवीं तीं आश्वासनें देत व कोणत्याही भल्याबुऱ्या साधनांचा व प्रचाराचा अवलंब करीत. डॉ. बा मॉ जहाल नकली समाजवादी कार्यक्रम जनतेपुढें मांडून निवडणूक मोहीम जिंकण्याचा प्रयत्न करीत, तर ऊ सॉ ब्रह्मी जनतेंत हिंदीविरोधी भावनांची आग पेटवून तीवर आपली पोळी पिकवून घेत !

याप्रमाणें ब्रह्मी राजकीय क्षेत्रांत स्वार्थपरायणता व संधिसाधुपणा यांचें अधिराज्य असून, वडीलधारी राजकारणी मंडळी स्वार्थसाधनेंत निमग्न असतांना, ब्रह्मी तरुणांत व विद्यार्थ्यांत मात्र जहाल राष्ट्रवादी व समाज-

वादी विचार फैलावत होते. १९२९ पासून पं. जवाहरलाल नेहरूंनीं हिंदी स्वातंत्र्य-लढ्यास नवी कलाटणी देण्यासाठीं स्वातंत्र्यलढा अधिक विशाल, प्रबल व प्रगमनशील बनविण्याच्या उद्देशानें हिंदुस्थानांत केलेला प्रभावी प्रचार, व त्यामुळें विशेषतः हिंदी विद्यार्थ्यांत आणि तरुणांत निर्माण झालेलें नवचैतन्य व त्यांतून जन्मास आलेली स्वातंत्र्य व समाजवाद यांवर आधारलेली युवक चळवळ, यांचा ब्रह्मी तरुणांवर व विद्यार्थ्यांवरही परिणाम होऊन ते नव्याच दृष्टीनें ब्रह्मी स्वातंत्र्याच्या प्रश्नाकडे बघूं लागलें. १९३०–३२ चें आंदोलन ओसरल्यावर पं. नेहरूंनीं या नव्या दिशेनें हिंदी स्वातंत्र्यलढ्याचा गाडा हंकारण्याचा प्रयत्न विशेष नेटानें केल्यामुळें त्या लढ्याला आलेल्या नव्या स्वरूपाचाही प्रभाव त्यांच्या मनावर विशेष पडूं लागला. ब्रह्मदेशभर विद्यार्थिसंघ स्थापन होऊं लागले व विद्यार्थ्यांचे देशव्यापी संप ही रोजचीच घटना होऊन बसली. देशभर स्थापन झालेल्या या विद्यार्थि-संघाच्या कार्यांत व कार्यक्रमांत एकसूत्रीपणा आणण्यासाठीं स्थापन करण्यांत आलेली 'ऑल बर्मा स्टूडंट्स् युनियन' विशेष प्रबळ बनली, आणि तिच्या नेतृत्वाखालीं फोंफावलेल्या विद्यार्थि-आंदोलनांत ऊ ऑंग सान व थकीन नु यांच्यासारखे कार्यकर्ते उदयास आले.

ब्रह्मी जनतेंत राष्ट्रवाद व स्वातंत्र्यप्रेम यांचा प्रसार करून ब्रह्मी जनतेला स्वातंत्र्य-लढ्यासाठीं संघटित करण्याचें, स्वार्थसाधनेंत रममाण झालेल्या वडीलधाऱ्या ब्रह्मी पुढाऱ्यांनीं दुर्लक्षिलेलें कार्य या नवयुवकांनीं आपल्या अंगावर घेतलें. पं. जवाहरलाल नेहरु यांचें व्यक्तिमत्व, त्यांचे विचार व कार्य यांची मोहिनी या ब्रह्मी नवयुवकांवर विशेष पडलेली असून, हें राष्ट्रकार्य अंगीकारतांना पं. नेहरूंच्यापासूनच त्यांनीं स्फूर्ति घेतलेली होती. त्यामुळें पं. जवाहरलाल नेहरूंच्याविषयीं ब्रह्मी तरुणांत व सर्वसाधारण जनतेंतही अकृत्रिम प्रेम वसत असल्याचें आढळून येतें.

ब्रह्मदेशांत राष्ट्रीय आंदोलन निर्माण करण्याच्या उद्देशानें या नवयुवकांनीं 'डो बामो ॲस्योन" या संस्थेची स्थापना करून ब्रह्मी विद्यार्थि, शेतकरी व कामकरी यांच्यांत राष्ट्रवादाचा प्रसार करून त्यांची

संघटना करण्याचें, त्यांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नावर आधारलेले लढे लढविण्याचें कार्य मोठ्या उत्साहानें आरंभिलें. ब्रह्मी विधिमंडळांतदेखील या संस्थेचे कांहीं प्रतिनिधी निवडून गेले. थकीन म्या यांच्या नेतृत्वाखालीं ब्रह्मी विधिमंडळांतला हा स्वातंत्र्यवादी गट कार्य करीत असे, व वेळोवेळीं ब्रह्मी स्वातंत्र्याचा प्रश्न तेथें निर्माण करी. काळ्याकुट्ट ढगावर वीज चमकून जावी, त्याप्रमाणें ब्रह्मी विधिमंडळांतील संधिसाधु राजकारणाच्या पार्श्वभूमीवर डो बामाच्या प्रतिनिधींचें हें कार्य चमकून दिसत असे !

“ आपण ब्रह्मी लोकच ब्रह्मदेशाचे धनी ( ‘ थकीन ’ ) आहोंत, ” हें डो बामाच्या प्रचाराचें मुख्य सूत्र होतें. त्यामुळें “ थकीन ” पक्ष या नांवानेंच डो बामा पक्ष लोकविश्रुत झाला. या पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या नांवांमागें ‘ श्रीयुत ’ प्रमाणें ‘ थकीन ’ हा शब्द लावण्यांत येऊं लागला. त्या चळवळींत उदयास आलेल्या कार्यकर्त्यांच्या नांवांमागें हें उपपद अजूनही लावलें जातें—जसें ‘ थकीन ’ नु, ‘ थकीन ’ थान तून इ० आपल्याकडचीं वृत्तपत्रें ‘ थकीन ’ मधील ‘ थ ’चा कधीं कधीं ‘ था ’ करतात; ब्रह्मी लोकांच्या नांवामागें ‘ श्रीयुत ’सारखें ‘ ऊ ’ हें उपपद लावण्यांत येतें, त्या ‘ ऊ ’चा ‘ यू ’ तर बहुधा सर्वच मराठी वृत्तपत्रें बनवीत असतात ! या बाबतींत दुसरी लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे ‘ ऊ ’ ( ‘ यू ’ ) हा शब्दच पूर्ण असल्यामुळें, त्यापुढें पूर्णविराम चिन्हही, ( ‘ श्रीयुत ’चा ‘ श्री. ’ असा संक्षेप करतांना आपण लिहितों तसें ) वापरण्याचें कारण नाहीं.

हिंदुस्थानची राष्ट्रीय ‘ संस्था राष्ट्रसभा ’ हिच्याप्रमाणेंच डो बामाला ब्रह्मदेशाच्या राष्ट्रीय संस्थेचें स्थान प्राप्त करून प्रयत्न देण्याचा डोबामाच्या कार्यकर्त्यांनीं आटोकाट केला. या संस्थेचे कार्यकर्ते ध्येयवादी, त्यागी, जहाल व वैचारिक दृष्ट्या समाजवादाकडे झुकणारे होते. परंतु त्यांचे विचार भोंगळ व संदिग्ध असल्यामुळें त्यांच्या संघटनेंत शिस्तबद्धता व सुसूत्रता येऊं शकली नाहीं. तसेंच या चळवळीचे कार्यकर्ते तरुण व अननुभवी असल्यामुळें त्यांना देशाच्या राजकारणांत प्रतिष्ठा व वजनही प्राप्त झालेलें

नव्हतें. त्यामुळें ब्रह्मी राजकारणांत जुन्या पुढाऱ्यांचें व पक्षांचेंच प्रस्थ कायम राहिलें व ब्रह्मी राजकारणाला निराळी कलाटणी देण्याइतका डो बामाच्या चळवळीचा प्रभाव पडूं शकला नाहीं.

दुसरें महायुद्ध सुरू झालें, तेव्हां साहजिकच ब्रह्मी राष्ट्रवाद्यांच्या आकांक्षा पुलकित झाल्या. युद्धांत यशस्वी होण्यासाठीं ब्रिटिश सरकारला ब्रह्मी जनतेच्या सहकार्याची गरज तीव्रतेनें भासणार असल्यामुळें यावेळीं जोरांत मागणी केल्यास ब्रह्मदेशाचें स्वातंत्र्य सिद्ध होऊं शकेल, असें सर्वांना वाटूं लागलें. युद्ध संपतांच ' अटलांटिक सनदेनुसार ब्रह्मदेशाला वसाहतीच्या दर्जाचें स्वराज्य देण्यांत येईल,' असें निःसंदिग्ध आश्वासन ब्रिटिश सरकारनें द्यावें, असा प्रयत्न ब्रह्मी विधिमंडळांतील पक्षांनीं केला. त्याची पूर्ण उपेक्षा करणें अशक्य झाल्यामुळें ' युद्ध संपल्यानंतर शक्य तितक्या लौकर ब्रह्मदेशास स्वायत्त वसाहतीचा दर्जा प्राप्त करून देण्याचा ब्रिटिश सरकारचा मनोदय आहे,' अशी गुळमुळीत घोषणा ॲमेरींनीं ब्रिटिश पार्लमेंटमध्यें केली. पण तिनें कोणाचेंच समाधान होऊं शकलें नाहीं; उलट देशभर असंतोष मात्र पसरला. युद्ध संपतांच ब्रह्मदेशाला वसाहतीच्या दर्जाचें स्वराज्य ताबडतोब देण्यांत येईल असें आश्वासन देण्यासाठीं चर्चिलचें मन वळविण्याकरितां ब्रह्मी पंतप्रधान ऊ सॉ जातीनें लंडनला गेले, पण चर्चिला पाझर फोडण्यांत त्यांना यश येऊं शकलें नाहीं. तेथून पुढें अमेरिकेस जाऊन ब्रह्मदेशास परत येत असतां वाटेंतच, जपानबरोबर गुप्त संबंध ठेवण्याच्या आरोपावरून ऊ सॉ यांना अटक करण्यांत येऊन, स्थानबद्ध करण्यांत आलें.

दुसरे पुढारी डॉ. बा मॉ यांनीं आपल्या मंत्रिमंडळाचा पराभव होतांच विधिमंडळाचा राजीनामा देऊन ब्रह्मी स्वातंत्र्यासाठीं प्रचारमोहीम सुरू केली. ब्रह्मदेशांतील सव जहाल गट एका संघटनेंत आणण्यासाठीं त्यांनीं देशगौरव सुभाषचंद्र बोस यांच्या फॉर्वर्ड ब्लॉकच्या धर्तीवर ' फ्रीडम ब्लॉक "ची स्थापना केली, आपल्या प्रचारमोहिमेसाठीं कार्यक्रमाची एक सप्त-सूत्री तयार केली, व मंडालेच्या एका जाहीर सभेंत आपण फ्रीडम ब्लॉकचे सर्वाधिकारी बनल्याचें जाहीर केलें. डॉ. बा मॉ यांनीं सुरू केलेल्या या उद्योगामुळें त्यांचीही तुरुंगांत रवानगी झाली.

डो बामासारखी जहाल संघटना युद्धकाळांत अबाधित राहूं दिली जाणें शक्यच नव्हतें. ब्रिटिश सरकारनें ती चळवळ दडपून टाकण्यासाठीं वटहुकुमांचा व दडपशाही कायद्यांचा बडगा हातीं घेतला. तिचे प्रमुख कार्यकर्ते तुरुंगांत टाकण्यांत आले. तुरुंग चुकवूं शकले, ते भूमिगत झाले.

अशा प्रकारें ब्रिटिशांकडून युद्धसहकार्याच्या बदल्यांत स्वातंत्र्य मिळविण्याचा ऊ सॉचा प्रयत्न अयशस्वी झाला, डॉ. बा मॉची संकल्पित मोहीम फसली, आणि डॉ. बा मॉच्या " थकीन " चळवळीचीही वाताहत झाली, यामुळें ब्रह्मदेशांत विफलतेचें वातावरण पसरलें आणि स्वातंत्र्य प्राप्त करून घेण्यासाठीं साहजिकच ब्रह्मी राष्ट्रवादी अन्य मार्ग हुडकूं लागले. १९०५ च्या रूसो-जपानी युद्धापासून आशियामधील राष्ट्रांना जपानविषयीं विशेष अभिमान वाटे; आशियांतील परतंत्र राष्ट्रांभोंवतींचे पाश्चात्य साम्राज्यसत्तांचे पाश झुगारून देण्याच्या कामीं त्या राष्ट्राचें साह्य होईल, अशी आशाही त्यांना वाटत असे. जपानमधील सत्तारूढ राजकारणीदेखील जपान हें आशियांतील राष्ट्रांचें नेतें व त्यांच्या स्वातंत्र्याचें कैवारी राष्ट्र आहे, असा प्रचार करीत असत. " आशियाई लोकांचा आशिया " हेंच युद्ध चालू असतां जपानी प्रचाराचें सूत्र होतें. जपान ब्रह्मदेशासारखेंच बुद्धानुयायी असल्यानें या प्रचाराचा त्या देशांतील जनतेवर सहज परिणाम होई. त्यांतच अटलांटिक सनद ब्रह्मदेशास लागू करण्याबद्दलची ब्रह्मी राष्ट्रीय मागणी ब्रिटिशांनीं धुडकावून लावल्यामुळें ब्रह्मी जनतेंत वैफल्याच्या भावनेबरोबरच ब्रिटिशद्वेषाची तीव्र भावनाही साहजिकपणेंच फैलावली. जपानी प्रचार पूर्ण यशस्वी होण्याला याहून अधिक अनुकूल संधि ती कोणती असणार ?

ब्रह्मी राष्ट्रीय राजकारणांत निर्माण झालेल्या अगतिकतेमुळें डो बामा पक्षांतही दोन गट पडले. एकाद्या प्रबळ परराष्ट्राच्या साह्याखेरीज ब्रह्मदेशाचें स्वातंत्र्य साध्य होणें कठीण असून तेव्हांच्या आंतरराष्ट्रीय परिस्थितींत असें प्रभावी साह्य एकट्या जपानकडूनच मिळणें शक्य असल्यामुळें जपानचें साह्य मिळवून ब्रह्मदेशाचें स्वातंत्र्य प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करावा, असें त्यांच्यांत बहुसंख्य असलेल्या गटाचें मत बनलें. या

गटाचें नेतृत्व थकीन आँग सान, थकीन नु प्रभृति कार्यकर्त्यांकडे होतें. थकीन सो प्रभृतींचा दुसरा गट अधिकृत साम्यवादी मताप्रणालीचा असून, त्याच विचारसरणीस चिकटून राहिला. या दिशेनें प्रयत्न करण्यासाठीं आँग साननें आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीनें क्रांतिकारक पक्षाची स्थापना केली, व तीस निवडक साथींनिशीं जपानी सरकारशीं समक्ष बोलणीं करण्यासाठीं आँग सान गुप्तपणें जपानला गेले. तेथें जपानी सरकारच्या अधिकृत प्रतिनिधींबरोबर त्यांनीं दीर्घकाळ वाटाघाटी केल्या व अखेर त्यांना हवें असलेलें ब्रह्मदेशाच्या स्वातंत्र्याविषयींचें स्पष्ट आश्वासन देण्यांत आलें. हाँगकाँग हस्तगत झाल्यावर ता. २१ जानेवारी १९४२ रोजीं जपानचे प्रधान मंत्री सेनापति तोजो यांनीं जपानच्या पार्लमेंटमध्यें केलेल्या भाषणांत ब्रह्मदेशाच्या स्वातंत्र्याविषयीं दिलेल्या या वचनाचा जाहीर पुनरुच्चार केला.

जपानमध्यें गेलेल्या ब्रह्मी राष्ट्रवाद्यांनीं तेथें लष्करी शिक्षण मिळविलें व त्यानंतर आँग साननें आझाद ब्रह्मदेश सेनेची उभारणी केली. जपानी सरकारबरोबर केलेल्या कराराप्रमाणें ही आझाद ब्रह्मदेश सेना जपान्यांनीं प्रशान्त महासागरांत युद्धाचा डोंब उसळविल्यावर जपानी सेनेच्या सहकार्यानें ब्रह्मदेशावर आँग सानच्या नेतृत्वाखालीं चालून गेली, व ब्रह्मदेश ब्रिटिशांपासून मुक्त केला.

आँग सान प्रभृति राष्ट्रवाद्यांनीं जपान्यांशीं सहकार्य करण्याचें ठरविलें तें भोळ्याभाबड्या भावनेच्या आहारीं जाऊन नव्हे. तेव्हांच्या आशियांतील परिस्थितींत जपानला ब्रह्मी स्वातंत्र्याविषयींच्या आपल्या वचनास जागणें भागच पडेल, असें त्यांना वाटत होतें. नंतरच्या काळांत रेडिओवर केलेल्या एका भाषणांत हें स्पष्ट करतांना, आझाद ब्रह्मी सेनेचे एक सेनानी कर्नल ने विन म्हणाले कीं, “ चीनमध्यें जपानी फॅसिस्टांनीं केलेला जुलूम व संहार यांची आम्हांला माहिती नव्हती असें नव्हे......पण आम्हांला असें वाटलें कीं जपान्यांना हिंदी जनतेच्या सक्रिय सहकार्यावाचून हिंदुस्थान व्यापणें कधींच शक्य होणार नाहीं, आणि त्यासाठीं आपणांस निरनिराळे प्रदेश गिळंकृत करण्याची इच्छा नाहीं, असा विश्वास जपान्यांना

हिंदी जनतेच्या अंतःकरणांत कृतीनें निर्माण करावा लागेल. हिंदी जनतेला आपल्या हेतूबद्दल असा विश्वास वाटावा यासाठीं ब्रह्मदेशाला स्वातंत्र्य देणें जपान्यांना भागच पडेल. परिस्थितीच्या दडपणाप्रमाणेंच राजकीय डावपेंच म्हणूनही ब्रह्मदेश, फिलिपाईन बेटें, व आग्नेय आशियांतील अन्य राष्ट्रांना जपाननें दिलेल्या स्वातंत्र्याबद्दलच्या अभिवचनाची परिपूर्ति अखेर करावीच लागेल, असें आम्हांस वाटल्यामुळें आम्हीं त्यांच्याकडून स्वातंत्र्याचें वचन मिळाल्यावर जपान्यांशीं सहकार्य करावयाचें ठरविलें.

पण ब्रह्मदेशामधून ब्रिटिशांची हकालपट्टी झाल्यावर खरी राज्यसत्ता जपानीच बळकावून बसले, आणि त्यांच्याशीं ज्यांनीं सहकार्य केलें होतें, त्या ब्रह्मी राष्ट्रवाद्यांच्या हातीं डॉ. बा माँ प्रमुख असलेलें नामधारी स्वतंत्र ब्रह्मदेशाचें सरकार ठेवलें ! जपान्यांनीं आपला विश्वासघात केलेला बघतांच आँग सान गटानें जपान्यांविरुद्ध बंड उभारण्याची तयारी गुप्तपणें सुरू केली. ब्रह्मी कम्युनिस्ट पक्ष, पीपल्स रेव्होल्यूशनरी पार्टी (नंतरचा ब्रह्मी समाजवादी पक्ष), ईस्ट एशिया यूथ लीग इत्यादि पक्ष व संस्थाही स्वतंत्रपणें जपानी सत्तेविरुद्ध गुप्त संघटना करीत होत्या. या पृथक्पणें कार्य करणाऱ्या पक्षांना व गटांना एका संघटनेंत आणून जपानी सत्तेचा प्रतिकार करणाऱ्या प्रभावी गुप्त चळवळींत तिचें रूपांतर करतां येईल, याची जाणीव या सर्वच पक्षांच्या कार्यकर्त्यांना झाली व त्या उद्देशानें १९४४ च्या ऑगस्टमध्यें त्यांनीं "ॲंटी-फॅसिस्ट पीपल्स फ्रीडम लीग" या संस्थेची स्थापना केली. अशा रीतीनें ब्रह्मदेशांतील सर्व स्वातंत्र्यवादी पक्ष व गट एका संघटनेच्या निशाणाखालीं येऊन जपानी सत्ता झुगारून देण्यासाठीं गुप्त तयारी पद्धतशीर सुरू होतांच, या आंदोलनाच्या पुढाऱ्यांनीं आपले हिंदुस्थानांत असलेले प्रतिनिधि थीन पी यांच्यामार्फत दोस्त राष्ट्रांच्या अधिकाऱ्यांशींही बोलणीं सुरू केलीं. हीं बोलणीं बराच काळ चाललीं. कारण ब्रह्मी राष्ट्रवाद्यांना जपान्यांविरुद्ध गनिमी काव्यानें लढण्यासाठीं शस्त्रें पुरविण्यास दोस्त सत्तांचे अधिकारी भीत होते. एकदां ब्रह्मी राष्ट्रवाद्यांना शस्त्रें पुरविलीं, म्हणजे उद्यां तीं काढून कशीं घेतां येतील ? आणि मग ते आमच्याच विरुद्ध त्यांचा उपयोग करणार नाहींत कशावरून ? या शंका त्यांना भेडसावीत होत्या. पण अखेर त्यांना फ्रीडम् लीगशीं

संगनमत करणें भागच पडलें, व या योजनेस अनुसरून १९४५ मध्यें दोस्त सैन्यें ब्रह्मदेशांत शिरलीं; त्याच वेळीं ऑंग सानच्या नेतृत्वाखालीं ब्रह्मी राष्ट्रवाद्यांनीं दोस्त सैन्यास तोंड देणाऱ्या जपान्यांच्या पिछाडीस सशस्त्र बंडाचा डोंब उसळून दिला! जपान्यांच्या तावडीमधून ब्रह्मदेशाचें 'विमोचन' करण्याच्या कामीं ऑंग सानच्या नेतृत्वाखालीं ब्रह्मी राष्ट्रवाद्यांनीं केलेल्या महनीय कामगिरीबद्दल दोस्त सैन्याच्या प्रमुख सेनानींनीही त्यांची मुक्तकंठानें स्तुति केली.

युद्धकाळांत ब्रह्मदेशास जें अग्निदिव्य करावें लागलें, त्यामुळें त्या राष्ट्राचा संपूर्ण कायापालट झाला. जनतेंत अभूतपूर्व राजकीय जागृति होऊन तिच्यांत तीव्र स्वातंत्र्याकांक्षा निर्माण झाली. फ्रीडम लीगची स्थापना जपान्यांचें वर्चस्व झुगारून देण्यासाठीं करण्यांत आली असली, तरी तिच्यापुढें तेवढेंच उद्दिष्ट नव्हतें; जपानी सत्तेचें उच्चाटन व ब्रह्मी स्वातंत्र्याची स्थापना असें द्विविध ध्येय फ्रीडम लीगनें पुरस्कारिलेलें होतें व जपानविरोधी गुप्त-संघटना म्हणून कार्य करतांनाही त्या संस्थेच्या वतीनें जें वाङ्मय गुप्तपणें जनतेंत वांटण्यांत आलें व अन्यही जो प्रचार करण्यांत आला, त्यांत फ्रीडम् लीगच्या ध्येयाच्या या द्विविध स्वरूपावर विशेष भर देण्यांत येत असे. युद्ध संपतांच फ्रीडम लीगची पुनर्घटना ब्रह्मी स्वातंत्र्यासाठीं लढणाऱ्या संयुक्त राष्ट्रीय आघाडीच्या स्वरूपांत करण्यांत आली व सेनापति ऑंगसान यांना तिचे अध्यक्ष निवडण्यांत आलें.

युद्धपूर्वकाळीं ब्रह्मी बहुजनसमाजाच्या अंतःकरणाचें अधिष्ठान असणारी राष्ट्रीय संस्था ब्रह्मदेशांत अस्तित्वांत नव्हती. फ्रीडम् लीग ऊर्फ 'फासा-पाला' नें ती उणीव भरून काढली आणि तिच्या रूपांत स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं उपयोगी पडणारें प्रभावी शस्त्र ब्रह्मी जनतेस प्राप्त झालें. ब्रह्मी जनता उत्साहानें तिच्या ध्वजाखालीं संघटित झाली आणि ब्रह्मदेशांतील सर्व स्वातंत्र्यवादी पक्ष व गट तिच्या संघटनेंत सामील झाले.

फासापालाचें ध्येय त्या संस्थेच्या घटनेंत पुढील शब्दांत नमूद करून ठेवण्यांत आलेलें होतें: "(१) जगामधून फॅसिझम्‌चा अखेरचा अवशेष नाहींसा होईतों त्याविरुद्ध लढा चालविणें; (२) ब्रह्मी जनतेचा

स्वयंनिर्णयाचा हक्क प्रथापित करणें; ( ३ ) लोकशाहीप्रणीत मार्ग व साधनें यांच्या साह्यानें युद्धानें उध्वस्त झालेल्या ब्रह्मदेशाची पुनर्रचना करणें, आणि ( ४ ) ब्रह्मदेशांतील अल्पसंख्य असलेल्या भिन्नवंशीय जनतेला मध्यवर्ती सरकारपासून फुटून निघण्यापर्यंतचा स्वयंनिर्णयाचा हक्क मान्य करून, जनतेच्या स्वयंस्फूर्त मान्यतेवर आधारलेल्या संघराज्याच्या स्वरूपांत नव्या ब्रह्मदेशाची रचना करणें.''

फासापालानें अत्यंत अल्प काळांतच ब्रह्मी जनतेच्या अंतःकरणाची पकड घेऊन जी प्रगति केली, तिला जगाच्या इतिहासांत क्वचित्‌च तोड सांपडेल. थोड्याच अवधींत हिंदी राष्ट्रसभेच्या राष्ट्रव्यापी संघटनेप्रमाणें फासापालाच्या शाखांचें जाळें सर्व ब्रह्मदेशभर पसरलें, आणि जवळजवळ पावणे-दोन कोटींची लोकसंख्या असलेल्या ब्रह्मदेशांतील पांच लक्षांइतके स्त्री-पुरुष तिचे प्राथमिक सभासद बनले! संघटनेचें कार्य पद्धतशीर व परिणामकारक व्हावें म्हणून उत्तर ब्रह्मदेश, मध्य ब्रह्मदेश व दक्षिण ब्रह्मदेश असे देशाचे तीन विभाग पाडून प्रत्येकावर एकेका विभाग-कार्यवाहाची नेमणूक करण्यांत आली. ते आपलें कार्य मुख्य कचेरीच्या संघटनाखात्याच्या नियंत्रणाखालीं करीत.

हिंदी राष्ट्रसभेच्या अखिल भारतीय समितीप्रमाणें फासापालाचें ध्येय-धोरण व कार्यक्रम निश्चित व नियंत्रित करण्याचें कार्य त्या संस्थेचें "सुप्रीम कौन्सिल" करतें, व त्याची अंमलबजावणी "वर्किंग कमिटी" हेंच नामाभिधान असलेली कार्यकारिणी करते.

फासापालाच्या संघटनेंतलें नजरेंत भरणारें वैशिष्ट्य म्हणजे, फासापालाचें ध्येय मान्य असणाऱ्या, व त्यासाठीं फासापालांत सामील होणाऱ्या राजकीय पक्षांना व बहुजनसमाजाच्या वर्ग-संस्थांना मान्यता देऊन त्या पक्षांचे व संस्थांचे प्राथमिक सभासद फासापालाचेही प्राथमिक सभासद आपोआप झाल्याचें मानण्याची असलेली योजना होय. राष्ट्राचा स्वातंत्र्य-लढा व जनतेचा दैनंदिन आर्थिक लढा यांची सांगड घालून राष्ट्रीय लढा अधिक बलवान करण्यासाठीं हिंदी राष्ट्रसभेच्या घटनेंत अशा धर्तीची योजना असावी, असें पं. जवाहरलाल नेहरूंनीं लखनौ अधिवेशनाच्या अध्यक्ष-

स्थानावरून भाषण करतांना आग्रहानें प्रतिपादन केलें होतें. फासापालांत याप्रमाणें सामील झालेल्या संस्थात ब्रह्मी समाजवादी पक्ष व ब्रह्मी साम्यवादी पक्ष असे दोनच राजकीय पक्ष, पीपल्स व्हॉलंटिअर ऑर्गनायझेशन ( पी. व्ही. ओ. ) ही फासापालाची स्वयंसेवक संघटना, करीन युवक संघ, मोन संघ, ऑल बर्माबर्मीज् मुस्लिम कॉंग्रेस यांसारख्या वंशविषयक संस्था, आणि किसान संघ, मजूर संघ, व्यापारी संघ, शिक्षक संघ अशा वर्ग किंवा विशिष्ट हितसंबंधी संस्था होत्या. फासापालाशीं संलग्न झालेल्या संस्था किंवा पक्ष यांना आपल्या स्वतंत्र राजकीय धोरणाचा अथवा कार्यक्रमाचा जाहीर प्रचार करण्याचें स्वातंत्र्य नसून त्यांनीं फासापालाच्या अधिकृत धोरणाचा व कार्यक्रमाचाच प्रचार व पुरस्कार केला पाहिजे व तोही फासापालाच्या सुप्रीम कौंसिलच्या वतीनें व नांवावरच केला पाहिजे, असें बंधन घटनेंत घालून ठेवण्यांत आलें. एकादें विशिष्ट धोरण अथवा कार्यक्रम फासापालानें स्वीकारावा असा प्रचार करण्याची मुभा, फासापालाच्या सुप्रीम कौन्सिलचा निर्णय होईपर्यंत प्रत्येक संलग्न संस्थेस ठेवण्यांत आली. मात्र त्याविषयीं सुप्रीम कौंसिलनें अखेरचा निर्णय घेतला, कीं सर्वांनीं तो आपलाच मानून मान्य केला पाहिजे; अशीही घटनेंत तरतूद असल्यामुळें फासापालाचें ध्येय धोरण व संलग्न पक्ष अथवा संघटना यांचें ध्येय-धोरण यांत संघर्ष निर्माण होण्याचा संभवही कमी झाला. या बंधनाचा भंग फक्त ब्रह्मी साम्यवादी पक्षानेंच नंतर केला, व या शिस्तभंगाबद्दलचें शासन म्हणून त्या पक्षाला फासापालाच्या संघटनेमधून अर्धचंद्र मिळाला.

ब्रह्मदेशांत निर्माण झालेल्या या नव्या जागृतीची व शक्तीची उपेक्षा करून, त्या देशामध्यें जुना जमाना पुन्हा सुरू करण्याचा प्रयत्न करणें धाडसाचेंच झालें असतें. परंतु ब्रह्मदेशचे युद्धकालीन गव्हर्नर सर रेजिनॉल्ड डॉर्मन-स्मिथ हे चर्चिलच्या जातीचे इरसाल साम्राज्यवादी असल्यामुळें, ते ब्रह्मदेश मुक्त होतांच ब्रह्मदेशास परत आले, ते अंतःकरणांत टोरी साम्राज्यवादी नीति व खिशांत टोरींनीं ब्रह्मदेशासाठीं तयार केलेली ब्रह्मदेशाच्या फाळणीवर आधारलेली व केव्हां तरी भविष्यकाळीं वसाहतीचा दर्जा देऊं करण्याचें संदिग्ध आश्वासन असलेली योजना घेऊनच. हिंदी

" मध्यंतर सरकार "प्रमाणें ब्रह्मदेशांतही मध्यंतर सरकार स्थापन करण्यांत यावें व स्वतंत्र ब्रह्मदेशासाठीं घटना तयार करण्याकरतां सार्वत्रिक मतदानानें घटना-समिति निवडण्यांत यावी, अशी फासापालानें त्यांच्याकडे मागणी केली. इतर ब्रह्मी पक्षांनींही तिचा पुरस्कार केला असतांदेखील डॉर्मन स्मिथ-साहेबांनीं ती धुडकावून लावली. फासापालाला डावलून आपल्या ' होयबां 'चें कार्यकारी मंडळ बनवून त्यांत फासापालाच्या या मागणीचा पुरस्कार करणाऱ्या व कांहीं काळ तिची संलग्न संस्था म्हणूनही नांदलेल्या म्योचित पक्षाचेही दोन सभासद नेमले. ब्रह्मी राष्ट्रीय चळवळींत फूट पाडण्यासाठीं आटोकाट प्रयत्न करण्याचा डॉर्मन-स्मिथनें धडाका आरंभिला व भरीला पूर्वी ब्रह्मदेशांवर वर्चस्व गाजविणाऱ्या पाश्चात्य मक्तेदार कंपन्यांना आपले पाश पुन्हां पसरविण्यासाठीं सवलती देण्यास प्रारंभ केला. एकाद्या दारूच्या कोठारावर ठिणगी पडावी त्याप्रमाणें डॉर्मन-स्मिथच्या या कृत्यानें ब्रह्म-देशांत भडका उडणें अपरिहार्य दिसूं लागलें. कारण ब्रह्मी राष्ट्रीय मागणी झिडकारण्यांत येतांच देशांत संपांची लाट उसळली. पोस्ट, रेल्वे व सरकारच्या मुलकी खात्यामधील इतर नोकरवर्गाप्रमाणेंच ब्रह्मी पोलीसही या राष्ट्रीय मागणीस पाठिंबा देण्यासाठीं संपावर गेले, आणि जपानच्या पराभवानंतर ब्रह्मदेशांत नव्यानेंच उभें करण्यांत आलेलें ब्रिटिश राज्ययंत्र कोलमडून पडण्याच्या बेतांत आलें! ब्रह्मदेशांत मोठ्या प्रमाणावर असलेला शस्त्र-प्रसार व जोडीस युद्धकाळीं गनिमी युद्धाचा अनुभव घेतलेल्या राष्ट्रवाद्यां-मधून उभारलेली फासापालाजवळ असलेली " पी. व्ही. ओ. " ही निम-लष्करी स्वयंसेवक-संघटना यांमुळें अखेर ब्रह्मदेशांतही इंडोचायनांतील संग्रामाची आवृत्ति निघणें संभवनीय होतें. इंग्लंडमध्यें सार्वत्रिक निवडणुकीं-नंतर अधिकारारूढ झालेल्या मजूरपक्षानें हा धोका त्वरित हेरला व डॉर्मन-स्मिथना परत बोलावून त्यांच्या जागीं सेनापति सर ह्यूबर्ट रॅन्स यांना गव्हर्नर म्हणून पाठविलें. या नव्या गव्हर्नरांनीं डॉर्मन-स्मिथच्या होयबांचें कार्यकारी मंडळ बरखास्त करून ऑंग सानच्या नेतृत्वाखालीं फासापालाचें बहुमत असलेलें सर्वपक्षीय कार्यकारी मंडळ बनवून, डॉर्मन-स्मिथनीं ब्रह्मी राष्ट्रवाद्यांविरुद्ध पुकारलेलें ' युद्ध ' बंद केलें.

याप्रमाणें नवें कार्यकारी मंडळ बनविण्यांत आलें, तरीही ब्रिटिश सरकारचें टोरींच्या श्वेतपत्रिकेवर आधारलेलें धोरणच कायम होतें. म्हणून ब्रह्मी कार्यकारी मंडळाला हिंदुस्थानांतल्या मध्यंतर सरकारचा दर्जा व सत्ता देण्यांत यावींत, एप्रिलमध्यें होणाऱ्या निवडणुकींनीं घटना-परिषद निवडण्यांत यावी आणि जानेवारी १९४८ अखेर ब्रह्मदेशास स्वातंत्र्य देण्यांत यावें, अशी फासापालाच्या कार्यकारिणीनें मागणी केली, व ती जानेवारी अखेरपर्यंत मान्य न झाल्यास लढा पुकारण्याचा निश्चयही नमूद करून ठेवला. कार्यकारी मंडळांत ज्या इतर पक्षांचे प्रतिनिधि होते त्यांनींहि या मागणीस दुजोरा दिला. याप्रमाणें ब्रह्मदेशांत निर्माण होऊं घातलेल्या नव्या पेंचप्रसंगांतून मार्ग काढण्यासाठीं ब्रिटिश सरकारच्या प्रतिनिधींबरोबर समक्ष विचारविनिमय करण्याकरतां ब्रिटिश सरकारनें ब्रह्मी पुढाऱ्यांच्या शिष्टमंडळाला पाचारण केलें. या निमंत्रणास अनुसरून ऑंग सानच्या नेतृत्वाखालीं गेलेल्या शिष्टमंडळाबरोबर ब्रिटिश सरकारनें केलेल्या वाटाघाटींमधून ॲटली-ऑंग सान योजना जन्मास आली. या योजनेप्रमाणें ब्रह्मी कार्यकारी मंडळाला मध्यंतर सरकारचा दर्जा मिळाला, आणि एप्रिल १९४७ मध्यें होऊं घातलेल्या निवडणुकींमधून घटना-परिषद स्थापन करण्याचेंही निश्चित झालें.

● ● ●

## फासापालाचे आधारस्तंभ : ४ :
## —समाजवादी पक्ष व पी. व्ही. ओ.

कोणाही परराष्ट्रीय निरीक्षकाच्या चटकन नजरेस येणारें ब्रह्मी राजकारणाचें वैशिष्ट्य म्हणजे इतर राष्ट्रांतील राजकीय क्षेत्रांत आढळून येणाऱ्या उजव्या-डाव्या विचारप्रणालीच्या संघर्षाचा ब्रह्मी राजकारणांत असणारा अभाव हें होय.

ब्रह्मदेश हें वासाहतिक समाजव्यवस्थेचें एक नमुनेदार उदाहरण आहे. त्या देशांत मोठमोठे कारखाने व उद्योगधंदेच नाहींत. तेल, खनिज

संपत्तीचें उत्पादन, नद्यांवरील वाहतुक-व्यवस्था व इमारती लाकडांचा व्यापार गोऱ्या मक्तेदार मंडळ्यांच्या ताब्यांत; शेती हा ब्रह्मी जनतेचा मुख्य व्यवसाय व निर्यात होणाऱ्या मालांतही तांदुळाचें प्रमाणच सर्वांत अधिक. परंतु भातशेतीपैकीं निम्याहून अधिक जमीन सावकारांच्या ताब्यांत गेलेली असून त्या सावकारांतही परकी म्हणजे हिंदी चेट्टियारच बहुसंख्य. ब्रह्मदेशाचा केवळ आयात-निर्यात व्यापारच परकी व्यापाऱ्यांच्या हातीं गेला नाहीं, तर देशांतील अंतर्गत व्यापारही परराष्ट्रीय व्यापारीच —प्रामुख्यानें हिंदी व चिनी बळकावून बसले.

हळू हळू त्या देशात इंग्रजी शिक्षणाचा प्रसार झाला, तसा सुशिक्षितांचा नवा वर्ग उदयास आला; त्यांच्यांतूनच लहान प्रमाणावरील उद्योगधंदे, भात सडण्याच्या गिरण्या, इमारती लाकडें कापण्याचे व इतर लहान-सहान कारखाने चालविणारा वर्ग निर्माण झाला. परंतु या लहान-सहान प्रमाणावरील उद्योगधंदे करणाऱ्या वर्गाला ब्रह्मी जीवनावर किंवा राजकारणावर प्रभाव कसा पाडतां येणार? याप्रमाणें उजव्या राजकारणाचा पुरस्कार करणारा कारखानदार, व्यापारी, सावकार, जमीनदार यांचा प्रबल 'स्वदेशी' वर्गच ब्रह्मदेशांत जन्मास न आल्यामुळें ब्रह्मी राजकारणांत 'उजवा' पक्षच अस्तित्वांत येऊं शकला नाहीं. आणि ब्रह्मी समाजाच्या या अविकसित अवस्थेमुळेंच दुसऱ्या महायुद्धापर्यंत त्या देशांत बद्धमूल झालेली प्रबल राष्ट्रीय संस्था जन्मास येऊं शकली नाहीं, प्रबल राष्ट्रीय आंदोलन जन्मास येऊं शकलें नाहीं.

आर्थिक दुरवस्थेनें हैराण झालेल्या व अपरंपार दारिद्र्यांत खितपत पडणाऱ्या जनतेंत जागृति व संघटना करून त्यांतून प्रबल आंदोलन उभें करण्यास अवश्य असलेली शास्त्रीय, क्रांतिवादी दृष्टि, व त्या कार्यास वाहून घेण्याची वृत्ति युद्धपूर्वकाळीं ब्रह्मी राजकारणांत प्राबल्य असणाऱ्या पक्षांच्या पुढाऱ्यांत नव्हती. उलट, आपल्या आर्थिक दुःस्थितीमुळें बहुजनसमाजांत धुमसत असलेल्या असंतोषाचा आपल्या संधिसाधु राजकारणासाठीं उपयोग करून घेतां यावा, म्हणून विशेषतः हिंदी लोकच त्यांच्या दुःख-दारिद्र्यास जबाबदार असल्याचें भासवून, त्यांच्यांत ब्रह्मदेशांतील हिंदी लोकांविरुद्ध

द्वेषाची भावना पेटवण्याचीच "नीति" त्यांनीं स्वीकारली, आणि लोकप्रिय होण्यासाठीं हाच सोपा व स्वस्त असलेला घोपट मार्ग त्यांनीं पत्करला. त्यांत अंग मोडून, त्यागपूर्वक कार्य करण्याची दगदग नव्हती, आणि ब्रह्मी बहुजनसमाजांत आपल्याऐवजीं हिंदी लोकांविरुद्ध असंतोष निर्माण झाल्यास, ब्रिटिश साम्राज्यवाद्यांना तें हवेंच असल्यामुळें, त्यांच्याकडूनही त्या पुढाऱ्यांना प्रत्यक्षाप्रत्यक्ष उत्तेजन, व 'कार्या'स भरपूर वावही मिळूं शकत होता!

डो बामाच्या थकीन आंदोलनामागें असणाऱ्या तरुणांनीं व विद्यार्थ्यांनीं बहुजनसमाजाची अशा शास्त्रशुद्ध पायावर संघटना करून, तिमधून राष्ट्रीय संस्था व राष्ट्रीय आंदोलन निर्माण करण्याचा केलेला प्रयत्नही, युद्धपूर्वकाळची परिस्थिति त्यासाठीं पुरेशी परिपक्व झालेली नसल्यामुळें, फसला. परंतु युद्धकाळांत करावें लागलेलें अग्निदिव्य व युद्धसमाप्तीनंतर आशियावर घडलेल्या घटना यांमुळें ब्रह्मी राजकीय परिस्थितींत घडून आलेल्या क्रांतिकारक परिवर्तनामुळें जनतेची अशी दिशाभूल करणें शक्य झालें नाहीं. युद्धामुळें झालेला विध्वंस व नंतर भडकलेली महागाई यामुळें ब्रह्मी जनतेला त्यांतल्या त्यांत शेतकरी व कामगार वर्गाला, आर्थिक परिस्थिति असह्य झाली होती. वर्ग-संघटनांच्या द्वारें बहुजनसमाजाला संघटित करून त्यांचीं गाऱ्हाणीं व दुःस्थिति निवारण करण्याऱ्या पक्षालाच तिचा पाठिंबा मिळूं लागला, आणि जुने पक्ष व पुढारी निष्प्रभ होऊन कोपऱ्यांत धूळ खात पडले.

युद्धोत्तरकालांत ब्रह्मदेशांत प्रबल राष्ट्रीय संस्था व राष्ट्रीय आंदोलन जन्मास आलीं, तेव्हां ब्रह्मी समाजाच्या या वैशिष्ट्यपूर्ण अवस्थेमुळें त्यांनाही वैशिष्ट्यपूर्ण रंगरूप प्राप्त झालें; ब्रह्मी राष्ट्रवाद, ब्रह्मी राष्ट्रीय संस्था व राष्ट्रीय आंदोलन 'डाव्या' रंगाचीं झालीं. त्या देशांत भांडवलशाही समाजव्यवस्थेचा पुरस्कार करणारा 'उजवा' राजकीय पक्ष जन्मास येणें, व आलाच असता, तर त्याला पाठबळ मिळणेंच, या परिस्थितींत शक्य नव्हतें.

ब्रह्मी परिस्थितीच्या या मुशीमधून ब्रह्मदेशाची राष्ट्रीय संस्था फासापाला

७।३१५

जन्मास आलेली असल्यामुळें, तिचें स्वरूप व कार्य यांत तिचेंच प्रतिबिंब पडणें अपरिहार्य होतें. ब्रह्मदेशाच्या या वैशिष्टयपूर्ण परिस्थितीची यथार्थ जाणीव न झाल्यामुळेंच त्या देशाची राष्ट्रीय संस्था व राष्ट्रीय चळवळ डाव्या गटांच्या 'वर्चस्वाखालीं गेलेली' असल्याचें मत कित्येक परराष्ट्रीय निरीक्षकांनीं व्यक्त केलेलें आढळून येतें.

फासापाला हा राजकीय पक्ष म्हणून कधींच संघटित करण्यांत आला नाहीं. ब्रह्मदेशाच्या स्वातंत्र्यासाठीं झगडणारी, ब्रह्मदेशांतील स्वातंत्र्यवादी पक्ष, संस्था व गट यांनीं उभारलेली संयुक्त राष्ट्रीय आघाडी हेंच तिचें स्वरूप तिच्या संस्थापनेपासून ठेवण्यांत आलें होतें. ऑंग सान हे ब्रह्मी साम्यवादी पक्षाच्या संस्थापकांत प्रमुख असून, नंतर युद्धकाळांतल्या परिस्थितींत झालेल्या मतभेदामुळें त्यांनीं तो पक्ष सोडला व नंतर ते समाजवादी पक्षाचेही सभासद झाले नाहींत, तरीही ते मतानें समाजवादीच होते. कोणत्याही पक्षाचें सदस्यत्व न पत्करतां समाजवादी समाज-व्यवस्था स्थापन करण्याच्या उद्देशानें कार्य करण्याची पं. नेहरूंची भूमिकाच नंतर त्यांनीं पत्करली. फासापालामध्यें ऑंग सानच्या खालोखाल वजन व महत्त्व असलेले, व त्यांच्या वधानंतर नेतृत्वपदाची जबाबदारी ज्यांच्या शिरावर आली, ते थकीन नु हेही ऑंग सानप्रमाणेंच कोणत्याही पक्षाचे सदस्य नसले, तरी विद्यार्थिदशेपासून विचारानें समाजवादीच आहेत.

फासापालाशीं संलग्न असणाऱ्या संस्थांत एकच राजकीय पक्ष आहे— तो म्हणजे ब्रह्मी समाजवादी पक्ष. फासापालाचीं सूत्रें वस्तुतः याच पक्षाच्या हातीं असून, तोच फासापाला व फासापाला-नियंत्रित ब्रह्मी सरकार यांच्या मागची खरी शक्ति आहे.

ब्रिटिश सत्तेविरुद्ध सशस्त्र बंड करण्याच्या उद्देशानें १९३९ मध्यें ऑंग सान प्रभृति युवक कार्यकर्त्यांनीं स्थापन केलेल्या पीपल्स रेव्होल्यूशनरी पार्टी या गुप्त क्रांतिवादी पक्षामधून ब्रह्मी समाजवादी पक्ष जन्मास आला. भूमिगत क्रांतिवादी पक्ष म्हणून कार्य करीत असतां, त्या पक्षामार्फत जनतेंत ज्या वाङ्मयाचा प्रसार करण्यांत येई, त्यांत साम्राज्यविरोधाबरोबरच समाजवादी विचारसरणीचाही प्रचार करण्यांत येत असे.

जपानच्या तावडीमधून ब्रह्मदेश मुक्त झाला, तेव्हां ब्रह्मी राजकारणाचें एक पर्व संपून, नव्या पर्वास प्रारंभ झाला. या नव्या परिस्थितीस अनुरूप अशा नव्या दिशेनें कार्य करण्यासाठीं १९४५ च्या सप्टेंबरमध्यें पूर्वीच्या पीपल्स रेव्होल्यूशनरी पार्टीचें रूपांतर ब्रह्मी समाजवादी पक्षांत करण्यांत आलें, व तेव्हांपासून समाजवादी पायावर स्वतंत्र ब्रह्मदेशाची उभारणी करण्यासाठीं त्या पक्षानें "कायदेशीर" पक्ष म्हणून कार्यास प्रारंभ केला.

साम्यवाद्यांच्या "पोलिट ब्यूरो" सारखें ब्रह्मी समाजवादी पक्षांचें पांच पुढाऱ्यांचें "प्रेसीडियम" असून, त्याखेरीज पंधरा सभासदांचें कार्यकारी मंडळ आहे. ऑंग सानबरोबर मारले गेलेले ब्रह्मी मध्यंतर सरकारचे अर्थमंत्रि थकीन म्या हे या पक्षाचे अध्यक्ष होते.

समाजवादी पक्षाचें ध्येय-धोरण मला विशद करून सांगतांना त्या पक्षाचे कार्यवाह ऊ बा स्वे म्हणाले, "फासापालाचा घटक म्हणून फासापालाच्या मार्फत ब्रह्मदेशांत राष्ट्रीय क्रांति घडवून आणण्याचा प्रयत्न करणें, हें आमच्या पक्षाचें प्रथम व तांतडीचें उद्दिष्ट आहे. हें उद्दिष्ट ब्रह्मी घटना-परिषदेंत मान्य होणाऱ्या घटनेच्या आधारावर स्वतंत्र व सार्वभौम प्रजासत्ताकाची स्थापना होईल तेव्हां सिद्ध होईलच. या प्रजासत्ताक ब्रह्म-देशाची समाज-व्यवस्था समाजवादी बनविण्यासाठीं या राष्ट्रीय क्रांतीचा सामाजिक क्रांतींत विकास करणें, हें आमचें त्यानंतरचें उद्दिष्ट."

ब्रह्मी समाजवादी पक्षानें आपल्यापुढचें हें द्विविध उद्दिष्ट साध्य करून घेण्यासाठीं स्वीकारलेली नीति व कार्यपद्धति समजावून देतांना ते पुढें म्हणाले, "राष्ट्रीय क्रांतीला पूर्वी मार्क्सवादी लोक 'बूर्ज्वा' क्रांति मानीत असत. परंतु आतां काळ बदलला आहे. किसान-कामगारांचा बहुजनसमाज आतां पूर्वीसारखा मागासलेला व असंघटित राहिलेला नाहीं. त्यांच्यांत जागृति व जाणीव निर्माण झालेली आहे. त्यामुळें राष्ट्रीय क्रांतीचें स्वरूपही आतां "बूर्ज्वा" उरलेलें नाहीं. साम्राज्यवादाच्या टांचेखालीं दडपलेल्या देशांतील जनतेच्या स्वातंत्र्य-लढ्याचें हें बदललेलें स्वरूप लक्षांत घेऊन, त्याला अनुरूप अशा नव्या दृष्टिकोनानें आम्ही आपलें कार्य चालवीत आहोंत. राष्ट्रीय क्रांतीमधूनच आम्हांला समाज-

क्रांतीचेंही ध्येय साध्य करावयाचें आहे. म्हणून राष्ट्रीय क्रांतीसाठीं कार्य करीत असतांनाच आमच्या वर्ग-संघटनांमार्फत आम्ही समाजक्रांतीचीही तयारी करीत आहोंत. ”

ब्रह्मदेशांत समाजवादी पक्ष व साम्यवादी पक्ष हे दोनच संघटित, व बहुजनसमाजांत वजन असलेले पक्ष आहेत. या दोन्ही प्रतिस्पर्धी पक्षांच्या स्पर्धेच्या अंतिम निर्णयावरच ब्रह्मदेशाचें राजकीय भवितव्य अवलंबून आहे. युद्धपूर्व काळांत ब्रह्मी राजकारणांत वर्चस्व गाजविलेल्या ऊ सॉनें ऑंग सानप्रभृतींचा खून करून राजसत्ता हस्तगत करण्याचा केलेला प्रयत्न फसल्यानंतर कोणा तिसऱ्या पक्षाकडून ब्रह्मी राजकीय क्षेत्रांत स्पर्धेसाठीं पदार्पण केलें जाण्याचा संभवच उरलेला नाहीं.

शेतकरी, कामकरी, विद्यार्थी, शिक्षक, महिला, युवक वगैरेंच्या संघटनांच्या मार्फत आपल्या पक्षाचा प्रभाव वाढविण्याचा प्रयत्न हे दोन्ही प्रतिस्पर्धी राजकीय पक्ष करीत आहेत. फासापालामध्यें संलग्न संस्था म्हणून सामील असलेला किसान संघ, निरनिराळे कामगार संघ, महिला संघ, शिक्षक संघ, युवक संघ इत्यादि संघटनांचें कार्य समाजवादी पक्षाच्या मार्गदर्शनाखालीं व नियंत्रणानेंच चालतें. साम्यवाद्यांच्या किसान संघ ( पेझन्ट्स् युनियन ) या संस्थेला प्रतिस्पर्धी अशी समाजवाद्यांची अखिल ब्रह्मदेश किसान संघ ( ऑल-बर्मा पेझन्ट्स् ऑर्गनायझेशन ) ही किसान संघटना आहे. फासा-पाला-साम्यवादी बेबनावानंतर समाजवादी पक्ष ऑल बर्मा ट्रेड युनियन काँग्रेस या संयुक्त संस्थेमधून बाहेर पडला, व ट्रेड युनियन काँग्रेस, बर्मा, ही आपली स्वतंत्र संघटना त्या पक्षानें स्थापन केली.

या दोन्ही पक्षांत अशी बिनतोड राजकीय स्पर्धा असतांही त्या दोहोंची एकजूट स्थापन करण्यासंबंधींचा प्रचार ब्रह्मी साम्यवादी पक्ष करीतच असतो. या बाबतींत समाजवादी पक्षाची काय भूमिका आहे, असा प्रश्न मी समाजवादी पक्षाचे कार्यवाह ऊ बा स्वे यांना केला होता. त्याला उत्तर देतांना ते म्हणाले; “ अशा एकीचा आम्हांला चांगलाच अनुभव आहे ! साम्यवाद्यांबरोबर गट्टी केली, म्हणजे अखेर ते पाठींत खंजीर खुपसतात, हें आम्हांस स्वानुभवावारून माहीत आहे. आम्हीही एकेकाळीं अशा ऐक्याचे

पुरस्कर्ते होतों; व साम्यवाद्यांबरोबर १९४४ च्या सप्टेंबरमध्यें आम्हीं गट्टी स्थापनदेखील केली होती. साम्यवाद्यांच्या बरोबर केलेला करार आम्हीं प्रामाणिकपणें पाळला. पण साम्यवाद्यांनीं मात्र त्या कराराचा उपयोग ब्रह्मी स्वातंत्र्यलढ्याचें नेतृत्व बळकावण्यासाठीं, खटपटी-लटपटी करण्यासाठीं साधन म्हणून केला, व त्याहीपेक्षां खेदजनक गोष्ट म्हणजे, विश्वासघात करून आमच्या पाठींत खंजीर खुपसण्यासही त्यांनीं कमी केलें नाहीं. पण जपान्यांविरूद्ध दोन महिन्यांत उठाव करतां येईल अशी तयारी करावयाची, तयारी पूर्ण झाल्यावर उठावाचा दिवस निश्चित करावयाचा, जपान्यांनंतर दोस्त सैन्यें ब्रह्मदेशांत येण्याच्या वेळीं आपलीं शस्त्रें परत न करतां ब्रिटिशांकडे ब्रह्मी राष्ट्रीय मागण्या करावयाच्या, त्या ब्रिटिशांनीं मान्य केल्यास दोस्तांना सामील व्हावयाचें, व मान्य न केल्या, तर ब्रिटिशांना इतर दोस्त राष्ट्रांपासून अलग पाडून, ब्रिटिशांविरुद्ध युद्ध पुकारून, तें यश मिळेपर्यंत चालू ठेवावयाचें, असा आमचा साम्यवाद्यांबरोबर करार झालेला होता. दोस्त सैन्यांनीं ब्रह्मदेशांत प्रवेश करतांच साम्यवाद्यांनीं उलट आपलीं शस्त्रें बिनशर्त दोस्त सैन्याच्या हवालीं करून, त्यांच्याशीं बिनशर्त सहकार्य करण्याची भूमिका पत्करली, व तसा आग्रह धरला ! यामुळें आम्हांला त्यांच्याबरोबर एकजुटीला रामराम ठोकावा लागला. आणि आज तेच साम्यवादी, आम्हीं आमच्या शर्ती मान्य केल्यावर, आमच्या शर्तींवर, ब्रिटिशांशीं मर्यादित सहकार्य केलें, तर आमची "तडजोडवादी" म्हणून निंदा करीत आहेत ! "

ते पुढें म्हणाले, "आतां आमचा असल्या एकजुटीवर यत्किंचितही विश्वास राहिलेला नाहीं. ब्रह्मदेशांतल्या सर्व पुरोगामी व समाजवादी शक्तींनीं समाजवादी पक्षाच्या ध्वजाखालीं संघटित व्हावें, असें आमचें त्यांना आवाहन आहे. अशा समाजवाद्यांच्या एकजुटीवर आमचा विश्वास आहे—मार्क्सवाद मानणाऱ्या साम्यवादी पक्ष, समाजवादी पक्ष, इत्यादि विविध पक्षांच्या एकजुटीवर नव्हे ! "

ब्रह्मी राजकारणांतील फासापालांतर्गत दुसरी प्रभावी शक्ति म्हणजे पीपल्स व्हॉलंटियर ऑर्गनायझेशन ( पी. व्ही. ओ. ) ही फासापालाची स्वयंसेवक

संघटना होय. ही केवळ स्वयंसेवक संघटनाच असली, तरी तिला ब्रह्मी राजकारणांत मोठें महत्त्व आहे.

जपान्यांविरुद्ध गनिमी काव्यानें लढण्यासाठीं ऑंग साननें स्थापन केलेल्या ' बर्मा रेव्होल्युशनरी फोर्स 'मधून ही संघटना जन्मास आली. रेव्होल्युशनरी फोर्समध्यें पन्नास हजार सैनिक होते. परंतु ब्रह्मदेशांत परत आल्यावर ब्रिटिशांनीं त्यांच्यापैकीं फक्त साडेपांच हजारांनाच ब्रह्मी लष्करांत सामील करून घेतलें; त्यामुळें बाकीच्या सैनिकांचें काय करावयाचें हा प्रश्न ऑंग सानपुढें उभा राहिला. गनिमी काव्याचें शिक्षण घेतलेल्या या सैनिकांना कार्यनिवृत्त करून आपापल्या घरीं पाठविलें असतें तर तेवढी उपयुक्त शक्ति राष्ट्राच्या दृष्टीनें व्यर्थ दवडल्यासारखें झालें असतें. कारण रेव्होल्युशनरी फोर्स ही पगारी, धंदेवाईक सैनिकांची संघटना नसून ब्रह्मी स्वातंत्र्यासाठीं शस्त्र हातीं घेतलेल्या देशभक्त, ध्येयवादी व त्यागी तरुणांची उभारलेली सेना होती. युद्धोत्तर काळांत ब्रह्मी राष्ट्रवाद्यांना अनेक प्रश्न व समस्या सोडविण्याच्या कामीं, त्यांतल्या त्यांत शांतता प्रस्थापित करण्याच्या कार्यांत त्यांचें साह्य होण्यासारखें होतें. शिवाय घटना-परिषदे-मार्फत आपलें ध्येय शांतताप्रिय मार्गानें साध्य करून घेण्याचा प्रयत्न चालू असतां तिच्याखालीं सुरुंग लावण्याचा प्रयत्न साम्राज्यवाद्यांनीं करून पाहिलाच, तर स्वातंत्र्यासाठीं अंतिम लढा देणें अपरिहार्य झालें असतें. त्यासाठींही ही संघटना कोणत्या ना कोणत्या स्वरूपांत केवळ अबाधितच न ठेवतां, ती अधिक विस्तृत, सूत्रबद्ध व शक्तिशाली बनविणेंही हितकर ठरलें असतें. म्हणून ब्रह्मी लष्करांत ज्यांना दाखल करून घेण्यांत आलें नाहीं, त्यांना संघटित करण्यासाठीं ऑंग साननें पीपल्स व्हॉलंटियर ऑर्गनायझेशन या संस्थेची स्थापना केली. ऑंग सानच या संघटनेचे सर-सेनापति होते. ब्रह्मी भाषेंत सेनापतीस "बो' व सरसेनापतीस "बो ज्यो' म्हणतात. ऑंग सान हे पी. व्ही. ओ.चे बो ज्यो होते व त्यामुळें सर्वसाधारण ब्रह्मी जनताही ऑंग सानना प्रेमभरानें 'बो ज्यो ऑंग सान' असेंच संबोधीत असे.

● ● ●

# फासापालाचा प्रतिस्पर्धी : साम्यवादी पक्ष : ५ :

ब्रह्मदेशांत विरोधी पक्षाची भूमिका ब्रह्मी साम्यवादी पक्षाकडे आहे. युद्धपूर्व काळांतले ब्रह्मी राजकीय क्षेत्रांतले सर्वच पक्ष व पुढारी अस्तंगत झाले असून, त्यांच्या " पुनरुत्थाना "ची नव्या परिस्थितींत शक्यताच उरलेली नाहीं.

फासापालाखेरीज साम्यवादी पक्ष हाच ब्रह्मदेशांत एकमेव राजकीय पक्ष आहे. फासापालाखालोखाल तोच संघटित व बलशाली असल्यामुळें त्याला महत्त्व आहे. ब्रह्मी साम्यवादी पक्षाचें दुसरेंही एक महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य लक्षांत ठेवण्यासारखें आहे. हिंदुस्थानांतील साम्यवाद्यांनीं हिंदी स्वातंत्र्य-लढा चालविणाऱ्या राष्ट्रसभेशीं विरोधाची भूमिका स्वीकारून स्वातंत्र्य-लढा तीव्र झाला तेव्हां प्रत्येक आणीबाणीच्या वेळीं राष्ट्रविरोधी धोरणाचा अवलंब केला. त्यामुळें तो पक्ष बदनाम झाला व जनतेच्या पराकोटीच्या अप्रीतीला त्या पक्षास तोंड द्यावें लागलें. ब्रह्मी साम्यवाद्यां-बाबतची परिस्थिति याहून उलट आहे. ब्रह्मदेशाच्या स्वातंत्र्य-लढ्यांत साम्यवादी प्रारंभापासून अग्रभागीं राहिलेले असून, तो संघटित व तीव्र करण्यांत त्यांनीं प्रामुख्यानें भाग घेतलेला आहे. हिंदी साम्यवादी हिंदी राष्ट्रवादाच्या प्रवाहा-विरुद्ध वर्तन केल्यामुळें राष्ट्र-विरोधी म्हणून जनतेंत बदनाम झाले, तर ब्रह्मी जनतेमधील राष्ट्रवादाच्या भावनेला आवाहन करूनच ब्रह्मी साम्यवाद्यांनीं कार्य केल्यामुळें, ब्रह्मदेशांतला साम्यवाद त्यावरच पुष्ट झालेला आहे.

ब्रह्मदेशांतील वैशिष्ट्यपूर्ण राजकीय व आर्थिक परिस्थितीचाही साम्य-वाद्यांना फायदा मिळूं शकला. ब्रह्मदेशांतले प्रतिष्ठित पक्ष व पुढारी स्वार्थसाधनेंत मश्गुल असल्यामुळें, ब्रह्मी स्वातंत्र्यासाठीं लढण्याकरतां प्रबळ राष्ट्रीय संस्था संघटित करण्याचें, व पिळणुकीनें गांजलेल्या ब्रह्मी किसान-मजुरांचें संघटन करण्याचें त्यांच्याकडून संपूर्णतया उपेक्षिलें गेलेलें कार्य ब्रह्मदेशांतल्या साम्यवाद्यांनींच अंगिकारलें. आशियाचा प्रश्न हा प्रामुख्यानें आशियांतल्या शेतकऱ्यांचा प्रश्न आहे, हें साम्यवाद्यांत प्रथम ब्रह्मी

साम्यवाद्यांनींच हेरलें, व त्यांच्यांत जागृति व संघटना करण्यावर सर्वांत अधिक भर दिला, त्यावरच आपलें लक्ष केंद्रित केलें, असें म्हणणें अतिशयोक्तीचें होणार नाहीं.

रंगून विश्वविद्यालयांत शिकणारे व ब्रह्मी विद्यार्थि-आंदोलनांत प्रामुख्यानें भाग घेणारे कांहीं भावनाप्रधान व तडफदार विद्यार्थी प्रथम साम्यवादाकडे आकृष्ट झाले. उघडपणें साम्यवादी म्हणून कार्य न करतां, ब्रह्मी स्वातंत्र्यासाठीं लढाऊ स्वरूपाच्या कार्यक्रमाचा पुरस्कार करणाऱ्या डो बामाच्या थकीन आंदोलनांत त्यांनीं थकीन म्हणूनच हिरीरीनें भाग घेतला. विद्यार्थी व मजूर यांच्या संघटनेचें कार्य करून मध्य ब्रह्मदेशांत प्रबल किसान संघटना उभारली. त्यामुळें ब्रह्मदेशांतील युयुत्सु वृत्तीचा तरुणांचा व विद्यार्थ्यांचा वर्ग त्यांच्याकडे आकृष्ट झाला, इतकेंच नव्हे, तर थकीन चळवळही त्यांच्याच नियंत्रणाखालीं गेली.

थकीन चळवळींत कार्य करणाऱ्या या ब्रह्मी साम्यवादी युवकांच्या तीन प्रतिनिधींचें शिष्टमंडळ आपल्या भावी कार्याच्या दिशेसंबंधीं हिंदी साम्य-वाद्यांशीं विचार विनिमय करण्यासाठीं १९३८ मध्यें हिंदुस्थानांत आलें होतें. ब्रह्मी साम्यवाद्यानीं डो बामा पक्षाचा ब्रह्मदेशांतील सर्व स्वातंत्र्यवादी साम्राज्य-विरोधी गटांच्या संयुक्त राष्ट्रीय आघाडींत विकास करण्याचा प्रयत्न करावा, आणि त्याचबरोबर, ज्यामधून पुढें ब्रह्मी साम्यवादी पक्षाची स्थापना करणें शक्य होईल, असा साम्यवादी कार्यकर्त्यांचा गट संघटित करण्याचेंही काम करावें, असें हिंदी साम्यवाद्यांनीं या शिष्टमंडळावर मार्गदर्शन केलें. याच दिशेनें डो बामा चळवळींतल्या साम्यवाद्यांनीं आपलें कार्य चालू ठेवलें, व अखेर १९३९ मध्यें दुसरें महायुद्ध सुरू होण्यापूर्वी त्यांनीं ब्रह्मी साम्यवादी पक्षाची रीतसर स्थापनाही केली. ब्रह्मी साम्यवादी पक्षाच्या संस्थापकांत थकीन ऑंग सान, थकीन सो, बा टीम, बा हीन आणि ल्हा पे हे प्रमुख होते.

साम्राज्य सत्तेविरुद्ध संयुक्त राष्ट्रीय आघाडी उभारून ब्रह्मदेशांतल्या किसान-कामगार जनतेचें प्रचंड आंदोलन संघटित करण्याचें ब्रह्मी साम्य-वाद्यांचें हें ध्येय-धोरण त्याकाळीं जगांतल्या सर्वच राष्ट्रांतल्या साम्यवाद्यांनीं

स्वीकारलेल्या " पॉप्युलर फ्रंट " किंवा " नॅशनल फ्रंट " उभारण्याच्या नीतीस अनुरूप असेंच होतें. दुसरें महायुद्ध सुरू झाल्यावर जगांतल्या साम्यवादी पक्षांनीं आपलें युद्धविषयक धोरण वेळोवेळीं बदललें, त्याप्रमाणें ब्रह्मी साम्यवाद्यांनींही आपली युद्धविषयक नीति अनेकदां बदलली. युद्धाच्या प्रारंभीं तें " साम्राज्यशाही युद्ध " असल्याचें निदान ब्रह्मी साम्यवादी पक्षानें केलें, व त्या युद्धाचेंच रूपांतर ब्रह्मदेशाच्या स्वातंत्र्ययुद्धांत करावयाचें, अशी युद्धविषयक नीति त्या पक्षानें स्वीकारली. परंतु ब्रिटिश सरकारच्या दडपशाहीपुढें साम्यवादी ज्या संघटनेमार्फत हें क्रांतिकार्य करूं इच्छित होते, ती डो बामा टिकाव धरूं शकली नाहीं, व तिच्या आंदोलनाची वाताहत झाली.

डो बामा चळवळ फसल्यावर पुढील पाऊल कसें टाकावयाचें या प्रश्नावर ब्रह्मी साम्यवादी पक्षाच्या कार्यकर्त्यांत मतभेद झाले. जपानचें साह्य संपादन करून ब्रह्मदेशाचें स्वातंत्र्य संपादन करावें, असें त्या पक्षांतल्या एका गटाचें मत होतें. त्याचें नेतृत्व थकीन ऑंग सान यांच्याकडे होतें; तर थकीन थान तून, थकीन सो प्रभृति साम्यवाद्यांचा या विचारसरणीस विरोध होता. या मुद्द्यावर पक्षांत फूट पडली, व ऑंग सान प्रभृतींनीं जपानच्या साह्यानें ब्रह्मदेश स्वतंत्र करण्याचा प्रयत्न केला.

हिटलरनें रशियावर आक्रमण केल्यानंतर, जगांतल्या इतर राष्ट्रांमधील साम्यवादी पक्षांप्रमाणेंच ब्रह्मी साम्यवादी पक्षानेंही आपलें युद्धविषयक धोरण बदललें, आणि फॅसिस्ट-विरोधी व जपानी लष्करशाही-विरोधी युद्धाला पाठिंबा देण्याची नीति अंगिकारली. परंतु ब्रह्मदेश जपानच्या घशांत गेला, तेव्हां साम्यवादी पक्षाचे कांहीं कार्यकर्ते तुरुंगांत होते, व अटक चुकवूं शकले, त्यांतले कांहीं ब्रह्मदेशांतच भूमिगत होऊन राहिले, व कांहीं हिंदुस्थानांत पळून आले होते.

जपानी ब्रह्मदेशांत आले, व डॉ. बा मॉ यांच्या नेतृत्वाखालीं त्यांनीं स्वतंत्र ब्रह्मदेशाचें नामधारी सरकार स्थापन केलें, तेव्हां थकीन सो, थकीन थान तून इत्यादि साम्यवादी कार्यकर्ते गुप्तपणें जपानी राजवटीविरुद्ध उठाव करण्याच्या उद्देशानें संघटना करीत होते. जपान्यांनीं दिलेल्या

आश्वासनांना हरताळ फांसून आपला विश्वासघात केलेला पाहून जपानपुरस्कृत स्वतंत्र ब्रह्मी सरकारांत संरक्षण-मंत्र्याच्या पदावर कायम राहून ऑँग साननें जपान्यांविरुद्ध बंड करण्याची गुप्त तयारी चालवली होती. ऑँग सानचा भ्रमनिरास झालेला बघून, थकीन थान तून आपल्या त्या एके काळच्या सहकाऱ्यांस गुप्तपणें जाऊन भेटले, दोघांत पुन्हा ऐक्य प्रस्थापित झालें, व या एकजुटीमधून फासापाला जन्मास आली.

ब्रह्मदेश जपान्यांच्या तावडींतून मुक्त झाल्यावर फासापाला कायदेशीर संस्था म्हणून कार्य करूं लागली, स्वातंत्र्यासाठीं लढणाऱ्या संयुक्त राष्ट्रीय आघाडीमध्यें तिचें रूपांतर झालें, तेव्हां साम्यवाद्यांनीं त्या कार्यांत सक्रिय भाग घेतला. थकीन थान तून हेच फासापालाचे कार्यवाह होते. ब्रह्मदेशांतून जपान्यांची हकालपट्टी करण्यांत आल्यावर फासापालामधील राष्ट्रवादी व समाजवादी कार्यकर्त्यांनीं आपल्या ध्येय-धोरणाविषयींचा जाहीरनामा प्रसिद्ध केल्यानंतर, साम्यवाद्यांनींही आपली नीति विशद करण्यासाठीं जाहीरनामा प्रकाशित केला. या दोन्ही जाहीरनाम्यांत अनुस्यूत असलेली नीति तत्त्वतः समानच होती, कारण राजकीय व आर्थिक स्वातंत्र्य आणि राष्ट्रीयीकरणावर आधारलेली अर्थव्यवस्था याच तीन मूलभूत तत्त्वांचें त्या दोहोंत प्रतिपादण्यांत आलेल्या नीतीस अधिष्ठान होतें.

थकीन थान तून, थकीन सो व थीन पे यांच्या नेतृत्वाखालीं फासापालाच्या संघटनेतून कार्य करणारे साम्यवादी खेड्या-पाड्यांतून फासापालावाले म्हणूनच ओळखले जात. कारण ते शेतकऱ्यांची संघटना करतांना मार्क्सवादी विचारसरणीचा प्रचार करण्याचें कटाक्षानें टाळून, बहुजनसमाजांत तीव्र स्वरूपांत निर्माण झालेली राष्ट्रीय भावना व त्यांची आर्थिक पिळणूक करणाऱ्यांविषयीं संताप या भावनांचा फायदा घेण्यावरच त्यांचा विशेष भर असे. राजकीय दास्यांत ठेवणारे ब्रिटिश साम्राज्यवादी परराष्ट्रीय, व आर्थिक पिळणूक करणारे जमीनदार-सावकारही परराष्ट्रीयच—हिंदी चेट्टियार—या वस्तुस्थितीचा त्यांना त्या कामीं चांगलाच उपयोग होई. जमीनदारांचीं तांदुळाचीं कोठारें लुटण्याचा " कार्यक्रम " अमलांत आणण्यासाठीं साम्यवाद्यांनीं पथकें उभारण्यास प्रारंभ केला, खंड-बंदी,

करबंदीचें शस्त्रही परजलें. त्यामुळें फासापालामधील त्यांच्या मानानें "नेमस्त" असलेल्या गटाशीं त्यांचे खटके उडण्यास सुरुवात झाली.

याच वेळीं ब्रह्मदेशांतील जनतेच्या धर्मभावना दुखविण्याचेंही कृत्य साम्यवाद्यांच्या हातून घडल्यामुळें त्यांना आपल्यावर जनतेचा रोष ओढवून घ्यावा लागला. साम्यवादी पक्षाचे प्रमुख नेते थीन पे यांनीं लिहिलेली कादंबरी याच सुमारास प्रसिद्ध झाली. तिच्यांत बौद्ध भिक्षू—फुंजी—वर्गाचा उपहास करण्यांत आला होता. जनता त्यामुळें इतकी प्रक्षुब्ध झाली, कीं थीन पेना जाहीर माफी मागणें भाग पडलें! रंगून विश्वविद्यालयाच्या कांहीं साम्यवादी विद्यार्थ्यांनीं रंगूनमधील जगप्रसिद्ध श्वेडेगॉन पॅगोडावर धर्मविरोधी पत्रकें डकवून जनतेच्या या प्रक्षोभाच्या अग्नींत तेल ओतलें होतें! या अनुभवानें शहाणे झालेले साम्यवादी पुन्हा बुद्ध धर्माच्या वाटेस गेले नाहींत!

ब्रह्मदेशांत अनेक वैशिष्ट्यपूर्ण गोष्टी आहेत, व त्यांतलीच एक म्हणजे त्या देशांत दोन साम्यवादी पक्ष आहेत—एक थकीन थान तून यांचा "शुभ्रध्वजधारी" (व्हाइट फ्लॅग) या नांवानें ओळखला जाणारा स्टॅलिनवादी पक्ष, व दुसरा थकीन सो यांचा लाल बावटेवाला (रेड फ्लॅग) जहाल साम्यवादी पक्ष. ही चमत्कृतिपूर्ण घटनाही याच काळांत घडून आली. १९४६ च्या जानेवारींत फासापालामधील नेमस्त कार्यकर्ते बा पे यांनीं रशियन हुकुमशाही व्यवस्थेचा जाहीर धिक्कार केला. त्यांना उत्तर देण्यासाठीं थकीन सो यांनीं पत्रक काढून बा पे हे साम्राज्यवाद्यांचे हस्तक असल्याचा आरोप केला. परंतु साम्यवादी पक्षांनीं थकीन सो यांनीं या मुद्द्यावर दुजोरा दिला नाहीं. म्हणून त्या पक्षामधून फुटून निघून थकीन सो यांनीं आपला सवता सुभा स्थापन केला. या घडामोडीनंतर ब्रिटिश साम्राज्यांतल्या राष्ट्रांमधील साम्यवादी पक्षांच्या प्रतिनिधींची जी परिषद झाली, तिला या दोन्हीं ब्रह्मी साम्यवादी पक्षांना निमंत्रण करण्यांत आलें होतें, व दोघांचेही प्रतिनिधी तिला उपस्थित होते!

ऑंग सानच्या नेतृत्वाखालीं ब्रह्मदेशांत मध्यंतर सरकार स्थापन झालें, तेव्हां त्यांत साम्यवाद्यांचे दोन प्रतिनिधी असावेत अशी ब्रह्मी साम्यवाद्यांनीं

मागणी केली. परंतु ऑँग सान यांनीं थीन पे या एकाच साम्यवाद्याला आपल्या मंत्रिमंडळांत घेतलें. ब्रिटिश साम्राज्यांत अधिकृत साम्यवादी पक्षाचा सभासद मंत्रिपदावर अधिष्ठित झाल्याचें बहुधा हें एकमेव उदाहरण असावें ! ब्रिटिश पंतप्रधान ॲटली यांच्याशीं बोलणें करण्यास ऑँग सानच्या नेतृत्वाखालीं शिष्टमंडळ गेलें, तेव्हां तें रिक्त हस्तेंच परत येणार, असें साम्यवाद्यांनीं भाकित केलें होतें. परंतु तें खोटें ठरलें; तेव्हां ऑँग सानच्या "तडजोडवादी" नीतीविरुद्ध त्यांनीं प्रचारमोहीम सुरू केली. या शिस्तभंगाचें प्रायश्चित म्हणून साम्यवाद्यांना फासापालामधून अर्धचंद्र मिळणार हें उघड झालें, त्यावेळीं थीन पेनी मंत्रिमंडळाचा राजीनामा देऊन टाकला.

फासापालामधून बाहेर जावें लागल्यानंतर ब्रह्मी साम्यवादी पक्ष फासापालाचा विरोधी पक्ष म्हणून राजकीय क्षेत्रांत उघडच उतरला. ॲटली-ऑँग सान करारानुसार स्थापन व्हावयाच्या ब्रह्मी घटना-परिषदेच्या निवडणुकीवर थकीन सो यांच्या लालबावटा साम्यवादी पक्षानें बहिष्कार टाकला, तर थान तूनच्या पांढरा बावटा साम्यवादी पक्षानें फासापालाचा पराभव करण्याच्या ईर्ष्येनें निवडणुकींच्या सामन्यांत उडी घेतली. फासापालास निवडणुकींत घसघशीत बहुमत मिळाल्यावर, आपण उघड उघड ऑँग सान-विरोधी किंवा फासापाला-विरोधी भूमिका स्वीकारल्या ब्रह्मी राजकारणांत आपला प्रभाव पडणार नाहीं, हें थान तून प्रभृति साम्यवादी नेत्यांनीं ओळखलें, व आपला पवित्रा पुन्हा बदलला.

ब्रह्मी घटना-परिषदेमधील साम्यवादी पक्षाचे पुढारी थीन पे यांनीं परिषदेमध्यें भाषण करून साम्यवादी पक्षाची ही नवी नीति जाहीर केली. घटनापरिषदेनें संपूर्ण स्वातंत्र्याचें उद्दिष्ट उद्घोषित करणारा ठराव केला असला तरी ब्रह्मदेश ब्रिटिश साम्राज्यवाद्यांच्या दास्यामधून संपूर्ण मुक्त करण्यासाठीं अंतिम लढा द्यावा लागेल, व त्यासाठीं सर्व स्वातंत्र्यवादी व साम्राज्यविरोधी शक्तींची संयुक्त आघाडी उभारली पाहिजे हेंच त्या नीतीचें सूत्र होतें. असें राष्ट्रीय ऐक्य साधण्यासाठीं फासापालामध्यें आपल्या पक्षास पुन्हा प्रवेश देण्यांत यावा म्हणून ऑँग सानप्रभृति नेत्यांबरोबर साम्यवादी नेत्यांनीं बोलणींही सुरू केली.

ब्रह्मी साम्यवादी पक्षाच्या या नव्या नीतीचें द्विविध उद्दिष्ट असल्याचें उघडच दिसत होतें. ( १ ) फासापालांत पुन्हा प्रवेश मिळवण्यांत यश मिळालेंच तर फासापाला व तिच्यामार्फत ब्रह्मी राष्ट्रीय आंदोलन आपल्या पक्षाच्या नियंत्रणाखालीं आणावयाचें; ( २ ) तें नच जमलें, तर फासापालामधील समाजवादी पक्ष व इतर संलग्न संघटनांतल्या जहाल व युयुत्सु वृत्तीच्या कार्यकर्त्यांना असें पटवून द्यावयाचें, कीं फासापाला व समाजवादी पक्ष यांचे तडजोडवादी नेमस्त नेते आड आल्यामुळें ब्रह्मी स्वातंत्र्यासाठीं अत्यावश्यक असलेली राष्ट्रीय एकजूट प्रस्थापित होऊं शकत नाहीं. अशा रीतीनें फासापालामधील लढाऊ वृत्तीच्या कार्यकर्त्यांना फासापालामधून बाहेर पडून आपल्या गोटांत खेचणें शक्य होईल; फाटाफुटीमुळें फासापाला व समाजवादी पक्ष यांची शक्ति व प्रभाव कमी होऊन, ब्रह्मदेशाच्या राजकारणावर आपलें प्रभुत्व प्रस्थापित करणें सुलभ होईल.

ऑंग सानप्रभृति नेत्यांचा खून झाला, तेव्हां साम्यवादी पुढाऱ्यांचीं त्यांच्याबरोबर या विषयींचीं बोलणीं चाललेलीं होतीं.

ब्रह्मी साम्यवादी पक्षाचें ध्येय-धोरण अधिकृत रीतीनें समजावून घेण्यासाठीं मीं त्या पक्षाचे सरचिटणीस थकीन थान तून यांची भाग या रोडवरील त्यांच्या " क्रेमलिन " मध्यें मुलाखत घेतली. ब्रह्मी साम्यवादी पक्षाच्या ध्येय-धोरणांत प्रारंभापासून झालेलीं स्थित्यंतरें, व त्या पक्षाच्या इतिहासामधील चढ-उतार विशद करून सांगतांना ते म्हणाले,

" युद्ध सुरू झालें तेव्हां युद्धप्रयत्नांत भाग न घेतां, त्या युद्धाचेंच रूपांतर ब्रह्मी स्वातंत्र्य-युद्धांत करावयाचें असें आमच्या पक्षाचें धोरण होतें. पण दडपशाहीमुळें पक्षाचे पुढारी एक तर तुरुंगांत टाकले गेले, किंवा त्यांना ' भूमिगत ' व्हावें लागलें, आणि आमचें आंदोलन दडपलें गेलें. त्यामुळें त्या दिशेनें केलेल्या प्रयत्नांना फारसें यश येऊं शकलें नाहीं. १९४१ मध्यें पक्षानें आपली युद्धविषयक नीति बदलली, व फॅसिस्ट-विरोधी आणि जपानी लष्करशाही-विरोधी युद्धाला पाठिंबा देण्याची भूमिका स्वीकारली. परंतु यापूर्वी जपान युद्धांत पडण्याच्या आधीं आमच्या पक्षांतही मतभेद व दुफळी झाली. ब्रह्मदेश स्वतंत्र करण्याच्या कामीं जपान्यांची मदत होऊं

शकेल, अशा कल्पनेनें आमच्यापैकीं ऑंगसान प्रभृति कार्यकर्ते जपान्यांना जाऊन मिळाले. साम्यवादी पक्षाचे कांहीं सभासद ब्रह्मदेशांत जपानी येऊन दाखल होईपर्यंत तुरुंगांत स्थानबद्धच होते, तर कांहीं हिंदुस्थानांत होते."

१९४४ मध्यें जपानी राजवटींत साम्यवादी पक्ष व पीपल्स रेव्होल्युशनरी-पक्ष या दोन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांमध्यें एकजूट प्रस्थापित झाली होती. तिचा इतिहास निवेदन करतांना थान तून म्हणाले : " प्रशान्त महासागरांत युद्धाचा डोंब उसळण्यापूर्वीं, जपान्यांच्या स्वारीपूर्वीं, व ब्रह्मदेशांत जपान्यांचें राज्य स्थापन झाल्यावरही थोडा काळ, ब्रह्मी राष्ट्रवादी व साम्यवादी यांच्यांत एकजूट होऊं शकली नाहीं. कारण जपान्यांच्या सहकार्यानें व साह्यानें ब्रह्मदेशाचें स्वातंत्र्य प्रस्थापित करतां येईल, अशी राष्ट्रवाद्यांना आशा वाटत होती. पण राष्ट्रवाद्यांचा लौकरच भ्रमनिरास झाला. कारण जपान्यांनीं त्यांना ब्रह्मी स्वातंत्र्याविषयीं दिलेल्या आश्वासनांस हरताळ फांसून ब्रह्मदेशांत पोलिसी दंडुकेशाही सुरू केली ! परिस्थितींत झालेल्या या बदलामुळें साम्यवादी व राष्ट्रवादी गटांची एकी होणें शक्य झालें. १९४४ मध्यें ब्रह्मी साम्यवादी पक्ष व पीपल्स रेव्होल्युशनरी पक्ष यांच्या कार्यकर्त्यांत याविषयीं वाटाघाटी होऊन दोहोंची एकजूट निर्माण झाली. ( १ ) जपान्यांविरुद्ध एकजुटीनें लढावयाचें, ( २ ) जपान्यांनंतर ब्रह्मदेशावर जी कोणी साम्राज्यसत्ता आक्रमण करील, त्याच्याविरुद्धही हा एकजुटीचा लढा पुढें चालूं ठेवावयाचा, व ( ३ ) अखेर पीपल्स रेव्होल्युशनरी पक्ष आणि साम्यवादी पक्ष या दोहोंचा मिळून एकच राजकीय पक्ष निर्माण करावयाचा, या तीन मुद्द्यांवर आमची एकजूट आधारलेली होती. परंतु पुढें पक्षाची संघटना, संयुक्त राष्ट्रीय आघाडीचा कार्यक्रम व ब्रह्मी स्वातंत्र्य लढ्याविषयीं निर्माण झालेले ताबडतोबीचे प्रश्न याविषयीं आमच्यांत पुन्हा मतभेद झाल्यामुळें, १९४५ च्या जुलैमध्यें ही एकी मोडली."

साम्यवादी पक्ष व फासापाला यांच्यांत झालेल्या बेबनावाचीं कारणें मला सांगतांना थान तून म्हणाले, " ब्रह्मदेशांत ब्रिटिश राजवट पुन्हा सुरू झाल्यानंतर फासापालाला ब्रह्मदेशाच्या राष्ट्रीय संस्थेचें स्थान प्राप्त करून

देण्याच्या कामीं ब्रह्मी साम्यवादी पक्षानें खूपच मेहनत घेतली. पण लौकरच फासापाला तडजोडवादी गटांच्या आहारीं गेली, व एकंदर स्वातंत्र्य-लढ्यामध्यें ब्रह्मी साम्यवादी पक्षानें सामर्थ्य तोकडें पडल्यामुळें या तडजोडवादी प्रवृत्तींचा पाडाव करण्यांत पक्षाला यश मिळूं शकलें नाहीं. तरीपण या तडजोडवादी नीतीविरुद्ध साम्यवादी पक्षानें ब्रह्मदेशाच्या किसान-कामगारांत जोराचा प्रचार करून, तिच्याविरुद्ध टीकेची झोड उठविली. १९४६ च्या सप्टेंबरमध्यें ब्रह्मदेशांत राष्ट्रव्यापी संप झाला, तेव्हां आपलें डगमगणारें आसन सांवरून धरण्यासाठीं ब्रिटिश साम्राज्यवाद्यांनीं फासापालाच्या पुढाऱ्यांना आपल्या जाळ्यांत ओढून त्यांना अधिकारपदें दिलीं. त्यामुळें त्यांच्या आमच्यांत मतभेद निर्माण झाले. अखेर फासापालाच्या "उजव्या" गटाच्या पुढाऱ्यांनीं स्वीकारलेल्या तडजोडवादी धोरणावर टीका केल्याच्या आरोपावरून साम्यवादी पक्षाला फासापालामधून काढून टाकण्यांत आलें."

ते पुढें म्हणाले : "आज ब्रह्मदेशावर ब्रिटिशांचें जें आर्थिक, लष्करी व राजकीय वर्चस्व आहे, तें झुगारून देण्यासाठीं सामुदायिक स्वरूपाचा लढा चालविणें हें आमचें सांप्रतचें ध्येय व धोरण आहे. ब्रिटिश साम्राज्य-शाहीविरुद्ध पुकारावयाच्या या अंतिम संग्रामासाठीं साम्यवादी व फासापाला यांच्यांत आम्हांला पुन्हा एकजूट प्रस्थापित करावयाची आहे. आज फासापालाचे पुढारी ब्रिटिश साम्राज्यवाद्यांचे कैदी बनलेले असून, ब्रिटिश साम्राज्यवाद्यांच्या तावडीमधून त्यांची मुक्तता करणें हें आमचें कर्तव्य समजतों. फासापालाच्या सर्वसाधारण सभासदांचें आम्हाला मतपरिवर्तन करावयाचें आहे. त्यासाठीं आम्हीं त्यांच्यापुढें हा लढ्याचा कार्यक्रम ठेवून त्यांच्यांत प्रचार करीत आहोंत."

समाजवादी पक्षाविषयींची भूमिका समजावून देतांना ते म्हणाले, "आम्हांला समाजवादी पक्षाशीं एकजूट करावयाची आहे. पण समाजवादी पक्षामध्यें दोन प्रकारच्या प्रवृत्ति आहेत. त्यांच्यांतल्या एका गटाला फासापालाच्या "उजव्या" गटाशीं समझौता करून राहावयाचें आहे. दुसरा गट लढ्याला व आमच्याशीं एकजूट करण्यास अनुकूल आहे."

ब्रह्मी साम्यवादी पक्षांत १९४६ मध्यें दोन तट पडून थकीन सोंचा सवता सुभा निर्माण कां झाला, या विषयींही त्यांनीं मला माहिती सांगितली. युद्धकालीन फाटाफुटीनंतर ब्रह्मी साम्यवादी पक्ष पुन्हा संघटित करण्याचें कार्य थकीन सो यांनींच प्रामुख्यानें केलें होतें, हें कृतज्ञतापूर्वक मान्य करून, थान तून म्हणाले, " १९४६ च्या फेब्रुवारीमध्यें आमच्यांत मतभेद निर्माण झाला. वासाहतिक क्रांतीच्या या अवस्थेमध्यें आमच्या लढ्याचें नेतृत्व कामकरी वर्गानेंच स्वीकारलें पाहिजे, व मध्यम वर्गाचें अस्थिर स्वरूप लक्षांत घेतां, हें नेतृत्व त्या वर्गाकडे जाणें इष्ट नाहीं, असेंच आमचेंही मत होतें; परंतु त्याचबरोबर, मध्यमवर्गीयांपैकीं स्वातंत्र्यवादी गटाचें स्वातंत्र्य-लढ्यांत सहकार्य मिळवणें शक्य व इष्ट आहे, असें आम्ही मानीत होतों. तर ब्रह्मी स्वातंत्र्य-लढ्यामधून मध्यमवर्गाला अजिबात वगळलें पाहिजे, अशी थकीन सो यांची भूमिका होती. थकीन सो यांची नीति स्वीकारल्यास ब्रह्मी स्वातंत्र्य-लढा दुर्बल होईल असें आमचें मत असल्यामुळें, आमच्यांत फूट पडली."

स्वातंत्र्योत्तर काळांत साम्यवादी पक्षानें टाकलेलीं पावलें, फासापाला व तिच्याशीं संलग्न असणाऱ्या समाजवादी पक्ष, पी. व्ही. ओ. प्रभृति पक्ष व संघटना यांवर, आणि त्यामुळें ब्रह्मदेशांतील सर्वसाधारण राजकारणावर त्यांची झालेली प्रतिक्रिया यांचा अन्वयार्थ लावण्यास त्या पक्षाचे कार्यवाह थान तून यांच्या या मुलाखतीचें पुष्कळ साह्य होण्यासारखें आहे.

● ● ●

## ब्रह्मदेशांतील अल्पसंख्यांक : ६ :

जगांतील इतर राष्ट्रांप्रमाणें ब्रह्मदेशांतही अल्पसंख्य समाज व त्यांचा प्रश्न आहेच. ब्रह्मदेशांत हिंदुस्थानांतल्याप्रमाणें धर्मभावनेवर आधारलेला भेदभाव नाहीं, त्याचप्रमाणें हिंदुस्थानांतल्या मुस्लिम लीगवाल्यांप्रमाणें आपल्या समाजाला स्वतंत्र राष्ट्राचा दर्जा व स्वतंत्र राज्य मागणारा समाज

किंवा संस्थाही नाहीं, हें खरें. पण त्याचप्रमाणें सर्व ब्रह्मी समाज एकजीवही झालेला नाहीं.

ब्रह्मदेशांत राहणारे ते सर्व " ब्रह्मी " असें ब्रह्मदेशाबाहेर मानलें जातें, व " ब्रह्मी " हा शब्दही त्याच अर्थानें वापरण्यांत येतो. परंतु त्या देशांत ब्रह्मी, शान, करीन, कचीन, चीन, मोण इत्यादि वंशांचे लोक राहतात, आणि त्यांच्यापैकीं प्रत्येक आपापल्या वंशाच्या नांवानें संबोधून घेण्याचा आग्रह बाळगीत असतो. ब्रह्मदेशांतील बहुसंख्य असलेले ब्रह्मी लोक त्या देशाच्या सखल प्रदेशांत प्रामुख्यानें राहतात; तर बाकीच्या वंशांच्या अल्पसंख्याकांपैकीं बहुसंख्य त्या देशाच्या पूर्व, पश्चिम व उत्तर अशा तीन सरहद्दीवरील डोंगराळ मुलखांत राहतात.

प्राचीन काळीं ब्रह्मदेशाच्या मध्य प्रदेशांतच विशेषेंकरून लोकवस्ती झालेली असून बाकीचा भाग निर्मनुष्य जंगलांनीं व्यापलेला होता. मध्य आशियामधील दाट वस्ती असलेल्या देशामधील जनतेला या मोकळ्या व समृद्ध प्रदेशाचें आकर्षण वाटणें साहजिकच होतें. त्यामुळें मध्य आशियांतील भिन्न भिन्न वंशांचे लोक या प्रदेशांत वस्ती करण्यासाठीं आले. साहजिकपणेंच जगांत इतरत्र घडलें त्याचप्रमाणें या नवागतांचे ब्रह्मदेशांत पूर्वींपासून राहणाऱ्या समाजाशीं व आपापसांतही वारंवार झगडे झाले. बहुसंख्य ब्रह्मी जनतेच्या आक्रमणापासून संरक्षण करण्यास अल्पसंख्य असलेल्या या भिन्न वंशीयांना डोंगराळ प्रदेशांत वस्ती करून राहणेंच सुरक्षिततेचें वाटलें. पण याचा अर्थ या सर्व समाजांत सारखे झगडेच होत राहिले असा नव्हे. विभिन्न वंशांचे मानवी समाज शेजारीं आल्यावर संघर्षाप्रमाणेंच, त्यांच्यांतील विरोधाची धार कालगतीनें बोथट झाली, म्हणजे त्यांचा संगमही होऊं लागतो, ह्या जगांतील सर्वच राष्ट्रांत आलेला अनुभवास ब्रह्मदेशही अपवाद नाहीं. ब्रह्मदेशांतील भिन्नवंशीय जनतेंत झगडे झाले, त्याचबरोबर या विभिन्न वंशप्रवाहाचा संगमही होत राहिला. आणि या संघर्ष-संगमाच्या प्रक्रियेमधून यथाकाल एकजीव समाजहि अखेर निर्माण झाला असता. परंतु हा संस्कृति-संगम पूर्ण होण्याआधींच ब्रह्मदेश ब्रिटिशांच्या घशांत पडला.

एकंदर ब्रह्मदेशाचा शें. ४७ इतका प्रदेश-विस्तार व शें. १६ टक्के लोकवस्ति असलेल्या या पहाडी मुलखांत राहणाऱ्या या अल्पसंख्य जमाती आपल्याकडील वन्य जमातींप्रमाणेंच मागासलेल्या मध्ययुगीन अवस्थेंत अजूनही आहेत. त्यांच्यांतले जे सखल प्रदेशांत ब्रह्मी लोकांशेजारीं येऊन राहिलेले आहेत, ते मात्र आपल्या शेजाऱ्यां इतकेच प्रगत झालेले आहेत.

भेदनीति प्रवीण ब्रिटिशांनीं ब्रह्मदेशांतील या वंशभेदांचा प्रथम ब्रह्मदेश जिंकण्याच्या कामीं व नंतर आपलीं आसनें स्थिर राखण्यासाठीं भरपूर उपयोग करून घेतला. इतिहासकाळांत या भिन्नवंशीय अल्पसंख्यांचे बहुसंख्य असलेल्या ब्रह्मी समाजाशीं जे झगडे झाले, त्यांमुळें त्यांच्यां संबधांत निर्माण झालेला कडवटपणा, त्यांना ब्रह्मी लोकांविषयीं वाटणारा अविश्वास व द्वेष कमी न होतां वाढेलच, असा प्रयत्न करण्याची नीति ब्रिटिशांनीं हेतुपुरस्सर स्वीकारली. ब्रिटिशांनीं प्रथमपासूनच हा सरहद्दीवरील डोंगराळ प्रदेश ब्रह्मदेशाच्या इतर भागापासून मुद्दाम अलिप्त ठेवला होता. १९३५ च्या घटनाकायद्यामधूनही हा प्रदेश वळगण्यांत आला होता. त्या कायद्यानें तर "मंत्रिमंडळाच्या अमलाखालचा ब्रह्मदेश (Ministerial Burma)" प्रदेश या सरहद्दीवरील विभागापासून अलग काढून ब्रह्मदेश द्विखंडच केलेला होता. या प्रदेशावर ब्रह्मी मंत्रिमंडळाचा कांहींही अधिकार चालत नसून, तो गव्हर्नराच्या खास अधिकाराखालीं ठेवावयास आलेला होता. त्यासाठीं " डिरेक्टोरेट ऑफ् फ्रँटियर एरिआज् " हें ब्रिटिश अधिकाऱ्यांचें स्वतंत्र खातें असून त्या मार्फत गव्हर्नर या प्रदेशांतील राज्यकारभार चालवीत असे. स्थानिक दैनंदिन कारभार शान संस्थानांतल्याप्रमाणें संस्थानिक असतील तेथला त्यांच्यामार्फत व इतरत्र ज्या त्या जमातींच्या प्रमुखांमार्फत चाले.

हा प्रदेश हिंदुस्थान व चीन या देशांच्या सरहद्दींना लागून असल्यामुळें लष्करीदृष्ट्या त्याला विशेष महत्त्व आहे. खेरीज खनिज द्रव्यांचा व इतरही दृष्टींनीं तो समृद्ध आहे; त्यामुळें पुढें मागें वर्धिष्णु ब्रह्मी राष्ट्रवादाच्या दडपणामुळें अखेर ब्रह्मदेशांत सत्तात्याग करण्याचा प्रसंग ओढवल्यास,

हा प्रदेश तरी आपल्या हातीं रहावा, म्हणून ब्रह्मदेशाची फाळणी करतां येणें शक्य व्हावें, यासाठीं या नीतीच्या रूपानें फुटीर वृत्तीचीं बीजें पेरून ठेवण्याचें दूरदृष्टीचें राजकारण ब्रिटिशांच्या या धोरणाच्या बुडाशीं होतें. त्यासाठीं मंत्रिमंडळाच्या अमलांतील ब्रह्मदेशांतल्या राष्ट्रवादी राजकारणाचा झुळुकही या प्रदेशास लागणार नाहीं, अशी खबरदारी या विभागाचे ब्रिटिश अधिकारी घेत असत. "अनिष्ट" लोकांना या प्रदेशांत प्रवेश करण्यास बंदी करण्याचा त्यांना अधिकार होता व त्याची ते कसोशीनें अंमलबजावणी करीत असल्यामुळें ब्रह्मी राष्ट्रवादी कार्यकर्त्यांना डोंगरी मुलखांत राहणाऱ्या आपल्या देशबांधवांशीं संबंध ठेवणें दुरापास्तच झालेलें होतें. १९४५ मध्यें चर्चिलच्या संयुक्त मंत्रिमंडळानें ब्रह्मदेशासाठीं तयार केलेली योजना ब्रह्मदेशाच्या फाळणीवरच आधारलेली होती. ब्रिटिशांनीं ब्रह्मदेशांत स्वीकारलेल्या भेदनीतीची परिणति अखेर त्या देशाच्या फाळणींतच व्हावयाची होती, हें त्या योजनेमुळें प्रत्यक्ष सिद्धच केलें.

आराकानी डोंगराचा प्रदेश, चिन डोंगरांचा प्रदेश, नागा डोंगरांचा प्रदेश, कचीन डोंगरांचा प्रदेश, शान संस्थानें, 'वा' संस्थानें, करीनी संस्थानें, व करीन डोंगरांचा प्रदेश असे राज्यकारभाराच्या सोईसाठीं या प्रदेशाचे निरनिराळे विभाग पाडण्यांत आलेले होते.

या डोंगरी जमातींपैकीं शानांची संख्या दहा लक्षांवर असून ते शान संस्थानें व वा संस्थानें यांत प्रामुख्यानें राहतात. ते ब्रह्मी लोकांप्रमाणेंच बुद्धानुयायी आहेत. अल्पसंख्यांमध्यें सर्वांत अधिक संख्या करीनांची—चौदा लक्ष—आहे. ते प्रामुख्यानें कंतारवादी, बावलाक व चेबोजी या "करीनी संस्थानें" म्हणून संबोधल्या जाणाऱ्या संस्थानांत व करीन डोंगरी प्रदेशांत राहतात. त्यांच्यातले बहुसंख्य पंचमहाभूतांची पूजा करणारे बुद्धानुयायी आहेत, तर अमेरिकन मिशनऱ्यांच्या प्रयत्नांमुळें अडीच लक्ष करीन खिस्ती बनलेले आहेत. कचीन चार लक्ष, चिन पंचवीस हजार, नागवंशी पंचाहत्तर हजार आहेत; यांपैकीं नागलोक अगदींच रानटी अवस्थेमध्यें आहेत.

या परिस्थितींत साहजिकपणेंच ब्रह्मदेशाच्या स्वातंत्र्याबरोबरच ब्रह्म-

देशाच्या या दोन्ही भागांचें एकीकरण झालें पाहिजे, असें ब्रह्मी राष्ट्रवाद्यांच्या मागणीचें द्विविध स्वरूप प्रथमपासूनच होतें. ब्रिटिशांनीं या प्रदेशाभोंवतीं आपल्या भेदनीतीची पोलादी भिंत उभी करून ठेवली असली, तरी युद्धकाळीं व युद्धोत्तर काळांत ब्रह्मदेशांत आणि आशिया-खंडांत झालेल्या घडामोडींचे पडसाद त्या प्रदेशामध्येंही उमटल्याखेरीज राहिले नाहींत. युद्धकाळीं जपान्यांच्या सहकार्यानें वेगडीच कां होईना स्थापन झालेलें "स्वतंत्र" ब्रह्मदेशाचें सरकार, फासापाला व ऑंग सान यांचा उदय, ऑंग सानच्या नेतृत्वाखालीं ब्रह्मी राष्ट्रवादाला आलेली भरती व त्यामुळें स्वातंत्र्याच्या उंबरठ्याजवळ जाऊन पोंहोचलेले ब्रह्मी लोक या घडामोडींनीं जंगल-पर्वतांनीं वेष्टिलेल्या या मागासलेल्या मुलखांतही परिवर्तन घडवून आणलें. त्या विभागांत राहणाऱ्या विभिन्न वंशांच्या जनतेंतही प्रबल स्वातंत्र्याकांक्षा प्रज्वलित झाली; आणि आपली एकंदर परिस्थिति लक्षांत घेतां बहुसंख्य ब्रह्मी जनतेशीं एकजूट केल्याखेरीज आपणांस स्वातंत्र्याचा आस्वाद घेतां येणें अशक्यच आहे याचीही त्यांना जाणीव झाली. त्यासाठीं मंत्रिमंडळाच्या अंमलाखालचा ब्रह्मदेश व त्यापासून अलग राखण्यांत आलेला आपला प्रदेश यांचें एकीकरण केलें पाहिजे व अशा अखंड ब्रह्मदेशाच्या स्वातंत्र्यासाठीं बहुसंख्य आणि अल्पसंख्य यांचें हार्दिक ऐक्य साधून झगडलें पाहिजे, हें त्यांना पटण्या-सही अवधि लागला नाहीं.

ब्रह्मी अल्पसंख्यांकांच्या मनोवृत्तींत झालेलें हें परिवर्तन बहुसंख्य व अल्प-संख्य यांच्यांत चिरस्थायी ऐक्य प्रस्थापित करण्यास अत्यंत अनुकूल होतें. ब्रह्मदेशाच्या सुदैवानें त्या देशाच्या इतिहासांत प्रथमच चालून आलेली राष्ट्रीय ऐक्य साधण्याची ही सुवर्णसंधि अचुक ओळखून तिचा फायदा घेणारा ऑंग सानसारखा नेता त्याला लाभलेला होता. ऑंग साननें फासापालाच्या स्थापनेपासूनच अल्पसंख्यांकांच्या मनांतील अविश्वास दूर करून राष्ट्रीय ऐक्य प्रस्थापित करण्याचा अविरत प्रयत्न चालू ठेवला होता. या मागासलेल्या वन्य समाजाचा उत्कर्ष करण्याच्या कार्यक्रमाला त्यानें फासापालाच्या कार्यांत महत्त्वाचें स्थान दिलेलें होतें. "करीन, शान,

चिन, कचीन इत्यादींसारख्या मागासलेल्या समाजांच्या प्रगतीसाठीं सरकारनें विशेष प्रयत्न केले पाहिजेत. त्यांच्याकडून करभाराच्या स्वरूपांत मिळालेल्या पैशांतील पैन् न पै त्यांच्या उद्धार-कार्यावर खर्च झाली पाहिजे, इतकेंच नव्हे, तर मध्यवर्ति सरकारनें आपल्या तिजोरीमधूनही त्यांच्यासाठीं खर्च केला पाहिजे. धर्म किंवा वंश यांचा भेद लक्षांत न घेतां प्रत्येक नागरिकाला आपला विकास करून घेण्याची संधि मिळाली पाहिजे; त्यांना धर्मस्वातंत्र्य असलें पाहिजे; व करीन, शान, कचीन, चिन, चिनी व हिंदी या भिन्न-वंशीयांच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय, भाषाविषयक हक्कांचें रक्षण होईल, अशी सरकारकडून हमी मिळाली पाहिजे, " असें फासापालाच्या कार्यक्रमांत स्पष्टपणें नमूद करण्यांत आलेलें होतें. फासापालाच्या घटनेंतील ध्येय-धोरणांत तर अल्पसंख्यांकांना मध्यवर्ती सत्तेपासून फुटून निघण्यापर्यंतचा स्वयंनिर्णयाचा हक्क मिळवून देण्याचाही समावेश करण्यांत आलेला होता. ब्रिटिश साम्राज्यवाद्यांनीं ब्रह्मदेशांतील भिन्नवंशीयांमध्यें अनेक वर्षांच्या परिश्रमानें उभारून ठेवलेली भिंत या घडामोडींच्या धक्क्यानें कोसळून पडली. त्यामुळें ब्रिटिश सरकारला ब्रह्मी राष्ट्रवाद्यांची ब्रह्मदेशाच्या एकीकरणाचीही मागणी मान्य करणें भाग पडलें.

ॲटली-ऑंग सान करारांत ब्रह्मदेशाच्या या एकीकरणाला तात्त्विक मान्यता देण्यांत येऊन, मध्यंतर सरकारशींही त्या जनतेचा निकट संबंध प्रस्थापित करण्यांत यावा असें नमूद करण्यांत आलें, तरी अशा योजनेस अल्पसंख्य जमातींच्या पुढाऱ्यांची संमति असली पाहिजे, अशी मेख मारून ठेवण्यांत आली. त्याचप्रमाणें ले. क. रीस-विल्यम्स् यांच्या नेतृत्वाखालीं याविषयीं योजना सुचविण्यासाठीं चौकशी समितीही नेमली गेली. हें एका अर्थानें फुटीर वृत्तींना आपलें डोकें वर काढण्यास संधि मिळवून देण्यासारखेंच होतें. परंतु ब्रह्मी शिष्टमंडळ इंग्लंडहून परत आल्या-नंतर मध्यंतर सरकार व अल्पसंख्य समाज यांच्या प्रतिनिधींची पांगलॉंग येथें झालेली परिषद्, व त्यानंतर रीस-विल्यम्स समितीचें कामकाज यांमधून दोहोंना संमत अशी योजना तयार झाली. ब्रह्मदेशाचें एकीकरण कोठल्या स्वरूपांत करावें, हें अल्पसंख्यांकांच्या प्रतिनिधींबरोबर विचारविनिमय करून

ब्रह्मी घटना समितीनेंच तपशीलवार ठरवावें, असें मत व्यक्त केलें. पहाडी प्रदेशांतील अल्पसंख्यांकांना घटना समितीवर ४५ प्रतिनिधि निवडून पाठविण्याची योजनाही या समितीच्या शिफारशींवरून करण्यांत आली.

या योजनेमुळें करीनांच्यापैकीं एका गटाचेंच तेवढें समाधान होऊं शकलें नाहीं. करीन समाज व त्यांतल्या त्यांत ख्रिस्तानुयायी करीन—हा ब्रह्मदेशांतील सर्वांत राजनिष्ठ समाज गणला जात असे. सन १८२६ मध्यें झालेल्या पहिल्या ब्रह्मी युद्धांत वाटाड्यांचें काम करून त्यांनीं आक्रमक ब्रिटिश सैन्याला साह्य केलें होतें. नंतरच्या दुसऱ्या युद्धांतही त्यांचें ब्रिटिशांना असेंच बहुमोल साह्य झालें. १८८५ मध्यें ब्रह्मदेश संपूर्णपणें ब्रिटिशांच्या ताब्यांत गेल्यावर देशांत माजलेली अंदाधुंदी मोडून काढून शांतता स्थापन करण्याच्या कामीं ब्रिटिश सैन्यास मदत करण्यासाठीं करीनांच्याच पलटणी तयार करण्यांत आल्या. ब्रह्मी लष्करांत पन्नास टक्क्यां-पेक्षां अधिक सैनिक पहाडी मुलखांतील अल्पसंख्यांकांतूनच भरती केले जात असत, व त्यांतही करीन बहुसंख्य असत. १९३० मध्यें झालेलें “ थारावादी बंड ” मोडून काढण्यासाठीं देखील करीन पलटणींचाच उपयोग करण्यांत आलेला होता! पहिल्या महायुद्धांत तर करीनांनीं ब्रिटिशांना साह्य केलेंच; पण दुसऱ्या महायुद्धांतही अन्य कोणताच समाज करीनांइतका ब्रिटिशांशीं एकनिष्ठ राहिला नाहीं. ब्रिटिश राज्यकर्त्यांकडून त्याना मिळणाऱ्या खास सवलती व वागणूक यांमुळें ब्रह्मी समाजाला ते आपला शत्रु लेखूं लागले व आपल्या हितसंबंधांच्या रक्षणासाठीं ब्रिटिश सत्तेवर विसंबण्याची प्रवृत्ति त्यांच्यांत साहजिकच निर्माण झाली. या समाजावर १८८१ मध्यें स्थापन झालेल्या राजनिष्ठ करीन पुढाऱ्यांच्या “ करीन नॅशनल युनियन ” चें वजन होतें. ही संस्था व तिच्या पंखा-खालचा बहुसंख्य करीन समाज केवळ ब्रह्मी राष्ट्रीय आंदोलनापासून अलिप्तच राहिला नाहीं, तर त्याविरुद्ध ब्रिटिशांच्या गोटांतच सरळ सामील झाल्यामुळें, ब्रह्मी समाज व करीन यांच्यांत परस्पर द्वेष व अविश्वास निर्माण झाला. त्यातच जपानी राजवटींत या दोन्ही समाजांत अनेक चकमकी झडल्यानें दोन्ही समाजांमधील हें अंतर अधिकच वाढलें.

C048

फासापालानें ब्रह्मी व करीन समाजांमधील हें वितुष्ट नष्ट करून ऐक्य स्थापन करण्यासाठीं खास प्रयत्न केले. ब्रह्मदेशांत व आशियांत चाललेल्या खळबळीचा परिणाम करीनांवर व त्यांतल्या त्यांत करिन युवकांवरही होतच होता. नवजागृत करीन युवकांनीं, करीन-ब्रह्मी ऐक्याचा प्रयत्न करून, करीन समाजाला ब्रह्मी स्वातंत्र्यलढ्यांत भाग घेण्याकरितां फासापालामध्यें सामील होण्यासाठीं, प्रचार-कार्य सुरू केलें. या नव्या दिशेनें करीन समाजांत कार्य करण्यासाठीं त्यांनीं आपली स्वतंत्र संस्था १९४४ च्या सप्टेंबरमध्यें स्थापन केली. या काळांत राजकीय स्वरूपाचें कार्य उघड रीतीनें करणें शक्य नसल्यानें त्यांनीं आपल्या संस्थेला "करीन समाज सेवा संघ" असें नांव दिलें होतें. करीन नॅशनल युनियनच्या पुढाऱ्यांचें मतपरिवर्तन करणें शक्य न झाल्यामुळें या नवयुवकांनीं १९४५ च्या डिसेंबरमध्यें "ऑल बर्मा करीन यूथ ऑर्गनायझेशन" या स्वतंत्र राजकीय संस्थेची स्थापना केली. ही संस्था फासापालाची संलग्न संस्था असून त्या समाजांत फासापालाच्या ध्येय-धोरणाचा तिनें प्रभावी प्रचार केला. या राष्ट्रवादी करीनांच्या युवक-आंदोलनांत मान बा खैन हा युवक नेता उदयास आला. ऑंग सानच्या विश्वासामधील कार्यकर्त्यांत तो प्रमुख असून त्यांच्या मंत्रिमंडळांतही मान बा खैनचा समावेश करण्यांत आलेला होता. करीन नॅशनल युनियननें घटना परिषदेवर बहिष्कार टाकला, तर या संस्थेनें फासापालाशीं घटना-परिषदे-मार्फत स्वतंत्र ब्रह्मदेशाची राज्यघटना तयार करण्याच्या कामीं संपूर्ण, हार्दिक सहकार्य केलें.

"करीनिस्ताना"च्या कल्पनेचा पुरस्कार करणाऱ्या करीन नॅशनल युनियनचे कार्यवाह सा था ल्हो यांची मुलाखत घेतली असतां, त्यांनीं मला सांगितलें कीं, सरहद्दीवरील इतरत्र करीनांची बहुसंख्य वस्ति असलेल्या प्रदेशाचें "करीन राज्य" करण्यांत यावें, ब्रह्मदेशाच्या उत्तर भागांत राहणाऱ्या करीनांना राष्ट्रीय अल्पसंख्यांकांचे हक्क मिळावेत, व स्वतंत्र ब्रह्मदेशाच्या घटनेंतही ब्रिटिश राजवटींत पोलिस व लष्कर यामध्यें करीनांना मिळणाऱ्या खास सवलती अबाधित राखण्यांत याव्यात या त्यांच्या मुख्य मागण्या. ते म्हणाले,

"आम्हां करीनांना स्वतंत्र इतिहास-परंपरा, संस्कृति व भाषा आहे.

आम्ही शांतताप्रिय, तर ब्रह्मी लोक आक्रमक वृत्तीचे आहेत. सबंध ब्रह्मदेशांतही कित्येक खेड्यांतून व शहरांतून आमची बहुसंख्या आहे. पण प्रत्येक ठिकाणीं आमची अलग वस्ति असून, कित्येक खेड्यांत तर करीन वस्तीभोंवतीं कुंपणच घातलेलें असतें ! ”

त्यांचें प्रतिपादन माझ्या कानांना परिचित वाटलें. म्हणून मी त्यांना सरळच प्रश्न केला, “ जिनांच्या पाकिस्तानाप्रमाणें तुम्हांला हें “ करीन राज्य’ही पूर्णपणें स्वतंत्र व सार्वभौम स्वरूपाचें हवें आहे काय ? ” सा था ल्हो या प्रश्नास उत्तर देतांना म्हणाले, “ असें पूर्ण स्वतंत्र व सार्वभौम करीन राज्य स्थापन करणें शक्य असतें, तर आम्हीं तें पत्करलेंच असतें. पण असें राज्य स्थापन केलें, तर तें स्वावलंबी होणें शक्य नाहीं. म्हणून हें करीन राज्य ब्रह्मी संघराज्याचें घटकच असावें, पण महत्त्वाचे शेषाधिकार मध्यवर्ती सरकारकडे न राहतां, करीन राज्याकडे असावेत, अशी आमची मागणी आहे. त्याचप्रमाणें ब्रह्मी लष्करांत स्वतंत्र करीन पलटणी असून, त्यांवर अधिकारी देखील करीनच नेमण्याची आजवरची प्रथा आहे. परंतु ती मोडून ब्रह्मी राष्ट्रवाद्यांना ब्रह्मदेशांतील सर्व वंशांच्या सैनिकांची खिचडी असलेलें पंचमेळ राष्ट्रीय सैन्य हवें आहे. आमचा या गोष्टीस विरोध असून लष्कर व पोलिस यांच्यांत मिळणाऱ्या खास सवलती अबाधित राखण्याचें आश्वासन आम्हांला मिळालें पाहिजे.”

ते पुढें म्हणाले : “ यावरून आम्ही ब्रह्मीविरोधी आहोंत असा गैरसमज मात्र करून घेऊं नका. आम्हांसही ब्रह्मी-करीन ऐक्य स्थापन करण्याची उत्सुकता लागलेली आहे. आमच्या समाजाची प्रगति व विकास करून ब्रह्मदेशाच्या कारभारांतला आमचा वांटा योग्य रीतीनें उचलणें शक्य होण्यासाठीं आम्हांस स्वयंनिर्णयाचा हक्क देण्यांत यावा, येवढीच आमची मागणी आहे. ”

करीन युवक संघाचे कार्यवाह सॉ मिन् थिन् यांची मुलाखत घेतली असतां ते म्हणाले : “ आमच्या जुन्या, वडीलधाऱ्या पुढाऱ्यांप्रमाणें करीन जनतेनें ब्रिटिशांवर अवलंबून न राहतां स्वावलंबी झालें पाहिजे, व त्याचबरोबर ब्रह्मदेशाचे नागरिक म्हणून ब्रह्मी स्वातंत्र्य-लढ्यांतला आपला वांटा

उचलला पाहिजे, अशी आमची भूमिका आहे. ”

ते पुढें म्हणाले : “ ज्यामुळें ब्रिटिश साम्राज्यवाद्यांचें फावेल, असें आम्ही वागतां कामा नये. त्यामुळें ब्रह्मदेशाचें स्वातंत्र्य दुरावेल. आम्हांस देखील करीनांची बहुसंख्य वस्ति असलेल्या प्रदेशाचें स्वायत्त करीन राज्य हवेंच आहे. पण हें राज्य केवळ ब्रह्मी संघराज्याचें घटकच राहून भागणार नाहीं; तर सर्व महत्त्वाचे शेषाधिकार या स्वायत्त संघटकांकडे न ठेवतां मध्यवर्ती संघराज्याकडेच राहिले पाहिजेत, असें आमचें ठाम मत आहे. हा आमचा जुन्या पुढाऱ्यांशीं असलेला दुसरा मूलभूत व महत्त्वाचा मत-भेदाचा मुद्दा आहे. इतकेंच नव्हे, तर आशियाला गोऱ्या साम्राज्यवाद्यांच्या आक्रमणास यशस्वी तोंड द्यावयाचें असेल, तर आशियांतील राष्ट्रांचें कोणत्या ना कोणत्या स्वरूपाचें संघराज्य निर्माण झालें पाहिजे, असाही आमचा विश्वास आहे, व या कामीं हिंदुस्थानच नेतृत्व करूं शकेल, अशी आमची आशा व श्रद्धाही आहे. आशियाच्या स्वातंत्र्यासाठीं अशा संघराज्याची आमच्या मतानें आवश्यकता असतां, आम्हीं केवळ सतरा दशलक्षांची वस्ति असलेल्या चिमुकल्या ब्रह्मदेशाचे अनेक राज्यांत तुकडे करूं लागलों, तर कसा निभाव लागेल ? ”

## गंडांतर टळलें

: ७ :

स्वतंत्र, सार्वभौम प्रजासत्ताक ब्रह्मदेशाची राज्यघटना तयार करून त्याची प्रत्यक्ष स्थापना करणें आणि युद्धकालीन संहारामुळें उध्वस्त झालेल्या ब्रह्मी समाज जीवनाची पुनर्रचना करणें, हें ब्रह्मी राष्ट्रवाद्यांपुढील द्विविध राष्ट्रीय उद्दिष्ट शांततामय मार्गानें साध्य करून घेण्याचें साधन म्हणूनच सेनापति ऑंग साननें ॲटली-योजनेचा स्वीकार केला होता. १९४७ च्या एप्रिलमध्यें त्या योजनेप्रमाणें झालेल्या ब्रह्मी घटना-परिषदेच्या निवडणुकींत फासापालास घसघशीत बहुमत मिळालें, आणि ऑंग सानपुढील मार्ग मोकळा झाला,

आणि घटना-परिषदेची निवडणूक संपल्याबरोबर आपल्या अननुकरणीय तडफेनें ऑंग साननें दोन्ही कार्यांस प्रारंभ केला.

घटना-परिषदेपुढें विचारार्थ ठेवण्याकरितां ब्रह्मी प्रजासत्ताकाच्या घटनेचा मसुदा तयार करण्यासाठीं फासापालाच्या कार्यकारी मंडळानें घटना-विशारदांची समिति नेमली. या समितीनें तयार केलेल्या घटनेच्या मसुद्याचा विचार करण्यासाठीं मे महिन्यांत फासापालाच्या वतीनें घटना-परिषदेंत निवडून गेलेले प्रतिनिधी व फासापालाचे प्रमुख कार्यकर्ते यांची संयुक्त परिषद भरविण्यांत आली. घटना-विशारदांच्या समितीनें तयार केलेला मसुदा या परिषदेंत मंजूर करण्यांत आला. हा मसुदा म्हणजे संपूर्ण घटना नव्हती. भावी ब्रह्मी प्रजासत्ताकाच्या घटनेचीं मूलभूत तत्त्वें व रूपरेषाच या मसुद्यांत निर्दिष्ट करण्यांत आलेलीं असून, संपूर्ण तपशीलवार घटना तयार करण्याचें कार्य घटना-परिषदेनें पार पाडावयाचें असें निश्चित करण्यांत आलें होतें.

घटना-परिषदेच्या पहिल्या अधिवेशनाला कांहीं दिवसांचाच अवधि असतां, युद्धकालीन संहारामुळें उध्वस्त झालेल्या ब्रह्मी समाजजीवनाची पुनर्रचना करण्यासाठीं योजना आंखण्याकरितां प्रातिनिधिक स्वरूपाची परिषद भरविण्यांत आली. या परिषदेनें पुनर्रचनाकार्याच्या विविध अंगोपांगापैकीं प्रत्येकाचा स्वतंत्रपणें विचार करून पृथक योजना आंखण्यासाठीं उपसमित्यांची नेमणूक केली. या सर्व योजनांचा साकल्यानें विचार करून ब्रह्मी समाजाच्या पुनर्रचनेची एक सर्वंकष योजना आंखण्याचें काम नंतर परिषदेनें पार पाडावयाचें होतें.

स्वतंत्र ब्रह्मदेशांतील समाजाचें स्वरूप कशा प्रकारचें राहणार याचें दिग्दर्शन ब्रह्मी प्रजासत्ताकाच्या घटनेच्या मसुद्यांत करण्यांत आलेलें असून त्याप्रमाणें ब्रह्मी समाजाच्या पुनर्रचनेच्या कार्याला प्रजासत्ताकाच्या स्थापनेनंतर प्रारंभ व्हावयाचा, हें उघडच होतें. त्यामुळें ब्रह्मी पुनर्घटना परिषदेपुढील कार्य मर्यादित स्वरूपाचेंच होतें; युद्धकाळीं उध्वस्त झालेल्या जीवनाची पुनर्रचना करण्यासाठीं तात्पुरत्या स्वरूपाची योजना परिषदेला तयार करावयाची होती. परंतु ही तात्पुरती योजना तयार करतांनाही स्वतंत्र ब्रह्मदेशाच्या वांच्छित समाजरचनेचें स्वरूप दृष्टीपुढें ठेवून पुढील

नव-समाजनिर्मितीच्या कार्याला ती पोषक ठरेल अशी खबरदारी घेण्यांत यावी, असाही आदेश परिषदेस देण्यांत आलेला होता.

ब्रह्मी घटना-परिषदेचें अधिवेशन मेच्या ( १९४७ ) दहा तारखेस समाजवादी पक्षाचे अध्यक्ष थकीन म्या यांच्या अध्यक्षतेखालीं सुरू झालें. फासापालाचे उपाध्यक्ष थकीन नू यांची नंतर परिषदेचे कायमचे अध्यक्ष म्हणून निवड करण्यांत आली.

ब्रह्मदेशाच्या राष्ट्रीय पुढाऱ्यांनीं आपल्या राष्ट्राचा स्वातंत्र्य-लढा चालवितांना हिंदी स्वातंत्र्य-लढ्याचा आदर्श आपल्या दृष्टीपुढें प्रथमपासूनच ठेविलेला होता. ब्रह्मी पुढाऱ्यांनीं आपल्या लढ्यांत वेळोवेळीं टाकलेलीं पावलें, केलेल्या मागण्या, स्वीकारलेलीं ध्येय-धोरणें आणि आंखलेले कार्यक्रम हीं त्या त्या वेळीं हिंदी राष्ट्रीय आंदोलनामधील घडामोडी दृष्टीपुढें ठेवूनच स्वीकारलीं असल्याचें स्पष्टच दिसतें. युद्धोत्तर काळांतही हिंदी स्वातंत्र्याचा प्रश्न सोडविण्यासाठीं तयार करण्यांत आलेल्या मध्यंतर सरकार आणि घटना-परिषद स्थापन करणाऱ्या योजनेचीच मागणी ब्रह्मी पुढाऱ्यांनीं आपल्या राष्ट्रासाठीं केली. त्या नंतर मध्यंतर सरकार आणि घटना परिषद यांचें कामकाज चालवितांनाही त्यांनीं हिंदी मध्यंतर सरकार आणि घटना परिषद यांचें अनुकरण, तत्त्व आणि तपशील या दोन्ही बाबतींत, शक्य तितकें चालविलें होतें, हें कोणाही निरीक्षकाच्या सहजच लक्षांत येत असे.

अध्यक्षांची निवडणूक झाल्यानंतर हिंदी घटना-परिषदेंत पं. जवाहरलाल नेहरू यांनीं इतिहासप्रसिद्ध उद्दिष्टांविषयींचा ठराव मांडला. त्याचें अनुकरण करून, ब्रह्मदेशाचे जवाहरलाल—सेनापति ऑंग सान— यांनीं, थकीन नू यांची ब्रह्मी घटना-परिषदेचे कायमचे अध्यक्ष म्हणून निवड होतांच उद्दिष्टांविषयींचा ठराव मांडून, मंजूर करून घेतला !

या उद्दिष्टांविषयींच्या ठरावानें ब्रिटिश राष्ट्रकुलामधून बाहेर पडलेल्या स्वतंत्र, सार्वभौम प्रजासत्ताकाची स्थापना करणें हें ब्रह्मी घटना-परिषदेचें उद्दिष्ट असल्याचें उद्घोषित करण्यांत आलें. त्याचप्रमाणें, १९३५ च्या कायद्याखालीं स्थापन झालेल्या मंत्रिमंडळाच्या अधिकारक्षेत्रामधील ब्रह्मदेश

नों. नं. ११५०८ ३९३४५

आणि त्यांतून वगळण्यांत आलेला ब्रह्मी अल्पसंख्यांकांची वस्ति असलेला ब्रह्मदेशाचा पहाडी प्रदेश, यांचें स्वयंनिर्णयाच्या तत्त्वानुसार एकीकरण करून, अखंड ब्रह्मदेशासाठीं सर्वमान्य राज्यघटना तयार करण्याचा संकल्पही त्या ठरावाच्या द्वारें घटना-परिषदेनें जाहीर केला.

ॲटली-योजनेंत ब्रह्मदेशाच्या संपूर्ण स्वातंत्र्याच्या ध्येयाला सरळ व स्पष्ट मान्यता देण्यांत आलेली नाहीं, म्हणून सेनापति ऑंग सान यांच्या विरोधकांनीं त्या बाबतींत "तडजोड" केल्याचा आरोप केला होता; याच मुद्द्यावर फासापालाविरोधी व्यक्ति व पक्ष यांनीं आपल्या प्रचारमोहिमेंत विशेष भर दिला होता. ॲटली-योजनेंत ब्रह्मदेश ब्रिटिश राष्ट्रकुलामधून बाहेर पडणार कीं त्यांतच राहणार, या विषयींचें कांहींच दिग्दर्शन नसल्यामुळें हा आक्षेप यथार्थ वाटत असला, तरी या विषयींचा निर्णय घेण्याचा अधिकार ब्रह्मी घटना-परिषदेस प्राप्त झालेला असल्यामुळें आपलें ध्येय साध्य करून घेणें ब्रह्मी जनतेच्याच हातीं आहे, असें जें ऑंग सान यांनीं समर्थन केलें होतें, तें घटना-परिषदेकडून उद्दिष्टाविषयींचा ठराव मंजूर करून घेऊन प्रत्यक्ष सिद्ध केलें. तसेंच, चर्चिल-योजनेनें करूं घातलेली ब्रह्मदेशाची फाळणी होऊं न देतां, अखंड ब्रह्मदेशाचें प्रजासत्ताक प्रस्थापित करण्याची ब्रह्मी स्वातंत्र्यवाद्यांची आकांक्षाही या ठरावानें फलद्रूप केली. घटना-परिषदेंत निवडून आलेल्या अल्पसंख्य समाजांच्या प्रतिनिधींनीं उद्दिष्टाविषयींच्या ठरावास हार्दिक पाठिंबा देऊन घटना-परिषदेनें अंगिकारिलेलें हें कार्य एकोप्यानें पार पाडण्यास अवश्य असलेलें अनुकूल वातावरण निर्माण करून दिलें.

उद्दिष्टाविषयींचा ठराव मंजूर केल्यानंतर घटना-परिषदेनें निरनिराळ्या उप-समित्यांची निवड केली. त्यांपैकीं "फ्रँटियर एरियाज् निगोशिएटिंग कमिटी" या ब्रह्मी अल्पसंख्याकांच्या प्रतिनिधींशीं वाटाघाटी करून त्यांना संमत अशी योजना तयार करण्यासाठीं निवडलेल्या समितीचें कार्य विशेष महत्त्वाचें होतें. या समितीचें नेतृत्व (तिच्या कार्याचें महत्त्व जाणून) स्वतः ऑंग सान यांच्याकडेच सोंपविण्यांत आलेलें होतें. अर्थात् ही समिती आणि तिचे कर्णधार ऑंग सान यांच्यावर इतर सर्व समित्यांपेक्षां कामाचा

विशेष भार पडला.

घटना-परिषदेच्या व पुनर्घटना-परिषदेच्या समित्यांचें काम एकाच वेळीं ब्रह्मदेशाच्या सेक्रेटरीएटमध्यें चालूं लागलें व त्यांच्या बैठकी रोज भरावयास लागल्या. दोन्ही परिषदांच्या समित्यांच्या कार्याची प्रगतीही झपाट्यानें आणि समाधानकारक रीतीनें होऊं लागली.

ब्रह्मी राष्ट्रवादी आपल्या द्विविध कार्यांत याप्रमाणें प्रगति करीत असतानाच हिंदुस्थानांतून वृत्त आलें, कीं ब्रिटिश सरकारनें दिनांक ३१ जून, १९४८ रोजीं आपलीं राज्यसूत्रें हिंदी राष्ट्रीय सरकारच्या स्वाधीन करण्याची आपली मूळ योजना बदलून, त्यापूर्वीं दिनांक १५ ऑगस्ट १९४७ लाच सत्तांतर करण्याचें मान्य केलें. ब्रह्मदेशासाठींही अशीच योजना निश्चित करून घ्यावी, अशी इच्छा ब्रह्मी राष्ट्रीय पुढाऱ्यांच्या अंतःकरणांत या वार्तेमुळें साहजिकच प्रादुर्भूत झाली. ब्रिटिश सरकारशीं बोलणें करून ब्रह्मदेशासाठीं तशा धर्तीची योजना मान्य करवून घेण्यासाठीं घटना परिषदेचे अध्यक्ष थकीन नू यांच्या नेतृत्वाखालीं लंडनला शिष्ट-मंडळ पाठविण्यांत आलें. थकीन नूंच्या शिष्टाईला यश येऊन, ब्रह्मदेशामधील सत्तांतरासंबंधींची नवी योजना घेऊनच ते ब्रह्मदेशास परत आले.

अ‍ॅटली-नू करारास ब्रह्मी मध्यंतर सरकारची मान्यता मिळतांच तो प्रसिद्ध होऊन, त्याच्या अंमलबजावणीसही प्रारंभ व्हावयाचा होता. ब्रह्मदेशाचें राष्ट्रीय उद्दिष्ट दृष्टिपथांतच नव्हे, तर अगदीं हाताशीं आलेलें दिसल्यामुळें ब्रह्मदेशामधील वातावरण आशेनें भरून गेलें होतें. परंतु, आतां अल्पकाळांतच आपलें सुखस्वप्न साकार होणार या आशेनें पुलकित झालेल्या ब्रह्मी जनतेवर " हा हन्त ! " म्हणून शोकाकुल होण्याचा प्रसंग अनपेक्षितपणें ओढवला !

थकीन नूंच्या शिष्टमंडळानें आणलेल्या नव्या योजनेचा विचार दिनांक १८ जुलैस सेनापति आँग सान यांच्या घरीं रात्रीं झालेल्या फासापालाच्या पुढाऱ्यांच्या अनौपचारिक सभेंत होऊन, त्या योजनेस मान्यता देण्यांत आली. दुसऱ्या दिवशीं—म्हणजे दिनांक १९ जुलै रोजीं—ही योजना व तदनुषंगिक इतर विषयांचा विचार करण्यासाठीं सेनापति आँग सान यांनीं

मंत्रिमंडळाची सभा बोलाविली होती. सकाळीं १०-४५ वाजतां सेक्रेटरी-एटमधील ऑंग सानच्या कार्यालयांत मंत्रिमंडळाची सभा चालू असतां, लष्करी गणवेश परिधान केलेले शस्त्रधारी तरुण दारावर पहारा करणाऱ्या दारवानांना बाजूस सारून कार्यालयांत शिरले आणि आपणांजवळील ऑटोमॅटिक गन्सच्या साह्यानें त्यांनीं तेथें उपस्थित असलेल्या मंत्रिमंडळाच्या सदस्यांवर गोळ्यांचा अक्षरशः वर्षाव केला. सेनापति ऑंग सान, त्यांचे थोरले बंधु व मंत्रिमंडळांतील व्यापार आणि पुरवठा-मंत्रि ऊ बा विन्, शिक्षण व राष्ट्रीय नियोजन खात्याचे मंत्रि अब्दुल रझाक, व्यापार व मजूर मंत्रि मान बा खैन आणि ब्रह्मी समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अर्थमंत्रि थकीन म्या हे पांच मंत्रि जागच्या जागींच गतप्राण झाले. प्रसिद्धि मंत्रि ऊ बा चो आणि पहाडी प्रदेशामधील जनतेचे मंत्रिमंडळामधील प्रतिनिधि मांग पान संस्थानाचे सावबा हे व जखमी झालेले आणखी दोन मंत्रि नंतर मरण पावले. सभेस हजर असलेल्या मंत्र्यांपैकीं पुनर्वसाहत मंत्रि ऊ बा जान हे एकटेच किरकोळ जखमा होऊन बचावले !

जनतेचा विश्वास व प्रीति संपादन केलेला नेता मारेकऱ्यांच्या सुरीला बळी पडल्याचीं अनेक उदाहरणें जगांतील निरनिराळ्या राष्ट्रांत घडलेलीं आहेत. परंतु मंत्रिमंडळाची सभा चालू असतां मंत्रिमंडळाच्या प्रमुख सदस्यांचा सामुदायिक वध झाल्याचें असें उदाहरण जगाच्या इतिहासांत क्वचितच घडलें असेल ! वादळी समुद्राचा प्रवास सुखरूप पूर्ण करून जहाज किनाऱ्यानजीक यावें, आणि किनारा दृष्टिपथांत आला असतां जहाजाचा कर्णधारच आपल्या सहकाऱ्यांसह मारेकऱ्यांच्या सुरीस बळी पडावा, असें घडल्यावर त्या जहाजावरील प्रवाशांची जी मनस्थिति होईल त्याच प्रकारच्या दुःखातिशयानें बधिर झालेल्या मनस्थितींत, ब्रह्मी जनता, हा अनपेक्षित व भीषण प्रकार घडल्यानंतर कांहीं दिवस होती. सबंध देशभर जनतेनें स्वयंस्फूर्तीनें निदर्शनें करून या हुतात्म्यांवरील आपलें गाढ प्रेम व दृढविश्वास प्रदर्शित केला आणि या अमानुष दुष्कृत्याचा तीव्र निषेध केला.

या घटनेच्या धक्क्यामुळें ब्रह्मी जनतेंत निर्माण झालेली बधिरतेची भावना हळू हळू कमी होत जातांच, तिची जागा ब्रह्मदेशाच्या राजकीय

भवितव्यावर होणाऱ्या तिच्या संभाव्य परिणामाविषयींच्या चिंतेनें घेण्यास प्रारंभ केला.

ब्रह्मी हातांत येऊं घातलेल्या सत्तेंत " प्राप्तीचा वांटा " सरळ राजमार्गानें प्राप्त करून घेणें फासापालाच्या प्रभावामुळें अशक्य असल्याचें अनुभवानें पटल्यामुळें फासापालाच्या नेत्यांचा अशा रीतीनें अचानक काटा काढून, हिटलरच्या " ब्लिट्झ क्रीग " प्रमाणें देशव्यापी बंडाळीचा डोंब उसळविण्याची पद्धशीर योजना फासापालाच्या विरोधकांनीं केलेली असावी, ही गोष्ट ज्या पद्धतीनें हें भीषण कृत्य पार पाडण्यांत आलें, त्यावरून उघडच दिसत होती. आणि देशभर अराजक माजवून " वच्चा साकू-" प्रमाणें सत्ता बळकाविण्याची शेखमहमदी योजना पार पाडण्यास ब्रह्मदेशामधील परिस्थिति अत्यंत अनुकूलही होती. परंतु ब्रह्मी सरकारनेंदेखील या आघाताचें स्वरूप ओळखून प्रत्याघातही विद्युद्वेगानें केल्यामुळें, या फासापालाविरोधी गटांना अशांतता माजविण्यास संधीच मिळूं शकली नाहीं. सरकारकडून इतकी त्वरित व कडक उपाययोजना करण्यांत येईल, असेंही हत्येची योजना आंखणाऱ्यांना वाटलें नसावें. उलट आकाशांतील कुऱ्हाडीप्रमाणें होणाऱ्या या आघातानें सरकार व जनता कांहीं काळ तरी भांबावून जातील, व तेवढ्या अवधींत आपण देशाच्या कानाकोपऱ्यांत बंडाळीचा डोंब उसळून देऊं शकूं, अशी त्यांची कल्पना असावी. परंतु ही घटना घडल्यानंतर कांहीं तासांच्या आंतच ब्रह्मदेशाच्या गव्हर्नरांनीं थकीन नू यांना राज्यसूत्रें हातीं घेण्यास पाचारण केलें, व त्यांनीं अधिकारसूत्रें हातीं घेऊन तावडतोब फासापालाविरोधकांच्या धरपकडीचें सत्र देशभर सुरू केलें; त्यामुळें ब्रह्मदेशांतल्या या राजकीय मारेकऱ्यांचा डाव हुकला.

अशा रीतीनें या घटनेचा तावडतोब घडून येण्यासारखा हा अनिष्ट परिणाम टळून, ब्रह्मी राजकारणाचें गाडें पुन्हा पूर्ववत् चालू झाल्यासारखें दिसलें, तरी जनतेच्या मनामध्यें वसणारी चिंता व साशंकता पूर्णपणें दूर होऊं शकली नाहीं.

ऑंग सानच्या मार्गदर्शनाखालीं ब्रह्मदेशांत नवें राष्ट्रीय नेतृत्व उदयास आल्यामुळें ब्रह्मदेशाच्या स्वातंत्र्यलढ्याला नवें तेज चढलें; प्रबल संघटित

शक्ति व आदर्श राष्ट्रीय ऐक्य निर्माण झालें, आणि ब्रह्मी राष्ट्रीय शक्तीच्या या प्रभावामुळें ब्रिटिश साम्राज्यशाहीस ब्रह्मी राष्ट्रवाद्यांशीं जुळतें घेण्याचें घेण्याचें धोरण स्वीकारणें भाग पडलें. परंतु पानिपतावर मराठ्यांची कर्त्या पुरुषांची एक पिढी कामास आल्यामुळें मराठी सत्तेवर झाला तसा दूरगामी परिणाम या दुर्दैवी घटनेनें ब्रह्मी राष्ट्रीय शक्तीवर केल्याचें स्पष्टच होतें. कारण थकीन नू यांच्या खेरीजचे फासापालाच्या पहिल्या श्रेणीचे नेते मारेकऱ्यांच्या सुरीस एकदमच बळी पडले होते. या संधीचा फायदा उठवून सत्तात्यागाच्या बाबतींत चालढकल करण्याची किंवा आणखी भानगडी निर्माण करण्याची कुटिल नीति तर ब्रिटिश सरकार स्वीकारणार नाहीं ना ? अशी शंका प्रत्येक सुजाण ब्रह्मी नागरिकाला भेडावूं लागली. दुसरें महायुद्ध संपल्यानंतर आशियांत उसळलेल्या स्वातंत्र्याकांक्षेच्या गगनचुंबी लाटेपुढें लव्हाळ्याप्रमाणें नमतें घेणाऱ्या साम्राज्यवाद्यांनीं ती लाट कालगतीनें ओसरत चाललेली बघताच पुनः ताठर होऊन जुनीं साम्राज्यवादी पावलें टाकण्यास प्रारंभ केल्याचें इंडोनेशियन प्रजासत्ताकावर डचांनीं त्याच वेळीं केलेल्या आक्रमणावरून दिसूं लागलें होतें. ऑंग सान प्रभृति नेत्यांच्या मृत्यूमुळें ब्रह्मी राष्ट्रीय आंदोलनाची शक्ति कमी झालेली असल्यामुळें ब्रिटिश साम्राज्यवादी ब्रह्मदेशांतही असे डावपेंच नव्यानें खेळूं लागणें अशक्य नाहीं, असें ब्रह्मी जनतेस साहजिकच वाटूं लागलें. ब्रह्मी राष्ट्रीय नेत्यांचे खून होण्यापूर्वीं ब्रह्मी सैन्याच्या ऑर्डनन्स डेपोमधून कांहीं शस्त्रास्त्रें तोतये-गिरीच्या मार्गानें नेण्यांत आल्याचें, त्याचप्रमाणें मोठ्या प्रमाणावर चोरीसही गेल्याचें वृत्त प्रसिद्ध झालेलें होतें. ही पुढाऱ्यांच्या खुनांची घटना घडल्या-नंतर ब्रह्मी सरकारनें फासापालाच्या विरोधकांच्या घरांच्या झडत्या घेतल्या तेव्हां कांहींच्या घरीं ऑर्डनन्स डेपोमधून लांबविण्यांत आलेलीं शस्त्रास्त्रें सांपडलीं, त्यामुळें तर ब्रिटिशांच्या हेतूविषयीं जनतेच्या मनांत वसत असलेला संशय दुणावला.

या परिस्थितीमधील ब्रह्मी जनतेच्या मनःस्थितीचा फायदा घेऊन ब्रह्मी जनता व फासापालाचे सर्वसाधारण कार्यकर्ते यांच्या मनांत पुन्हा प्रादुर्भूत होऊं लागलेल्या ब्रिटिशविरोधी भावना चेतविण्याच्या उद्देशानें या घटनेच्या

बुडाशीं ब्रिटिश साम्राज्यवादी व त्यांचे ब्रह्मी हस्तक आहेत, असा पद्धतशीर प्रचार करण्यास ब्रह्मदेशाच्या साम्यवादी पक्षानें तावडतोब प्रारंभ केला. खास जाहिरनामा प्रसिद्ध करून आपले खरे शत्रु कोण आहेत, हें ओळखून त्यांचें पारिपत्य करण्याकरितां बद्धपरिकर होण्यासाठीं त्या पक्षानें ब्रह्मी जनतेस आवाहन केलें ब्रह्मी साम्यवादी पक्षानें या जाहिरनाम्यांत असें म्हटलें होतें कीं, " ब्रिटिश नोकरशाही व तिचे भाडोत्री हस्तक हे आपले खरेखुरे शत्रु असून, त्यांच्या पाताळयंत्री कारवायामुळेंच आपण ऑँग सान-प्रभृति देशभक्तांना आंचवलों आहोंत, हें ब्रह्मी जनतेनें ओळखलें पाहिजे. हे देशभक्त ब्रह्मी जनतेचें मार्गदर्शन करीत अ हेत, तोंपर्यंत ब्रह्मदेशावरील आपली मगरमिठी अबाधित राखण्याची आपली आशा फलद्रूप होणें अशक्य आहे याची त्यांना पूर्ण जाणीव होती, हें उघड दिसतें. "

" आपल्या खऱ्या शत्रूंचा निःपात करण्यासाठीं " एकजूट होण्याचा आदेशही या जाहीरनाम्यामधून साम्यवादी पक्षानें ब्रह्मी जनतेस दिला.

ऊ सॉ हा राक्षसी महत्त्वाकांक्षी व पाताळयंत्री म्हणून कुप्रसिद्ध असलेला, युद्धपूर्वकाळीं ब्रह्मी राजकारणात वर्चस्व गाजविलेला माजी राजकीय " पुढारी " व त्याच्या म्योचित पक्षामधील त्याचे अनुयायी, हेच या कारस्थानाचे सूत्रधार असावेत, असा सर्वसाधारण समज होता. अर्थातच ऑँग सान प्रभृतींच्या खुनानंतर झालेल्या धरपकडींत त्यांची कारागृहांत रवानगी करण्यात आली. युद्धपूर्वकाळीं व नंतर जपान्यांच्या अमलात गाजलेले बा मॉ यांचेंहि या कृत्यांत अंग असावें, असा संशय नसला, तरी ब्रह्मी जनतेच्या क्षोभास ते बळी पडूं नयेत, म्हणून त्यांनाहि सरकारनें सुरक्षिततेसाठीं स्थानबद्ध करून ठेवलें होतें. ब्रह्मी कम्युनिस्ट पक्षाचें या कृत्यांत अंग असल्याचा संशय कोणासच नव्हता, कारण त्या पक्षानें फासापालाशीं पुन्हा एकजूट करण्यासाठीं वाटाघाटी चालविल्या असून, हे खून झाले, तेव्हां त्या यशस्वी होण्याच्या बेतांत होत्या. फासापालामधून अर्धचंद्र मिळाल्यानंतर हा पक्ष फासापालामागील जनतेचा पाठिंबा नाहींसा करण्याचा विडा उचलून ब्रह्मी राजकीय समरांगणात उतरला होता. परंतु अखेर फासापालाशीं उघड विरोध मांडल्यास आपला प्रभाव पडणार नाहीं,

हें ओळखून " फासापाला कम्युनिस्ट एकी "चा नवा सूर ब्रह्मी साम्यवाद्यांनीं लावला ! कम्युनिस्ट-फासापाला एकजूट पुन्हा प्रस्थापित करून ब्रिटिश साम्राज्यशाहीविरुद्ध अंतिम लढा देण्याची तयारी करण्याकरतां प्रभावी प्रचार करून फासापालाच्या सर्वसाधारण कार्यकर्त्यांना अनुकूल बनवावयाचें, व अखेर सर्व फासापालाचेंच मतपरिवर्तन करावयाचें, अशी नवी नीति ब्रह्मी साम्यवादी पक्षानें तेव्हां नुकतीच स्वीकारलेली होती. ब्रह्मी राष्ट्रीय नेत्यांच्या वधानें प्रक्षुब्ध झालेल्या वातावरणाचा फायदा घेऊन हें फासापालाचें " मतपरिवर्तन " घडवून आणावयाचें आणि त्या संघटनेमध्यें आपलें वर्चस्व प्रस्थापित करून ब्रह्मी राष्ट्रीय लढा व राष्ट्रीय राजकारण आपल्या नियंत्रणाखालीं आणावयाचें, या हेतूनेंच ब्रह्मी साम्यवादी पक्षानें ही प्रचारमोहीम सुरू केली होती, व त्याच दिशेनें आपलीं पावलें टाकण्यास प्रारंभ केला होता. ऑंग सान प्रभृतींच्या वधानंतर ब्रह्मी समाजवादी पक्षाचे चिटणीस थकीन थान तून व ब्रह्मी घटना-परिषदेमधील त्या पक्षाचे नेते थीन पी हे उभयतां फासापालाच्या कार्यालयांत गेले, आणि फासापालाच्या पुढाऱ्यांस समक्ष भेटून आपणही त्यांच्या दुःखांत सहभागी असल्याचें निवेदन केलें; आणि फासापाला-कम्युनिस्ट एकी प्रस्थापित करण्याविषयींचीं बोलणीं त्यांनीं पुन्हा सुरू केलीं.

ऑंग सान प्रभृतींच्या खुनाच्या कटाशीं ब्रह्मी लष्कराचा प्रत्यक्षाप्रत्यक्ष संबंध असल्याच्या ब्रह्मदेशांत पसरलेल्या अफवा निराधार असल्याचें बर्मा कमांड, हेड क्वार्टर्सचे जनरल ऑफिसर-कमांडिंग यांनीं पत्रक काढून जाहीर केलें. " ज्या घटनांचें ब्रह्मदेशाच्या माजी मंत्र्यांच्या खुनांत पर्यवसान झालें, त्यांच्याशीं ब्रह्मी लष्कराचा संबंध असल्याचें जनतेंत व वृत्तपत्रांतहि सूचित करण्यात येत असलेलें बघून अत्यंत खेद वाटतो." असें जी. ओ. सी. नीं आपल्या पत्रकांत म्हटलें, व " सुसज्ज आणि तरबेज लष्कर ब्रह्मी सरकार व त्याचे दिवंगत नेते ऑंग सान यांच्या दिमतीस देऊन त्यांच्या कार्यांत साह्य करणें, हेंच बर्मा कमांडचें अविचल धोरण होतें." असा निर्वाळा दिला.

आपण पोलीस अधिकारी असल्याची बतावणी करून कांहीं व्यक्तींनीं बनावट कागदपत्रांच्या साह्यानें दोन ऑर्डनन्स डेपोंमधून शस्त्रें मिळविलीं, हें जी. ओ. सी.नीं आपल्या पत्रकांत खेदपूर्वक मान्य केलें, परंतु त्याकडे लष्करी अधिकाऱ्यांनीं जाणून बुजून दुर्लक्ष केलें असा जो प्रवाद प्रचलित होता, त्याचा इन्कार केला. त्याचप्रमाणें डेपोंमधून शस्त्रास्त्रांच्या झालेल्या चोरीच्या प्रकरणाची कसून चौकशी करण्यासाठीं लष्करी कोर्ट स्थापन करण्यांत आलीं असून, या बाबतींत लष्करांतील कोणी अधिकारी दोषी असल्याचें या चौकशींत सिद्ध झाल्यास त्यांच्याविरुद्ध जास्तींत जास्त कडक उपाय योजण्यांत येतील, असें आश्वासन ब्रह्मी लष्कराच्या या मुख्याधिकाऱ्यानें आपल्या पत्रकांत दिलें, व दरम्यान ज्या डेपोंमधून शस्त्रें लांबविलीं गेलीं त्यांच्या अधिकाऱ्यांना आपल्या अधिकारापासून तात्पुरतें दूर करण्यांत आलें असल्याचेंहि जाहीर केलें.

"बर्मा कमांडचे जनरल ऑफिसर कमांडिंग यांनीं पंत-प्रधान थकीन नु यांची मुद्दाम भेट घेतली, आणि आपण आपलें लष्कर सरकारशीं त्यांच्यापुढील बिकट कार्यात सर्व प्रकारें हार्दिक सहकार्य देऊं असें आश्वासन दिलें," असें त्या पत्रकांत शेवटीं निवेदन करण्यांत आलें होतें.

ब्रह्मी सरकारनेंहि पत्रक काढून असें जाहीर केलें, कीं ब्रिटिश सरकार व ब्रह्मदेशाचे ब्रिटिश गव्हर्नर यांचा या खुनाशीं संबंध लावणाऱ्या अफवा निराधार आहेत; या उलट ब्रिटिश सरकार, ब्रह्मदेशाचे गव्हर्नर व ब्रह्मी सरकार यांचें पूर्ण मतैक्य असून, या भीषण कृत्यास जबाबदार असलेले गुन्हेगार त्वरित हुडकून काढून त्यांना शासन करण्याच्या कामांतहि त्यांचें पूर्ण सहकार्य आहे.

ब्रिटिश सरकारनेंही आपला या खुनांशीं कांहीं संबंध नाहीं, किंवा त्या घटनेचें निमित्त करून सत्तात्यागाच्या बाबतींत चालढकल करण्याचाही आपला मनोदय नाहीं, येवढेंच जाहीर करून न थांबतां, थकीन नूंच्या शिष्टमंडळाबरोबर केलेला करार दिनांक २३ जुलै रोजीं जाहीर केला; त्यास अनुसरून ब्रह्मी मध्यंतर सरकारचें कामचलाऊ मंत्रिमंडळांत रूपांतर करण्यांत आलें; घटना-परिषदेंत मान्य होणाऱ्या घटनेनुसार सत्तात्याग

करण्यासाठीं अवश्य तो कायदा ब्रिटिश पार्लमेंटमध्यें मंजूर करून घेण्यांत येईल, आणि संरक्षण, आर्थिक बाबी व इतर प्रश्नांविषयीं करारमदार करण्यासाठीं या ॲटली-नू करारांत नमूद केल्याप्रमाणें शिष्टमंडळेंही त्वरित रवाना करण्यांत येतील, असें आश्वासन दिलें. त्यामुळें ब्रिटिश सरकारच्या हेतूंविषयीं ब्रह्मी जनतेच्या मनांत निर्माण झालेल्या शंकांमुळें आणि ब्रह्मी नेत्यांच्या खुनाशीं त्यांचा संबंध जोडणाऱ्या अफवांमुळें, गढूळ झालेलें ब्रह्मदेशामधील राजकीय वातावरण फारसा कालावधि लाटण्यापूर्वींच पुष्कळशा प्रमाणांत निवळलें.

ब्रिटिश पार्लमेंटमध्यें दिनांक ३० जुलैला ब्रिटिश पंत प्रधान क्लेमंट ॲटली यांनींही असे उद्गार काढले कीं, “ थकीन नू यांच्या नेतृत्वाखालीं ताबडतोब तात्पुरतें मंत्रिमंडळ बनविण्यांत आले, यामुळें ब्रह्मदेशामधील परिस्थिति निवळली आहे. ”

ब्रह्मी नेत्यांच्या खुनाशीं ब्रिटिश सरकारचा संबंध असल्याच्या अफवा ब्रह्मदेशामधील कांहीं गट ती भीषण घटना घडल्यापासून पसरवीत होते, याचाही ॲटलींनीं उल्लेख केला, आणि त्याबाबतींत ब्रह्मी सरकारनें काढलेल्या पत्रकाचा निर्देश करून, त्यांचा स्पष्ट शब्दांत इन्कार केला.

ब्रह्मदेशाचे नवे पंतप्रधान व त्यांचें मंत्रिमंडळ यांना ब्रह्मदेशांतील बहुसंख्य जनतेचा जोरदार पाठिंबा आहे, यांत यत्किंचितही संशय नाहीं, असे उद्गारही ॲटलींनीं आपल्या भाषणांत काढले आणि आपली व ब्रिटिश पार्लमेंटची थकीन नू आणि त्यांचें मंत्रिमंडळ यांविषयींची सद्भावना व सहानुभूति व्यक्त केली.

सेनापति ऑंग सान प्रभृति ब्रह्मी नेत्यांचे खून झाल्यानंतरची ब्रह्मदेशामधील परिस्थिति इतकी नाजुक व स्फोटक झाली होती कीं, ब्रिटिश-सरकारनें सत्तात्यागाच्या बाबतींत यत्किंचितही चालढकल केली असती, तर ब्रह्मदेशांत बंडाळीचा डोंब उसळला असता, आणि ब्रह्मी राजकारणाची दिशाच पूर्णपणें बदलली असती. त्या भीषण घटनेच्या बुडाशीं ब्रिटिश साम्राज्यवादी व त्यांचे ब्रह्मी हस्तक आहेत, असा जोरदार प्रचार करून, ब्रह्मी जनतेंत ब्रिटिशविरोधी भावना चेतविण्याची पद्धतशीर मोहीम ब्रह्मी साम्यवादी

पक्षानें चालविलीच होती. ब्रिटिश सरकारनें चालढकलीचें धोरण स्वीकारलें असतें, तर त्यामुळें या आगींत तेलच ओतलें गेलें असतें, ब्रह्मी साम्यवाद्यांना फासापालामध्यें पुन्हा प्रवेश मिळवणें त्यामुळें सुलभ झालें असतें, आणि अखेरीस फासापाला, ब्रह्मी राष्ट्रीय आंदोलन व शेवटीं ब्रह्मदेशच साम्यवाद्यांच्या पूर्ण आहारीं गेला असता. आग्नेय आशियाच्या संरक्षणाच्या दृष्टीनें ब्रह्मदेशास असलेल्या महत्त्वाची ब्रिटिशांनाही पूर्ण जाणीव आहेच. त्यामुळें ब्रह्मदेश साम्यवादी पक्षाच्या वर्चस्वाखालीं जाण्याचा धोका ते पत्करतील, हें संभवनीयच नव्हतें. ब्रह्मी नेत्यांचे खून झाल्यानंतर अल्प कालावधींतच प्रत्यक्ष कृतीनें आपल्या हेतूविषयींचा निर्वाळा देण्याची तत्परता दाखवितांना हाच विचार ब्रिटिश सरकारपुढेंही प्रामुख्यानें असला पाहिजे. त्यावेळचे ब्रिटिश सरकारचे ब्रह्मदेश-मंत्रि लॉर्ड लिस्टोवेल यांनीं या घटनेनंतर केलेल्या ब्रह्मदेशच्या दौऱ्यावरून परत गेल्यावर लंडनला पत्रकार-परिषदेपुढें केलेल्या निवेदनांतही युद्धपूर्वकाळांतील " उजव्या " राजकीय पुढाऱ्यांचें धोरण, आणि दुसऱ्या टोकाची ब्रह्मी साम्यवादी पक्षाची नीति, या दोहोंचा " सुवर्ण-मध्य " साधणारी नीति ब्रह्मी राष्ट्रीय नेत्यांनीं स्वीकारली, याबद्दल ब्रह्मी नेत्यांची प्रशंसा केली, ती या दृष्टीनें मोठी सूचक असून, ब्रिटिश नीति-विषयींच्या या कयासाला तिच्यामुळें दुजोराच मिळतो. तें कांहींही असलें, तरी ब्रिटिश सरकारनें ॲटली-नू योजना ऑंग सानप्रभृतीच्या खुनांनंतर तडकाफडकी अमलांत आणून ब्रह्मदेशांत भडकूं घातलेला आग-डोंब टाळला आणि ब्रह्मी राष्ट्रीय राजकारणाचा गाडा ऑंग साननें निश्चित केलेल्या दिशेनें पुढें नेणें नवे नेते थकीन नू यांना शक्य केलें, यांत शंका नाहीं.

● ● ●

# नव्या ब्रह्मदेशाचा शिल्पकार—सेनापति ऑंग सान : ८ :

ब्रह्मी स्वातंत्र्याचा प्रश्न सामोपचारानें सोडविण्यासाठीं परस्परसंमत योजना आंखण्याकरतां वाटाघाटींसाठीं ब्रिटिश पंतप्रधानांच्या निमंत्रणावरून लंडनला जात असता सेनापति ऑंग सान दिल्लीस आले होते. भारताच्या राजधानीमधील मुक्कामांत ऑंग साननीं पत्रकारांना मुलाखत देऊन आपलें ध्येयधोरण विशद करून सांगितलें. त्या पत्रकार-परिषदेमध्यें झालेल्या प्रश्नोत्तरांच्या वेळीं, " आपली आगामी शिष्टाई सफल न झाल्यास ब्रह्मदेशाच्या स्वातंत्र्यासाठीं आपण जो लढा पुकाराल, तो हिंसात्मक असेल, कीं अहिंसात्मक ? " असा प्रश्न एका पत्रकारानें त्यांना विचारला असतां चटकन् ऑंग साननीं उत्तर दिलें : " आमचा स्वातंत्र्यलढा चालवितांना हिंसा-अहिंसा यांसारखे विधिनिषेध आम्हीं मानीत नाहीं. " सेनापति ऑंग सान यांचें जीवन व कार्य यांचें, तें उत्तर हें सूत्रबद्ध रहस्यच म्हणतां येईल. हें सूत्र लक्षांत घेतलें असतां ऑंग साननें ब्रह्मदेशाच्या राजकीय क्षेत्रांत पदार्पण केल्यापासून, ब्रह्मी स्वातंत्र्यलढ्याचें नेतृत्व स्वीकारून तो चालवितांना आलेल्या हुतात्म्याच्या मृत्यूपर्यंत वेळोवेळीं स्वीकारलेली नीति व टाकलेलीं पावलें यांचा अचूक अन्वयार्थ लावतां येतो.

उत्तर ब्रह्मदेशामधील मागवे जिल्ह्यांतल्या नतमाच या गांवीं १९१५ मधील तीन फेब्रुवारीस ऑंग सानचा जन्म झाला. ऑंग सानचें माध्यमिक व दुय्यम शिक्षण येनांग यांग येथील नॅशनल हायस्कूलमध्यें झालें. हायस्कूलमध्यें शिकत असतां ऑंग सानची गणना हुषार विद्यार्थ्यांत होत असे. ' मिडल स्कूल ' परीक्षेंत त्यांस ' ऊ श्वे गो ' पारितोषिक मिळालें होतें. नंतर विश्वविद्यालयाच्या प्रवेशपरीक्षेंत ऑंग साननें दोन विषयांत ' डिस्टिंक्शन ' मिळवलें.

१९३२ मध्यें विश्वविद्यालयाची प्रवेशपरीक्षा उत्तीर्ण होऊन ऑंग सान रंगूनच्या युनिव्हर्सिटी कॉलेजमध्यें दाखल झाला, तेव्हां ब्रह्मी विद्यार्थिविश्वांत स्वातंत्र्य व समाजवाद याविषयींच्या नवविचारांचे वारे वाहूं लागले असून, ब्रह्मदेशामधील विद्यार्थी व तरुण त्यांनीं जणुं भारले गेलेले होते.

या काळांत हिंदुस्थानांतल्या स्वातंत्र्यलढ्याला विशेषच तेज चढलें होतें, व त्याचे पडसाद ब्रह्मी जनतेच्या अंतःकरणांत उमटत होते. त्यांतल्या त्यांत पं. जवाहरलाल नेहरू यांनीं संपूर्ण स्वातंत्र्य व समाजवाद यांचा हिंदी तरुणांत प्रभावी प्रचार केल्यामुळें हिंदुस्थानांत फोफावलेली युवक चळवळ व सर्व हिंदी स्वातंत्र्यलढ्यालाच मिळालेली अभिनव कलाटणी यांनीं ब्रह्मदेशांतील विद्यार्थी व तरुण यांच्या अंतःकरणांत नवविचारांचें वादळ उठविलें. पं. नेहरूंनीं हिंदी स्वातंत्र्यलढ्यास लाविलेल्या नव्या दिशेनें आपल्या राष्ट्राचा स्वातंत्र्यलढा चालवावा, अशी आकांक्षा ब्रह्मी तरुणांच्या अंतःकरणांत प्रादुर्भूत झाली. देशांत सर्वत्र विद्यार्थि-संघटना जन्मास आल्या, विद्यार्थ्यांचे संप व निदर्शनें या ब्रह्मदेशांत दररोजच्याच गोष्टी होऊन बसल्या, आणि या नवजागृत विद्यार्थ्यांनीं स्वातंत्र्याचा संदेश ब्रह्मी शेतकरी व मजूर यांच्यांत पोंचवून बहुजनसमाजांतही ·जागृति व संघटना करण्यास प्रारंभ केला.

युनिव्हर्सिटी कॉलेजांत दाखल झाल्यावर ऑंग साननें या आंदोलनांत मन घालण्यास प्रारंभ केला व विद्यार्थि-संघटनेंत त्यानें प्रत्यक्ष भाग घेण्यास सुरुवात केल्याबरोबर ऑंग सानच्या अंगीं वसणाऱ्या असामान्य संघटना-कौशल्याचा आविष्कार होऊं लागला. लौकरच कॉलेजच्या विद्यार्थि-संघाचें मुखपत्र असलेल्या 'ओ वे' या नियतकालिकाच्या संपादकपदावर ऑंग सानची नेमणूक करण्यांत आली व कॉलेजच्या नियामकमंडळावर संघाचा प्रतिनिधि म्हणून त्यासच निवडून पाठविण्यांत आलें. हळू हळू ऑंग सानची कीर्ति पसरूं लागून ब्रह्मी विद्यार्थी-आंदोलनाचें नेतृत्वच त्याच्याकडे आलें. १९३७ मध्यें रंगून विश्वविद्यालयांतील विद्यार्थ्यांचा संघ व अखिल ब्रह्मदेश विद्यार्थी संघ या दोन्ही संस्थांच्या अध्यक्षपदीं ऑंग सानची निवड झाली. या आंदोलनांत ऑंग सान, ऊ नू (आजचे थकीन नू) व एम्. ए. रशीद ही नेतृत्रयी उदयास आली, आणि ऑंग सान हा ब्रह्मी युवकांचा लाडका पुढारी बनला. या आंदोलनांत ऑंग सानला सोळा दिवस स्थानबद्ध करून ठेवण्यांत आलें होतें.

१९३७ मध्यें पदवी परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर वकील होण्याच्या

उद्देशानें आँग साननें कायद्याचा अभ्यास करण्यास प्रारंभ केला. पण ब्रह्मदेशांतील राजकारणास उत्तरोत्तर अधिकाधिक रंग येऊं लागल्यामुळें, त्यांत रंगून गेलेल्या आँग सानला तो अभ्यासक्रम पुरा करणें शक्य झालें नाहीं. पुढील वर्षी ( १९३८ मध्यें ) ब्रह्मी स्वातंत्र्यासाठीं संघटित लढा देणाऱ्या थकीन ( डोबामा आसिअयोन ) पक्षांत आँग सान सामील झाला, व त्याच्या अंगच्या संघटनाकौशल्याची जाणीव असलेल्या थकीनांनीं आपल्या पक्षाच्या कार्यवाहाच्या पदावर त्याची नेमणूक केली. याच वेळीं थकीनांपैकीं एका गटानें हिंदुस्थानांतील साम्यवाद्यांशीं विचारविनियम करून ब्रह्मी साम्यवादी पक्षाची स्थापना केली. ब्रह्मदेशाच्या साम्यवादी पक्षाच्या या संस्थापकांत आँग सान प्रमुख होते.

दुसरें महायुद्ध सुरू होतांच ब्रह्मी स्वातंत्र्यवाद्यांनीं आपला झगडा अधिकच तीव्र केला. हिंदी स्वातंत्र्य-लढ्यांत होणाऱ्या घडामोडी नजरेपुढें ठेवूनच ब्रह्मी पुढारीही आपलीं पावलें टाकीत होते, हें त्यांनीं युद्धासंबंधीं स्वीकारलेली भूमिका व केलेल्या मागण्या यांवरून सिद्ध होतें. डॉ. बा मा यांनीं नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या फॉर्वर्ड ब्लॉकच्या धर्तीवर स्थापन केलेल्या फ्रीडम ब्लॉकच्या कार्यवाहाच्या पदावरही आँग सानचीच नेमणूक करण्यांत आली होती.

रामगडला १९४० मध्यें झालेल्या हिंदी राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनाला ब्रह्मी पुढाऱ्यांचें शिष्टमंडळ हजर राहिलें होतें. या शिष्टमंडळांत आँग सान होता. आपल्या रामगड येथील मुक्कामांत आँग साननें म. गांधी व पं. जवाहरलाल नेहरू यांची भेट घेऊन त्यांच्याशीं चर्चाही केली होती.

ब्रह्मदेशामधील युद्धारंभींची स्थिति हिंदुस्थानपेक्षां निराळी होती. जुन्या, मवाळ पुढाऱ्यांचें ब्रिटिश सरकारकडून ब्रह्मी स्वातंत्र्यासंबंधीं स्पष्ट अभिवचन मिळविण्याचे प्रयत्न फोल ठरले होते; तर जहाल थकीन चळवळीची सरकारी दडपशाहीमुळें वाताहत झाली होती. या परिस्थितींत स्वातंत्र्य संपादन करण्यासाठीं कसें पाऊल टाकावें हा बिकट प्रश्न ब्रह्मी स्वातंत्र्यवाद्यांपुढें उभा होता. थकीन चळवळींतल्या कार्यकर्त्यात व ब्रह्मी साम्यवादी पक्षांतही या प्रश्नावर मतभेद झाले. आपल्या सामर्थ्याच्या जोरावर ब्रह्मदेशाचें स्वातंत्र्य

हस्तगत करण्याइतकी ब्रह्मी स्वातंत्र्याची चळवळ प्रबल नसल्यामुळें एकाद्या प्रबल परकी सत्तेच्या साह्यावांचून तें साध्य करणें शक्य नाहीं; आणि असें साह्य जपानकडूनच मिळणें शक्य असल्यामुळें, त्या दिशेनें प्रयत्न करावेत, अशा मताचा हा प्रबल गट थकीनांमध्यें व साम्यवाद्यांमध्यें निर्माण झाला. या गटाचें नेतृत्व ऑंग सानकडे होतें. दुसरा गट आपल्या मूळच्या भूमिकेसच चिकटून राहिला.

रामगडहून परत आल्यानंतर एक महिन्यानें ऑंग सानला पकडण्या-साठीं ब्रह्मी सरकारनें वॉरंट काढलें असतां, तें चुकवून ऑंग सान ब्रह्मदेशांतून निसटला, व चीनमार्गें जपानांत गेला. आपल्या इतर सहकाऱ्यांशीं मतभेद झाल्यानंतर ऑंग साननें ब्रह्मी साम्यवादी पक्षांतून फुटून निघून जपानच्या साह्यानें ब्रह्मदेश स्वतंत्र करण्यासाठीं प्रयत्न कर-ण्याच्या उद्देशानें कार्य करण्यासाठीं आपणाशीं सहमत असणाऱ्या इतर सहकाऱ्यांच्या सहकार्यानें "क्रांतिवादी गट" स्थापन केला. आणि हा उद्देश सिद्धीस नेण्यासाठीं प्रयत्न करण्याच्या उद्देशानेंच आपल्या निवडक सहकाऱ्यांसह ऑंग सान जपानला गेला. जपानचे पंतप्रधान टोजो यांच्याशीं वाटाघाटी करून ब्रह्मी स्वातंत्र्याच्या मान्यतेच्या भूमिकेवरून त्यांच्याशीं सहकार्याचा करारही केला. जपानी लष्करी विद्यालयांत ऑंग सान व त्याचे चाळीस सहकारी यांनीं लष्करी शिक्षण मिळविलें. जपानी सरकारनें ऑंग सानला "रायझिंग सन"च्या तिसऱ्या श्रेणीचा दर्जा (ऑर्डर ऑफ दि रायझिंग सन—थर्डक्लास) देऊन त्याचा बहुमानही केला. जपानी सरकारच्या मदतीनें ऑंग साननें आझाद ब्रह्मदेश सेना उभी केली व १९४२ मध्यें ऑंग सानच्या नेतृत्वाखालीं ब्रह्मदेश स्वतंत्र करण्याच्या उद्देशानें जपानी सेनेबरोबर ही सेना ब्रह्मदेशावर चालून गेली. त्यापूर्वी १९४१ मध्यें ऑंग सान गुप्त रीतीनें जपानमधून ब्रह्मदेशांत गेला, आणि आपल्या सहकाऱ्यांशीं विचारविनिमय करून आपली सेना चालून येतांच त्यांनीं करावयाच्या कामगिरीची योजना त्यानें आंखली. त्यावेळीं खुद्द रंगूनमध्यें ऑंग सान सबंध आठवडाभर होता, परंतु पोलिसांना त्याचा किंवा त्यानें केलेल्या या महत्त्वाच्या हालचालींचा थांगपत्ताही लागला नाहीं!

[stamp]

ब्रिटिशांची ब्रह्मदेशामधून हकालपट्टी केल्यानंतर जपान्यांनी स्थापन केलेल्या स्वतंत्र ब्रह्मी सरकारमध्यें ऑंग सान संरक्षण-मंत्रि असून ब्रह्मी सेनेच्या सेनापतीचें पदही त्याच्याकडेच होतें. या स्वतंत्र ब्रह्मी सरकारचे डॉ. बा मा हे पंतप्रधान होते.

जपान्यांनीं दिलेलें "स्वातंत्र्य" बेगडी स्वरूपाचें असून, आपणांस दिलेल्या वचनांना हरताळ फांसून त्यांनीं खरीखुरी सत्ता आपल्या (जपान्यांच्या) हातींच ठेवलेली आहे, हें पाहिल्यावर ऑंग सान व त्याचे सहकारी यांचा भ्रमनिरास झाला. परंतु जपान्यांनीं वचनभंग केल्यामुळें निर्माण झालेल्या परिस्थितीमुळें गांगरून न जातां जपान्यांवर मात करण्यासाठीं त्यांनीं हालचालीस प्रारंभ केला. ब्रिटिश व अमेरिकन सेनाधिकाऱ्यांशीं बोलणीं करून त्यांच्या सहकार्यानें जपान्यांच्या उच्चाटणाची महत्त्वाकांक्षी योजना ऑंग साननें आंखली. दोस्त राष्ट्रांच्या सेनेनें ब्रह्मदेशावर हल्ला करतांक्षणींच ब्रह्मदेशांत बंडाळीचा डोंब उसळविण्याची कडेकोट तयारी केली. त्यासाठीं अवश्य ती संघटना करण्याकरतां अँटी फॅसिस्ट पीपल्स फ्रीडमलीग या गुप्त संस्थेची स्थापना करून तिचें जाळें देशभर विणलें. आपल्या हाताखालच्या जपान्यांच्या साह्यानें उभारलेल्या सैनिकांना त्या दृष्टीनें शिक्षण देऊन तयार केलें; ब्रिटिश व अमेरिकन सैन्याधिकाऱ्यांकडून शस्त्रास्त्रें मिळविलीं. आणि हें सर्व केलें जपान्यांनीं स्थापन केलेल्या बेगडी स्वतंत्र ब्रह्मी सरकारमधील संरक्षणमंत्रि व सरसेनापति या अधिकारपदावर राहून!

१९४५ च्या २७ मार्चला रंगून येथील सुविख्यात श्वेडेगॉन पॅगोडाच्या पायथ्याशीं ऑंग साननें आपल्या सैन्याचा मेळावा भरविला, व दुसऱ्या दिवशीं सकाळीं तें सारें सैन्य जपान्यांविरुद्ध गनिमी काव्याचें युद्ध चालविण्यासाठीं ब्रह्मदेशाच्या प्रसिद्ध जंगलांत अदृश्य झालें. पण हा सर्व प्रकार इतका उघड झाला, कीं जपानी गुप्त पोलिसांना त्यांच्या खऱ्या स्वरूपाची कल्पनाच आली नाहीं. ही एकच गोष्ट ऑंग सानच्या अंगीं वसणाऱ्या असामान्य संघटनाकौशल्याची कल्पना येण्यास पुरेशी आहे.

युद्ध संपल्यावर ऑंग साननें फासापालाची पुनर्घटना करून तिच्या

ध्वजाखालीं ब्रह्मदेशामधील स्वातंत्र्यवादी व्यक्ति व गट यांची अभेद्य एकजूट स्थापन केली आणि ब्रह्मी स्वातंत्र्य-लढा तीव्र व दुर्दमनीय बनविला. अखेर ब्रिटिश सरकारला नमतें घ्यावें लागून ऑंग सानला १९४६ मध्यें कार्यकारी मंडळ बनविण्यास पाचारण करणें भाग पडलें. ब्रह्मी स्वातंत्र्य-लढ्याचें दडपण वाढतच गेल्यामुळें, पुढें ॲटलींना ऑंग सानला लंडनला वाटाघाटीसाठीं बोलवावें लागलें; त्यांतून ॲटली-ऑंग सान करार जन्मास आला आणि मध्यंतर-सरकार व घटना-परिषद यांविषयींची ब्रह्मी राष्ट्रवाद्यांची मागणी मान्य झाली.

ऑंग साननें संपादन केलें होतें इतकें ब्रह्मी जनतेचें अकृत्रिम प्रेम व इतका दृढविश्वास त्याच्यापूर्वी ब्रह्मदेशांत अन्य कोणाही पुढाऱ्यानें संपादन केला नव्हता. कोठलाच ध्येयवाद नसलेले स्वार्थपरायण पुढारी, व त्यांनीं आपल्या स्वार्थसाधनेच्या उद्देशानें स्थापन केलेले पक्ष यांचेंच प्राबल्य पूर्वी ब्रह्मदेशाच्या राजकारणांत माजलेलें होतें. ब्रह्मदेशाच्या राजकारणांतली ही अनिष्ट परंपरा मोडून टाकून स्वातंत्र्याच्या ध्येयानें भारलेली, त्या ध्येयाच्या सिद्धीसाठीं कडेकोट त्याग करण्यासाठीं व प्राणपणानें लढण्यासाठीं सदैव सज्ज असणारी तरुणांची नवी पिढीच्या पिढी निर्माण करण्याचें शककर्त्या राष्ट्रपुरुषाचें कार्य ऑंग साननें केलें.

ब्रह्मदेशाला युद्धपूर्व काळापर्यंत स्वातंत्र्यासाठीं अविरत झगडणारी राष्ट्रीय संस्था नव्हती; फासापालाची प्रबल राष्ट्रव्यापी व जनतेच्या अंतःकरणाचें अधिष्ठान असलेली व पुरोगामी ध्येय-धोरणांचा पुरस्कार करणारी नमुनेदार संघटना त्यांनीं ब्रह्मी जनतेला उपलब्ध करून दिली. जनतेची सर्व प्रकारची सेवा करणारें, अराजक व अशांतता यांच्याशीं झुंजणारें, प्रसंग पडल्यास राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठीं लढण्यास उपयोगी पडेल व स्वतंत्र ब्रह्मदेशाच्या स्वातंत्र्याचें रक्षण करण्यासाठीं भाडोत्री नव्हे, तर देशभक्तांचें राष्ट्रीय सैन्य ज्यामधून निर्माण करतां येईल, असें पोलादी शिस्तीचे पांच लक्ष ध्येयवादी तरुणांचें "पी. व्ही. ओ."सारखें आदर्श स्वयंसेवक दलही त्यांनीं उभें करून दिलें.

ब्रह्मदेशाच्या पहाडी सरहद्दीवर प्रामुख्यानें राहणाऱ्या अनेकवंशी अल्प-

संख्यांकांचा प्रश्न ब्रह्मी राष्ट्रवाद्यांपुढें होता. भेदनीतिप्रवीण ब्रिटिश राज्यकर्त्यांनीं त्यांच्यांत अलगतेची व फुटीर वृत्तीची भावना योजनापूर्वक निर्माण करून तिची प्रयत्नपूर्वक जोपासना केलेली होती. बहुसंख्य ब्रह्मी जनता व अल्पसंख्यांक जमाती यांच्यांत परस्परांविषयींचा अविश्वास व गैरसमज यांची भिंत उभी करून ब्रह्मी राष्ट्रवादी कार्यकर्ते आणि ब्रह्मी राष्ट्रीय आंदोलन यांचा संपर्कही अल्पसंख्यांकांना होणार नाहीं अशी खबरदारी डोळ्यांत तेल घालून ते अव्याहत घेत आले होते.

अखेर ब्रह्मदेश द्विखंड करून तें राष्ट्र दुर्बल करून ठेवण्याच्या योजनेचीं केवळ बीजेंच या प्रकारें पेरण्यांत आलेलीं नव्हतीं, तर चर्चिल-मंत्रिमंडळानें तशी योजनाही आंखली होती. ऑंग साननें आपल्या पुरोगामी व उदार धोरणाच्या साह्यानें बहुसंख्याकांप्रमाणेंच अल्पसंख्यांकांचाही विश्वास संपादन केला. ॲटली-ऑंग सान करारांत ब्रह्मदेशाच्या राष्ट्रीय एकतेचें तत्त्व मान्य करण्यांत आलें असलें, तरी त्या बाबतींतल्या अल्पसंख्यांकांच्या आशा-आकांक्षा काय आहेत, हें जाणून घेण्यासाठीं चौकशी समिती नेमण्याची तरतूदही त्यांत होती, व फुटीर वृत्तींना आपलें डोकें वर काढण्यास एवढें उत्तेजन पुरेसें होतें. ब्रिटिश पार्लमेंटनें नेमलेल्या या चौकशी-समितीचे अध्यक्ष म्हणून, परंतु फुटीर वृत्तींना प्रोत्साहन देण्याच्या प्रच्छन्न उद्देशानें ब्रह्मदेशांत आलेल्या कर्नल रीस-विल्यम्स यांच्या साक्षीनेंच करीनांच्या एका गटाव्यतिरिक्त सर्व अल्पसंख्यांकांनीं ऑंग सानच्या नेतृत्वाखालीं बहुसंख्य ब्रह्मी जनतेच्या हातांत हात घालून स्वातंत्र्यमंदिराच्या दिशेनें जाण्याचा निर्णय घेतला.

ऑंग सानचें अल्पसंख्यांकांविषयींचें धोरण औदार्याचें होतें, तसेंच खंबीरपणाचेंही होतें. खंबीरपणाचा अभाव म्हणजे औदार्य नव्हे, व खंबीरपणा आणि औदार्य एकत्र नांदूं शकतात, हें त्यांनीं आपल्या अल्पसंख्यांकांविषयींच्या कृतीनेंच सिद्ध करून दाखविलें.

अल्पसंख्यांकांच्या सर्व खास हक्कांचें संरक्षण करण्याची हमी देणारी तरतूद घटनेंत करण्याची खबरदारी घेऊन, अल्पसंख्यांकांना आपला सांस्कृतिक विकास करून घेण्यास संपूर्ण संधि उपलब्ध करून देण्याची खास

योजनादेखील त्यांनीं ब्रह्मी प्रजासत्ताकाच्या राज्यघटनेंत समाविष्ट केली. परंतु ज्यामुळें ब्रह्मदेशामधील मध्यवर्ती सत्ता दुबळी होईल, किंवा ब्रह्मदेशाच्या अखंडत्वाला धोका निर्माण होऊं शकेल, अशी अल्पसंख्यांकांच्या वतीनें म्हणून पुरस्कारिण्यांत आलेली कोणतीहि योजना किंवा करण्यांत आलेली कोणतीही मागणी निश्चयपूर्वक झिडकारण्याचें ठाम धोरण आँग साननें प्रथमपासूनच स्वीकारलें, व कोठल्याही परिस्थितींत या भूमिकेपासून तसूभरही मागें सरण्याचें नाकारलें. एकदां अल्पसंख्यांकांना द्यावयाच्या सवलतींची कमालमर्यादा ठरवून दिल्यानंतर त्या मर्यादेपलीकडे इंचभरही पुढें सरकावयाचें नाहीं, आणि येवढ्या उदार धोरणानंतरही असंतुष्ट राहून अशांतता माजवण्याचा प्रयत्न करणाऱ्या गटांचें पारिपत्य करावयाचें, ही एक आँग सानची अल्पसंख्यांकांविषयींची नीति होती.

ब्रह्मी घटनापरिषदेंत स्वातंत्र्याचें ध्येय उद्घोषित करणारा उद्दिष्टांविषयींचा ठराव मांडतांना आँग साननें आपल्या या नीतीची जाणीव अल्पसंख्यांकांना स्पष्ट शब्दांत करून दिली होती. “ अल्पसंख्यांकांना यापूर्वीच्या पारतंत्र्य व अज्ञान यांच्या अंधःकारामधून स्वातंत्र्याच्या प्रकाशांत आम्हीं आणून सोडीत आहोंत. या उपर पुन्हा अंधःकारांत परत जाण्याची तुम्हांपैकीं कोणाची इच्छा असेल, तर भले जा. पण त्यांत तुमचेंच अहित आहे.” असा इषारा आँग साननें त्या भाषणांत ब्रह्मी अल्पसंख्याकांना उद्देशून दिला होता. शान, कचीन, चिन व राष्ट्रवादी करीन या अल्पसंख्यांकांच्या प्रतिनिधींशीं याच भूमिकेवरून घटनासमितीच्या “ फ्रँटियर एरियाज् निगोशिएटिंग कमिटी ”चा प्रमुख म्हणून आँग साननें बोलणीं करून उभयतांना संमत अशी योजना तयार करण्यांत यश मिळविलें, व ब्रह्मदेश दुभंग करण्याचा साम्राज्यवाद्यांचा डाव सपशेल उधळून लावला.

स्वातंत्र्यमंदिराच्या दिशेनें ब्रह्मदेशाचें पाऊल कसें पुढें पडेल, या एकमेव दृष्टीनेंच आँग सान आपलीं धोरणें आंखीत असत. त्यांनीं जपान्यांशीं सहकार्य केलें, तें ब्रह्मदेशाचें स्वातंत्र्य प्राप्त करून घ्यावें म्हणून आणि जपान्यांशीं सहकार्य केल्यानें तें साध्य होत नाहीं, याची जाणीव होतांच तेंच उद्दिष्ट साध्य करण्याच्या दृष्टीनें त्यांनीं ब्रिटिशांशीं सहकार्य

करण्याचें ठरविलें. ऑंग सान जपानधार्जिणे नव्हते कीं ब्रिटिशधार्जिणे नव्हते; तर ब्रह्मदेशधार्जिणे होते.

ऑंग सान हुकुमशहा असल्याचा आरोप अनेकांनीं केला होता, परंतु तो निराधार होता. ऑंग साननें अनेक वेळां आपल्या अनुयायांच्या मतास मान देऊन आपले निर्णय बदलल्याचीं किंवा त्यांना मुरड घातल्याचीं उदाहरणें घडलीं होतीं. एकदां लोकशाही पद्धतीनें वादविवाद, चर्चा होऊन धोरण ठरलें, कार्यक्रम निश्चित झाला व त्याची अंमलबजावणी करण्याचा मार्ग ठरला, म्हणजे कोणत्याही प्रतिकूल परिस्थितीमुळें किंवा संकटामुळें विचलित न होतां निश्चयानें पुढेंच जावयाचें, हें ऑंग सानच्या कार्यपद्धतीचें वैशिष्ट्य होतें. त्यांच्या मनाची निश्चयभावी दोलायमान परिस्थिति झाली, किंवा चालतांना त्यांचीं पावलें डळमळीत, लटपटत पडलीं, असें कधींच झालें नाहीं. निश्चयाभाव, मानसिक गोंधळ व डळमळीतपणा म्हणजे लोकशाही, आणि निश्चित धोरणाप्रमाणें, निश्चित दिशेनें, विचलित न होतां निर्धारानें व विश्वासानें पुढेंच चालत जाणें म्हणजे हुकुमशाही, असें समीकरण मांडावयाचें झालें, तरच ऑंग सानची हुकुमशहांत गणना करतां येईल.

ब्रह्मी जनतेला केवळ आपलें प्रजासत्ताकच उभें करावयाचें नव्हतें, तर त्याचबरोबर युद्धामुळें उध्वस्त झालेल्या समाजजीवनाची पुनर्रचना करावयाची होती. काव्यसृष्टींतल्या फिनिक्स पक्ष्याप्रमाणें युद्धाच्या डोंबांत झालेल्या ब्रह्मी समाजजीवनाच्या रक्षेमधून नवतेजानें विनटलेला ब्रह्मदेश निर्माण करण्याचें महनीय कार्य ब्रह्मी जनतेला पार पाडावयाचें होतें, व आहे. “ युद्धानें उध्वस्त झालेल्या ब्रह्मदेशाची-घडी बसविण्यासाठीं कमींत कमी वीस वर्षें तरी ब्रह्मी जनतेला अविश्रांत परिश्रम करून, भरीव रचनात्मक कार्य करावें लागेल. ” अशी जाणीव ऑंग साननें आपल्या अखेरच्या जाहीर भाषणांत ब्रह्मी जनतेला करून दिली होती. ब्रह्मदेशांतल्या सर्व शक्तींना व गटांना एका सूत्रांत ठेवून, त्यांचें अचूक मार्गदर्शन करून, त्यांच्याकडून हें कार्य करवून घेण्यासाठीं ऑंग सानसारख्या दुर्दम्य इच्छाशक्तीच्या व पोलादी निर्धाराच्या नेत्याची ब्रह्मदेशास आवश्यकता होती.

युद्धकाळीं आशियाच्या राजकीय क्षितिजावर उदयास आलेल्या या नव्या

ताऱ्याची प्रभा प्रतिपदेच्या वर्धिष्णु चंद्रकोरीप्रमाणें दिवसेंदिवस अधिकाधिकच फांकत जात असून, मारेकऱ्याच्या सुरीला बळी पडण्याच्या वेळीं युद्धोत्तर नवजागृत आशियाच्या नेतृमालिकेंत ऑंग सानला मानाचें स्थान प्राप्त झालेलें होतें. विद्यार्थिजीवनापासून, पं. जवाहरलाल नेहरूंपासून ऑंग साननें स्फूर्ति मिळविलेली होती, व त्यांचा स्नेहही संपादन केला होता. पं. नेहरूंच्याप्रमाणेंच आशियामधील राष्ट्रांमध्यें ऐक्य व स्नेहभावना निर्माण करण्याच्या योजनेचे ऑंग सान हे पुरस्कर्ते होते.

आशियामधील दलित जनतेचें दास्यविमोचन त्वरित घडवून आणण्यासाठीं योजना आंखण्याकरतां आशियाई राष्ट्रांची "पोट्सडॅम परिषद" भरविण्याची सूचना १९४५ च्या तीस ऑक्टोबरला वृत्तप्रतिनिधींना दिलेल्या मुलाखतींत ऑंग साननीं केली होती.

"आग्नेय आशियामधील राष्ट्रांची एकजूट निर्माण करणें अत्यंत अगत्याचें आहे," असें सांगून ऑंग सान त्या मुलाखतींत म्हणाले कीं, "आशियामधील राष्ट्रें पारतंत्र्यामधून मुक्त करण्यासाठीं परस्परसहकार्यानें कार्य करण्याची योजना अशा परिषदेमध्यें तयार करतां येईल."

आपला मलायाचा दौरा संपवून पं. जवाहरलाल नेहरू हिंदुस्थानास परत येतांना त्यांना वाटेंत रंगूनला मुक्काम करावा लागला होता. त्यावेळीं पं. नेहरूंनीं आशियामधील राष्ट्रांची अशी परिषद बोलविण्यांत पुढाकार घ्यावा अशी त्यांना विनंति केली, व त्यांनीं ती मान्यही केली, असें फासापालाच्या कार्यवाहांनीं मला सांगितलें. नंतर पं. नेहरूंनीं दिल्लीस बोलाविलेल्या आशियाई राष्ट्रपरिषदेस ऑंग साननें ब्रह्मदेशाचे प्रतिनिधी पाठवून त्यांच्याशीं सहकार्य केलेंच होतें.

दुसऱ्या महायुद्धानंतर आशियाच्या युगाला प्रारंभ झाला आहे. नवजागृत आशियामध्यें क्रांतिकारक घडामोडी होत असून त्यांचे पडसाद जगभर उमटत आहेत. ऑंग साननें आशियामधील या क्रांतिकार्यांत महनीय कामगिरी केली असती. वयाच्या केवळ बत्तीसाव्याच वर्षी मारेकऱ्यांच्या सुरीला ऑंग सान बळी पडल्यामुळें ब्रह्मदेशाची तर अपरिमित हानि झालीच; परंतु सर्व आशियाखंडही एका कर्तबगार नेत्याला आंचवलें !

● ● ●

## ब्रह्मी प्रजासत्ताकाची राज्यघटना : ९ :

ऑंग साननंतर ब्रह्मदेशाच्या नेतृपदाचीं वस्त्रें स्वीकारतांच थकीन नू यांनीं ऑंग सानचें ऊर्वरित कार्य पार पाडण्यास प्रारंभ केला. ब्रह्मी जनता व फासापालाचे कार्यकर्ते यांनींही अभिनंदनीय संयम, नीतिधैर्य व शिस्त राखून थकीन नूंचें कार्य सुकर केलें. घटना-परिषदेचे अध्यक्ष थकीन नू हे ब्रह्म-देशाचे पंतप्रधान झाल्यामुळें घटना-षरिषदेनें त्यांच्या जागीं यांघवे संस्थानाचे सावबा साव श्वे थैक यांची निवड केली. आपल्या नेत्यांच्या वधानंतर ब्रह्मी जनतेनें दर्शविलेल्या ऐक्यभावनेचें, अल्पसंख्यांकांच्या पुढाऱ्याची घटना परिषदेच्या अध्यक्षपदीं करण्यांत आलेली ही निवडणूक, हें जणुं प्रतीकच होतें. अशा प्रकारच्या अनुकूल वातावरणांत ब्रह्मी प्रजासत्ताकाची राज्य-घटना तयार करण्याचें कार्य घटनापरिषदेस झटपट उरकतां आलें. करीनांच्या-पैकीं "करीनीस्ताना" चा पुरस्कर्ता म्हणून समजल्या जाणाऱ्या गटाचें समाधान मात्र ब्रह्मी राष्ट्रवाद्यांना करतां आलें नाहीं.

ब्रह्मदेशाच्या स्वतंत्र, सार्वभौम प्रजासत्ताकाचें "यूनियन ऑफ बर्मा" असें नामाभिधान या घटनेनें केलेलें असून पूर्वी मंत्रिमंडळाच्या अमलाखालीं असलेला प्रदेश, त्यांतून वगळण्यांत आलेला सरहद्दीवरील पहाडी प्रदेश, व तोंपर्यंत स्वायत्त असलेलीं करीनी संस्थानें या सर्वांचें या राज्यघटनेनें एकी-करण करून अखंड ब्रह्मदेशाचें प्रजासत्ताक प्रस्थापित करण्याचें ब्रह्मी राष्ट्र-वाद्यांचें स्वप्न साकार केलें आहे.

प्रजासत्ताकाचा अध्यक्ष हा प्रजासत्ताकामधील सर्वश्रेष्ठ अधिकारी असून, प्रजासत्ताकाच्या सर्व अधिकारांची अंमलबजावणी करण्याची सत्ता घटनेनें अध्यक्षांच्याच हातीं ठेविलेली आहे; प्रजासत्ताकासाठीं कायदे करण्याची सत्ता प्रजासत्ताकाच्या पार्लमेंटलाच आहे. अध्यक्ष, चेंबर ऑफ डेप्युटीज् व चेंबर ऑफ नॅशॅनॅलिटीज् या तिहींचें मिळून ब्रह्मी प्रजासत्ताकाचें पार्लमेंट बनविण्यांत आलेलें आहे.

पार्लमेंटच्या दोन्ही सभांच्या संयुक्त अधिवेशनांत गुप्त-मतदानपद्धतीनें प्रजासत्ताकाच्या अध्यक्षाची निवडणूक करण्यांत यावयाची. अध्यक्षाची

निवड पांच वर्षांसाठीं करण्याची तरतूद घटनेंत करण्यांत आलेली आहे. अर्थात्, आपल्या अधिकाराची मुदत संपण्यापूर्वीच अध्यक्षपदीं निवडून आलेला नागरिक मृत्यु पावला, अपंग झाला, किंवा त्याला अधिकारावरून दूर करण्यांत आलें, तर फेर निवडणूक करण्याची तरतूदही घटनेंत करण्यांत आलेली आहेच. त्याचप्रमाणें, त्याच व्यक्तीला लागोपाठ दोन वेळांच अध्यक्षपदीं निवडून येतां येईल, असा निर्बंधही घालून ठेवण्यांत आलेला आहे.

अध्यक्षपदीं निवडून आलेल्या नागरिकानें (१) देशद्रोही वर्तन केलें, (२) प्रजासत्ताकाच्या घटनेविरुद्ध आचरण केलें, किंवा (३) गंभीर स्वरूपाची गैरवर्तणूक केली, तर त्याच्यावर खटला भरून त्याबद्दल शासन करण्याची ( Impeachment ) तरतूददेखील घटनेंत आहे.

प्रजासत्ताकाचा अध्यक्ष पार्लमेंटच्या दोन्ही सभांपैकीं कोणत्याही सभेचा सदस्य असतां कामा नये. पार्लमेंटच्या एकाद्या सभेचा सदस्य अध्यक्ष म्हणून निवडून आल्यास, त्याचें सभासदत्व आपोआप रद्द झालें असें समजण्यांत येईल.

ब्रह्मी प्रजासत्ताकाच्या पंतप्रधानाची नेमणूक अध्यक्षानेंच करावयाची असून, पंतप्रधानाच्या सल्ल्यानें मंत्रिमंडळामधील इतर मंत्र्यांची नेमणूक करण्याचाही अधिकार अध्यक्षासच देण्यांत आलेला आहे. पंतप्रधानाच्या सल्ल्यानुरूप पार्लमेंटच्या चेंबर ऑफ डेप्युटीजचें अधिवेशन बोलावणें, संपवणें किंवा चेंबर ऑफ डेप्युटीज बरखास्त करणें हें अध्यक्षाचेंच काम राहील. पार्लमेंटच्या सभांपैकीं कोणत्याही सभेमध्यें मंजूर झालेल्या कायद्याच्या मसुद्यावर अध्यक्षाची सही झाल्यानंतरच त्याला कायद्याचें स्वरूप येईल; पार्लमेंटनें मंजूर केलेला कायदा अध्यक्षाकडूनच जारी करण्यांत येईल.

ब्रह्मी प्रजासत्ताकाचें सरकार सामुदायिकरीत्या पार्लमेंटच्या चेंबर ऑफ डेप्युटीज या सभागृहास जबाबदार रहावयाचें आहे.

ब्रह्मदेशामध्यें अठरा वर्षें वयाच्या प्रत्येक नागरिकास पार्लमेंटच्या निवडणुकींत मताधिकार असून एकवीस वर्षांच्या कोणाही नागरिकास पार्लमेंटचा सभासद होतां येईल. पार्लमेंटच्या सदस्यत्वासाठीं किंवा पार्लमेंटच्या निवडणुकींत मताधिकार प्राप्त होण्यासाठीं विशिष्ट मालमत्ता

असली पाहिजे, अशी लायकीविषयक अट लादण्यांत येणार नाहीं; त्याचप्रमाणें पार्लमेंटचें सदस्यत्व प्राप्त होण्याच्या बाबतींत किंवा पार्लमेंटच्या निवडणुकींत मताधिकार प्राप्त होण्याच्या बाबतींत नागरिकां-नागरिकांत लिंग, वंश किंवा धर्म यांसारख्या कारणांवरून पंक्तिप्रपंच करणारा, किंवा मताधिकार नाकारणारा कायदा करतां येणार नाहीं, व असा कायदा किंवा कायदे पूर्वीपासून अस्तित्वांत असतील, तर ते रद्द समजण्यांत येतील.

चेंबर ऑफ डेप्युटीज्च्या सभासदांची निवडणूक ब्रह्मदेशाच्या मतदार नागरिकांनीं करावयाची आहे; चेंबर ऑफ नॅशनॅलिटीज् हें ब्रह्मदेशांतील शान संस्थान, कचीन संस्थान, चिनांचा खास विभाग, करीनी संस्थानें, करीन व राहिलेला भाग यांमधून निवडून आलेल्या प्रतिनिधींचें असावयाचें आहे. चेंबर ऑफ डेप्युटीज्ची मुदत चार वर्षांची ठेवण्यांत आलेली असून, ही सभा बरखास्त करण्यांत येतांच, चेंबर ऑफ नॅशनॅलिटिजदेखील बरखास्त करण्यांत आलें असे समजण्यांत येईल. चेंबर ऑफ डेप्युटीजला व डेप्युटी स्पीकर असतील, तर चेंबर ऑफ नॅशनॅस्पीकर लिटीजच्या सभापति व उपसभापतींना अनुक्रमें 'अध्यक्ष' व 'उपाध्यक्ष' अशी संज्ञा राहील.

कोणताही कायद्याचा मसुदा चेंबर ऑफ डेप्युटीज् व चेंबर ऑफ नॅशनॅलिटीज् यापैकीं कोणत्याही एका सभागृहांत प्रथम मांडतां येईल, व तेथें मंजूर झाल्यानंतर दुसऱ्या सभागृहाकडे मंजुरीसाठीं पाठवितां येईल. दोन्ही सभागृहांनीं मंजूर केल्यावर त्याचें कायद्यांत रूपांतर होईल. अर्थविषयक कायद्याचा मसुदा मात्र चेंबर ऑफ डेप्युटीज्मध्येंच प्रथम मांडावा लागेल. नंतर शिफारशीसाठीं तो चेंबर ऑफ नॅशनॅलिटीज्कडे पाठविण्यांत येईल. चेंबर ऑफ नॅशनॅलिटीजनें केलेल्या शिफारसी स्वीकारण्याचा किंवा नामंजूर करण्याचा अधिकार 'चेंबर ऑफ डेप्युटीज्' या सभागृहास आहे. पण अल्पसंख्यांकांच्या हितसंबंधाविषयीचा कोणताही कायदा चेंबर ऑफ नॅशनॅलिटीज्च्या मान्यतेवांचून अमलांत येऊं शकणार नाहीं.

ब्रह्मी प्रजासत्ताकाचें घटक राज्य म्हणून शान राज्य (शान स्टेट) स्थापन करण्यांत आलें असून, त्यांत ब्रह्मी अल्पसंख्यांकापैकीं शान लोकांची

बहुसंख्य वस्ति असलेल्या फेडरेटेड शान संस्थानें व ' वा ' संस्थानें यांचा प्रदेश समाविष्ट करण्यांत आलेला आहे.

शान राज्यासाठीं शान कौन्सिलची योजना करण्यांत आलेली असून ब्रह्मी प्रजासत्ताकाच्या पार्लमेंटमध्यें शान राज्यामधून निवडून गेलेले प्रतिनिधी या कौन्सिलचे सभासद राहावयाचे आहेत. ब्रह्मी प्रजासत्ताकाचे पंत-प्रधान शान कौन्सिलच्या सल्ल्यानें ब्रह्मी पार्लमेंटमधील या शान राज्याच्या प्रतिनिधींपैकीं एका सदस्याची ब्रह्मदेशाच्या मंत्रिमंडळांत नेमणूक करतील. ब्रह्मी मंत्रिमंडळामधील या मंत्र्यास शान राज्य-मंत्रि ( मिनिस्टर फॉर दि शान स्टेट ) असें संबोधण्यांत येईल.

हा शान राज्य-मंत्रि हाच शान राज्याचा मुख्य अधिकारी असेल. शान राज्याचा राज्यकारभार त्याच्याच हुकमतींत राहील. राज्यकारभारांत शान राज्य-मंत्र्यास साह्य व सल्ला देण्यासाठीं एक मंत्रिमंडळही असेल. शान राज्यमंत्रि आपल्या शान राज्याविषयींच्या सत्तेची अंमलबजावणी स्वतः किंवा आपल्या हाताखालीं दुय्यम अधिकारी नेमून त्यांच्यामार्फत करील. शान राज्याच्या कौन्सिलास ज्या विषयांवर कायदे करण्यांस अधिकार आहे त्या सर्व बाबी शान राज्याच्या अधिकारक्षेत्राखालीं राहतील, आणि त्या सर्व बाबतींत शान राज्याच्या कौन्सिलचा निर्णय राज्याचा प्रमुख जो राज्यमंत्रि त्यावर बंधनकारक राहतील.

शान राज्याविषयींच्या प्रत्येक विषयावर शान राज्यप्रमुखानें शान राज्य कौन्सिलचें मत घेतलेंच पाहिजे, त्याचप्रमाणें राज्याच्या जमाखर्चाचें वार्षिक अंदाजपत्रक तयार करून त्या कौन्सिलपुढें विचारार्थ मांडलेंच पाहिजे, असें बंधनही घटनेनें त्याच्यावर घालून ठेविलेलें आहे.

शान राज्याच्या धर्तीवर, पूर्वींच्या मिचिना व भामो जिल्ह्यांत मोडणाऱ्या, कचीन समाजाची बहुसंख्य वस्ति असलेल्या प्रदेशाचा अंतर्भाव करणारें कचीन राज्य स्थापन करण्याची तरतूद घटनेनें केलेली आहे. कचीन राज्यमंत्रि कचीन राज्य कौन्सिल व कचीन राज्यमंत्रिमंडळ यांची तरतूदही शान राज्यासारखीच करण्यांत आलेली असून, त्यांना त्याच प्रकारची सत्ता देण्यांत आलेली आहे.

करीनांच्या दोन्ही गटांमध्यें मतैक्य न झाल्यामुळें करीनांच्यासाठीं कायम स्वरूपाची योजना घटनापरिषदेस तयार करणें शक्य झालें नाहीं. परंतु करीनांची बहुसंख्य वस्ति असलेला सालवीन जिल्हा, आणि त्याला लागून असलेला, त्याविषयीं चौकशी करण्यासाठीं नेमण्यांत यावयाचें कमिशन ठरवील तो प्रदेश यांतील बहुसंख्य करीनांची, त्याचप्रमाणें ब्रह्मदेशांत इतरत्र राहणाऱ्या करीनांतील बहुसंख्यांची तशी इच्छा असल्यास शान राज्याच्या धर्तीवर करीन राज्याचीही स्थापना करण्यांत यावी, अशी योजना घटनेमध्यें करून ठेवण्यांत आलेली आहे. दरम्यान सालवीन जिल्हा व त्याला लागून असलेला कमिशन ठरवील तो प्रदेश यांचा समावेश करणारा "करीन प्रदेश" ( करीन रीजन ) निर्माण करण्यांत यावा, त्यास चॉ-थू-ले ' असे संबोधण्यांत यावें, ब्रह्मी प्रजासत्ताकाच्या मंत्रिमंडळांत करीन मंत्रि ( मिनिस्टर फॉर फॉरिन अफेअर्स ) असावा, व त्याला साह्य आणि सल्ला देण्यासाठीं करीन अफेअर्स कौन्सिल असावें, अशी योजना घटनेमध्यें करण्यांत आलेली आहे.

वर उल्लेखिलेल्या स्वरूपाचें करीनराज्य स्थापन होण्यापूर्वीच्या काळा-पुरतें कांतारवादी, बावलाके व च्येबोजी या पूर्वीच्या तीन स्वायत्त करीनी संस्थानांचा समावेश करणारें करीनी-राज्य स्थापन करण्यांत यावें, अशी तरतूद घटनेंत करण्यांत आलेली असून, हें राज्य व त्यांतील अधिकारी व त्यांचे अधिकार याविषयींची योजना शान व कचीन राज्यासारखीच आहे.

ब्रह्मी घटनेमध्यें प्रादेशिक स्वायत्तता स्थापना करण्याचीही योजना करून ठेवण्यांत आलेली आहे. घटनेच्या ९१ व्या कलमाप्रमाणें खास कायदा करून विशिष्ट प्रदेशामधील प्रातिनिधिक संस्थांना त्यांच्या क्षेत्रांतील सांस्कृतिक, शैक्षणिक व इतर बाबतींतला कारभार चालविण्यासाठीं अवश्य ते अधिकार देणारा कायदा ब्रह्मी पार्लमेंट करूं शकेल.

त्याचप्रमाणें ब्रह्मी प्रजासत्ताकाच्या प्रत्येक घटकास प्रजासत्ताकामधून फुटून निघण्याचा हक्कही घटनेनें दिलेला असून, तो हक्क कशा रीतीनें बजावतां येईल, याविषयींचा तपशील घटनेच्या दहाव्या प्रकरणांत नमूद करण्यांत आलेला आहे. मात्र ही घटना अमलांत आल्यापासून दहा वर्षे-

पर्यंत हा फुटून निघण्याचा हक्क कोणाही घटकास बजावतां येणार नाहीं, अशी मर्यादाही घालून देण्यांत आलेली आहे.

लोकशक्तीचें अधिष्ठान असलेलें, ब्रह्मी बहुजनसमाजाचें खरेंखुरें प्रातिनिधिक असलेलें, व ज्यामधील अर्थव्यवस्था "संपूर्ण नसली, तरी जवळजवळ समाजवादी स्वरूपाची असेल," असें प्रजासत्ताक या घटनेच्या साह्यानें ब्रह्मदेशांत प्रस्थापित करण्यांत येईल, असें आश्वासन आँग साननें फासापालाच्या प्रतिनिधींच्या परिषदेंत घटनेचा मसुदा मंजुरीसाठीं मांडतांना दिलें होतें. भांडवलदारी पद्धतीवर चालणाऱ्या उद्योगधंद्यांचें नियंत्रण करण्यांत येईल, महत्त्वाच्या उद्योगधंद्यांचें राष्ट्रीयीकरण केलें जाईल, व किसानांचा अभ्युदय करण्यांत येईल, असेंही आँग साननें तेव्हां म्हटलें होतें. ही राज्यघटना घडवितांना हें आश्वासन दृष्टीआड करण्यांत आलेलें नव्हतें, हें शेतकरी-कामकऱ्यांविषयीं तिच्यांत खास तरतूद करणारें प्रकरणच घालून सिद्ध करण्यांत आलें आहे.

"राज्य व शेतकरी-कामकरी यांचे संबंध" (Relation of the State to Peasants and Workers) असें त्याचें शीर्षक आहे.

या प्रकरणांतील शेतकरीविषयक तरतुदींपैकीं पुढील तरतुदी विशेष उल्लेखनीय आहेत:—

(१) ब्रह्मदेशांतील जमिनीची अंतिम मालकी राज्याची असून, (२) या घटनेस अनुसरून प्रचलित शेतीपद्धतींचें (Land Tenures) नियंत्रण करण्याचा, त्यांत बदल करण्याचा, किंवा त्या संपूर्णपणें नष्ट करून, कसण्यासाठीं किंवा सामुदायिक अथवा सहकारी पद्धतीनें शेती करण्यासाठीं कुळांना जमीन वांटून देण्याचा राज्यास अधिकार राहील. (३) कोणाही नागरिकाच्या ताब्यांत कोणत्याही कारणास्तव मोठ्या क्षेत्राची जमीन राहूं दिली जाणार नाहीं. एका व्यक्तीच्या ताब्यांत जास्तींत जास्त केवढ्या आकाराची जमीन राहूं द्यावयाची, हें शक्य होईल तेव्हां कायद्यानें निश्चित करून देण्यांत येईल.

त्याचप्रमाणें, प्रजासत्ताकाला ब्रह्मदेशाच्या नागरिकांव्यतिरिक्त कोणासही उपभोगासाठीं अथवा सुधारणा करण्यासाठीं ब्रह्मदेशामधील शेतजमीन देतां

येणार नाहीं. प्रजासत्ताकाच्या हिताच्या दृष्टीनेंच अपवाद म्हणून कांहीं कारणास्तव ब्रह्मदेशाच्या नागरिकांखेरीज अन्य कोणास जमीन देणें अवश्य वाटल्यास, पार्लमेंटकडून खास कायदा करवून तसें करण्याचा अधिकार मिळविल्यावरच प्रजासत्ताकाच्या सरकारला, परकीयांना उत्पादनासाठीं, उपभोगासाठीं अथवा सुधारणा करण्यासाठीं जमीन देतां येईल.

राज्य व कामगार यांचे संबंध विशद करतांना घटनेच्या या प्रकरणांत असें म्हटलें आहे कीं, कामगारांना आपले संघ स्थापन करून, त्यांच्या साह्यानें आर्थिक पिळणुकीपासून बचाव करण्यासाठीं संघटित प्रयत्न करतां यावा त्यासाठीं कायदे करून व अन्य रीतीनें सरकार त्यांना मदत करील. तसेंच, खास कायदे करून कामगारांना संघटना-स्वातंत्र्य मिळवून देण्यांत येईल; त्यांच्या कामाचे तास निश्चित करण्यांत येतील; त्यांना वर्षाकांठीं हक्काची रजा मिळवून देण्यांत येईल; व त्यांच्या सर्वसाधारण परिस्थितींत सुधारणा होण्यासाठीं अवश्य ते उपाय योजण्यांत येतील; त्याचप्रमाणें परिस्थिति अनुकूल होतांच कामगारांसाठीं घरें बांधून देण्याची व विम्याची योजनाही हातीं घेण्यांत येईल, असेंही नमूद करण्यांत आलेलें आहे.

सार्वजनिक हिताचे उद्योग ( Public Utility Service ) कोणत्या पद्धतीनें चालविण्यांत येतील, अथवा कोणत्या पद्धतीनें व शर्तींवर सुरू करूं दिले जातील, हें घटनेच्या २१८ व्या कलमांत ( प्रकरण १३ वें— ‘ सर्वसाधारण तरतुदी ’ ) पुढीलप्रमाणें नमूद करण्यांत आलेलें आहे:—

. सार्वजनिक हिताचे उद्योग चालविण्यासाठीं सर्टिफिकेट, लायसेन्स किंवा अन्य स्वरूपाचें अधिकारपत्र पुढें दिलेल्या स्वरूपाच्या संस्थांनाच देण्यांत येईल—

( १ ) प्रजासत्ताक किंवा प्रजासत्ताकाचें एकादें घटक राज्य अथवा एकादी स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या नियंत्रणाखालीं चालविण्यांत येणारी संस्था; ( २ ) ब्रह्मदेशाच्या नागरिकांच्या नियंत्रणाखालीं चालविण्यांत येणारी संस्था; किंवा ( ३ ) ज्यांच्या भांडवलापैकीं किमान साठ टक्के भांडवल ब्रह्मी प्रजासत्ताक, किंवा त्याचें एकादें घटक राज्य, किंवा एकादी स्थानिक स्वराज्य संस्था, अथवा ब्रह्मी नागरिक यांच्या मालकीचें आहे,

अशा ब्रह्मी प्रजासत्ताकाच्या कायद्यान्वयें स्थापन करण्यांत आलेल्या कंपन्या किंवा संस्था.

अशा प्रकारें सार्वजनिक हिताचे उद्योग चालविण्यासाठीं देण्यांत येणाऱ्या अधिकारपत्राची मुदत वीस वर्षांहून अधिक असणार नाहीं; दरम्यानच्या काळांत लोकहितासाठीं अवश्य वाटल्यास अधिकारपत्राच्या शर्तींत बदल करण्याचा, सुधारणा करण्याचा किंवा अधिकारपत्रच रद्द करण्याचाही अधिकार सरकारला राहील.

यानंतरच्या ( कलम २१९ ) कलमांत ब्रह्मदेशामधील जंगलांतील व भूगर्भांतील संपत्तीच्या उत्पादनासंबंधीची ब्रह्मी प्रजासत्ताकाची नीति ग्रथित करण्यांत आलेली आहे.

ब्रह्मदेशाच्या जंगलांतील इमारती लाकूड व अन्य संपत्ति; जलमार्ग, व मच्छीमारी; ब्रह्मदेशाच्या भूगर्भांतील कोळसा, पेट्रोलियम व इतर तेलें; विद्युत्शक्तीचें उत्पादन ज्यांपासून होऊं शकेल अशीं साधनें, आणि ब्रह्मदेशांतील अन्य सर्व प्रकारची नैसर्गिक संपत्ति उत्पादन करण्याचें कार्य ब्रह्मी प्रजासत्ताकच करील. या नैसर्गिक संपत्तीचें उत्पादन करण्याचे हक्क ब्रह्मी नागरिकांना, किंवा ज्यांच्या भांडवलांपैकीं किमान साठ टक्के भांडवल ब्रह्मी नागरिकांच्या मालकीचें आहे, अशा कंपन्यांना अथवा संस्थांनाही देण्यांत येतील. याप्रमाणें नैसर्गिक संपत्तीच्या उत्पादनाचे देण्यांत येणारे हक्क पंचवीस वर्षांपेक्षां अधिक मुदतीसाठीं देण्यांत येणार नाहींत; मुदत संपल्यानंतर ती पंचवीस वर्षांपेक्षां अधिक काळासाठीं वाढवून मिळणार नाहीं; दरम्यानच्या काळांतही लोकहितासाठीं अवश्य वाटल्यास, हे हक्क ज्या शर्तींवर देण्यांत आलेले असतील, त्यांत सुधारणा अथवा बदल करण्याचा किंवा ते हक्कच रद्द करण्याचाही सरकारला अधिकार राहील :

मात्र ब्रह्मी प्रजासत्ताकाच्या हिताच्या दृष्टीनें ब्रह्मदेशाच्या ज्या नैसर्गिक संपत्तीचें उत्पादन करण्याचा हक्क अशा प्रकारें देणें इष्ट नाहीं, असें प्रजासत्ताकाच्या कायद्यानेंच ठरविण्यांत आलेलें असेल, तिच्या उत्पादनाचे हक्क कोणासही देण्यांत येणार नाहींत.

ब्रह्मी नागरिकांस मिळणाऱ्या मूलभूत हक्कांचा समावेशही घटनेंत करण्यांत

९७०२ 31/3/54

आलेला आहेच. त्यांत भाषणस्वातंत्र्य, मतस्वातंत्र्य, धर्मस्वातंत्र्य, संघटना-स्वातंत्र्य, समान संधि, व कायद्याच्या अंमलबजावणीच्या बाबतींत संपूर्ण समानता, यांच्यासारखे हक्क तर ब्रह्मी नागरिकांना देण्यांत आलेच आहेत; परंतु पुढील "आर्थिक हक्क" देखील प्रत्येक नागरिकास प्राप्त होतील, अशी हमी देण्यांत आलेली आहे : ( कलम २३ वें )—

( १ ) घटनेच्या या कलमांत करण्यांत आलेल्या तरतुदींस अनुसरून, खाजगी मालमत्ता ठेवण्याचा व आर्थिक क्षेत्रांत वैयक्तिक उपक्रमांस वाव ठेवण्याचा हक्क अबाधित राखण्यांत येईल, अशी राज्यसंस्थेकडून हमी देण्यांत येत आहे.

( २ ) सार्वजनिक हितास विघातक होईल अशा रीतीनें कोणासही आपल्या खाजगी मालमत्तेचा उपयोग करूं दिला जाणार नाहीं.

( ३ ) आपल्या मर्जीप्रमाणें वस्तूंच्या किंमती लादण्याच्या, त्यांचा व्यापार सर्वस्वीं आपल्या मुठींत ठेवण्याच्या, किंवा ज्यामुळें राष्ट्राच्या आर्थिक जीवनावर अनिष्ट परिणाम होईल अशा उद्देशानें स्थापन करण्यांत येणाऱ्या कार्टेल्स, सिंडिकेट्स, ट्रस्ट्स यांच्यासारख्या मक्तेदारी प्रस्थापित करणाऱ्या संस्था स्थापन करूं देण्यांत येणार नाहींत.

( ४ ) लोकहिताच्या दृष्टीनें अवश्य वाटल्यास खाजगी मालमत्तेवर नियंत्रण घालण्यांत येईल, किंवा खासगी मालमत्ता राष्ट्राच्या मालकीचीही करण्यांत येईल; मात्र खासगी मालकीचें असें नियंत्रण अथवा राष्ट्रीयीकरण कायदेशीर रीतीनेंच करण्यांत येईल; कोणत्या स्वरूपाच्या खासगी मालमत्तेच्या बाबतींत व कोणत्या प्रमाणांत मालकास नुकसान भरपाई देण्यांत यावी, हेंही ज्या कायद्यानें मालमत्तेचें राष्ट्रीयीकरण करण्यांत येईल त्यांतच निश्चित केलें जाईल.

( ५ ) या नमूद करण्यांत आलेल्या पद्धतीनेंच लोकहिताच्या दृष्टीनें अवश्य वाटल्यास, राष्ट्राच्या आर्थिक जीवनांतील महत्त्वाचीं अंगें गणले जाणारे उद्योग व खासगी मालकीचे उद्योगधंदे यांचेंही राष्ट्रीयीकरण करण्यांत येईल.

धर्मविषयक नागरिक-हक्कांचें विवेचन करतांना ब्रह्मदेशांतील बहुसंख्य प्रजाजन बुद्धानुयायी असल्यामुळें बुद्धधर्मास ब्रह्मदेशामध्यें "खास स्थान"

असल्याचें घटनेंत म्हटलें असून, ही घटना अमलांत असतांना ब्रह्मदेशांत प्रचलित असलेले धर्म म्हणून हिंदुधर्म, इस्लामधर्म, ख्रिश्चनधर्म व ब्रह्मदेशांतील पहाडी जमाती पाळीत असलेला पंचमहाभूतांचा धर्म यांना मान्यता देण्यांत आलेली आहे. त्याचबरोबर, नागरिका-नागरिकांत धर्माच्या नांवावर भेदभाव करण्यांत येणार नाहीं व कोणी विशिष्ट धर्माचे अनुयायी म्हणून छळ केला जाणार नाहीं, असें आश्वासन देण्यांत आलेलें असून राजकीय हेतूंसाठीं धर्माचा दुरुपयोग करण्यास बंदी करण्यांत आली आहे.

" ज्यामुळें ब्रह्मदेशांतील विविध धर्म, वंश व पंथ असलेल्या प्रजाजनांमध्यें द्वेष, वैरभाव अथवा विसंवाद निर्माण होईल, असें कृत्य घटना-विरोधी असून, त्याबद्दल पारिपत्य करण्यासाठीं खास कायदाही करण्यांत येईल; " असा इशारादेखील घटनेमध्यें स्पष्ट शब्दांत दिलेला आहे, व ब्रह्मदेशांतील शिक्षणसंस्थांत प्रवेश मिळण्याच्या बाबतींत धार्मिक, वांशिक अथवा भाषिक अल्पसंख्यांकांच्या बाबतींत पंक्तिप्रपंच केला जाणार नाहीं, अथवा त्यांच्यावर विशिष्ट धर्मविषयक शिक्षणही लादलें जाणार नाहीं, असें अभिवचनदेखील देण्यांत आलेलें आहे.

ब्रह्मी प्रजासत्ताकाच्या परराष्ट्रीय नीतीचें दिग्दर्शन घटनेमधील परराष्ट्रीय संबंधांविषयींच्या प्रकरणांत करण्यांत आलेलें आहे.

युद्ध हें आपली नीति प्रस्थापित करण्याचें साधन आहे, असें ब्रह्मी प्रजासत्ताक मानीत नसून, त्यासाठीं युद्धाच्या मार्गाचा अंगिकार करण्यांत येणार नाहीं, असें या राज्यघटनेंत स्पष्ट शब्दांत म्हटलेलें असून, आंतरराष्ट्रीय कायद्याच्या सर्वमान्य सिद्धान्तांना अनुसरूनच ब्रह्मी प्रजासत्ताक परराष्ट्रांशीं आपले संबंध ठेवील; जगांतील राष्ट्रांमध्यें आंतरराष्ट्रीय न्याय व नीति यांस अनुसरून स्नेहयुक्त सहकार्य प्रस्थापित करणें, व अशा रीतीनें जगांत शांतता प्रस्थापित करणें हें आपल्या परराष्ट्रीय नीतीचें उद्दिष्ट आहे, असें ब्रह्मी राज्यघटनेनें उद्घोषित केलें आहे.

पाली व संस्कृत या भाषांच्या शिक्षणास ब्रह्मी सरकारकडून उत्तेजन देण्यांत येईल, असें, प्रजासत्ताकाला आपली नीति निश्चित करण्याच्या कामीं मार्गदर्शन करण्याच्या उद्देशानें या घटनेस जें मार्गदर्शक तत्त्वाविषयींचें प्रकरण

( Directive Principles of State Policy ) जोडण्यांत आलेलें आहे त्यांत म्हटलें आहे, ही विशेष उल्लेखनीय गोष्ट आहे. घटनेमधील याविषयींचें कलम पुढीलप्रमाणें आहे—

" सर्व प्रकारच्या कला व शास्त्रें; संशोधनाचें व सांस्कृतिक स्वरूपाचें कार्य करण्याऱ्या संस्था यांना सरकारचें उत्तेजन व मदत मिळेल. त्याचप्रमाणें पाली व संस्कृत भाषांच्या अध्ययनासही सरकारकडून उत्तेजन व साह्य देण्यांत येईल."

# ब्रह्मदेशांतील हिंदी लोक : १० :

ब्रह्मदेशांत विविध वंशीयांची वस्ति असल्यामुळें ब्रह्मी प्रजा म्हणजे एक पंचमेळ खिचडीच बनलेली आहे. या ' स्वदेशी ' भिन्न वंशीयांच्या भरीस परदेशामधून येऊन वसाहत केलेल्यांची संख्याही मोठी असल्यामुळें ब्रह्मदेशाच्या प्रश्नाचें, व त्यांतल्या त्यांत ब्रह्मदेशामधील अल्पसंख्यांकांच्या प्रश्नाचें स्वरूप विचित्र बनलें आहे. ब्रह्मदेशामधील या ' विदेशी ' अल्पसंख्यांकांत हिंदी लोकांचें संख्याधिक्य असून त्या देशाच्या आर्थिक जीवनांत ब्रिटिशांच्या खालोखाल त्यांचें वर्चस्व असल्यामुळें ब्रह्मदेशामधील हिंदी वसाहतवाल्यांचा प्रश्न जितका महत्त्वाचा तितकाच नाजूक स्वरूपाचाही आहे. ब्रह्मदेशामधील ' स्वदेशी ' अल्पसंख्यांकांचा प्रश्न सोडविण्याची तरतूद ब्रह्मी घटनापरिषदेनें केली; परंतु ब्रह्मदेशामध्यें कायमची वस्ति करून राहिलेल्या हिंदी लोकांचा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला नाहीं. ब्रह्मदेशांतील हिंदी लोकांचें स्वतंत्र ब्रह्मदेशाच्या नव्या घटनेखालीं काय स्थान राहील, त्यांना कोणते हक्क प्राप्त होऊं शकतील, त्यासाठीं त्यांना कोणकोणत्या शर्तींचें पालन करावें लागेल, हा सर्वच प्रश्न घटनापरिषदेनें न हाताळल्यामुळें ब्रह्मदेशाच्या व हिंदुस्थानच्या सरकारांना परस्परविचारविनिमयानें सोडवावा लागेल.

पुरातन काळापासून ब्रह्मदेश व हिंदुस्थान यांचे संबंध असून, हिंदी लोकांनीं ब्रह्मदेशांत जाऊन वसाहत केल्याचे उल्लेख अगदीं प्राचीन काळापासूनच्या उपलब्ध असलेल्या ब्रह्मी कागदपत्रांत आढळतात. त्यांच्यापैकीं कित्येकांनीं तर ब्रह्मदेशाच्या राजाचा विश्वास संपादन करून त्याचें मंत्रिपदही भूषविल्याचे उल्लेख आहेत. ब्रह्मदेश व हिंदुस्थान यांच्यांत याप्रमाणें दळणवळण पूर्वापार असलें तरी हिंदी लोकांनीं मोठ्या प्रमाणावर ब्रह्मदेशास जाऊन त्या देशांत वस्ति करावयास प्रारंभ केला, तो ब्रह्मदेश ब्रिटिशांच्या अधिराज्याखालीं गेल्यानंतरच.

ब्रिटिशांनीं ब्रह्मदेश जिंकल्यानंतर नैसर्गिक संपत्तीनें समृद्ध परंतु अविकसित अवस्थेमध्यें असलेल्या त्या देशाच्या संपत्तीचें उत्पादन करण्याचें विशाल कार्य सुरू व्हावयाचें होतें. हजारों एकर जमीन पडीक असून, जंगलें तोडून आणखीही किती तरी जमीन लागवडीखालीं आणतां येण्यासारखी होती; रेल्वे सुरू करावयाची होती; रस्ते, बंदरें व गोद्या बांधावयाच्या होत्या; ब्रह्मी जंगलांतील व ब्रह्मदेशाच्या भूगर्भांतील संपत्तीचें उत्पादन करावयाचें होतें; आधुनिक स्वरूपाचें ब्रिटिश राज्ययंत्र स्थापन व्हावयाचें असून, त्यासाठीं दुय्यम दर्जाचे अधिकारी व कारकून म्हणून काम करण्यासाठीं इंग्रजी जाणणारांची आवश्यकता होती; त्याचप्रमाणें, निरनिराळे उद्योग-धंदे, व्यापार व व्यवसाय थाटण्यासाठीं ब्रह्मदेश हें नवेंच क्षेत्र उपलब्ध झालें होतें. ब्रिटिशांनीं ब्रह्मदेश जिंकून त्याची हिंदुस्थानबरोबर सांगड बांधली, तेव्हां इंग्रजी विद्येचें—" वाघिणीचें दूध "—पिऊन हिंदी जनतेनें राजकीय, शैक्षणिक, औद्योगिक, व्यापारविषयक अशा विविध क्षेत्रांत बरीच प्रगति केलेली होती, तर ब्रह्मी जनतेला आधुनिक विद्या-कल्पनांचा " नवा प्रकाश " प्राप्त झालेला नव्हता. त्यामुळें साहजिकच उपलब्ध झालेल्या या नव्या क्षेत्राकडे हिंदुस्थानामधील जनतेचें लक्ष वेधलें गेलें. ब्रह्मदेशामधील शेतावर, जंगलांत, बंदरांत, रेल्वेंत, रस्ते बांधण्याच्या कामावर, तेलांच्या खाणींत मजुरी करण्यासाठीं हजारों हिंदी स्त्री-पुरुष मजूर ब्रह्मदेशास गेले. विविध सरकारी खात्यांत दुय्यम अधिकाऱ्यांच्या व कारकुनांच्या जागीं हिंदी शिक्षितांची भरती झाली; खाजगी

व्यापारी पेढ्या व बँकांतही दुय्यम अधिकारी व कारकून म्हणून हिंदी शिक्षितांची वर्णी लागली; वकिली-डॉक्टरीसारखे व्यवसाय थाटण्याकरतांही हिंदी सुशिक्षित लोक ब्रह्मदेशांस गेले, तर वणिज्यवृत्तीच्या महत्त्वाकांक्षी हिंदी लोकांनीं ब्रह्मदेशांत जाऊन व्यापार-उदीम सुरू केला.

हिंदुस्थानामधून नोकरी-व्यवसायासाठीं हिंदी लोक ब्रह्मदेशास गेले, यांत आश्चर्य वाटण्यासारखें कांहींच नाहीं. या निमित्तानें नेहमींच हिंदी लोक एका प्रांतामधून दुसऱ्या प्रांतांत जात आले आहेत, व ब्रह्मदेशही हिंदुस्थानचा एक प्रांतच असल्यामुळें, इतर प्रांतांप्रमाणेंच त्या प्रांतांतही वस्तीसाठीं अन्य प्रांतीय लोक गेले. फरक इतकाच, कीं ब्रह्मदेश सर्वच बाबतींत अविकसित असल्यामुळें तिकडे इतर प्रांतांतल्यापेक्षां नोकरी-धंद्याला अधिक संधि होती, म्हणून इतर प्रांतांपेक्षां मोठ्या प्रमाणावर हिंदी लोक त्या देशास गेले; आणि त्याचबरोबर, ब्रिटिश सरकारनेंही, हिंदी लोकांनीं ब्रह्मदेशांत जाऊन वसाहत करावी म्हणून सक्रिय उत्तेजन दिलें होतें, ही गोष्टही लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

१८५२ मध्यें ब्रह्मदेशाचा पेगू हा प्रांत ब्रिटिशांनीं जिंकला तेव्हां-पासूनच हिंदुस्थानांतल्या लोकांनीं, विशेषतः शेतकऱ्यांनीं, ब्रह्मदेशास वसाहतीसाठीं जावें म्हणून हिंदुस्थान सरकारनें प्रत्यक्ष प्रयत्न केले. हिंदुस्थानांतल्या ज्या भागांत वारंवार दुष्काळ पडत असत, तिकडच्या शेतकऱ्यांची व शेतमजुरांची ब्रह्मदेशास रवानगी केल्यास, ब्रह्मदेशांतील पडीक जमीन लागवडीखालीं येईल, व दुष्काळांतल्या उपासमारीमुळें हिंदुस्थानांत वेळोवेळीं निर्माण होणारी स्फोटक परिस्थिति निर्माण होण्याचें टाळतां येईल, अशा दुहेरी हेतूनें हिंदुस्थान सरकारनें ते प्रयत्न केले. परंतु त्यांना अपेक्षेइतकें यश न आल्यामुळें हिंदुस्थान सरकारनें १८८८ मध्यें नेमलेल्या फॅमीन कमिशननें त्या योजनेवर पुन्हा विचार करून, हिंदुस्थान सरकारनें अशा प्रकारें प्रत्यक्ष प्रयत्न न करतां, फक्त उत्तेजन देऊन अप्रत्यक्ष प्रयत्न करावेत, अशी शिफारस केली. या शिफारशींस अनुसरून ब्रह्मदेशांत शेती करण्यासाठीं जाणारांना सवलती देण्याचा उपक्रमही हिंदुस्थान सरकारनें त्यानंतर केला. अशा प्रकारें सवलती देऊन शेतीसाठीं ब्रह्मदेशास जाण्या-

करितां सरकारनें दिलेल्या उत्तेजनाच्या बाबतींत पेगू जिल्ह्यांत २७,००० एकर व झियावादी जिल्ह्यांत १५,००० एकर जमीन खास सवलतीच्या जमीनमहसुलाच्या दरानें हिंदुस्थानामधून ब्रह्मदेशास गेलेल्या वसाहतवाल्यांना दिल्याचें उदाहरण उल्लेखनीय आहे.

१९३१ मध्यें करण्यांत आलेल्या खानेसुमारींत एकूण १६,८००,००० लोकसंख्या असलेल्या ब्रह्मदेशामध्यें वसाहत करून राहिलेल्या हिंदी लोकांची संख्या १०,१७,८२५ भरली! ब्रह्मदेशामधील हिंदी वसाहतवाल्यांची व्यवसायदृष्ट्या तेव्हां केलेली वर्गवारीही अत्यंत उद्‌बोधक आहे. ब्रह्मदेशामध्यें शेतीवर उपजीविका करणाऱ्या हिंदी स्त्री-पुरुषांची संख्या १,४०,५०० असून, २,००,५०० हिंदी स्त्री-पुरुष निमकसबी व साधी अंगमेहनत करणारे मजूर होते; ८२,५०० व्यापारी व गुमास्ते असून, सरकारच्या निरनिराळ्या खात्यांत व खासगी व्यापारी पेढ्या आणि बँकांमध्यें दुय्यम अधिकारी व कारकून असणाऱ्या हिंदी लोकांची संख्या २०,००० होती. घरकाम व रिक्षा ओढण्याचें कामही हिंदी मजूरच मुख्यतः करतात. जंगलें, रेल्वे, रस्ते, खाणी व बंदरें याठिकाणीं मजुरी करणारांत आंध्र प्रांतीय बहुसंख्य असून खालच्या ब्रह्मदेशांतील भातशेतीवर मजुरी करणाऱ्यांत ओरिसामधून गेलेल्या मजुरांचें प्राबल्य आहे.

रंगून ही ब्रह्मदेशाची राजधानी ना? पण रंगूनच्या नागरिकांत परदेशी वसाहतवाल्यांची बहुसंख्या असून, खुद्द ब्रह्मी अल्पसंख्य आहेत! १९३९ मध्यें रंगूनच्या नागरिकांत त्रेपन्न टक्के हिंदी होते. म्युनिसिपल मार्केटचा एकमेव अपवाद वगळून, रंगूनमधील सर्व बाजारांच्या इमारती हिंदी व्यापारी मंडळांच्या मालकीच्या आहेत; तर रंगूनमधील इमारतींपैकीं ऐंशी टक्के इमारती हिंदी लोकांच्या मालकीच्या आहेत!

तांदुळाचा व तांदूळ सडण्याच्या गिरण्यांचा धंदा हा ब्रह्मदेशाचा प्राणभूत व्यवसाय; परंतु तोही ब्रह्मी लोकांच्या हातीं नसून, मोठमोठ्या तांदूळ सडण्याच्या गिरण्या ब्रिटिश भांडवलदारांच्या मालकीच्या असून, मध्यम व लहान गिरण्या हिंदी व चिनी व्यापाऱ्यांच्या, व अगदीं थोड्या ब्रह्मी व्यापाऱ्यांच्या हातीं! ब्रह्मी शेतकरी व ब्रह्मदेशांतील ग्राहक जनता यांच्या-

मध्यें दलाली करणारे व्यापारीही हिंदीच. ब्रह्मी शेतकऱ्याला लाग-लागवडी-साठीं कर्ज देण्याचें कार्य दक्षिण हिंदुस्थानामधील चेट्टियारांनीं अंगिकारलें. ब्रह्मदेशामधून निर्यात होणाऱ्या मालांत मुख्य म्हणजे तांदूळ. पण तो निर्यात करण्याचें कामही प्रामुख्यानें हिंदी व्यापारीच करीत. इतकेंच नव्हे, तर ब्रह्मदेशामधील सर्वच प्रकारचा आयात-निर्यात व्यापार व अंतर्गत व्यापारही प्रामुख्यानें हिंदी व्यापाऱ्यांच्याच हातीं गेला.

अशा रीतीनें ब्रह्मदेशाच्या आर्थिक जीवनांत ब्रिटिश, हिंदी व चिनी यांसारख्या परराष्ट्रीयांचेंच वर्चस्व प्रस्थापित होऊन, खुद्द ब्रह्मी लोकांना त्यांत कांहींच स्थान उरलें नाहीं ! आणि त्यांतही, ब्रह्मदेशांतील जलमार्गा-वरील वाहतूक, मोठमोठ्या भात-गिरण्या व ब्रह्मी जंगलांतील आणि भूगर्भामधील संपत्तीचें उत्पादन यांखेरीजच्या सर्वच आर्थिक क्षेत्रांत हिंदी लोकांचेंच प्राबल्य निर्माण झाल्यामुळें ब्रिटिशांच्या खालोखाल त्यांना महत्त्व प्राप्त झालें. तशांत, १९३०-३५ मधील जागतिक मंदीचा फटका ब्रह्मी शेतकऱ्यांना बसल्यावर विशेषतः खालच्या ब्रह्मदेशामधील शेतजमिनीपैकीं निम्म्याहून अधिक जमीन सावकारांच्या घशांत गेली; त्यांतही मद्रासकडचे चेट्टियारच बहुसंख्य ! ब्रह्मी शेतकऱ्यांना हिंदी सावकरांनीं कर्जाऊ दिलेली रक्कम जवळ जवळ ७५ कोटी रुपयांइतकी असून, ब्रह्मदेशांत लागवडीखालीं असलेल्या एकूण १,२०,००,००० एकर जमिनीपैकीं जवळ जवळ एक-चतुर्थांश म्हणजे सुमारें तीस लक्ष एकर जमीन हिंदी सावकारांच्या मालकीची झालेली आहे !

ब्रह्मदेशांत शिक्षणाचा प्रसार झाला नव्हता, ब्रह्मी जनतेमध्यें राष्ट्राय भावना जन्मास आली नव्हती, तोंपर्यंत ब्रह्मदेशामधील हें परक्यांचें वर्चस्व अबाधित राहूं शकलें. परंतु ब्रह्मी जनतेमध्यें इंग्रजी शिक्षणाचा प्रसार होऊन, ब्रह्मी सुशिक्षीतांचा नवा वर्ग निर्माण झाला, तेव्हां त्याला आपल्या राष्ट्रांत सर्वच क्षेत्रांमध्यें परकीयांचें, त्यांतल्या त्यांत हिंदी लोकांचें, वर्चस्व असलेलें दिसून आलें. हिंदी स्वातंत्र्यलढ्यापासून स्फूर्ति घेऊन ब्रह्मदेशांतही राष्ट्रीय भावनेचा प्रसार करावा, ब्रह्मदेशाला राष्ट्रीय स्वातंत्र्य प्राप्त करून देण्यासाठीं व त्या देशाची सर्वांगीण उन्नति व विकास करण्यासाठीं हिंदी राष्ट्रीय

सभेसारखी .संस्था स्थापन करून संघटित प्रयत्न करावेत, अशी आकांक्षा, जागृत ब्रह्मी लोकांच्या अंतःकरणांत निर्माण झाली; परंतु त्याचबरोबर, सर्वच क्षेत्रांमध्यें आपल्या प्रगतीचा मार्ग प्रामुख्यानें हिंदी लोकच रोखून धरीत आहेत, असेंही त्यांना वाटूं लागलें, आणि ब्रह्मी राष्ट्रवादामध्यें हिंदी-विरोधी भावनेची छटा निर्माण झाली. ब्रह्मदेशांत हिंदुस्थानांतल्या-इतकी जागृति झालेली नसतां, व त्या देशांत हिंदुस्थानांतल्यासारखें प्रबल राष्ट्रीय आंदोलनही नसतां, ब्रह्मदेश हिंदुस्थानचाच एक प्रांत असल्यामुळें, हिंदी राष्ट्रीय चळवळीच्या वाढत्या प्रभावामुळें हिंदुस्थानांत अमलांत येणाऱ्या सुधारणांमधून ब्रह्मदेशाला वगळणें ब्रिटिशांना कठीण झालें होतें. १९१९ मध्यें त्यांनीं तसा प्रयत्न करून पाहिला असतां, त्यामुळेंच ब्रह्म-देशांत प्रक्षोभ निर्माण झाल्यामुळें ब्रिटिशांना माघार घ्यावी लागली होती. पुढें मागें हिंदुस्थान हातचा गेल्यास नैसर्गिक संपत्तीनें समृद्ध असलेला ब्रह्मदेश तरी हातीं राहावा, असें ब्रिटिश साम्राज्यवाद्यांना वाटत होतें. व त्या दृष्टीनें ब्रह्मदेशाची हिंदुस्थानबरोबर केवळ राज्यकारभाराच्या सोईच्या दृष्टीनें सांगड घातली, हें चुकलेंच, असेंही त्यांना वाटूं लागलें होतें. ही चूक दुरुस्त करण्यासाठीं ते कांहीं तरी मार्ग, कांहीं तरी उपाय शोधीतच होते. ब्रह्मी जनतेंत निर्माण होऊं लागलेली ही हिंदीविरोधी भावना त्या दृष्टीनें त्यांच्या पथ्यावरच पडली, व ती वाढविण्यासाठीं, अधिकाधिक तीव्र करण्यासाठीं, सर्व सूक्ष्मासूक्ष्म मार्गांचा त्यांनीं अवलंब केला. आपल्या अवनतीचें कारण आपलें पारतंत्र्य आहे, म्हणून आपलें लक्ष तें नष्ट करण्यावर केंद्रित केलें पाहिजे, अशी जाणीव ब्रह्मी जनतेमध्यें निर्माण झाल्यास तें आपल्या प्रभुत्वास मारक होईल, म्हणून ब्रह्मी जनतेचें लक्ष ब्रिटिशांना दुसरीकडे खेंचावयाचें होतें. त्यामुळें ब्रह्मी राष्ट्रीय आंदोलन दुबळें होऊन ब्रह्मी स्वातंत्र्याचें ध्येय दुरावेल, व ब्रह्मदेश हिंदुस्थानपासून विभक्त करून हिंदुस्थानबरोबरच ब्रह्मदेशही गमावण्याची आपत्ति टाळतां येईल, असा द्विविध हेतु या नीतीच्या द्वारें ब्रिटिश साम्राज्यवाद्यांना सिद्धीस नेतां येणें शक्य होतें. म्हणून ब्रह्मी राष्ट्रवादाला आपला मोर्चा ब्रिटिश साम्राज्यसत्ते-ऐवजीं ब्रह्मदेशांतील हिंदी लोकांविरुद्ध उभारण्याच्या कामीं ब्रिटिशांनीं

भरपूर उत्तेजन दिलें. ब्रह्मी लोकांमध्यें धुमसत असलेल्या या हिंदी-विरोधी भावनेचा हिंदी-विरोधी दंग्यांच्या रूपानें स्फोट झाला, व हिंदुस्थानपासून ब्रह्मदेश विभक्त करण्यांत यावा, अशी मागणी ब्रह्मी राजकारणी करूं लागले; लवकरच या मागणीचें साग्रसंगीत आंदोलनामध्यें रूपांतर झालें.

आणि अत्यंत खेदाची गोष्ट ही, कीं अशा प्रकारच्या अत्यंत नाजूक परिस्थितींत ब्रह्मदेशामधील हिंदी जनतेनें अत्यंत समजूतदारपणाचें व संयमाचें धोरण स्वीकारणें इष्ट असतां, सर्वच दृष्टीनें चुकीचें धोरण स्वीकारलें, चुकीच्या दिशेनें पावलें टाकलीं. त्यामुळें, हिंदीविरोधी क्षोभाच्या आगींत तेलच ओतलें गेलें !

ब्रह्मदेशांत जाऊन संपत्ति मिळविलेल्या हिंदी लोकांनीं ब्रह्मदेशाविषयीं कधींच आत्मीयतेची भावना प्रकट केली नाहीं. त्यांनीं ब्रह्मी जनतेमध्यें शिक्षणप्रसार व्हावा, म्हणून शिक्षणसंस्थांना इमारती बांधण्यासाठीं किंवा इतर कार्यासाठीं आर्थिक साह्य केलें नाहीं; किंवा हॉस्पिटलें, दवाखाने उघडून ब्रह्मी जनतेला रोगराईपासून मुक्त करण्याच्या कामीं साह्य केलें नाहीं. उभ्या ब्रह्मदेशांत एकच "हिंदी" हॉस्पिटल आहे; आणि तें रामकृष्ण मिशन या संस्थेनें रंगूनला चालविलें आहे. त्याला ब्रह्मी सरकार व रंगून कॉर्पोरेशन यांच्याप्रमाणेंच हिंदी धनिकही साह्य करीत आले आहेत. त्याचप्रमाणें, हिंदी लोकांपैकीं विशिष्ट समाजाच्या उपयोगासाठीं ब्रह्मदेशांत कांहीं सार्वजनिक दवाखाने चालविण्यांत येत असतात, व त्यांत त्या समाजाबाहेरील व्यक्तींनाही औषधोपचार केला जातो, हेंही खरें. परंतु हिंदी धनिकांनीं ब्रह्मदेशांत मिळविलेल्या संपत्तीपैकीं कांहींतरी भाग ब्रह्मदेशांत हॉस्पिटल्स व दवाखाने काढण्यासाठीं खर्च केला असता, तर केवढें तरी कार्य झालें असतें. शिवाय त्यामुळें त्यांनीं ब्रह्मी जनतेचें प्रेम व सद्भावना मिळविली असती, तिचें तर मोलच करतां आलें नसतें. तसेंच ब्रह्मी संस्कृति, कला, साहित्य यांविषयींच्या आंदोलनांत लक्ष घालून त्यांना उत्तेजन देणेंही त्यांना अशक्य नव्हतें. परंतु त्यांना त्याची कधीं आवश्यकताच भासली नाहीं ! ब्रह्मी स्वातंत्र्याच्या चळवळीला ब्रह्मदेशांतील किसान, कामगार, विद्यार्थी-आंदोलनांतही त्यांच्याकडून कधीं साह्य झालें नाहीं. ब्रह्मी लोकांचें

सामाजिक जीवन, त्यांचे राष्ट्रीय उत्सव-समारंभ यांमध्येंही, त्या देशांत वसाहत करून धनसंचय करीत असूनही, त्यांनीं कधीं भाग घेतला नाहीं. ब्रह्मदेशांत वसाहत करून राहिलेले हिंदी धनिक व पुष्कळशा प्रमाणावर सर्वसाधारण हिंदी लोकही ब्रह्मदेशांतील जनतेशीं समरस झाले नाहींत,- त्यांच्या सुख-दुःखांत सहभागी झाले नाहींत. " मला काय त्याचें ! " अशी अलिप्ततेची व बेफिकिरीची वृत्तीच त्यांनीं नेहमीं दर्शविली.

राजकीय बाबतींत तर त्यांना अतिशय चुकीचें मार्गदर्शन मिळालें. हिंदुस्थानामध्यें मुस्लिम लीगच्या वर्चस्वाखालीं असलेल्या मुसलमानांनीं विभक्त मतदार संघ व इतर संरक्षक योजनांची मागणी केली, त्यांच्याच पावलावर पाऊल टाकून ब्रह्मदेशामधील हिंदी लोकांनीं आपण अल्पसंख्य असल्यामुळें, आपल्या हितसंबंधांचें रक्षण करण्यासाठीं प्रत्येक सुधारणेच्या वेळीं स्वतंत्र मतदारसंघ व इतर तत्सम हक्कांसाठीं प्रयत्न केले, व बहुसंख्य समाजाचा सद्भाव गमावला. पुढें विभक्तीकरणाचें आंदोलन जोरांत आल्यावरही ब्रह्मदेशांतील हिंदी लोकांच्या पुढाऱ्यांनीं आत्मघातकी धोरणाचा अवलंब केला. वास्तविक ब्रह्मदेश हिंदी संघराज्याचा घटक म्हणून राहावा, कीं विभक्त व्हावा, या प्रश्नाचा निर्णय घेण्याचें सर्वस्वी ब्रह्मी जनतेवर सोंपवून, पूर्णपणें तटस्थतेचें धोरण ब्रह्मदेशांतील हिंदी लोकांनीं स्वीकारलें असतें, तर हिंदी-विरोधी भावना चेतविणारे ऊ सॉ यासारखे ब्रह्मी पुढारी व त्यांच्या मागें असलेले ब्रिटिश साम्राज्यवादी यांच्या शिडामधील वारा निघून गेला असता. परंतु त्याऐवजीं ब्रह्मी हिंदी पुढाऱ्यांनीं विभक्तीकरणविरोधी प्रचार मोठ्या हिरीरीनें केला, आणि विभक्तीकरणास विरोधी असणाऱ्या डॉ. बा मासारख्या ब्रह्मी पुढाऱ्यांचाही मार्ग बिकट करून टाकला !

ब्रह्मदेशामधील हिंदी लोकांचे एक प्रमुख पुढारी व बर्मा इंडियन्स् असोसिएशन या संस्थेचे कार्यवाह श्री. बी. के. दादाचानजी यांनीं आपल्या " नोट ऑन इंडो-बर्मा रिलेशन्स " या पुस्तिकेंत ब्रह्मदेशामधील हिंदी लोकांनीं स्वीकारलेली चुकीची भूमिका व तिच्यामुळें ओढवलेला अनर्थ यांचें विदारक वर्णन केलें आहे. ते लिहितात : " ब्रह्मदेश हिंदुस्थानपासून

३८११

विभक्त करण्यांत आल्यास, ब्रह्मदेशाची भरभराट अशीच कायम ठेवणें ब्रह्मी लोकांना जमणार नाहीं; विभक्तीकरणानंतर ब्रह्मदेश ही एक ब्रिटिशांची वसाहत होऊन बसेल, व ब्रिटिश लोक ब्रह्मी जनतेला निर्दयपणें पिळून काढतील; ब्रह्मदेशाच्या विभक्तीकरणासाठीं चळवळ करून ब्रह्मी लोक आपल्या हातानेंच आपल्या पायावर धोंडा पाडून घेत आहेत; कारण त्यामुळें आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक असा सर्वांगीण सर्वनाश ओढवणार आहे; असा फुसका न पटणारा युक्तिवाद करण्याचें धोरण दुर्दैवानें आम्हीं त्यावेळीं स्वीकारलें. 'आमचें हिताहित आम्हांला समजतें; आम्हांला कोणाच्याही उपदेशाची किंवा सल्ल्याची गरज नाहीं,' असा रोकडा जबाब ब्रह्मी लोकांकडून आम्हांला वारंवार देण्यांत येत असे."

ते पुढें म्हणतातः "वास्तविक, ब्रिटिश साम्राज्यवाद्यांनीं ब्रह्मदेश विभक्त करण्याचें निश्चित केलें होतें, व त्यांचाच शब्द अखेर निर्णायक ठरणार असून, आपला मनोरथ तडीस नेल्यावांचून ते राहणार नाहींत, याची आम्हांस जाणीव होती. आणि हें पुरतेपणीं माहीत असूनही, आम्हीं आमचा विरोध हटवादीपणानें चालूच ठेवला, आणि असंख्य ब्रह्मी सज्जनांच्या सद्भावनेला आंचवून बसलों. ब्रह्मदेश हिंदुस्थानपासून विभक्त करण्यांत येऊं नये म्हणून चालविलेल्या प्रयत्नांत आम्हांला सारखें अपयशच येत गेलें; आणि सर्वांत वाईट गोष्ट म्हणजे अशा रीतीनें वर्तन करून विभक्तीकरणास प्रतिकूल असणाऱ्या ब्रह्मी लोकांनाही आम्हीं आपल्या हातांनींच विभक्तीकरणवाद्यांच्या गोटांत लोटून दिलें, आणि अल्प काळांतच सर्वच्या सर्व ब्रह्मदेश हिंदी-विरोधी बनला!"

विभक्तीकरणाच्या आंदोलनाचे अध्वर्यु, महत्त्वाकांक्षी व पाताळयंत्री ब्रह्मी "पुढारी" ऊ सॉ हे होते. त्यांनीं हिटलरी प्रचारतंत्राचा अवलंब करून ब्रह्मी जनतेमध्यें हिंदी-विरोधी भावना चेतविण्याचा धडाका चालविला. हिंदीविरोध हेंच त्यांचें ब्रीद व हाच त्यांचा राजकीय कार्यक्रमही होता. त्यांच्या "तूर्या" (सूर्य) या वृत्तपत्राच्या स्तंभांमधून हिंदीविरोधी भावनांचें जहर जणूं दुथडी वाहत होतें! साहजिकच ब्रह्मदेशांतील हिंदी लोकांच्या या राजकीय मूर्खपणाचा त्यांनीं ब्रह्मी लोकांच्या भावना भडक-

विण्यासाठीं पुरेपूर उपयोग करून घेतला.

१९३५ चा कायदा तयार होत असतांना तर या प्रश्नाला साहजिकच महत्त्व प्राप्त झालें, व हिंदी-विरोधी प्रचाराच्या तीव्रतेनेंही उच्चांक गांठला. "एक तर स्थापन होऊं घातलेल्या हिंदी संघराज्याचा एक घटक म्हणून स्थान पत्करा, किंवा विभक्तीकरण स्वीकारा," असें ब्रिटिश सरकारनें ब्रह्मी पुढाऱ्यांना सुचवलें. ब्रह्मी कायदेमंडळाच्या निवडणुकीही याच मुद्द्यावर लढविण्यांत आल्या.

डॉ. बा मा हे दुसरे ब्रह्मी पुढारी विभक्तीकरणास प्रतिकूल होते. ब्रह्मदेशाचा हिंदुस्थानशीं असलेला संबंध पूर्णपणें तोडून न टाकतां, इच्छेस येईल तेव्हां फुटून निघण्याचा हक्क राखून ठेवून, ब्रह्मदेशानें हिंदी संघराज्याचा एक स्वायत्त घटक म्हणून नांदण्याचें पत्करावें, अशा मताचे डॉ. बा मा व इतर कित्येक ब्रह्मी पुढारी होते. ऊ सॉनें हिंदी-विरोधी जहरी प्रचार करून निवडणूक लढविली तरीही डॉ. बा मांनाच निवडणुकींत बहुमत मिळालें, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. या नव्या कायदे-मंडळानें विभक्तीकरणाची मागणी न करतां, फुटून निघण्याचा हक्क मिळाल्यास हिंदी संघराज्यांत राहण्याची तयारी दर्शविणारा ठराव करून तो ब्रिटिश सरकारकडे पाठविला. परंतु ब्रिटिश सरकारनें ब्रह्मदेश हिंदुस्थानापासून अलग करण्याचा निश्चयच केलेला होता. त्यांना ब्रह्मी कायदेमंडळाचा हा ठराव कसा रुचावा? "विभक्तीकरण पत्करा नाहींतर बिनशर्त हिंदी संघराज्यामध्यें सामील होण्यास तयार व्हा," अशी 'बिनतोड' भूमिका स्वीकारून ब्रिटिश सरकारनें तो ठराव धुडकावून लावला! ऊ सॉला हें उत्तेजनच होतें. त्यानें आपला प्रचार अधिकच धूमधडक्यानें चालू केला. उत्तरोत्तर ब्रह्मदेशामधील हिंदीविरोधी भावनेचा पारा इतका चढला, कीं मनामधून विभक्तीकरणास प्रतिकूल असणाऱ्या ब्रह्मी लोकांनाही लोकक्षोभास बळी पडण्याच्या भीतीनें गप तरी बसावें लागलें, किंवा बहुजनांच्या सुरांत सूर मिळविणें भाग पडलें. निवडणुकीमध्यें विभक्तीकरण-विरोधी कौल घेऊन निवडून आलेल्या डॉ. बा मांना देखील अखेर आपला विभक्तीकरणविरोध सोडून देणें भाग पडलें! शेवटीं ब्रिटिश सरकार व

हिंदीविरोधी ब्रह्मी पुढारी ऊ सॉ यांनीं आपला निश्चय तडीस नेला, आणि १९३७ मध्यें ब्रह्मदेश हिंदुस्थानपासून विभक्त झाला.

हिंदुस्थानपासून विभक्त झाल्यानंतर ब्रह्मदेशाचा स्वतंत्र राजकीय संसार सुरू झाला, तेव्हां ब्रह्मदेशामधील हिंदी लोकांच्या प्रश्नाचें स्वरूप कांहींसें बदललें. ऊ सॉला ब्रह्मदेशामधील सत्ता आपल्या हातीं ठेवावयाची होती. त्यासाठीं त्यानें हिंदीविरोधाचेंच भांडवल उपयोगांत आणलें. ब्रह्मी जनतेच्या दुःख-दारिद्र्याचें मुख्य कारण ब्रह्मदेशामधील हिंदी लोक हेच होत; म्हणून त्यांच्यावर निर्बंध घातले पाहिजेत व हिंदी लोकांच्या ब्रह्मदेश-प्रवेशास बंदी केली पाहिजे किंवा नियंत्रण घातलें पाहिजे, असा ऊ सॉनें प्रचार सुरू केला. हिंदुस्थानमधून हिंदी लोक सारखे येत राहतील, व एक दिवस असा उगवेल, कीं तेच ब्रह्मदेशांत बहुसंख्य होऊन, खुद्द ब्रह्मी लोकांच्या नशिबीं अल्पसंख्यांचें जिणें जगणें येईल, असें भविष्य-काळाविषयीं काळेंकुट्ट चित्र ब्रह्मी जनतेपुढें रंगविण्याचा त्यानें सपाटा चालविला. ब्रह्मी सरकारनें या प्रश्नाचा विचार करण्यासाठीं बॅक्स्टर कमिशनची नेमणूक केली. हिंदी लोकांच्या ब्रह्मदेशप्रवेशासंबंधींची ही भीति निराधार असल्याचें कमिशननें मत व्यक्त केलें; परंतु त्याचबरोबर ब्रह्मी सरकारनें हिंदुस्थान सरकारशीं विचारविनिमय करून एक करारच करावा अशी शिफारस केली. या शिफारशीस अनुसरून ब्रह्मदेशाचे हिंदी-विरोधी पंतप्रधान ऊ सॉ व हिंदुस्थान सरकारचे प्रतिनिधि सर गिरिजा-शंकर बाजपाय यांच्यांत बोलणीं होऊन १९४१ मध्यें सॉ-बाजपाय करार जन्मास आला. हा करार ब्रह्मदेशांतील हिंदी लोकांना पसंत पडला नाहीं, व हिंदुस्थानांत तर त्याचा एकमुखी निषेधच झाला. नंतर जपान युद्धांत पडल्यावर हा प्रश्न मागें पडला. ब्रह्मदेश जपान्यांनीं व्यापल्यावर निर्वासित ब्रह्मी सरकारचें कार्यालय सिमल्यास स्थापन झाल्यानंतर ब्रह्मी सरकारनें हिंदुस्थान सरकारशीं याविषयीं पुन्हा बोलणीं सुरू केलीं. दोन्ही सरकारांचे प्रतिनिधी व हिंदुस्थानांत निर्वासित म्हणून आलेल्या ब्रह्मी हिंदी लोकांचे प्रतिनिधी यांच्या अनेक परिषदा झाल्या, व अखेर एक नवाच करार करण्यांत आला; परंतु जपानच्या पराजयानंतर ब्रह्मी सरकार ब्रह्म-

देशास परत गेल्यावर, नवा करार ब्रह्मी जनतेस पसंत पडण्यासारखा नाहीं, असें निमित्त करून, ब्रह्मी सरकारनें तो बाजूस सारला, आणि हिंदुस्थान सरकारशीं आणखी एकदां बोलणीं सुरू केलीं.

दुसऱ्या महायुद्धानें ब्रह्मदेशांत क्रांतिकारक बदल घडवून आणला; त्यामुळें ब्रह्मदेशांतील हिंदी लोकांच्या प्रश्नाचें स्वरूपही पालटलें. ब्रह्मदेशावर जपानचें आक्रमण झालें त्यावेळीं ब्रह्मदेशामधील हिंदी लोकांपैकीं जवळ-जवळ चार लक्ष स्त्री-पुरुष आश्रयासाठीं हिंदुस्थानास आले. त्यांच्यापैकीं जे याप्रमाणें ब्रह्मदेश सोडून हिंदुस्थानास न येतां ब्रह्मदेशांतच राहिले त्यांनीं युद्धकाळांत ब्रह्मदेशामधील महत्त्वपूर्ण घडामोडी प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहिल्या व अनुभविल्यामुळें, त्यांच्या राजकीय दृष्टिकोनांत क्रांतिकारक बदल घडून आला. नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या आझाद हिंद सरकारच्या महनीय कामगिरीचें आग्नेय आशिया हेंच कार्यक्षेत्र होतें. नेताजींच्या स्फूर्तिदायी नेतृत्वानें आग्नेय आशियामधील निरनिराळ्या देशांत वसाहत करून राहिलेले हिंदी स्त्री-पुरुष अक्षरशः भारले गेले, व आपल्या मातृभूमीच्या विमोचनासाठीं नेताजींनीं केलेल्या ऐतिहासिक महत्त्वाच्या त्या उद्योगांत त्यांनीं हिरीरीनें भाग घेतला. नेताजींच्या आझाद हिंद सरकारची मध्यवर्ति कचेरी ब्रह्मदेशांत रंगूनलाच होती. त्यामुळें साहजिकपणेंच ब्रह्मी जनतेवर या आझाद हिंद आंदोलनाचा व नेताजींच्या अलौकिक व्यक्तिमत्त्वाचा विशेष प्रभाव पडला.

नेताजींचें आझाद हिंद सरकार व डॉ. बा मा-ऑंग सानचें आझाद ब्रह्मी सरकार हीं दोन्ही सरकारें सहकार्यानेंच कार्य करीत असल्यामुळें, त्या काळांत ब्रह्मी जनता व ब्रह्मदेशामधील हिंदी जनता यांच्यामध्यें नवीनच बंधुप्रेमाची भावना निर्माण झाली. युद्ध सुरू होईपर्यंत हिंदी-ब्रह्मी संबंधांत निर्माण झालेली कटुता कोठल्या कोठें विरून गेली, आणि ब्रह्मी जनता हिंदी लोकांकडे नव्या सहानुभूतीच्या व स्नेहाच्या दृष्टीनें बघूं लागली.

युद्ध संपल्यानंतर हिंदुस्थान व ब्रह्मदेश हीं दोन्ही राष्ट्रें स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावर उभीं राहिलीं. युद्धपूर्वकाळीं हीं दोन्हीं राष्ट्रें ब्रिटिश साम्राज्यांतर्गत असल्यामुळें ब्रह्मी व हिंदी जनता 'ब्रिटिश प्रजाजन' गणली जात असे;

साहजिकच दोघांनाही त्यामुळेंच ब्रह्मदेशांत समान नागरिक हक्क उपभोगतां येत असत. परंतु ब्रह्मदेश स्वतंत्र झाल्यानंतर, ब्रह्मदेशामधील जे हिंदी लोक ब्रह्मदेशाचें नागरिकत्व स्वीकारतील त्यांसच ब्रह्मी नागरिकांसारखे हक्क मिळणारे असून, जे ब्रह्मी नागरिकत्व न स्वीकारतां हिंदी नागरिक म्हणूनच राहण्याचें ठरवितील, त्यांना इतर परराष्ट्रीयांप्रमाणें हिंदुस्थान सरकारशीं विचारविनिमय करून ब्रह्मी सरकार निश्चित करील ते निर्बंध मान्य करूनच ब्रह्मदेशांत राहावें लागेल, अशी परिस्थिति निर्माण झाली. अर्थात् एकदां हिंदी नागरिकत्व सोडून ब्रह्मी नागरिकत्व स्वीकारणारांना नंतर हिंदुस्थान सरकारकडे आपलीं गाऱ्हाणीं निवारून घेण्यासाठीं किंवा हित-संबंधांचें रक्षण करून घेण्यासाठीं धांव घेतां येणें अशक्य होणार असून, त्यासाठीं ब्रह्मी सरकारचीच कास धरावी लागणार, हें उघडच होतें.

या नव्या परिस्थितीस अनुरूप अशा नव्या दृष्टीनें व नव्या दिशेनेंच ब्रह्मदेशामधील हिंदी लोकांचा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करणें अवश्य होऊन बसलें. युद्धकाळीं ब्रह्मदेशांतच राहिलेल्या हिंदी लोकांना ही नवी दृष्टि प्राप्त झालेली होती. स्वतंत्र मतदार संघ, राखीव जागा व अन्य खास हक्क आणि सवलती यांच्यामुळें आपल्या हितसंबंधांचें रक्षण तर होत नाहींच; तर ब्रह्मी जनतेच्या सद्भावनेला व स्नेहाला मात्र आपण पारखे होतों; म्हणून असले कांहीं खास हक्क किंवा खास सवलती न मागतां, ब्रह्म-देशामधील हिंदी लोकांनीं ब्रह्मदेश हीच आपली मातृभूमि मानून, ब्रह्मी जनतेच्या आशा-आकांक्षांशीं एकरूप व्हावें, त्यांच्याबरोबर खांद्यास खांदा देऊन ब्रह्मी स्वातंत्र्य-लढ्यांत भाग घ्यावा, व त्यांचा स्नेह आणि विश्वास संपादन करून स्वतंत्र ब्रह्मदेशांत आपल्या समाजास योग्य असें मानाचें स्थान प्राप्त करून घ्यावें, अशी भूमिका त्यांनीं स्वीकारली. युद्धसमाप्तीनंतर युद्धकाळीं हिंदुस्थानास आश्रयार्थ गेलेल्या हिंदी लोकांपैकीं लाख दीड लाख लोक ब्रह्मदेशास परत आले. त्यांनीं ब्रह्मदेशांतील युद्धकालीन वातावरण पाहिलें-अनुभविलें नसल्यामुळें युद्धपूर्व ब्रह्मदेशाचेंच चित्र त्यांच्या डोळ्यांपुढें होतें. आपल्या जुन्या कल्पना व जुनी विचारसरणी घेऊनच ते ब्रह्मदेशास परत आल्यामुळें पूर्वीप्रमाणेंच राखीव जागा व इतर खास हक्क मागण्या-

बद्दल त्यांचा आग्रह होता. त्यामुळें युद्धोत्तर काळांत कांहीं काळ ब्रह्मदेशा-मधील हिंदी लोकांत जवळ जवळ दोन तटच पडले होते. परंतु युद्धामुळें परिस्थितीमध्यें झालेला क्रांतिकारक बदल हिंदुस्थानामधून परत आलेल्या हिंदी लोकांच्या हळू हळू लक्षांत आला व हिंदी लोकांतील दोन्ही गटांमधील हें वैचारिक अंतर उत्तरोत्तर कमी होऊन, त्यांनींही अखेर युद्धकाळीं ब्रह्मदेशांतच राहिलेल्या हिंदी लोकांच्या भूमिकेचा स्वीकार केला.

ज्याचा जन्म ब्रह्मदेशांत झालेला असून, तो १ जानेवारी १९४२ किंवा १ जानेवारी १९४७ पर्यंत आठ वर्षें तरी ब्रह्मदेशांत सतत राहत असेल, अशा ब्रिटिश किंवा संस्थानी प्रजाजनालाच ब्रह्मी घटना-परिषदेच्या निवड-णुकींत भाग घेतां येईल, असें ॲटली-ऑंग सान-करारामध्यें नमूद केलेलें असल्यामुळें ब्रह्मदेशांतील हिंदी लोकांपैकीं फारच थोड्यांना त्या निवडणुकींत मतदानाचा अधिकार मिळाला. या योजनेंत बदल करून घेऊन, अधिकांत अधिक हिंदी नागरिकांना ब्रह्मी घटना-परिषदेच्या निवडणुकींत मताधिकार मिळावा म्हणून प्रयत्न करण्यासाठीं ब्रह्मदेशांतील हिंदी लोकांच्या सर्व संस्थांनीं एका संयुक्त समितीची निवड केली. बर्मा इंडियन ॲसो-सिएशन या संस्थेचे अध्यक्ष व रंगून येथील एक प्रमुख हिंदी वकील रायबहादूर बी. के. बसु हे या हिंदी 'ॲड् हॉक' समितीचे अध्यक्ष होते. ॲटली-ऑंग सान करार श्वेतपत्रिकेच्या रूपांत प्रसिद्ध झाल्या-नंतर त्वरितच घटना-परिषदेच्या निवडणुकी व्हावयाच्या असल्यामुळें ऑंग सानची सहानुभूति असूनही, त्या योजनेंत हिंदी लोकांना हवा असलेला बदल करणें शक्य झालें नाहीं; त्यामुळें ब्रह्मी घटना-परिषदेंत ब्रह्मदेशांतील हिंदी जनतेस आपला एकही हिंदी प्रतिनिधि निवडून पाठवितां आला नाहीं. घटना-परिषदेच्या अल्पसंख्यांकांविषयींच्या उपसमितीवर श्री. एम्. ए. रशीद व श्री. झोरासिंग या दोन प्रमुख हिंदी नागरिकांना स्वीकृत करून घेऊन, हिंदी लोकांवर झालेल्या या अन्यायाचें अंशतः परिमार्जन करण्याचा ऑंग साननें प्रयत्न केला. श्री. रशीद हे ऑंग सान व थकीन नू या दोघांचेही विद्यार्थि-चळवळीपासूनचे सहकारी व निकट-वर्ती स्नेही असून, पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीनंतरच्या ब्रह्मी मंत्रिमंडळांत

मजूरमंत्रि म्हणून त्यांची नूंनीं नेमणूक केलेली आहे. श्री. झोरासिंग हे नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या आझाद-हिंद सरकारच्या पुरवठा-खात्याचे कार्यवाह होते.

ब्रह्मी घटना-परिषदेनें मंजूर केलेल्या राज्यघटनेंत फक्त नागरिकत्वा-विषयींच्या प्रश्नाची तेवढी तरतूद करून ब्रह्मदेशांतील हिंदी रहिवाशांचे इतर प्रश्न तसेच शिल्लक ठेविले आहेत. दिनांक १ जानेवारी १९४२ किंवा दिनांक ४ जानेवारी १९४८ या पैकीं कोणत्याही एका दिवसापूर्वींच्या दहा वर्षांत सतत आठ वर्षें ब्रह्मदेशांत वास्तव्य असलेल्या हिंदी स्त्री-पुरुषांस ब्रह्मी प्रजासत्ताकाचें नागरिकत्व प्राप्त करून घेतां येईल, असें ब्रह्मी राज्य-घटनेंत नमूद करण्यांत आलें आहे.

८०५४

## ब्रह्मदेश आणि हिंदुस्थान : ११ :

१९४८ च्या चार जानेवारीला ब्रह्मदेशांत १८८५ पासून फडकणारें ब्रिटिश साम्राज्यसत्तेचें प्रतीक असलेलें ‘ यूनियन जॅक ’ उतरविण्यांत येऊन, त्याच्या जागीं स्वतंत्र, ‘ सार्वभौम प्रजासत्ताक ब्रह्मदेशाचा राष्ट्रध्वज ’ फडक-विण्यांत आला, ही दुसऱ्या महायुद्धानंतर सुरू झालेल्या आशिया खंडाच्या पुनरुत्थानामधील हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य-प्राप्तीनंतरची महत्त्वपूर्ण घटना होय. नवोदित ब्रह्मी प्रजासत्ताकाला हिंदी सरकार व जनता यांच्या वतीनें अभिवादन करतांना पाठविलेल्या संदेशांत स्वतंत्र भारताचे पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांनीं असे उद्गार काढले होते, कीं “ ब्रह्मदेशाची स्वातंत्र्यप्राप्ती ही अखिल आशियावासी जनतेच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वपूर्ण अशी घटना आहे. परंतु त्यांतल्या त्यांत हिंदुस्थानच्या दृष्टीनें या घटनेला विशेष महत्त्व आहे. कारण भूतकाळापासून या दोन्ही देशांचे संबंध अत्यंत निकटचे असल्यामुळें, त्या दोहोंपैकीं कोणत्याही एका देशामधील घटनेचे पडसाद दुसऱ्यांत उमटणें अपरिहार्य आहे.” ब्रह्मदेश व हिंदुस्थान या

दोन्ही देशांच्या सरकारांप्रमाणेंच जनतेलाही याची पूर्ण जाणीव आहे, हें दोन्ही देशांच्या जनतेनें परस्परांच्या स्वातंत्र्यदिनीं साजऱ्या झालेल्या समारंभांत स्वयंस्फूर्तीनें भाग घेऊन सिद्ध केलेलेंच आहे. परंतु स्वतंत्र हिंदुस्थान व स्वतंत्र ब्रह्मदेश यांच्यांत भ्रातृभाव असणें केवळ त्या दोहोंमधील ऐतिहासिक व सांस्कृतिक संबंधांमुळेंच इष्ट आहे, असें नव्हे.

स्वतंत्र हिंदुस्थानच्या संरक्षणाच्या दृष्टीनें ब्रह्मदेशाला विशेष महत्त्व आहे. कारण ब्रह्मदेशावर प्रभुत्व असलेली सत्ता बंगालच्या उपसागरावरही प्रभुत्व प्रस्थापित करूं शकते, हें गेल्या महायुद्धांत सिद्ध झालेलें आहे. हिंदुस्थानांतलें सर्वांत मोठें असलेलें कलकत्ता शहर व त्या भोंवतालचा प्रदेश, हिंदुस्थानांतील सर्वांत मोठ्या असलेल्या झरियाच्या कोळशाच्या खाणींचा प्रदेश आणि आशिया खंडांतील टाटांचा सर्वांत मोठा कारखाना यांवर ब्रह्मदेशामधून विमान हल्ला यशस्वी रीतीनें व सहज करतां येईल, म्हणून लष्करी दृष्ट्या ब्रह्मदेश ही हिंदुस्थानच्या संरक्षणाची "पहिली आघाडी" ( First Line of Defence ) आहे. ब्रह्मदेशाच्या संरक्षणाच्या दृष्टीनेंही हिंदुस्थानला विशेष महत्त्व आहे. कारण ब्रह्मदेशाचा विस्तार अत्यंत अल्प असून, त्या देशाचें मनुष्यबळही अल्पच आहे. त्याचप्रमाणें आधुनिक पद्धतीच्या संरक्षणासाठीं अवश्य असलेले उद्योगधंदेही ब्रह्मदेशांत अस्तित्वांत नाहींत. त्यामुळें आधुनिक युद्धसामुग्रीनें सुसज्ज असलेल्या एकाद्या सत्तेनें ब्रह्मदेशावर आक्रमण केल्यास त्याचा प्रतिकार करण्याचें सामर्थ्य एकट्या ब्रह्मदेशापाशीं नाहीं. ब्रह्मी स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळीं ब्रह्मी पंतप्रधान थकीन नु यांनीं ब्रिटिश पंतप्रधान श्री. क्लेमंट ॲटली यांच्याबरोबर केलेल्या तहनाम्यांत ब्रह्मदेशास संरक्षणक्षम करण्यासाठीं ब्रिटिश लष्करी "मिशन" ब्रह्मदेशांत ठेवण्याची तरतूद आहे; त्यासाठीं ब्रिटिश सरकारला अनेक लष्करी सवलती देण्यांत आलेल्या आहेत, व इतर कोणत्याही देशाचें अशा प्रकारचें साह्य ब्रह्मदेशानें घ्यावयाचें नाहीं, असेंही त्या तहनाम्यांत नमूद करण्यांत आलेलें आहे हें खरें, परंतु हजारों मैल दूर असलेल्या इंग्लंडकडून ब्रह्मदेशाचें संरक्षण होणें अशक्य आहे, ही गोष्टही गेल्या महायुद्धांत सिद्ध झालेलीच आहे. त्यासाठीं ब्रह्मदेशाला आपल्या शेजारच्या राष्ट्राकडेंच

बघावें लागेल. मग अँग्लो-ब्रह्मी तहामधील योजना कांहीं का असेनात !

आग्नेय आशियामधून ब्रिटिश साम्राज्यसत्तेचा अस्त झाल्यामुळें या भूभागामधील परिस्थितींत लष्करी दृष्ट्या अत्यंत क्रांतिकारक फरक घडून आलेला आहे. हिंदुस्थानमध्यें ब्रिटिश सत्ता असल्यामुळेंच दुसऱ्या महायुद्धापर्यंत आग्नेय आशियांत शांतता व सुरक्षितता अव्याहत नांदत आली. परंतु दुसऱ्या महायुद्धानंतर हिंदुस्थानांतून व नंतर ब्रह्मदेशामधूनही ब्रिटिश साम्राज्यसत्ता लयास गेल्यामुळें हा प्रदेश लष्करी दृष्ट्या " उघडा " पडला आहे. ब्रिटिश सत्तेच्या अस्तामुळें निर्माण झालेल्या या परिस्थितींत आग्नेय आशियामधील राष्ट्रांना आपापलें स्वातंत्र्य अबाधित राखण्यासाठीं परस्पर सहकार्यानें संरक्षण योजना आंखणें अवश्य होणार आहे. आग्नेय आशियाच्या संरक्षणयोजनेंत हिंदुस्थानचें स्थान सर्वप्रथम राहणार आहे, हें इतिहासानेंच सिद्ध केलें आहे. आग्नेय आशियामधील केवळ ब्रिटिशांच्याच नव्हे, तर फ्रेंच आणि डच यांच्या वसाहतीही हिंदुस्थानवर प्रभुत्व गाजविणाऱ्या ब्रिटिश सत्तेच्या संरक्षणामुळेंच सुरक्षित राहिल्या, इतकेंच नव्हे, तर गेल्या महायुद्धांत त्या सर्व जपान्यांच्या टांचेखालीं गेल्या असतां दोस्त राष्ट्रांना हिंदुस्थानचा तळ होता म्हणूनच जपानविरुद्ध करावयाच्या लष्करी मोहिमेची अवश्य ती तयारी करून, जपान्यांच्या तावडीमधून त्या सोडविणें शक्य झालें, ही एकच गोष्ट हिंदुस्थानचें या दृष्टीनें असलेलें महत्त्व लक्षांत येण्यास पुरेशी आहे. शिवाय आग्नेय आशियामधील हिंदुस्थान-खेरीजचीं राष्ट्रें आकारानें लहान असून, संरक्षण दृष्ट्या अवश्य असलेल्या साधनसामुग्रीच्या दृष्टीनें असमर्थ आहेत; यामुळेंहि या योजनेंत हिंदुस्थान-लाच महत्त्वाची कामगिरी बजवावी लागणार आहे. अशा संरक्षणयोजनेच्या जोडीला या भूभागाच्या आर्थिक विकासाचीहि योजना आंखून तीदेखील परस्पर सहकार्यानें पार पाडणें आग्नेय आशियामधील राष्ट्रांना क्रमप्राप्तच होईल.

स्वतंत्र ब्रह्मदेशाच्या सरकारला व जनतेला पहिल्या ब्रह्मी स्वातंत्र्यदिना-निमित्त पाठविलेल्या संदेशांत पं. नेहरूंनीं आशियाई राष्ट्रांतल्या अशा स्वरूपाच्या सहकार्याची आवश्यकता प्रतिपादन करतांना म्हटलें होतें कीं,

" ब्रह्मदेश व हिंदुस्थान या देशांतील जनतेमध्यें वसत असलेल्या भावना समान आहेत, या एकाच कारणासाठीं ब्रह्मदेश व हिंदुस्थान यांच्यांत निकट स्नेह व सहकार्य असलें पाहिजे, असें नव्हे. आज जगामध्यें, व विशेषतः आशिया खंडांत, प्रत्यहीं घडणाऱ्या घडामोडी लक्षांत घेतल्यावरही हिंदी-ब्रह्मी स्नेहाची आवश्यकता पटण्यासारखी आहे. ब्रह्मदेश व आशियांतील इतर शेजारी राष्ट्रें यांच्यांत सहकार्य नांदण्यास अवश्य असलेली योजना आंखण्यास अनुकूल असा काळ लौकरच येईल, हें निःसंशय."

आग्नेय आशियांतीलच नव्हे, तर आशिया व आफ्रिका खंडांतील सर्वच दलित राष्ट्रांतील जनतेस आपल्या स्वातंत्र्य-लढ्यांत हिंदी स्वातंत्र्य-लढ्यापासून स्फूर्ति मिळत असे. या सर्व दलित राष्ट्रांच्या स्वातंत्र्य-लढ्यास सहानुभूति व्यक्त करून भ्रातृभावनेनें पाठिंबा देण्याची नीति हिंदी राष्ट्रीय सभेनें पं. नेहरूंच्या मार्गदर्शनामुळें स्वीकारली होती, आणि त्या देशांच्या राष्ट्रीय नेत्यांशीं पं. नेहरूंचा वैयक्तिक स्नेहसंबंधही प्रस्थापित झालेला होता. दुसऱ्या महायुद्धानंतर त्या राष्ट्रांना स्वातंत्र्यप्राप्तीच्या कामीं पं. नेहरूंच्या नेतृत्वाखालीं हिंदुस्थानकडून मिळालेल्या व मिळत असलेल्या हार्दिक आणि परिणामकारक साह्यामुळें या सर्वच भूभागांत हिंदुस्थानविषयीं आदराची व स्नेहाची भावना वसत असलेली दिसून येते. जगाच्या राजकीय नभोमंडळावर पं. नेहरूंच्या व्यक्तिमत्वाची उत्तरोत्तर अधिकाधिक फांकणारी प्रभा, त्यांचा उदात्त ध्येयवाद, त्यांचा स्फटिकसदृश प्रांजलपणा यांची मोहिनी या भागांतल्या सर्व जनतेवर पडलेली दिसून येते.

या सर्व राष्ट्रांपेक्षां ब्रह्मदेशाचा तर हिंदुस्थानशीं अधिकच निकटचा संबंध. हिंदी स्वातंत्र्य-लढ्यापासूनच ब्रह्मी जनतेस स्फूर्ति मिळाली. आपल्या लढ्यांतलें प्रत्येक पाऊल टाकतांना त्या राष्ट्राचे नेते हिंदुस्थानचेंच अनुकरण करीत असल्याचें उघड दिसे, इतकेंच नव्हे, तर विशेषतः पं. नेहरूंपासूनच ऑंग सान प्रभृति नेते स्फूर्ति घेत असत; ऑंग सानप्रमाणेंच थकीन नु प्रभृति ब्रह्मदेशाच्या आजच्या नेत्यांचा पं. नेहरूंशीं गाढ स्नेहसंबंध आहे, आणि आंतरराष्ट्रीय राजकीय क्षेत्रांत ते पं. नेहरूंच्या धोरणानुसारच वागतात, हें सर्वश्रुतच आहे.

ब्रह्मदेशांतील सर्वसाधारण जनतेंत पं. नेहरूंविषयीं हिंदी जनतेइतकाच असीम आदर व अकृत्रिम प्रेम आढळून येतें. त्यांचें आत्मचरित्र व इतर साहित्य न वाचलेला शिक्षित ब्रह्मी मनुष्य हुडकूनच काढावा लागेल! त्यांच्या हालचाली, वक्तव्यें व भाषणें यांना ब्रह्मी वृत्तपत्रांत नेहमीं प्रमुख व मानाचें स्थान दिलें जातें. पं. नेहरूंच्याविषयींची ही आदरभावना केवळ ब्रह्मदेशांतील बहुसंख्य समाज, अथवा अधिकारारूढ फासापाला पक्ष यांच्यापुरतीच मर्यादित नाहीं. स्वातंत्र्योत्तर काळांत थकीन नूंच्या सरकारविरुद्ध बंड पुकारून करीनांपैकीं एका गटानें आपलें जें स्वतंत्र "चाथुले" राज्य स्थापन केलें होतें, त्या "करीनिस्ताना"च्या रेडियो-वरून देखील पं. नेहरूंच्या हालचाली, वक्तव्यें व भाषणें यांना आदरपूर्वक प्रसिद्धि देण्यांत येत असे!

ब्रह्मी पुढारी व जनता यांना हिंदुस्थान व हिंदी नेते यांच्याविषयीं स्नेह वाटत असला, तरी ब्रह्मदेशांतल्या हिंदी लोकांच्या प्रश्नावरून अधून मधून कडवटपणा निर्माण होत असतो. जगांतल्या छोट्या राष्ट्रांना नेहमींच आपल्या शेजारच्या मोठ्या राष्ट्राविषयीं भीति वाटत असते. एका बाजूस हिंदुस्थान व दुसरीकडे चीन या दोन मोठ्या राष्ट्रांच्यामध्यें ब्रह्मदेश आहे. आपला वाढत्या लोकसंख्येचा प्रश्न सोडविण्यासाठीं हीं राष्ट्रें ब्रह्मदेशाचा उपयोग पुढेंमागें करून घेतील, अशी दहशत ब्रह्मी जनतेच्या मनांत वसत राहावी, असा पद्धतशीर प्रयत्न ब्रिटिश साम्राज्यवाद्यांनीं केला होता. हिंदी लोकांच्या ब्रह्मदेशप्रवेशावर वेळोवेळीं जीं बंधनें लादण्यांत आलीं, त्यासाठीं प्रचार-आंदोलनें झालीं, त्यांचा जन्म या भीतीच्या पोटींच झाला होता. हिंदुस्थान व ब्रह्मदेश यांच्यांत चिरस्थायी स्नेहसंबंध प्रस्थापित होण्यासाठीं ब्रह्मदेशांतल्या हिंदी लोकांविषयींचे सर्व प्रश्न दोघांसही समाधानकारक अशा रीतीनें सुटणें म्हणूनच अवश्य आहे. हिंदुस्थान सरकारशीं बोलणीं करून या दिशेनें प्रयत्न करण्यासाठीं ब्रह्मदेशाचे पंतप्रधान थकीन नु यांच्याच नेतृत्वाखालीं शिष्टमंडळ आलें होतें, व त्यांनीं या सर्व प्रश्नांवर पं. नेहरूंशीं चर्चाही केली. हें ब्रह्मी शिष्टमंडळ हिंदुस्थानांत येऊं घातलें असतां, "न्यू टाइम्स ऑफ बर्मा" या निमसरकारी दैनिकानें प्रदर्शित केलेल्या विचारा-

वरून जाणत्या ब्रह्मी जनतेंत हा प्रश्न सोडविण्याच्या आवश्यकतेची जाणीव असल्याचें दिसून येऊं शकेल.

" हिंदुस्थान व ब्रह्मदेश हीं दोन्हीं राष्ट्रें आतां स्वतंत्र झालेलीं असल्यामुळें त्या दोघांत स्नेहसंबंध प्रस्थापित करणें पूर्वीपेक्षां अधिक सुलभ झालेलें आहे; कारण पूर्वी त्यांच्यापैकीं एका राष्ट्राच्या जनतेच्या हितास बाधक असणारें कृत्य दुसऱ्यानें केलें, म्हणजे त्याच्या बुडाशीं दोघांनाही पारतंत्र्यांत ठेवणाऱ्या तिसऱ्या सत्तेचा हात असल्याचा संशय येत असे," असें म्हणून, त्या दैनिकानें पुढें लिहिलें : " ब्रह्मदेश व हिंदुस्थान यांचे हितसंबंध पुष्कळच बाबतींत समान आहेत. जागतिक घडामोडींमुळें आग्नेय आशियाच्या भवितव्याच्या दृष्टीनें महत्त्वाची कामगिरी या दोन्ही राष्ट्रांना बजवावी लागणार आहे. आर्थिक दृष्ट्या कित्येक बाबतींत ब्रह्मदेश व हिंदुस्थान परस्परपूरक आहेत. ..संरक्षणाच्या दृष्टीनें विचार करतां, पूर्वेकडून हिंदुस्थानावर हल्ला झाल्यास, त्याचा प्रतिकार करण्याच्या कामीं 'ब्रह्मदेश हीच हिंदुस्थानची पहिली आघाडी' ठरेल. म्हणून कोणत्याही दृष्टीनें विचार केला तरी हें दिसून येईल कीं या दोन्ही देशांत स्नेहाची भावना नांदणें व त्यांच्या सर्व क्षेत्रांमधील ध्येय-धोरणांत एकसूत्रीपणा असणें अवश्य आहे."

नू शिष्टमंडळानें याविषयीं केलेलीं बोलणीं पुढें चालविण्यासाठीं तेव्हांचे हिंदी राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष डॉ. पट्टाभि सीतारामय्या यांच्या नेतृत्वाखालीं हिंदी शिष्टमंडळ ब्रह्मदेशास जावयाचें होतें. परंतु त्या देशांत अशांतता निर्माण झाल्यामुळें शिष्टमंडळास आपला कार्यक्रम रद्द करावा लागला. त्यानंतर हा प्रश्न मागेंच पडला.

फासापालानें ऑंग सानच्या नेतृत्वाखालीं पुरस्कारलेल्या कार्यक्रमांत प्रमुख उद्योगधंदे व शेती यांच्या राष्ट्रीयीकरणाच्या कार्यक्रमास महत्त्वाचें स्थान देण्यांत आलें होतें. हा कार्यक्रम अमलांत आणून ब्रह्मी प्रजासत्ताकाचा समाजवादी सत्तेमध्यें विकास करणें शक्य व्हावें, अशीच राज्यघटना ब्रह्मी घटना-परिषदेकडून घडविण्यांत आली आहे. ब्रह्मदेशाच्या आर्थिक जीवनांत हिंदी लोकांचें असलेलें स्थान लक्षांत घेतां, या राष्ट्रीयीकरणाच्या कार्यक्रमाचा त्यांच्या हितसंबंधांवर परिणाम होणें अपरिहार्य आहे. परंतु हिंदी लोकांनीं

या प्रश्नाकडे व्यापक दृष्टीकडे पाहिलें, व ब्रह्मी सरकारनें तो सोडवितांना शुद्ध शास्त्रीय व निःपक्षपाती दृष्टी ठेवली. अँग्लो-ब्रह्मी तहांत ब्रिटिश हितसंबंधांचें राष्ट्रीयीकरण करतांना नुकसानभरपाई देण्याचें तत्त्व मान्य केलें, त्याप्रमाणेंच हिंदी हितसंबंधांचें राष्ट्रीयीकरण करतांनाही नुकसानभरपाई देण्याचें धोरण अवलंबिलें, तर हा प्रश्न समाधानकारक रीतीनें सुटणें अवघड खास नाहीं.

या प्रश्नाकडे अशा निःपक्षपाती न शास्त्रीय दृष्टीनेंच ब्रह्मी राष्ट्रीय नेते व सरकार बघत असल्याचें त्यांनीं वेळोवेळीं केलेल्या वक्तव्यांवरून स्पष्ट होतें. स्वतः पंतप्रधान थकीन नु यांनीं ब्रह्मी प्रजासत्ताकाच्या राज्यघटनेचा अखेरचा मसुदा घटना-परिषदेपुढें मान्यतेसाठीं मांडतांना केलेल्या भाषणांत अशाच शास्त्रशुद्ध भूमिकेवरून ब्रह्मी सरकार या प्रश्नाकडे पाहत असल्याचें दिग्दर्शित केलें होतें. ते म्हणाले होते कीं, " ब्रह्मदेश हें समृद्ध राष्ट्र असलें, तरी ब्रह्मी जनता मात्र दरिद्रीच आहे. आतांपर्यंत ब्रह्मदेशाच्या संपत्तीचा उपभोग ब्रिटिश भांडवलवाले घेत आले असून, त्यांच्या खालोखाल हिंदी व चिनी भांडवलदारांचा क्रम लागतो. ब्रह्मी लोकांना या ब्रिटिश, हिंदी व चिनी भांडवलदारांच्या मेजावरून उच्छिष्टाचे जे तुकडे पडतील, ते खाऊनच समाधान मानावें लागतें."

ते पुढें म्हणाले, " परराष्ट्रीय भांडवलदारांच्या जागीं ब्रह्मी भांडवलदारांचें वर्चस्व आम्हांला स्थापन करावयाचें नाहीं. कारण तुमानी व धोतरें जाऊन त्यांच्या जागीं ' पासो ' येण्यानें ब्रह्मदेशाची परिस्थिति सुधारणार नाहीं. ज्या अनिष्ट आर्थिक परिस्थितीमुळें आज ब्रह्मदेशांत मूठभर लोक मक्तेदार बनून, ब्रह्मी बहुजनसमाज अपरंपार दारिद्र्यांत खितपत पडला आहे, ती परिस्थिति नष्ट करणें हेंच आमचें उद्दिष्ट आहे. ही अनिष्ट अर्थव्यवस्था अबाधित राखण्याला साह्य करणारे भांडवलवाले ब्रिटिश आहेत, हिंदी आहेत, कीं ब्रह्मी, हा प्रश्न महत्त्वाचा नाहीं. ही अनर्थावह अर्थव्यवस्था नष्ट झाली पाहिजे, हीच मुख्य व महत्त्वाची गोष्ट आहे."

या शास्त्रशुद्ध भूमिकेविरुद्ध कोण आक्षेप घेऊं शकेल ?

● ● ●

# आणखी एक दिव्य

: १२ :

दिनांक चार जानेवारी १९४८ रोजीं स्वतंत्र, सार्वभौम ब्रह्मी प्रजा-सत्ताकाचा जन्मोत्सव ब्रह्मदेशांत मोठ्या थाटामाटांत साजरा झाला, तेव्हां ब्रह्मदेशावरील संकटपरंपरा एकदांची संपली, व ब्रह्मदेशाच्या राष्ट्रीय इतिहासांतील नवसमाजनिर्मितीच्या नव्या पर्वाला प्रारंभ झाला, असें सर्वांनाच वाटलें. सेनापति आँग सानचा खून झाला, तेव्हां ब्रह्मी स्वातंत्र्य-लढ्याची वाताहत होण्याचीच भीति निर्माण झाली होती. परंतु तें गंडांतर टळलें, व आँग साननें आंखलेल्या योजनेबरहुकुम ब्रह्मी प्रजासत्ताकाच्या जन्माची घोषणा होईपर्यंतची मजल कोठल्याही प्रकारचा प्रत्यवाय न येतां गांठतां आली, यामुळें ब्रह्मी राष्ट्रवाद्यांना समाधान वाटणेंही साहजिकच होतें.

आणि ब्रह्मदेशामधील त्या वेळची परिस्थितीही अशी आशा वाटण्या-सारखीच होती. करीनांमधील एका दुराराध्य वाटणाऱ्या गटाखेरीज सर्व अल्पसंख्याकांचें प्रजासत्ताकाच्या घटनेमध्यें त्यांच्या हितरक्षणासाठीं करण्यांत आलेल्या योजनेमुळें संपूर्ण समाधान झालेलें होतें; तर साम्यवादी पक्षानें सहकारितेचें धोरण स्वीकारलें होतें. ब्रिटिश साम्राज्यवाद्यांबरोबरचा निर्वाणीचा अंतिम लढा देण्यासाठीं साम्यवादी-फासापाला एकजूट प्रस्थापित करण्याची नीति साम्यवादी पक्षानें अंगिकारिलेली असून, फासापालामधील सर्वसाधारण कार्यकर्त्यांना अशा एकजुटीस अनुकूल बनवून, फासापालाच्या मनामधून साम्यवाद्यांशीं एकजुटीस तयार नसणाऱ्या "उजव्या" प्रवृत्तीच्या पुढाऱ्यांवर दडपण आणून त्यांना साम्यवाद्यांशीं हातमिळवणी करावयास लावावयाची, असा महत्त्वाकांक्षी व्यूह ब्रह्मी साम्यवाद्यांनीं त्यावेळीं रचलेला होता. आतां जगांतल्या सर्व देशांत सर्वांना परिचयाच्या झालेल्या अननुकरणीय तंत्रानें या नव्या नीतीस अनुसरून धडाक्याची प्रचारमोहीम त्यांनीं देशभर सुरू केली होती. आपली एकजुटीविषयींची तळमळ प्रामाणिकपणाची आहे, हें जनतेला व फासापालाच्या कार्यकर्त्यांना पटावें, म्हणून साम्यवादी पुढारी मोठ्या चातुर्यानें पावलें टाकीत होते. ब्रह्मी खेड्यापाड्यांमधील अशांततेचा बीमोड करण्याच्या उद्देशानें थकीन नू यांनीं फासापालाच्या इतर प्रमुख

नेत्यांसमवेत प्रचारमोहीम काढली, तेव्हां ब्रह्मी साम्यवादी पक्षाचे "स्टॅलिन" थकीन थान तून हे स्वतः आपल्या कांहीं सहकाऱ्यांसह ब्रह्मी पंतप्रधानांबरोबर त्यांच्या प्रचार-दौऱ्यांत हिंडले, व त्यांच्या शांततामोहिमेस साम्यवादी पक्षाचा असलेला पाठिंबा सक्रिय दर्शविला; त्यामुळें साम्यवाद्यांच्या हेतूंविषयीं सर्वसाधारण जनता व कार्यकर्ते यांच्या मनांत शंका न राहणेंही स्वाभाविकच होतें.

या दौऱ्यावरून परत आल्यानंतर अल्प काळांतच पंतप्रधान थकीन नू ब्रिटिश पंतप्रधान क्लेमंट ॲटली यांच्याबरोबर ब्रह्मी घटना-परिषदेनें मंजूर केलेल्या घटनेच्या आधारें निर्माण व्हावयाच्या प्रजासत्ताकास मान्यता मिळवून, ब्रह्मदेशामधील सत्तांतराविषयींचा तपशील निश्चित करणारा तहनामा करण्याविषयीं बोलणीं करण्यासाठीं लंडनला गेले. थकीन नूंनीं ॲटलीबरोबर केलेल्या तहनाम्यामध्यें असलेली अर्थविषयक व संरक्षण-विषयक योजना ब्रह्मी साम्यवादी पक्षाला पसंत पडली नाहीं व त्यामुळें त्या पक्षानें आपली सहकार्याची भूमिका सोडून देऊन पुन्हा विरोधाची भूमिका स्वीकारली.

ब्रह्मी प्रजासत्ताकाचा उदय झाल्यानंतर पुढल्या—म्हणजे फेब्रुवारी महिन्यांत कलकत्त्यास भरलेल्या हिंदी साम्यवादी पक्षाच्या अधिवेशनास थकीन थान तून आपल्या कांहीं सहकाऱ्यांसह हजर होते. त्या अधिवेशनांत ब्रह्मदेशच्या प्रश्नावर बोलतांना त्यांनीं असे उद्गार काढले, कीं 'ब्रह्मदेश हें स्वतंत्र, सार्वभौम प्रजासत्ताक राष्ट्र असल्याची घोषणा करण्यांत आलेली असली तरी हें 'स्वातंत्र्य' नकली आहे. या 'स्वातंत्र्या'मध्यें ब्रह्मदेशामधील वासाहतिक स्वरूपाची समाजव्यवस्था अबाधित राखली जाईल, अशी खबरदारी घेण्यांत आलेली आहे."

अशा प्रकारें ब्रिटिश साम्राज्यसत्तेचे पाश ब्रह्मदेशाच्या गळ्याभोंवतीं अँग्लो-ब्रह्मी करारानें कायमच ठेविले असल्याचें साम्यवाद्यांचें मत बनल्यामुळें ते तोडून टाकून, ब्रह्मदेश मुक्त करण्याचा त्यांनीं निर्धार केला.

हिंदी साम्यवादी पक्षाच्या कलकत्ता परिषदेवरून परत येतांच ब्रह्मी साम्यवाद्यांनीं ब्रह्मदेशच्या 'बेगडी' स्वातंत्र्याविरुद्ध युद्ध पुकारलें. एका-

मागून एक संप घडवून आणून त्यांनीं आपल्या या मोहिमेस प्रारंभ केला. बर्मा ऑईल कंपनीच्या सीरीयम येथील कारखान्यामधील व रिफाइनरी-मधील कामगार संपावर गेले. त्या पाठोपाठ इरावती फ्लॉटिला कंपनीच्या दल्ला येथील डॉक यार्डमधील कामगार व स्टील ब्रदर्सच्या इमारती-लांकडाच्या कारखान्यामधील कामगारांनींदेखील संप पुकारला. अशा रीतीनें हीं संपाची लाट देशभर पसरवून तिची अखेर देशव्यापी सार्वत्रिक संपा-मध्यें परिणति करून, ब्रह्मी सरकारचें राज्ययंत्र बंद पाडावयाचें असा सत्तासंपादनाचा कार्यक्रम साम्यवाद्यांनीं योजल्याचें स्पष्ट दिसूं लागलें. थकीन नूंच्या सरकारनें ही योजना हेरून संपाची लाट अधिक पसरण्या-पूर्वींच प्रतिबंधक उपाय जारी केल्यामुळें सार्वत्रिक संपाची योजना यशस्वी होऊं शकली नाहीं. " दडपशाहीच्या वरवंट्याखालीं ब्रह्मदेशामधील बहुजन-समाजाला चिरडून टाकून ब्रह्मदेशामधील ब्रिटिश साम्राज्यवाद्यांचें व भांडवलवाल्यांचें आसन थकीन नूंच्या सरकारला स्थिर करावयाचें आहे " अशी टीका थान तून यांनीं यावेळीं रंगूनमध्यें भरलेल्या एका जाहीर सभेंत केली. ब्रह्मी सरकारनें साम्यवाद्यांच्या धरपकडीचें सत्र सुरू केलेलें पाहतांच पोलिसांच्या हातावर तुरी देऊन थान तून रंगूनमधून निसटले. सार्वत्रिक संपाची योजना फसतांच ब्रह्मी साम्यवादी ब्रह्मदेशाच्या जगविख्यात जंगलांत निघून गेले व तेथून त्यांनीं थकीन नू सरकारविरुद्ध गनिमी युद्ध सुरू केलें.

फासापालाच्या सर्वसाधारण कार्यकर्त्यांचें मतपरिवर्तन करून, त्यांच्या दडपणामुळें एकतर फासापालाच्या थकीन नू-प्रभृति पुढाऱ्यांना आपल्या ( साम्यवादी ) पक्षाबरोबर एकजूट करणें भाग पाडावयाचें, किंवा तें शक्य नच झाल्यास, आपणांशीं एकजूट करण्यास अनुकूल असणाऱ्या फासा-पालाच्या अनुयायांना फासापालामधून फुटून निघून आपणांस सामील होण्यास उद्युक्त करावयाचें, असा ब्रह्मी साम्यवाद्यांच्या नीतीच्या डाव-पेंचांचा दुहेरी उद्देश होता. जहाल क्रांतिवादाकडे सहज आकृष्ट होण्या-सारखे फासापालाच्या पी. व्ही. ओ. ( पीपल्स व्हॉलंटियर ऑर्गनायझेशन ) व युवकसंघ यामधील तरुण कार्यकर्ते हेंच साम्यवाद्यांच्या या प्रचारमोहीमेचें ' लक्ष्य ' होतें. ब्रह्मदेश नांवाला स्वतंत्र झाला असला, तरी ब्रह्मदेशावरील

ब्रिटिश साम्राज्यवाद्यांचें आर्थिक व लष्करी वर्चस्व थकीन नूंनीं अॅटलीं-बरोबर केलेल्या अँग्लो-ब्रह्मी तहानें अबाधित राखलेलें आहे, या प्रचाराचा फासापालाच्या अनुयायांमधील युयुत्सुवृत्तीच्या, व आँग सानच्या तालमींत लढाऊ साम्राज्य-विरोधाचें बाळकडू मिळालेल्या या तरुणवर्गाच्या मनावर प्रभाव पडणें सुलभ होतें; आणि तसें झालेंही !

फासापालाची संघटना अभंग राहिली तरच येऊं घातलेल्या नव्या वादळामधून ब्रह्मी राजकारणाचें तारूं यशस्वी रीतीनें पार पाडतां येईल, याची थकीन नू प्रभृतींना जाणीव होती. त्याचप्रमाणें ब्रह्मदेशांत अमलांत आणावयाच्या आर्थिक कार्यक्रमाच्या बाबतींत फासापाला व ब्रह्मी साम्य-वादी पक्ष यांच्यामध्यें तात्त्विक मतभेद नसल्यामुळें, स्वतः थकीन नूही शक्य झाल्यास साम्यवाद्यांबरोबरचे मतभेद मिटविण्यास उत्सुकच होते. फासा-पालाची संघटना अभेद्य राहून वर साम्यवाद्यांचेंदेखील सहकार्य मिळूं शकलें, तर ब्रह्मदेशामधील पुनर्रचनेचें बिकट कार्य अधिक जलद गतीनें व यशस्वी रीतीनें पार पाडणें शक्य होईल, असेंही ब्रह्मी पंतप्रधानांना वाटत होतें. त्यामुळें दिनांक १३ जून १९४८ रोजीं पंतप्रधान थकीन नु यांनीं एक पंधरा कलमी योजना आंखून ब्रह्मी साम्यवाद्यांना एकजूट करण्यासाठीं जाहीर आवाहन केलें. थकीन नूंच्या या भाषणामुळें इंग्लंड-अमेरिकेसारख्या लोकशाहीवादी राष्ट्रांत बरीच खळबळ उडाली, व ब्रह्मदेश रशियाच्या गोटांत शिरणार कीं कसें, अशी भीति त्या देशांच्या अधिकारी वर्तुळामधून प्रकटरीत्या व्यक्त करण्यांत आली.

थकीन नूंच्या मूळ ब्रह्मी भाषेंतल्या भाषणाचें भाषांतरित इतिवृत्त रंगवून पाठविण्यांत आलें असल्याचा अधिकृत खुलासा झाल्यानंतर जगांतल्या लोकशाही राष्ट्रांच्या परराष्ट्रीय खात्यांमध्यें त्या वक्तव्यामुळें उडालेली खळबळ कमी झाली, तरी या प्रतिक्रियेचा असा परिणाम झाला, कीं थकीन नूंची ऐक्य-योजना फासापालाच्या कार्यकारी मंडळापुढें विचारार्थ आली असतां, तिच्यांतलें मार्क्सवादाच्या प्रचारासंबंधींचें कलम वगळून ती स्वीकारण्यांत आली.

अशा रीतीनें " पातळ " करण्यांत आलेल्या योजनेनें फासापालामधील

ऐक्योत्सुक तरुण कार्यकर्त्यांचें समाधान झालें नाहीं. या मुद्द्यावर पी. व्ही. ओ. संघटनेंत दोन तट पडले. त्यामधील ऐक्योत्सुकांचें नेतृत्व बो ला यांग यांच्या-कडे असून, फासापालाच्या कार्यकारिणीच्या नीतीस पाठिंबा असणाऱ्यांचे नेते त्या संघटनेचे अध्यक्ष बो ह्मू ऑंग हे होते. बो ला यांग गटाचें म्हणणें असें होतें कीं, नू-सरकारविरुद्ध बंडाचा झेंडा उभारणाऱ्या साम्यवाद्यांशीं फासापाला-साम्यवादी एकजूट स्थापन करण्याबद्दल विचारविनिमय करण्या-साठीं फासापालानें वर्तुळ परिषद बोलावावी. परंतु त्यांची ती मागणी मान्य न झाल्यामुळें पी. व्ही. ओ.मधील बो ला यांग गट बाहेर पडला. फासापालामधून फुटून निघालेल्या पी. व्ही. ओ. नें आपल्या गणवेषावर पांढरी फीत लावण्यास प्रारंभ केला, तर फासापालाशीं एकनिष्ठ राहिलेले पिवळी फीत लावूं लागले. या फाटाफुटीनंतर या दोन्ही गटांचे पी. व्ही. ओ.-वाले अनुक्रमें "पांढरी फीतवाले पी. व्ही. ओ." व "पिवळी फीतवाले पी. व्ही. ओ." म्हणूनच संबोधिले जाऊं लागले.

या घटनांचा एकाद्या दारूच्या कोठारावर ठिणगी पडण्यासारखाच परिणाम झाला. ऑंग साननें परिश्रमपूर्वक उभारलेल्या फासापालाची सुंदर संघटना दुभंगली. फासापालामधून बाहेर पडल्यानंतर पांढरी फीतवाल्या पी. व्ही. ओनें बंडाचा झेंडा उभारतांच ब्रह्मी सरकारच्या लष्करामधील एक हजार सैनिकांची 'तिसरी पलटण' आपल्या शस्त्रांनिशीं त्यांना मिळाली! स्वायत्त 'करीनिस्ताना'साठीं चळवळ करणाऱ्या असंतुष्ट करीनांनींदेखील ही संधि साधून घेतली. करीनांची बंडाळी सुरू होतांच, ब्रह्मी सरकारच्या लष्करामधील करीनांचाच भरणा असलेली एक हजार सैनिकांची 'दुसरी पलटण' बंडखोर करीनांना जाऊन मिळाली. थकीन सो यांच्या लाल बावटेवाल्या साम्यवादी पक्षानें तर या घटनांपूर्वीच जंगलाचा आसरा घेऊन खेड्यापाड्यांत गनिमी युद्ध चालविलें होतें. भरीला ब्रह्मी समाजवादी पक्षामधील संधिसाधु म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गटानेंही पांढऱ्या फीतवाल्यांच्या पावलांवर पाऊल टाकून अनुकरण केलें, आणि ब्रह्मी अल्पसंख्यांकांपैकीं मोणवंशीयांचा गट व आराकानी मुसलमान यांनींही बंडाळी सुरू करून या 'वाहत्या गंगे'मध्यें हात धुऊन घेण्याची संधि साधली!

ब्रह्मदेशामध्यें सुरू झालेली यादवी अशी अनेकरंगी असल्यामुळें ब्रह्मदेशांतील घडामोडींविषयीं वृत्तपत्रांत अधून मधून प्रसिद्ध होणारें त्रुटित स्वरूपाचें वृत्त वाचल्यावर सामान्य हिंदी वाचकास ब्रह्मी परिस्थितीविषयीं कांहींच बोध न होतां, अनेक लहानमोठ्या आघाड्यांवर चालू असलेलें हें अनेकरंगी यादवी युद्ध साहजिकच एकाद्या 'ब्रह्मघोटाळ्या'सारखें वाटूं लागलें.

थकीन नू सरकारविरुद्ध बंड पुकारलेल्या या अनेक गटांपैकीं (१) थकीन थान तून यांचा श्वेतध्वजधारी (स्टालिनवादी) ब्रह्मी साम्यवादी पक्ष, (२) थकीन सो यांचा लालबावटेवाला साम्यवादी पक्ष, (३) पांढरी फीतवाले पी. व्ही. ओ. आणि (४) करीन नॅशनल युनियन व करीन नॅशनल डिफेन्स ऑर्गनायझेशनचे करीनिस्तानवाले करीन, हे चारच गट खरे सामर्थ्यसंपन्न असून, बाकीचे संख्येनें व बलानें कमकुवत असल्यामुळें, त्यांच्या बंडाळीचें यशापयश बंडखोरांमधल्या या चार मातबर गटांच्या बंडाच्या यशापयशावर अवलंबून होतें.

या सर्व बंडखोरांनीं ब्रह्मदेशाच्या एकूण भूविस्तारापैकीं शेंकडा चाळीस टक्के विस्तारावर आपलें वर्चस्व प्रस्थापित केलें. उरलेला साठ टक्के भूप्रदेश थकीन नू सरकारच्या ताब्यांत राहिला असला, तरी लष्करी डावपेंचांच्या दृष्टीनें महत्त्वाचा असलेला ब्रह्मदेशाचा मध्यप्रदेश बंडखोरांच्या हातीं गेल्यामुळें, बंडखोरांचें पारिपत्य करणें ब्रह्मी सरकारला कठीण जाऊं लागलें; त्याचप्रमाणें, बंडखोरांनीं न व्यापिलेल्या प्रदेशाशीं दळणवळण ठेवणें दुरापास्त झाल्यामुळें, त्या प्रदेशावरील राज्यकारभार व्यवस्थितपणें चालविणेंही अशक्य झालें. राजधानीपासून केवळ बारा मैलांच्या अंतरावर असलेलें इन्सीन शहरदेखील करीन बंडखोरांच्या हातीं पडलें होतें! थकीन नूंच्या सरकारला या परिस्थितीमुळेंच ब्रह्मदेशाबाहेर "रंगून सरकार" असें संबोधण्यांत येऊं लागलें होतें!

ब्रह्मी सैन्याचे सरसेनापति जनरल स्मिथ डुन हे स्वतः करीन असल्यामुळें करीनांचें बंड सुरू होतांच त्यांनीं आपल्या अधिकाराचा राजीनामा दिला. सरकारनें पोलिस-दलामधील, त्याचप्रमाणें सैन्यामधील बंडांत सामील न

झालेल्या करीनांचीं शस्त्रें काढून घेतलीं. यावेळच्या परिस्थितीचें वर्णन करतांना ब्रह्मी पार्लमेंटपुढें केलेल्या भाषणांत स्वतः पंतप्रधान थकीन नू यांनींच असे उद्गार काढले कीं, " आपलें लष्कर, पोलिसदल व मंत्र्यांचा नोकरवर्ग भ्रष्ट झालेला आहे. पोलिसांना, त्याचप्रमाणें खेड्यापाड्यांतल्या नागरिकांना आत्मरक्षणासाठीं वांटण्यांत आलेल्या शस्त्रांपैकीं दहा हजार शस्त्रें बंडखोरांच्या हातीं पडलीं ! " याच वेळीं ब्रह्मी सरकारचे तीस हजार मुलकी नोकरही संपावर गेले. अशा प्रकारें सर्व बाजूंनीं कोसळलेल्या सर्व प्रकारच्या संकटपरंपेरमधून थकीन नूंचें सरकार कसें काय निभावून निघतें, याकडे जगाचें लक्ष लागलें होतें.

थकीन नूंनीं प्रथम करीनांशीं तडजोड करून त्यांना बंडखोरांपासून अलग करण्याचा प्रयत्न करून पाहिला. ब्रह्मी सरकारनें नेमलेल्या रीजनल अटॉनॉमी कमिशननें ब्रह्मी प्रजासत्ताकाचें घटक असलेलें स्वायत्त करीन राज्य निर्माण करण्याच्या कल्पनेला तत्त्वतः मान्यता दर्शविली होती. पार्लमेंटमध्यें भाषण करतांना थकीन नूंनींही असें जाहीर केलें, कीं " असें प्रजासत्ताकांतर्गत करीन राज्य स्थापन करण्यास आपण केव्हांही तयार आहोंत. मात्र ब्रह्मी प्रजासत्ताकापासून विभक्त होऊन संपूर्णपणें स्वतंत्र असें करीन राज्य प्रस्थापित करण्याचा प्रयत्न कोणी केल्यास आम्हीं त्याचा प्रतिकार करण्याचा ठाम निर्धार केला आहे. मग त्यासाठीं आम्हांला साम्रसंगीत यादवी युद्ध खेळावें लागलें, तर तो धोकादेखील पत्करण्याचें आम्हीं ठरविलें आहे." असेंही थकीन नूंनीं त्याचबरोबर ठांसून सांगितलें.

करीन नॅशनल युनियनचे अध्यक्ष सॉ बा यूजी यांच्याशीं थकीन नूंनीं १९४९ च्या जानेवारीअखेर तडजोडीचीं बोलणींही सुरू केलीं. तीं चालू असतांच, करीन नॅशनल यूनियनच्या करीन नॅशनल डिफेन्स ऑर्गेनायझेशनच्या जहाल लढवय्यांनीं बंडाळीचा डोंब उसळवून दिला. जानेवारीच्या ३० तारखेस ज्यावेळीं रंगूनमध्यें सरकार व करीन नॅशनल यूनियन यांचे प्रतिनिधी तडजोडीसाठीं वाटाघाटी करीत होते, त्यावेळीं रंगूनच्या पश्चिमेस सत्तर मैलांवर असलेल्या बसीन या महत्त्वाच्या शहरांतील रस्त्यारस्त्यांत करीन नॅशनल डिफेन्स ऑर्गेनायझेशनचे बंडखोर व ब्रह्मी सरकारचे सैनिक

यांच्यांत हातघाईची लढाई चालू होती! करीन नॅशनल यूनियनच्या "मवाळ" पुढाऱ्यांचा सरकारशीं तडजोड करण्याचा चालू असलेला प्रयत्न हाणून पाडण्याच्याच उद्देशानें डिफेन्स ऑर्गेनायझेशनच्या कार्यकर्त्यांनीं नेमके त्याच वेळीं बंडाचा भडका उडविला. आणि त्यांत त्यांना अपेक्षेप्रमाणें यश आलेंही; कारण जवळजवळ यशस्वी होण्याच्या बेतांत आलेलीं हीं तडजोडीचीं बोलणीं या बंडाळीमुळें फिसकटलीं! तीं फिसकटल्यावर करीन नॅशनल युनियनच्या "मवाळ" गणलेल्या पुढाऱ्यांनाहीं बंडखोरांना सामील होण्याखेरीज अन्य मार्ग उरला नाहीं. अखेर १९४९ च्या जून महिन्यांत बंडखोर करीनांनीं तांगू येथें स्वतंत्र सार्वभौम करीन राज्य स्थापन केल्याची घोषणा केली. करीन आपल्या राज्यास "चा थू ले" असें संबोधीत असत, व या राज्यानें ब्रह्मी भूप्रदेशापैकीं चाळीस हजार चौरस मैलांचा विस्तार असलेला भूभाग व्यापिला असल्याचा त्यांचा दावा होता. तांगू ही या "चा थू ले" ची राजधानी व करीन नॅशनल युनियनचे अध्यक्ष सॉ बा यू जी हेच त्या सरकारचे प्रधान मंत्रि होते. या सरकारनें आपलें स्वतंत्र रेडिओ केंद्रदेखील स्थापन केलें होतें.

बंडखोरांपैकीं पांढऱ्या फितीच्या पी. व्ही. ओं. नीं ब्रह्मदेशाचा सर्वांत मोठा भूभाग व्यापण्यांत यश मिळवलें. प्रोम हें या पी. व्ही. ओ. बंडखोरांचें मुख्य केंद्र असून ब्रह्मदेशाचा शेंकडा वीस टक्के प्रदेश त्यांच्या वर्चस्वाखालीं गेला. पी. व्ही. ओ.च्या ताब्यांत गेलेल्या या प्रदेशांत सीकवा, मिंचिला, थारावादी, हेंझादा, प्येये, मिंबू यांसारखीं महत्त्वाचीं केंद्रें असून, तो प्रदेश तांदूळ, सोनें, कोळसा, पेट्रोलियम यांच्या समृद्धीबद्दल प्रसिद्ध व म्हणून अत्यंत महत्त्वाचा; पी. व्ही. ओ.च्या या बंडांत सहा हजार पी. व्ही. ओ. स्वयंसेवक सामील झाले असून, ब्रह्मी लष्कराच्या तिसऱ्या पलटणीचे एक हजार सशस्त्र सैनिकही त्यांना सामील झाले. खेरीज आपण व्यापलेल्या प्रदेशांतील तरुणांमधून पी. व्ही. ओं.नें दीड हजार स्वयंसेवकांचें एक दुय्यम दर्जाचें साहाय्यक पथकही उभारलें. पी. व्ही. ओ. स्वयंसेवक गनिमी युद्धांत तरबेज असून, त्यांच्याजवळ जपानी

व ब्रिटिश रायफली, ऑटोमॅटिक स्वरूपाचीं शस्त्रें, ग्रेनेड्स्, छोटे बॉम्ब्स् यांसारखा शस्त्रसंभार असून, कांहीं जीप्स् व मालवाहतुकीच्या लॉरीजही होत्या.

करीन बंडखोरांच्या ताब्यांत प्रामुख्यानें करीनांची वस्ती असलेला शेंकडा बारा टक्के भूभाग होता. यांत ब्रह्मदेशाचें 'तांदुळाचें कोठार' म्हणून विख्यात असलेला प्रदेशही समाविष्ट असल्यामुळें, ब्रह्मदेशाच्या दृष्टीनें त्यास असलेलें महत्त्व लक्षांत येण्यासारखें आहे. करीन नॅशनल डिफेन्स ऑर्गनायझेशनचे चार हजार सशस्त्र स्वयंसेवक असून, त्यांना ब्रह्मी लष्करांतील एक हजार करीन सैनिकांची दुसरा तुकडी सशस्त्र सामील झाली. या बंडखोरांत ख्रिश्चन करीनच बहुसंख्य असून, ते ब्रिटिशधार्जिणे असल्याचा आरोप बहुसंख्य ब्रह्मी लोक नेहमींच करीत आलेले आहेत. करीन बंडखोरांना ब्रिटिश व अमेरिकन प्रतिगाम्यांची चिथावणी असल्याचा आरोपही ब्रह्मी राष्ट्रवाद्यांनीं वारंवार केलेला आहे. त्याचा ब्रिटिश व अमेरिकन गोटांमधून इन्कार करण्यांत आल्यानंतरही ब्रह्मी राष्ट्रवाद्यांचा या बाबतींतला संशय पूर्वीइतकाच अद्यापही दृढ आहे. एकूण करीन समाजांत ख्रिश्चन अल्पसंख्य असून ख्रिश्चनेतरांचा थकीन नू सरकारला पाठिंबा आहे, असा करीन यूथ ऑर्गनायझेशन व करीन बुद्धिस्ट्स् युनियन या प्रतिस्पर्धी संस्थांचा दावा होता. बहुसंख्य खिस्तेतर करीन करीनिस्तानवाल्यांच्या बंडापासून अलिप्त राहिले, व त्यांपैकीं पुष्कळांनीं थकीन नू सरकारला प्रत्यक्षाप्रत्यक्ष साह्यच केलें, यावरून त्याचें प्रत्यंतरही आलें.

थकीन थान तून यांच्या श्वेतध्वज साम्यवादी पक्षानें ब्रह्मदेशाच्या भूभागापैकीं शेंकडा पांच टक्के प्रदेश व्यापला. या पक्षाजवळ एकूण तीन हजार सशस्त्र गनीमी सैनिक-स्वयंसेवक असून, त्यांच्यापैकीं फक्त एक हजारांजवळच रायफली व इतर आधुनिक स्वरूपाचीं शस्त्रें होतीं. बाकीच्यांपाशीं गांवठी बंदुका, तरवारी व भाले हींच आयुधें होतीं. पांढऱ्या फितीच्या पी. व्ही. ओ.नीं व्यापलेल्या प्रदेशाच्या ईशान्य सरहद्दीस लागूनच साम्यवादी-व्याप्त भूभाग होता. पी. व्ही. ओ.बरोबर संगनमत करून थान तून यांनीं 'संयुक्त आघाडी' उभारली, व थान तूनच्या नेतृत्वा-

खाली प्रोम येथें प्रतिस्पर्धी सरकारची स्थापनाही करण्यांत आली.

थकीन सो यांच्या जहाल लालबावटावाल्या साम्यवादी पक्षानें तीन टक्के प्रदेश व्यापला असून, त्या पक्षाच्या गनिमी सैनिकांची संख्या हजाराच्या आसपासच असावी. त्यांच्याजवळ शस्त्रास्त्रांची कमतरताच. मोगवंशीय बंडखोरांची संख्या चारशें असून आराकानी मुसलमान बंडवाल्यांपाशीं दोन-सवादोनशें गनिमी सैनिक होते. त्यांच्याजवळ गांवठी बंदुका, तरवारी व भाले यांसारखीं जुनाट स्वरूपाचींच शस्त्रें असल्यामुळें दळणवळणाच्या दृष्टीनें अगदीं बाजूस असलेल्या आराकान प्रांताच्या पश्चिम भागांत लुटालूट करण्यावरच त्यांना समाधान मानून घ्यावें लागलें.

ब्रह्मी बंडखोरांच्या सर्व गटांचे मिळून जवळजवळ सोळा-साडेसोळा हजार गनिमी सैनिक ब्रह्मी सरकारविरुद्ध लढत होते. बंडापूर्वी ब्रह्मी सरकारच्या लष्करांत एकूण सात हजार सैनिक होते. त्यांपैकीं हजार सैनिकांची दुसरी पलटण करीनांना व तितक्याच सैनिकांची तिसरी पलटण पांढरी फीतवाल्या पी. व्ही. ओ. ना सामील झाल्यावर, ब्रह्मी लष्करांत पांच हजार सैनिक उरले. त्यांत चीन व कचीनवंशीयांचाच विशेष भरणा असून, कांहीं अधिकारी शानवंशीय होत. याशिवाय, शान संस्थानाच्या सावबांजवळ स्वतःचें एकूण तीन हजार सैनिक असणारें लष्कर असून, चिन व कचीन प्रदेशांत एक हजार शस्त्रधारी पोलीस होते. बर्मा टेरिटोरियल फोर्सचे ५,२५० सैनिक निरनिराळ्या जिल्ह्यांच्या केंद्रस्थानीं ठेवण्यांत आलेले होते. त्यांखेरीज एक हजार युनियन मिलिटरी पोलीस, चार हजार शस्त्रधारी 'बर्मा पोलीस' व तीन हजार "शस्त्रधारी रंगून पोलीस" ब्रह्मी सरकारजवळ होते. अशा प्रकारें बंडाच्या प्रारंभा ब्रह्मी सरकारजवळ निरनिराळ्या दलांचे मिळून २३,७५० लढवय्ये होते.

ब्रह्मी लष्कराजवळचा तोफखाना अगदींच छोटेखानी ! कमी वजनाच्या व मध्यम आकाराच्या आर्टिलरीज व मॉर्टर्स; वापरून जुने झालेले बारा रणगाडे, व बावीस आर्मर्ड गाड्या ही ब्रह्मी लष्कराची सामुग्री ! ब्रह्मी सरकारचें आरमारदेखील असेंच चिमुकलें. "मायु" या नांवाचें एक फ्रिगेट, वीस गन् बोटी आणि पंधरा सशस्त्र मचवे ( लाँचेस् ) इतका या नाविक-

दलाचा संरजाम ! आणीबाणीच्या प्रसंगीं शस्त्रसज्ज करून उपयोगांत आणणें शक्य झालें असतें, असे आणखी फारतर शंभर मचवे सरकार जमवूं शकलें असतें. ब्रह्मी नाविक-दलांत दोनशें सैनिक असून, रंगून नेव्हल व्हॉलंटियर रायफल्स् या स्वयंसेवक-दलांत तीन-साडे तीनशें नौ-स्वयंसेवक शिक्षण देऊन तयार करण्यांत आले होते. ब्रह्मदेशाचें विमानदलही असेंच छोटेसें. त्यांत तीन स्पिटफायर्स, दोन बॉंबर्स् व बारा डकोटा विमानांचा समावेश होई.

या यादवीयुद्धाच्या ग्रहणामधून नवजात ब्रह्मी प्रजासत्ताक लौकर मुक्त व्हावें, अशी उत्कट इच्छा ब्रह्मदेशाच्या सर्वच मित्रराष्ट्रांना होती. या गंडांतरामधून पार पडण्याच्या कामीं थकीन नू सरकारला साह्य करण्याच्या उद्देशानें हिंदुस्थानचे महामंत्री श्री. जवाहरलाल नेहरू यांनीं ब्रिटिश राष्ट्रकुलांतील राष्ट्रांच्या प्रतिनिधींची एक अनौपचारिक परिषद दिल्लीस भरविली होती. त्या परिषदेंत त्या विषयीं चर्चा झाल्यानंतर कोलंबोस राष्ट्रकुलांतील परराष्ट्रमंत्र्यांची जी परिषद झाली, तिच्यांतही ब्रह्मी सरकारला साह्य करण्याच्या योजनेवर विचार करण्यांत आला. राष्ट्रकुलांतील राष्ट्रांनीं ब्रह्मी सरकारच्या चलनास बळकटी आणण्यासाठीं साठ लक्ष पौंडांचें कर्ज थकीन नू सरकारला दिलें. त्याखेरीज, ब्रिटिश व हिंदुस्थान सरकारांनीं मिळून ब्रह्मदेशाकडून खरीदावयाच्या तांदुळाच्या पोटीं पन्नास लक्ष रुपयांचें आणखी कर्जही त्या सरकारला दिलें.

दिनांक जुलै १९, १९४९ रोजीं सेनापति ऑंग सानप्रभृति हुतात्म्यांच्या दुसऱ्या पुण्यतिथीच्या प्रसंगीं पंतप्रधान थकीन नु यांनीं एक वर्षांत ब्रह्मदेशामधील बंडाळी मोडून पुन्हा शांतता प्रस्थापित करण्याचा ब्रह्मी सरकारचा निर्धार जाहीर केला. ही शांततामोहीम संघटित रीतीनें चालविण्यासाठीं थकीन नूंनीं प्रत्येक जिल्ह्यांत शांतता समिती स्थापन केली. फासापालानें सर-चिटणीस ऊ बा स्वे व परराष्ट्रमंत्री ऊ चा नीन यांच्या नेतृत्वाखालीं राष्ट्रभर प्रचारमोहीम सुरू केली. ब्रह्मदेशामधील वृत्तपत्रांनींही प्रसिद्धि व नभोवाणी मंत्रि ऊ तून पे यांच्या स्फुरणानें तिला साथ दिली.

या प्रचार मोहीमेच्या साह्यानें राष्ट्रांत अवश्य तें वातावरण तयार होत असतांच, बंडखोरांविरुद्ध लष्करी आघाडी उघडण्याच्या तयारीस सरकार

लागलें. ब्रिटन व हिंदुस्थान या देशांकडून शस्त्रास्त्रें व इतर युद्धसाहित्य मिळविण्यांत आलें. त्याचप्रमाणें इटालियन तज्ञांच्या साह्यानें खुद्द ब्रह्मदेशामध्येंही शस्त्रास्त्रांची निर्मिती करण्यांत आली.

रंगून व मंडाले यांमधील मार्गावरील तांगू शहर बंडखोर करीनांच्या ताब्यांत असल्यामुळें रंगून ही राजधानीच दळणवळणाच्या दृष्टीनें अलग पडल्यासारखी झाली होती. खेरीज, तांगू ही करीन बंडखोरांच्या 'सरकार'ची राजधानी असल्यामुळें तांगूचा पाडाव करणें हाच त्यांचें नीतिधैर्य खचविण्याचा परिणामकारक मार्ग होता. तसेंच, ब्रह्मदेशाचें तांदुळाचें कोठार म्हणून प्रसिद्ध असलेल्या हेंझादा जिल्ह्यांतही करीन बंडखोरांचें प्राबल्य असून, रंगून-हेंझादा जलमार्गही त्यामुळें रोखला गेला होता. तांदुळाची निर्यात करणें ब्रह्मदेशाची आर्थिक तंगी कमी करण्याच्या दृष्टीनें अवश्य होतें. तांदुळाच्या निर्यातीबद्दलचे परराष्ट्रांशीं ब्रह्मी सरकारनें केलेले करार पार पाडल्यास परदेशांत ब्रह्मी सरकारबद्दल विश्वास निर्माण झाला असता. त्याचप्रमाणें खुद्द ब्रह्मदेशामधील जनतेमध्येंही नीतिधैर्य व विश्वास निर्माण होण्यास त्याचें साह्य होणार होतें. म्हणून या सर्व दृष्टींनीं विचार करतां, तांगू सर करून, हेंझादा विभागामधून करीन बंडखोरांची हकालपट्टी करून, रंगून-मंडाले मार्ग व रंगून-हेंझादा जलमार्ग प्रथम मोकळा करण्याचें ब्रह्मी सरकारनें ठरविलें.

करीन बंडखोरांना बंडांत प्रारंभींच मिळालेल्या यशामुळें आपल्या सामर्थ्याविषयीं फाजील विश्वास वाटूं लागला होता. त्यामुळें सहज संरक्षण करतां येईल, इतक्या मर्यादित क्षेत्रांतच आपली शक्ति केंद्रित न करतां, दक्षिण व उत्तर शान संस्थानांच्या मुलखांतही आपले हातपाय पसरविण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. परंतु ब्रह्मी सरकारच्या लष्करानें करीनव्याप्त प्रदेशावर हल्ला सुरू करतांच शान संस्थानांमधील करीनांचा प्रतिकार कोसळून पडला, व दक्षिण शान संस्थानाची राजधानी तांजी न लढतांच ब्रह्मी लष्कराच्या हातीं पडली ! नंतर करीनांच्या "चा थू ले" राज्याची राजधानी तांगू सर करण्यासाठीं ब्रह्मी लष्करानें उत्तर व दक्षिण अशा दोन दिशांनीं हल्ला चढविला. रंगून-तांगूमधील मार्ग बंडखोरांच्या हातीं असल्यामुळें रंगूनशीं

विमानमार्गानेंच दळणवळण शक्य होतें, व तांगूविरुद्ध लष्करी मोहीम सुरू करण्याच्या मार्गांत ती एक मोठीच अडचण होती. परंतु " चा थु ले " सरकारजवळ विमानें नव्हतीं. त्यामुळें ब्रह्मी लष्करानें लष्करी विमानांच्या जोडीस या कामासाठीं खाजगी प्रवासी विमानें घेऊन हल्ला सुरू केला, तेव्हां चा थु ले सरकारचा प्रतिकार लंगडा पडला, व अखेर अभेद्य गणलें गेलेलें तांगू शहर पडलें! तांगू पडतांच, ब्रह्मी यादवी युद्धाचें पारडें अपेक्षेप्रमाणें थकीन नू सरकारच्या बाजूस फिरलें, करीन बंडखोरांचें नीतिधैर्य खचलें; त्यांच्याजवळची शस्त्रसामुग्री झपाट्यानें संपूं लागली, व अधिक सामुग्री मिळविणें अशक्य झाल्यामुळें, त्यांच्या अडचणींत आणखीच भर पडली. ब्रह्मदेशाचे तेव्हांचे नायब पंतप्रधान व ब्रह्मी लष्कराचे सर-सेनापति ने विन यांनीं करीनव्याप्त प्रदेशामधील मोक्याचीं शहरें एकामागून एक सर करण्याचा कार्यक्रम लष्करास आंखून दिला, व त्याप्रमाणें लष्कराची " ब्लिट्झ क्रीग " सदृश मोहीम सुरू होतांच, करीनांच्या ताब्यांतलीं शहरें भराभर पडूं लागलीं. एप्रिलमध्यें तांगू पडतांच, करीन बंडखोरांची दाणादाण उडाली; आणि करीनांचा पाडाव होतांच, पांढऱ्या फितीचे पी. व्ही. ओ., दोन्ही जातींचे साम्यवादी व इतर चित्रविचित्र बंडखोर गट यांच्यातही ब्रह्मी लष्कराचा प्रतिकार करून, व्यापलेला प्रदेश आपल्या ताब्यांत ठेवण्याचें सामर्थ्य उरलें नाहीं आणि १९ जुलै १९५० पर्यंत ब्रह्मदेशामधील बंडाचा मोड करून शांतता प्रस्थापित करण्याची प्रतिज्ञा परिपूर्ण करण्यांत थकीन नू सरकार यशस्वी झालें.

त्यानंतर ऑगस्टमध्यें बंडखोर करीनांचे नेते सॉ बा यू जी हे त्यांना अटक करण्यासाठीं गराडा घालणाऱ्या ब्रह्मी सरकारच्या सैनिकांशीं झालेल्या झटापटींत मारले गेल्यामुळें करीनांचा उरला सुरला प्रतिकारही संपुष्टांत आला.

ब्रह्मदेशामधील यादवी युद्धांत ब्रह्मी सरकारविरुद्ध लढणाऱ्या सर्व गटांमध्यें लष्करी सामर्थ्याच्या व प्रत्यक्ष प्रतिकार साधनसामुग्रीच्या दृष्टीनें करीन व पी. व्ही. ओ. हेच अधिक प्रबळ होते. परंतु राजकीय दृष्ट्या त्यांच्यांतला सर्वांत महत्त्वाचा गट म्हणजे साम्यवाद्यांचा होय. ब्रह्मी सरकारची लष्करी मोहीम सुरूं होतांच करीन, पी. व्ही ओ. प्रभृतींची

दाणादाण उडाली, याचें कारण म्हणजे फाजील आत्मविश्वासाला बळी पडून त्या गटांनीं ब्रह्मी लष्कराशीं समोरासमोर सामना दिला, आणि आपला सर्वनाश ओढवून घेतला, हें थकीन थान तून प्रभृति साम्यवादी नेत्यांनीं चाणाक्षपणें हेरलें. इतर बंडखोर गटांचा पराभव होत असलेला बघतांच, साम्यवाद्यांनीं पी. व्ही. ओ.बरोबरची आपली प्रत्यक्ष लष्करी गट्टी मोडली, आणि मध्य ब्रह्मदेशामधील इरावती व छिंदविन या नद्यांच्या दुआबांतल्या दाट जंगलांच्या आश्रयाला ब्रह्मी साम्यवादी आपल्या निवडक गनिमी सैनिकांसह गेले.

अशा प्रकारें बंडखोर गटांचा सामुदायिक प्रतिकार संपल्यानंतर ब्रह्मी सरकार देशांत शांतता आणि सुव्यवस्था प्रस्थापित करण्याच्या कार्यास दुप्पट जोरानें लागलें. पी. व्ही. ओ., करीन प्रभृति गटांच्या बंडखोरांनीं सरकारनें जाहीर केलेल्या मुदतींत आपल्याजवळचीं शस्त्रास्त्रें मोठ्या प्रमाणावर सरकारच्या स्वाधीन केलीं. त्यांच्यापैकीं कांहीं लोक देशांत निरनिराळ्या भागांत विखुरलेले असून त्यांचा उपद्रव अजूनहि तुरळक स्वरूपांत होत असतो. तोही नाहींसा करण्यास अर्थातच बराच कालावधि लागणें ब्रह्मदेशामधील विशिष्ट परिस्थितीमुळें अपरिहार्य आहे.

दुसऱ्या महायुद्धामध्यें ब्रह्मदेशांत झालेल्या अपरंपार संहारामुळें झालेल्या नुकसानीचें वर्णन यापूर्वीच्या एका प्रकरणांत केलेलेंच आहे. त्यांत या यादवी युद्धानें आणखी भर घातली! ही यादवी मोडण्यासाठीं ब्रह्मी सरकारला रु. १६० कोटींचा खर्च सोसावा लागला, आणि १९५०–५१ मध्यें रु. ९० लक्षांची तूट आली. या परिस्थितीमुळें ब्रह्मी सरकारला आपल्या उत्पन्नामधील शें. सेहेचाळीस टक्क्यांइतका खर्च लष्करावरच करावा लागत आहे!

याप्रमाणें परिस्थिति निवळतांच ब्रह्मी सरकारनें सार्वत्रिक निवडणूक करण्याचें ठरविलें. अजूनही ग्रामीण विभागामधील ज्या भागांत बंडखोरांच्या गनिमी टोळ्यांचा उपद्रव चालू आहे, तो निवडणुकीमधून वगळण्यांत आला होता. निवडणुकी शांततेनें पार पाडण्याच्या कामांत त्यांच्याकडून अडथळा आणण्यांत येईल हें हेरून, त्या व्यवस्थित रीतीनें पार

पाडणें शक्य व्हावें, यासाठीं सरकारनें ब्रह्मदेशांतल्या सर्वच मतदार संघातल्या निवडणुकी एकाच वेळीं न घेतां, हप्त्याहप्त्यानें पार पाडल्या.

सन १९५२ च्या प्रारंभीं स्वातंत्र्यप्राप्तीनंतर तब्बल चार वर्षांनंतर अशा रीतीनें ब्रह्मदेशांतील सार्वत्रिक निवडणूक पार पडून, स्वतंत्र ब्रह्म-देशाचें पहिलें निवडून आलेलें सरकार अधिकारावर आलें. यादवीमुळें निर्माण झालेल्या विशिष्ट परिस्थतीमुळें ब्रह्मी समाजवादी पक्षाचें फासापाला-मधील वर्चस्व पूर्वापेक्षां अधिकच वाढलें. त्यामुळें फासापालाच्या वतीनें सार्वत्रिक निवडणुकीसाठीं उभ्या केलेल्या उमेदवारांत त्या पक्षाचे सदस्यच बहुसंख्य होते. निवडणुकींत फासापालास घसघशीत बहुमत मिळाल्यावर ब्रह्मी पार्लमेंटमध्येंही त्यांचें बहुमत झालें असून, मंत्रिमंडळांतही समाजवादी पक्षाच्या सदस्यांचेंच बहुमत आहे. पंतप्रधान थकीन नु यांच्यासारखे कांहीं स्वतंत्र वृत्तीचे नेते त्यांत असले, तरी आज ब्रह्मी सरकार व त्या सरकारमागील शक्ति–फासापाला–या दोहोंचींही सूत्रें समाजवादी पक्षाच्याच हातांत आहेत.

यादवी मोडल्यानंतर ब्रह्मदेशांत वाढत्या प्रमाणावर प्रस्थापित होत असलेल्या शांततेमुळें होणाऱ्या प्रगतीचें प्रतिबिंब ब्रह्मदेशाच्या आयात-निर्यात व्यापारासंबंधींच्या परिस्थितींत दिसून येतें. सन १९४९-५० मध्यें ब्रह्मदेशामधून एकूण रु. ६६ कोटींचा माल निर्यात झाला होता. तर ५०-५१ मध्यें रु. ९९ कोटींचा माल निर्यात झाला. ब्रह्मदेशच्या निर्यात व्यापारांत सर्वांत महत्त्वाची चीज म्हणजे तांदूळ. सन १९४९-५० मध्यें रु. ५८ कोटींचा तांदूळ ब्रह्मदेशानें निर्यात केला, तर १९५०–५१ मध्यें रु. ७६ कोटींच्या तांदुळाची निर्यात झाली. याच काळांत इमारती लांकूड, कमाविलेलें व न कमाविलेलें कातडें; कच्चें रबर, कापूस व खनिज द्रव्यें इत्यादींची निर्यातही रु. ५ कोटींवरून रु. १६ कोटींवर गेली. या सुधारणेमुळें परकी हुंडणावळीच्या संबंधांतली ब्रह्मदेशाची परिस्थितीही उत्तरोत्तर सुधारली. सन १९५१ च्या मार्चमध्यें परकी हुंडणावळीचे रिझर्व्ह रु. ६६ कोटींचे होते, ते १९५२ मध्यें रु. ८१ कोटींचे झाले.

फासापालाच्या राष्ट्रीय कार्यक्रमांत व ब्रह्मी प्रजासत्ताकाच्या राज्यघटनेंत

ज्यावर विशेष भर देण्यांत आलेला आहे, त्या राष्ट्रीयीकरणाच्या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसही ब्रह्मी सरकारनें प्रारंभ केला आहे. शेतीच्या राष्ट्रीयीकरणाच्या पंचवार्षिक कार्यक्रमाचा प्रारंभ यादवी सुरू होण्याच्या थोडा काळ आधींच करण्यांत आला होता. परंतु यादवीमुळें त्या कामीं विशेष प्रगति होऊं शकली नाहीं. राष्ट्रीयीकरण करतांना द्यावयाच्या नुकसानभरपाईची रक्कम निश्चित करणें व तदनुषंगिक इतर गोष्टी पार पाडण्यासाठीं नॅशनलायझेशन कमिशन प्रस्थापित करण्यांत आलेलें आहे.

दळणवळणाच्या साधनांत सर्वांत अधिक महत्त्व असलेल्या जलमार्गावरील दळणवळणाचें राष्ट्रीयीकरण झालेलें आहे. जंगलांतल्या इमारती लाकडें वगैरे संपत्तीचें राष्ट्रीयीकरण झालें असून, त्यासाठीं स्टेट टिंबर बोर्डाची स्थापना करण्यांत आली आहे. भूगर्भांतील तेलें वगैरे संपत्तीच्या उत्पादनाचेंहि राष्ट्रीयीकरण करण्यांत यावयाचें असून, त्या दिशेनें टाकण्यांत आलेलें पहिलें पाऊल म्हणून त्या क्षेत्रांत आज बर्मा ऑईल कंपनी व बर्मा कॉर्पोरेशन या दोन ब्रिटिश कंपन्यांचे एक-तृतीयांश भाग विकत घेऊन ब्रह्मी सरकार त्यांचें भागीदार बनलें आहे. परंतु या बाबतींत लक्षांत ठेवावयाची महत्त्वाची गोष्ट म्हणजे ब्रह्मदेशामधील राजकीय पक्षांमध्यें अंतर्गत राष्ट्रीय कार्यक्रमासंबंधीं विशेष महत्त्वाचा असा तात्त्विक स्वरूपाचा मतभेद नाहीं. मतभेद आहे तो मुख्यतः परराष्ट्रीय नीतीसंबंधीं.

नूचें सरकार व फासापाला आणि ब्रह्मी समाजवादी पक्ष यांचें परराष्ट्रीय धोरण अँग्लो-अमेरिकन किंवा रशियन यापैकीं कोणत्याही गटांत सामील न होतां, स्वतंत्र नीति अनुसरण्याचें आहे. नूचे पं. नेहरूंशीं असलेले स्नेहसंबंध सर्वश्रुतच आहेत. परराष्ट्रीय राजकारणाच्या क्षेत्रांत ब्रह्मी सरकार भारताच्या सहकार्यानेंच वागत असतें.

युद्धपूर्व काळांतल्या उजव्या पक्षांना पुन्हा डोकें वर काढण्यास अनुकूल संधीच उरलेली नाहीं. उ सॉनें आँग सान प्रभृतींचा खून करून राज्यसत्ता बळकावण्याचा अयशस्वी प्रयत्न केला, व नंतर त्यांना त्यांच्या सहकाऱ्यांसह त्या आरोपावरून फांशीं देण्यांत आल्यानंतर त्यांच्या पक्षाचें 'पुनरुत्थान' अशक्यच झालें आहे. यादवी शमून ब्रह्मी साम्यवादी जंगलाच्या आसऱ्याला

गेले असले, तरी त्या पक्षाची विशेष म्हणण्यासारखी हानि झालेली नाहीं. त्या प्रयत्नांत साम्यवादी अयशस्वी झाले असले, तरी आज ब्रह्मी राजकारणांत ब्रह्मी साम्यवादी पक्ष हाच विरोधी पक्ष आहे. फासापाला व ब्रह्मी समाजवादी पक्ष यांच्यांत बेबनाव आणि फाटाफूट घडवून आणण्याच्या बाबतींत ब्रह्मी साम्यवादी पक्ष यशस्वी झालेला आहे, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. यादवी युद्धाच्या प्रारंभीं त्यांनीं पी. व्ही. ओ.मध्यें फूट पाडली, युवक संघटनेमध्यें तडा पडला. आतां यादवी युद्धांत अयशस्वी होऊनही खुद्द ब्रह्मी समाजवादी पक्षांतच दुफळी माजविण्यांत साम्यवादी यशस्वी झाले आहेत !

राष्ट्रीय एकजुटीचें तुणतुणें वाजविण्यास साम्यवाद्यांनीं पुन्हा प्रारंभ करून, ब्रह्मदेशांत संयुक्त सरकार स्थापन करावें अशी सूचना केली असतां, ती मान्य करावी, व आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या क्षेत्रांत स्वतंत्र धोरण न ठेवतां रशियाच्या गटाशीं सहकार्य करावें, असें ब्रह्मी समाजवाद्यांमधील एक गट प्रतिपादन करूं लागला. आपल्या पक्षांत बहुमत अनुकूल करून घेण्यांत त्यांना यश न आल्यामुळें, हा गट समाजवादी पक्षामधून फुटून निघाला, व ब्रह्मी शेतकरी-कामगारपक्ष या नामाभिधानाचा स्वतंत्र पक्ष त्यांनीं स्थापन केला. हा पक्ष हीच भूमिगत ब्रह्मी साम्यवादी पक्षाची कायदेशीर आघाडी असून, डॉ. बा मांचा महाबामा पक्ष, पीपल्स युनायटेड पार्टी, पीपल्स पीस फ्रंट इत्यादि पक्ष व संघटनाची संयुक्त आघाडी त्या पक्षाच्या झेंड्याखालीं उभारण्यांत आलेली आहे.

ब्रह्मी पंतप्रधान थकीन नु हिंदुस्थानांत आले असतां, पत्रकारांना दिलेल्या मुलाखतींत त्यांनीं असें सांगितलें कीं, आजच्या ब्रह्मी सरकारलाच ब्रह्मदेशांतल्या बहुजनसमाजाचा पाठिंबा असून, ब्रह्मी जनता साम्यवादी पक्षास पाठिंबा देत नाहीं. त्यामुळें निवडणुकीमध्यें आपणांस यश मिळणार नाहीं, याची त्यांना जाणीव होती व आहे, म्हणूनच साम्यवादी पक्षानें हिंसामार्गाचा अवलंब केला आहे. बंडखोरांची सध्यांची संख्या चार-पांच हजार असून ते देशांत ठिकठिकाणीं विखुरलेले आहेत. त्यांचें संपूर्ण पारिपत्य करण्याच्या मार्गांतली एकमेव अडचण म्हणजे आमचें लष्कर अवश्य तेवढें मोठें नाहीं, हीच असून त्या दिशेनें प्रयत्न करण्यांत येत

आहे, असेंही त्यांनीं सांगितलें. तसेंच चीनच्या साम्यवादी सरकारकडून बंडखोर साम्यवाद्यांना साह्य मिळालें नाहीं, व त्यांचे ब्रह्मी सरकारशीं स्नेहाचेच संबंध आहेत, असेंही ते पुढे म्हणाले.

शांततामय व लोकशाही मार्गानें ब्रह्मदेशांत समाजवादी व्यवस्था स्थापन करण्यांत थकीन नूंच्या नेतृत्वाखालीं फासापाला व समाजवादी पक्ष यांच्या चालू असलेल्या प्रयत्नाच्या यशापयशावरच ब्रह्मदेशाचें राजकीय भवितव्य अवलंबून आहे. आशियाचा प्रश्न हा प्रामुख्यानें शेतकरी समाजाचा प्रश्न आहे. चीनमध्यें झालेल्या साम्यवादी क्रांतीमुळें सर्व जगाच्याच राजकारणांत क्रांतिकारक परिवर्तन घडवून आणलें असलें, तरी तिचे पडसाद आशियाई राष्ट्रांत विशेष उमटणें स्वाभाविकच आहे. त्यांतल्या त्यांत ब्रह्मदेशाच्या राजकारणावर या घटनेचे परिणाम विशेष दूरगामी होण्याचा संभव होण्याचा संभव आहे.

चीनभोंवतीं आपल्या मांडलिक राज्यांचें कडें उभारून, साम्यवादी चीनची नाकेबंदी करण्याचा अमेरिकेचा व्यूह आहे, असा चीनचा दावा आहे. यासंबंधींच्या लष्करी डावपेचांत ब्रह्मदेशाला विशेष महत्त्व आहे. कारण ब्रह्मदेशावर प्रभुत्व गाजविणाऱ्या सत्तेला मलाया व सिंगापूर आपल्या प्रभुत्वाखालीं आणतां येतात; त्याचप्रमाणें चीनच्या प्रशान्त महासागरावरील बंदरांची नाकेबंदी करण्यांत आल्यास, चीनला ब्रह्मदेश मार्ग ( बर्मा रोड ) हाच एकमेव रस्ता उरतो, हें दुसऱ्या महायुद्धांत सिद्ध झालेलें आहे. चीनच्या दृष्टीनें संरक्षणाच्या ब्रह्मदेशास येवढें महत्त्व असल्यामुळें, आंतरराष्ट्रीय परिस्थिति उत्तरोत्तर अधिक तंग होत जाईल, त्या प्रमाणांत चीनचें ब्रह्मदेशावरील प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष दडपणही वाढत जाण्याचा असलेला संभवही दृष्टीआड करतां येणार नाहीं.

पंतप्रधान थकीन नु यांनीं आतांपर्यंत ज्या कौशल्यानें ब्रह्मदेशाची नौका हांकारली, त्यावरून अशी आशा वाटूं लागते, कीं ती सुरक्षितपणें पैलतीरास नेऊन पोंचाविण्याच्या कार्यांत ते यशस्वी होतील.

८०५४

• • •

# मंदी असो वा तेजी असो

सुसंस्कृत गृहस्थास विमा हा घ्यावाच लागतो. मंदीच्या दिवसांत काय करावें तर, सुरुवातीस वय ६५ मुदतीचा, बिन नफ्याचा, पश्चातचा, असा अत्यल्प हप्त्याचा विमा घ्यावा. पांच वर्षांनीं मंदीची लाट पूर्णपणें ओसरल्यावर, तोच विमा वय ५५ मुदतीचा, नफ्याचा, हयातींतील असा बदलून घ्यावा.

**वेस्टर्न इंडियाचा हप्ता सर्वांत कमी**

**वय २५ ला, दर हजारीं, अवघे रु. २२-१२-०**

आपण आपली जन्मतारीख कळवून माहिती मागवा.
शाखाधिकारी आनंदानें पुरवितील.

**मुंबई शाखा**

वेस्टर्न इंडिया हाऊस, सर फेरोजशहा मेथा रोड, फोर्ट.
टे. नं. २६९०५

**वेस्टर्न इंडिया विमा कंपनी लि., सातारा.**

# पैशाचा दुहेरी उपयोग !




काटकसरीचा संसार करून जो कांहीं थोडाबहुत पैसा शिल्लक उरेल, तो सोन्याच्या दागिन्यांत गुंतविणें हेंच शहाणपणाचें होय. कारण, दागिन्यानें सौंदर्यांत भर पडतेच, पण शिवाय वाटेल त्यावेळीं कोणाच्याही मदतीशिवाय अडचणीच्या प्रसंगीं सोन्याचा दागिना संग्रहीं असल्यास पैसा उभा करतां येतो. अशा खालीच्या दागिन्यां-करितां आमची पेढी कित्येक वर्षें प्रसिद्ध आहे.

—गेल्या वर्षींच रौप्यमहोत्सव साजरा झालेली—

## वामन गणेश हरचेकर,

**सोन्याचांदीची व जवाहिराची पेढी.**

टे. नं. ६०४२८ दादर, मुंबई नं. २८

## संसाराचा गाडा सुस्थितींत चालवायला
# सतत बचतीचें वंगण हवें.

संसारी जीवनास सुरुवात झाली कीं, खर्चाचा व्याप सतत वाढत असतो. मिळवणाराची मिळकत बहुधा ठराविक, पण खर्चाला मात्र अनेक. मिळवलेली सर्व कमाई रोजच्या खर्चासाठीं संपली, तर सण–समारंभ, अहेर–देणग्या, आजार–प्रवास यांसारख्या प्रासंगिक आणि आकस्मिक प्रसंगीं दीनवाणें व्हावें लागतें. म्हणून प्रत्येक संसारी व्यक्तीनें थोडथोडी शिल्लक ही टाकलीच पाहिजे.

**न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया लि.** या शेड्यूल्ड बँकेंत तुमचें सेव्हिंग खातें सुरू करण्यानें हरघडी येणाऱ्या प्रासंगिक व आकस्मिक खर्चाची तरतूद करतां येते. मुंबई व उपनगर यांतून या बँकेच्या सध्यां सात शाखा असून महाराष्ट्राचे इतर भाग, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, दिल्ली व पूर्व पंजाब मिळून एकंदर अठेचाळीस शाखा आहेत. तुम्हांला बँकेंत खातें उघडावयाचें असेल, तर आपल्या नजीकच्या न्यू सिटिझन बँकेच्या शाखा–व्यवस्थापकांना भेटा. तुम्हांला योग्य तो सल्ला व जरूर ती सर्व माहिती आनंदानें दिली जाईल.

# न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया लि.

**विठ्ठलदास चेम्बर्स, अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई १**

**शाखा :** गिरगांव, क्वीन्स रोड, झवेरी बझार, दादर, माटुंगा, शीव व विलेपार्ले. शिवाय महाराष्ट्राचे इतर भाग, मध्य प्रदेश, गुजरात, उत्तर प्रदेश, दिल्ली व पूर्व पंजाब यातून एकेचाळीस शाखा आहेत.

क्वीन्स रोड शाखेचे इमारतींत बँकेचे सेफ डिपॉझिट व्हॉल्ट असून माफक दरानें लॉकर्स मिळूं शकतात.

अधिक माहितीसाठीं लिहा:—

द. दा. देशपांडे
मॅनेजिंग डायरेक्टर

REFBK 0008054

REFBK-0008054

## संसाराचा गाडा सुस्थितींत चालवायला
## सतत बचतीचें वंगण हवें.

संसारी जीवनास सुरुवात झाली कीं, खर्चाचा व्याप सतत वाढत असतो. मिळवणाराची मिळकत बहुधा ठराविक, पण खर्चाला मात्र अनेक. मिळवलेली सर्व कमाई रोजच्या खर्चासाठीं संपली, तर सण–समारंभ, अहेर–देणग्या, आजार–प्रवास यांसारख्या प्रासंगिक आणि आकस्मिक प्रसंगीं दीनवाणें व्हावें लागतें. म्हणून प्रत्येक संसारी व्यक्तीनें थोडथोडी शिल्लक ही टाकलीच पाहिजे.

**न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया लि.** या शेड्यूल्ड बँकेंत तुमचें सेव्हिंग खातें सुरू करण्यानें हरघडी येणाऱ्या प्रासंगिक व आकस्मिक खर्चाची तरतूद करतां येते. मुंबई व उपनगर यांतून या बँकेच्या सध्यां सात शाखा असून महाराष्ट्राचे इतर भाग, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, दिल्ली व पूर्व पंजाब मिळून एकंदर अठ्ठेचाळीस शाखा आहेत. तुम्हांला बँकेंत खातें उघडावयाचें असेल, तर आपल्या नजीकच्या न्यू सिटिझन बँकेच्या शाखा–व्यवस्थापकांना भेटा. तुम्हांला योग्य तो सल्ला व जरूर ती सर्व माहिती आनंदानें दिली जाईल.

## न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया लि.
### विठ्ठलदास चेम्बर्स, अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई १

**शाखा :** गिरगांव, क्वीन्स रोड, झवेरी बझार, दादर, माटुंगा, शीव व विलेपार्ले. शिवाय महाराष्ट्राचे इतर भाग, मध्य प्रदेश, गुजरात, उत्तर प्रदेश, दिल्ली व पूर्व पंजाब यांतून एकेचाळीस शाखा आहेत.

क्वीन्स रोड शाखेचे इमारतींत बँकेंचे सेफ डिपॉझिट व्हॉल्ट असून माफक दरानें लॉकर्स मिळूं शकतात.

अधिक माहितीसाठीं लिहा :—

द. दा. देशपांडे
मॅनेजिंग डायरेक्टर